

# स्मरणफुले...

दत्त आपटे यांच्याविषयी
आठवणींचे संकलन

आधीच्या पिढ्यांतील कित्येकांनी मोठे कर्तृत्व केले असले तरी त्याविषयी फारसे लिहून ठेवलेले नाही. दत्त आपटे यांच्या बाबतीत तसेच घडले आहे. त्यांच्या रोजनिशीत प्रामुख्याने कामासंबंधीची टिपणे आहेत. त्यांतून सहज सलग घटना समजून घेता येत नाहीत. दत्त आपटे यांच्याविषयीच्या आठवणी संग्रहित करण्याची जी मूळ कल्पना होती, त्यासंबंधी भेटीगाठी सुरू झाल्यावर लक्षात आले की, बहुतेक सर्वांनाच मनस्वी जिव्हाळ्यातून दत्तोपंतांविषयी खूप काही सांगायचे आहे.

ते त्यांचे सांगणे या आठवणींतून 'ऐकता' येईल. ज्यांच्या आयुष्यक्रमात दत्तोपंतांचा काही ना काही भाव-प्रभाव आहे, अशांच्या मुलाखतींनी या आठवणी जागविल्या आहेत. सुमारे अर्धशतकाचा दत्त आपट्यांचा भराचा कालखंड मागे पडला. अर्थातच त्याविषयी सांगणारी सगळी माणसेही आता संध्याछायेत आहेत. त्यांपैकी काहीजण लेखन झाल्यानंतर कालवश झाली आहेत.

त्या सर्वांच्या स्मरणांतून दत्त आपटे यांचे प्रेरक व चैतन्यमय व्यक्तिमत्व पुढच्या कित्येक पिढ्यांसमोर उभे राहील. त्यांनी स्वत:च एका पत्रात म्हटल्याप्रमाणे 'पैसा कोणीही मुलाबाळांसाठी ठेवतील, पण दोन पिढ्यांना पुरेल एवढी प्रतिष्ठा अर्ध्या शतकात निर्माण करणे ही मानवी जीवनाची खरी कृतार्थता आहे.' दत्तोपंतांची मृत्यूघटिका काहींनी निवेदन केली आहे; त्या क्षणी ती कृतार्थता त्यांना नि:संशय असेल, असे या विविध आठवणींवरून वाटते.

सांगलीच्या जीवनात दत्तोपंत-विनायकराव या आपटे बंधूंना वेगळे स्थान होते. त्यांच्या अंतरीचा परस्पर भाव दर्शविणारे झुकत्या वयातील छायाचित्र येथे दिले आहे.

*विविध क्षेत्रांतील अनेक व्यक्तींना भेटून त्यांचे कथन शरद आपटे यांनी शब्दांकित करून आठवणींच्या रूपाने संग्रहित केले. अशा मुलाखतींच्या वेळी कित्येकजण कृतज्ञतेने भावनावश झाले होते; त्यांतून सत्यांशाचा भाग पारखून तो येथे समाविष्ट केला आहे. काहींनी लेखरूपाने आठवणी दिल्या. त्याही संपादित करून घेतल्या आहेत.*


| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सर्वगामी दत्तोपंत | १६० |
| २ | अनुक्रम | १६२ |
| ३ | मान्यवरांची मनोगते | १६३ |
| ४ | माजी विद्यार्थी व शिक्षक | १६५ |
| ५ | सामाजिक क्षेत्रातील सहकारी | २१५ |
| ६ | नातलग | २२६ |
| ७ | अन्य | २४५ |

## सर्वगामी दत्तोपंत

-गो.ना.आपटे

सन १९४२-४३ सालची गोष्ट. एका व्रतबंध समारंभासाठी मी किर्लोस्करवाडीहून सांगलीस गेलो होतो. तो समारंभ आटोपल्यावर विनायकराव व दत्तोपंताची भेट घेण्यासाठी मी घरी गेलो. माझे पाऊल घरात पडले मात्र, पाठोपाठ पोलिसांची धाड घरावर पडली. ब्रिटिश राज्य उलथून टाकण्यासाठी साऱ्या देशभर त्यावेळी जितक्या तीव्र स्वरूपाचा उठाव झाला होता, तितकीच - किंबहुना अधिकच - सरकारी दडपशाही तीव्र होती. सुक्या बरोबर ओलेही जळत होते.

अशा या कल्लोळात, दत्तोपंत स्वस्थ राहातील, हे शक्य नव्हते, आणि तसा सुगावा लागल्यानेच पोलिस घरात घुसले होते. इकडे किर्लोस्करवाडीतही बहुधा दर दिवशी पोलिसांची मग्रूर हडेलहप्पी चालू असल्याने मला हा प्रसंग नवा किंवा भीतीप्रद वाटत नव्हताच, पण हे प्रकरण आता दत्तोपंतांवर किती शेकणार, याबद्दल चिंता वाटू लागली. झडती सुरू होऊन कपाटे-खिडक्या, कोनाडे, अडगळी व तिजोरी धुंडाळण्यात आली. ज्या भिंतीतील एका कमानीत तिजोरी होती त्या कमानीत, डाव्या अंगच्या कोनाड्यात दत्तोपंतांनी हस्तगत केलेले एक पिस्तुल होते. सुदैवाने पोलिसांना ते मिळाले नाही. काही सटरफटर वस्तू - दत्तोपंतांवर आळ घालण्याइतपत पुरावा म्हणून - पोलिसांनी जप्त केल्या. आमच्या माजघरातील एका भिंतीत अंबार काढलेले होते. 'हवे तर हे अंबार शोधून पहा,' असे थोड्या खवचटपणे मी पोलिस अधिकाऱ्यास म्हटले; पण या पराक्रमी साहेब-बहादुरास ते धारिष्ट्य झाले नाही. नंतर ही केस, त्यावेळचे सांगली सिटी पोलिस इन्स्पेक्टर राजाभाऊ काळे यांच्याकडे पेश करण्यात आली. कर्मधर्मसंयोगाने राजाभाऊ माझे परम स्नेही होते, त्यांनी दत्तोपंतावर आलेले हे किटाळ मोठ्या कौशल्याने शमविले.

दत्तोपंताच्या बालवयातच वडिलांचे छत्र नाहीसे झाल्याने आमच्या कुटुंबावर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगाचे वर्णन शब्दांनी करता येण्यासारखे नाही. वडिलांच्या पश्चात, केवळ त्यांच्या पुण्याईच्या बळावरच आम्ही सर्व बंधू आपापल्या पायावर नेकीने उभे राहू शकलो, हे खरे आहे. पण दत्ता-विनायकाचं त्यावेळचं बालवय लक्षात घेता, त्यांनी दाखविलेली मनाची तयारी, व घेतलेले व्रत दृढ संकल्पाने तडीस नेण्याची जिद्द, क्वचितच आढळणारी आहे यात शंका नाही. कुटुंबाचा भार वडील बंधूंवर पडला, आणि त्यांचे शिक्षण पुरे होताच कर्नाटकात शिरहट्टीसारख्या दूरच्या ठिकाणी त्यांना नोकरीवर जावे लागले. यामुळे विनायकराव दत्तोपंताचे शिक्षण तडीस लागण्यासारखी कोणतीच अनुकूलता नव्हती. त्या दोघांचे आम्ही त्रिवर्ग वडील बंधू, पण प्रत्येकजण स्वत:च्या विवंचनेत; आईचा प्रेमळपणा हाच काय तो मुख्य आधार! या आधाराबरोबरच स्वत:ची धैर्यशील वृत्ती, स्वाभिमानी स्वभाव, प्रसंगी स्वार्थावर लाथ मारून कुणालाही मदतीचा हात द्यावा असा संस्कार

आम्हा भावंडांवर होता. विनायकराव बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले, दत्तोपंत त्या मार्गावर थांबले होते. विधायक सार्वजनिक कार्याच्या पूर्व संकल्पानुसार त्यांनी लवकरच 'प्रताप हायस्कूल' ही शिक्षणसंस्था पांजरपोळ इमारतीत चालू केली. सध्याच्या 'श्री. गणपतराव आरवाडे हायस्कूल'मध्ये त्या संस्थेचे रूपांतर झाले; आजचे त्याचे भव्योदात्त स्वरूप हे दत्तोपंतांच्या प्रदीर्घ व निरपेक्ष प्रयत्नांचे फळ आहे. निरलसता व कर्तव्यबुद्धी तर यामागे आहेच पण दत्तोपंतांनी स्वार्थाकडे कधी ढुंकूनही पाहिलेले नाही, हेही निर्विवाद!

या त्यांच्या निरलसतेसंबंधी एक खासगी बाबही येथे नमूद करण्यासारखी आहे. आमचे मेव्हणे अ.गो. ताम्हनकर हे १९३२ साली प्लेगने निवर्तले. मृत्यूपूर्वी थोडेच दिवस त्यांनी आपल्या लाखोभराच्या जिंदगीचा ट्रस्ट केला होता. त्यानुसार वार्षिक उत्पन्नाचा दहा आणे हिस्सा पत्नीस, म्हणजे आमची बहीण अंबूताई हिला - मिळावयाचा होता. पण ताम्हनकरांच्या माघारी ट्रस्टींकडून इस्टेटीची आबाळ होऊ लागली. त्यांच्या हेतूंबद्दल संशय वाटू लागला. तीन ट्रस्टींचा एकत्र विचार व एकवाक्यता होऊन, अंबूताईस निर्वाहाचे साधन प्राप्त होण्याचा योगच दुर्मीळ दिसू लागला. मग दत्तोपंत पुढे सरसावले. कोर्ट कचेरी आणि थोडे दबावतंत्रसुद्धा होऊन अंबूताईची जिंदगी मोठ्या अंशाने तिच्या हाती आली. तिच्या तीन्ही मुलींसह अंबूताईचा योगक्षेम निर्वेध चालेल अशी सर्व तजवीज दत्तोपंतानी करून दिली. तिला पतीवियोगाच्या दारूण दु:खाचाही, दत्तोपंत-विनायकरावांच्या सान्निध्यात विसर पडला. अंबूताईच्या मृत्यूनंतर तिची रोकड शिल्लक व चीजवस्तू दत्तोपंतानी तिच्या तिघी मुलींच्या हवाली केली. या कर्तव्यभावनेतून व कौटुंबिक जिव्हाळ्यातून दत्तोपंतानं नव्या पिढीच्या मनातही आपलं स्थान निर्माण केलं आहे. भाचे, पुतणे असा आमचा परिवार मोठा पण सर्वांशी दत्तूकाका हसत खेळत, थट्टा विनोद करीत असलेले जितके दिसतात, तितकेच सर्वजण त्यांना वचकून असतात.

दत्तोपंतांना धनाची जोड सहजशक्य असूनही करता आली नाही. सार्वजनिक कार्यात, व्यवहारात, सरकार दरबारापासून मी मी म्हणणाऱ्या सर्वांची मने त्यांनी स्वत:च्या निरपेक्ष वृत्तीने काबीज केली आहेत. अजातशत्रू ही उपाधी त्यांना सार्थ ठरेल. त्यांच्या या योग्यतेचा मलाही एकदा अनुभव आला, तो असा - जमीन व्यवहाराच्या एका प्रकरणात, सद्गृहस्थ म्हणविणाऱ्या एका व्यक्तीने मला गोविले. प्रकरण कोर्टात तर गेलेच होते, पण तिथे स्वत:ची लंगडी बाजू उघड होऊन कब्जा शेकणार, असा रंग दिसू लागल्याने हे गृहस्थ मध्यस्थीसाठी दत्तोपंतांच्या कानी लागले. समाधानाची गोष्ट अशी की, हे प्रकरण सामोपचाराने निकालात निघाले. या जमिनीत मालकी हक्काने मी आजही नांदत आहे. दत्तोपंतांच्या सर्वगामी स्वभावाची यावरून मला कल्पना आली.

औद्योगिक व्यवसाय, कामगार चळवळी, सार्वजनिक व सहकारी क्षेत्रे, संस्था, कायदेविषयक अभ्यासपूर्ण सल्ला अशा प्रत्येक बाबतीत दत्तोपंताचा पुढाकार असतो. त्याबरोबरच शाळेचा प्रचंड व्याप दत्तोपंत कसा सांभाळीत असतील, हे त्यांनाच माहीत! निदान नवी कामे तरी त्यांनी अंगावर घेऊ नयेत, हा माझा हितोपदेश ते खुशाल गुंडाळून ठेवतील. नव्या नव्या प्रेरणा त्यांना मिळत असतातच. ही तडफ त्यांना मिळालेल्या बाळकडूत सापडू शकेल.

आम्ही बंधू विभक्त दिसतो व तसे आहोत हे खरेच! पण आम्हा सर्वांत निर्व्याज बंधुप्रेम नांदत असून, विशेषत: माझ्या अडीअडचणींत या दोघांही धाकट्या भावांच्या बहुमोल साहाय्याचा मला जो लाभ मिळतो, ती मला कधीही न फिटणारी अशी ठेव आहे! आई वडिलांचे छत्र नाहीसे झाल्यावर, वडील भावावर जी जबाबदारी येते ती पार पाडण्यास मी असमर्थ ठरलो, ही हुरहूर - ही टोचणी माझ्याच मनाला लागून राहाते.

चाळीस वर्षांच्या व्यक्तिगत व सामाजिक खडतर तपश्चर्येनंतर, सुमारे १५० वर्षांच्या मोडकळीस आलेल्या वडिलार्जित वास्तूस, उभयता बंधूंनी नवे टुमदार स्वरूप दिलेले पाहून मलाही आनंदाचे भरते येते. वाडवडिलांचे आशीर्वाद या बंधुद्वयाच्या पाठीशी आहेत. शिवाय सांगलीच्या नागरिकांविषयी आम्हा कुटुंबियांच्या वतीने कृतज्ञ राहणे माझे पवित्र कर्तव्य ठरते.

*(लेखक : किर्लोस्करवाडीजवळ 'आपटे मळा' फुलविणारे दत्तोपंताचे थोरले बंधू. त्यांची काही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.)*

●●●

# स्मरण फुलांची ओंजळ


| नाव | पृष्ठ |
|---|---|
| काही मान्यवर | १६३ |
| बापूसाहेब पुजारी | १६४ |
| म.द.हातकणंगलेकर | १६५ |
| गजानन हुद्दार | १६७ |
| राम नलवडे | १६८ |
| न.ना.किरकिरे | १७१ |
| ब.ता.वाळवेकर | १७२ |
| डी.जे.आरवाडे | १७५ |
| मुकुंद फडणीस | १७६ |
| एच.एस. पाटील | १७७ |
| शशिकांत आरवाडे | १७९ |
| अरुण नाईक | १८१ |
| वसंत कुंभोजकर | १८२ |
| यशवंत श्रीपाद रास्ते | १८६ |
| सी.आर.(शशिकांत) फडणीस | १८८ |
| सुमन व शशिकला करंदीकर | १८९ |
| भूपाल मसाजी कांबळे | १९१ |
| शशिकला साळुंखे | १९३ |
| व्ही.डी.काळे | १९४ |
| शुभांगी जोशी | १९६ |
| पांडुरंग हरी साठे | १९६ |
| मकरंद कुलकर्णी | २०० |
| चिंतोपंत गोखले | २०४ |
| गोपाळ खाडिलकर | २०५ |
| उस्मान शिकलगार | २०५ |
| विजयकुमार प्रथमशेट्टी | २०७ |
| कोकिलाबेन शहा | २०८ |
| ना.का.साने | २१० |
| राजाराम निलकंठ | २१० |
| नारायण केळकर | २११ |
| बी.व्ही.कुलकर्णी | २१२ |
| बा.गो.नाईक | २१३ |
| जी.डी.साळुंखे | २१५ |
| चंपाताई उर्फ विजया कुलकर्णी | २१७ |
| विनायक क्षीरसागर | २१९ |
| टी.डी. लाड | २२२ |
| बिराज साळुंखे | २२४ |
| भूपाल नवले | २२५ |
| विजया पेंडसे | २२६ |
| विठ्ठल जोगळेकर | २२८ |
| अरविंद उर्फ बिंदु आपटे | २३१ |
| सुरेश आपटे | २३३ |
| शरयू सहस्रबुद्धे | २३६ |
| शैलजा वेलणकर | २३७ |
| विनया काळे | २३८ |
| अशोक गाडगीळ | २३९ |
| विष्णू गोपाळ गोखले | २४१ |
| मीना गो.कोल्हटकर | २४२ |
| रघुनाथ पटवर्धन | २४२ |
| किशोर पटवर्धन | २४३ |
| शंकरराव सटाले | २४५ |
| श्रीनिवास शिंदगी | २४६ |
| पी.जी.आपटे | २४८ |
| माधव खाडिलकर | २४९ |
| मधु आपटे | २५० |
| चारुदत्त भागवत | २५२ |
| सुलोचना बिंदुमाधव कुलकर्णी | २५३ |
| मोहन भिलवडीकर | २५४ |
| सतीश थत्ते | २५५ |
| य.शं.(बाबूराव) गाडगीळ | २५६ |
| अरुण दांडेकर | २५६ |
| प्रमोद राजदीप | २५७ |
| मंगल फाटक | २५८ |

*१९७१ साली दत्त आपटे यांना वयाची साठ वर्षे झाल्यावर सत्कार समारंभ झाला. त्यानिमित्ताने त्यावेळी प्रकाशित झालेली काही मनोगते-*

सांगली येथील शैक्षणिक क्षेत्रातील एक कार्यकर्ते व स्वातंत्र्यलढ्यातील एक उत्तम लढवय्ये म्हणून गुरुवर्य श्री. दत्तोपंत आपटे यांचा सत्कार आयोजित करणे हे अगदी योग्य आहे.

**-म. ध. चौधरी**

*(शिक्षण मंत्री, महाराष्ट्र)*

श्री. आपटे यांजकडून शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रांत आजतागायत जसे कार्य घडत आले आहे, तसेच यापुढेही घडो आणि त्यासाठी त्यांना उदंड आयुष्य आणि प्रकृति-स्वास्थ लाभो.

**-वि.स. पागे**

*(सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद)*

श्री.दत्तोपंत आपटे यांनी निरक्त उद्योग आणि नियमित राहणी यांमुळे आपली प्रकृती सुरेख व सुदृढ ठेवली आहे. त्यांच्या शाळेला मी अनेकदा भेट दिली आहे. त्यांच्या घरच्या पाहुणचाराचाही अनेकदा आस्वाद घेतला आहे. श्री.आपटे हे उत्तम शिक्षक, उत्तम गृहस्थ आणि उदात्त विचाराचे स्नेही आहेत. आपटे पुढच्या पिढीची केवळ काळजी करीत बसले नाहीत; त्यांनी आपल्या जवळ होते नव्हते ते काळजीपूर्वक पुढीलांच्या गळी उतरवले आहे. आपटे यांची निर्भय सत्यनिष्ठा आणि समर्थ राष्ट्रीय वृत्ती अल्पांशाने जरी त्यांच्या विद्यार्थीगणात उतरली असली तरी पुरे आहे.

**-ग. दि. माडगूळकर**

*(महाकवी, पटकथाकार, आमदार)*

श्री.दत्तोपंत आपटे यांनी १९४२च्या स्वातंत्र्य लढ्यात गाजविलेल्या मर्दुमकीमुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली. पुढे अनेक कामांच्या निमित्ताने परिचय वाढत गेला आणि त्यांच्याशी निकटचा स्नेह जमला. ज्यावेळी प्रतिगामी विचारांचा पगडा तरुण पिढीवर बसत होता त्यावेळी पुरोगामी समाजवादी विचार आणि सर्व धर्मांना समान मानण्याची खंबीर लोकशाही भूमिका मांडून, त्यांनी अनेक तरुणांना योग्य दिशा दाखविली आणि माझ्यासारख्या राष्ट्रसेवा दलात काम करणाऱ्या मित्रांना सर्व प्रकारचे साहाय्य केले. श्री.आपटे हे उत्तम लेखक असून War and Peace या टॉल्स्टॉयच्या जगद्विख्यात कादंबरीची कथा त्यांनी मोठ्या रसाळपणाने मराठीत कथन केली आहे. श्री.आपटे यांना भोंगळपणा आवडत नाही आणि एखादी गोष्ट मनाला पटली की ते टोकापर्यंत जाऊन तिचा आग्रह धरतात. या त्यांच्या स्वभावामुळे अनेकांचा त्यांच्याशी संघर्ष झाला. पण दत्तोपंतांनी वैयक्तिक कटुता निर्माण होऊ नये म्हणून सतत प्रयत्न केले. कृष्णाकाठी वाढलेले बलदंड व्यक्तिमत्व आणि मनमोकळा दिलदार स्वभाव यामुळे श्री.दत्त आपटे आम्हा अनेकांना प्रिय वाटतात. त्यांच्याशी गप्पा मारण्यात एक आगळाच आनंद असतो.

खंबीर पुरोगामी विचार हे श्री.दत्त आपटे यांच्याजीवनाचे अधिष्ठान आहे. विद्यार्थ्यांबद्दलचे प्रेम, साहित्याबद्दलचा जिव्हाळा आणि दलितांना निर्भयपणे व मानाने जगता यावे ही मनाची ओढ, ही दत्तोपंतांची वैशिष्ट्ये आहेत. 'मोडेन पण वाकणार नाही' या वृत्तीने समाजासाठी केलेले अपार कष्ट हे त्यांच्या जीवनाचे वैभव आहे.

**-ग. प्र.प्रधान**

*(इंग्रजीचे प्राध्यापक, समाजवादी विचारवंत, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते होते.)*

# मुले धाडसी पाहिजेत

-बापूसाहेब पुजारी

गांधीहत्त्येनंतर महाराष्ट्रात- त्यातल्या त्यात पश्चिम महाराष्ट्रात -ब्राह्मण समाजाला दोषी धरून त्यांच्यावर हल्ले झाले. मनुष्यहानी नसली तरी वित्तीय हानी फार मोठी झाली. घरादारांची राखरांगोळी झाली. या कठीण काळात दत्तोपंत ब्राह्मण समाजाच्या पाठीशी ठाम उभे राहिले. ब्राह्मण समाजाच्या गरीब मुलांसाठी सांगलीतील नदीकाठी असलेला आश्रम हे जाळपोळ करणाऱ्यांचे पहिले लक्ष्य होते. त्या जमावाला रोखण्यास दत्तोपंत आणि त्यांचे बंधू विनायकराव आडवे आले. 'गरीब पोरांच्या आश्रमाला त्रास देऊ नका' म्हणून तंबी दिली. दत्तोपंतांना जमावाने मारहाण केली. त्यांच्या डोक्याला खोक पडली. तरीही जमावाला हार मानावी लागली. ब्राह्मणांची मोठी वस्ती असलेला गावभाग जळीतातून सहीसलामत वाचला. नंतर गावातल्या इतर जळीतग्रस्तांना सरकारी मदत मिळवून देण्यात दत्तोपंतांचा वाटा मोठा होता. जळीतग्रस्तांना सरकारने आपली घरेदारे, संसार पुन्हा उभे करण्यासाठी काही रक्कम कर्जाऊ दिली. स्वतंत्र महाराष्ट्र राज्य झाले त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी सांगली दौऱ्यावर असताना ही कर्जे माफ केली. गणपतराव गोडबोले यांनी जळीतग्रस्त ब्राह्मणांचे नेतृत्व केले होते. कर्जमाफीचा सल्ला दत्तोपंतानीच यशवंतरावांना दिला. दत्तोपंतांचे यशवंतरावांशी आणि मुरारजीभाई देसाई यांच्याशी असलेले संबंध या कामी उपयोगी आले. त्या बाबतीत खासदार आबासाहेब खेबूडकरांचेही योगदान होते.

त्या काळात विद्यार्थी कोणत्याही शाळेत असला तरी, शाळेबाहेर तो अनेक शिक्षकांचा विद्यार्थी असे. आम्ही संघाचे स्वयंसेवक. पण पुरात पोहायला दत्तोपंत आणि विनायकराव या बंधूंनी आम्हाला शिकविले. मुलांच्यात धारिष्ट्य पाहिजे, हा दत्तोपंतांचा आग्रह असे. साहसी खेळात सांगलीकरांना पुरात पोहणे हा एकच फुकटचा खेळ होता. आज साहसी खेळांचे अनेक प्रकार आणि साधने उपलब्ध आहेत. जनतेकडे पैसेही आहेत. त्या काळी सगळ्याची वानवा होती. कृष्णा नदीचा पूर मोठा असे. नदी भयावह आवाज करीत असे, त्यालाच 'रोंरावत वाहणे' म्हणतात! अशा महापुरात पोहणे हे सर्व तरुणांना आव्हान असे. दत्तोपंत आणि विनायकराव असल्या पुरात आम्हा मुलांना घेऊन उतरत. गणपतीमंदिरामागे असलेला माईघाट ते सांगलीवाडी किनारा अशी नदी क्रॉस करायची आणि पुन्हा परत सांगलीच्या किनाऱ्यावरील विष्णू घाटावर लागायचे. विष्णू घाटावर एक पिंपळाचे झाड होते, त्या झाडाची भली मोठी फांदी नदीकडे झुकलेली होती. त्या फांदीवर चालत जाऊन पाण्यात उडी मारणे हे खरोखरीच कठीण आणि धाडसाचे काम होते. पावसाने ओल्या झालेल्या आणि वाऱ्यांनी गदागदा हालणाऱ्या, कोणताही आधार नसलेल्या त्या फांदीवरून चालत जावे लागे. दत्तोपंत आणि विनायकराव हे स्वत: करीत, आणि आम्हालाही करायला लावीत. विनायकरावांचा तर हातखंडा होता. ते नुसती उडी कधी मारीत नसत. उंच सूर, समरसॉल्ट असल्या चित्तथरारक कसरती ते करीत.

आम्ही त्यांचे थेट विद्यार्थी नव्हतो पण 'शाळेबाहेरील शाळे'त दत्तोपंत माझे शिक्षक होते. दत्तोपंत नगरपालिकेच्या निवडणुकीस काँग्रेस पक्षातर्फे उभे असले तरी, आम्ही संघातील स्वयंसेवक म्हणून काँग्रेसला आमचा विरोध. वास्तविक विरोधी उमेदवाराची योग्यता दत्तोपंतापुढे काहीच नसे, तरीही आम्ही संघवाले विजयी होत असू, कारण त्यांचा गावभाग हा संघाचा बालेकिल्ला. इथे हा उल्लेख करायचे कारण म्हणजे, एरवी सार्वजनिक, शैक्षणिक कामांत आम्ही एक असू; तरीही त्या राजकीय पराभवाचे उट्टे कोठे ना कोठे काढायचे असली वृत्ती दत्तोपंतांची नव्हती; आज ती सर्वत्र दिसते! तसे ठरविलेच असते तर ते सहज करू शकले असते, तितका त्यांचा वट होता. खुद्द त्यांच्या शाळेतही कट्टर संघातील शिक्षक होते.

आरवाडे हायस्कूलच्या इमारतीचे काम एकदा निधीअभावी थांबले होते. मी त्यावेळी सांगली अर्बन बँकेचा चेअरमन होतो. एक दिवस दत्तोपंत 'शाळेला कर्ज हवे आहे' म्हणून आले, तथापि सरकारी नियमानुसार आम्ही

ते देऊ शकत नव्हतो. मात्र, कोणा योग्य व्यक्तीच्या नावाने बँक मोठे कर्ज देऊ शकणार; ती रक्कम शाळेस वापरली तर आमची हरकत नव्हती. शाळेचे देणगीदार व सांगलीतील हळदीचे व्यापारी गणपतराव आरवाडे हे आमच्या बँकेचे वजनदार खातेदार होते. बँकेने हळद व्यवसायात पुढील काळात मोठी उलाढाल केली, त्याला श्रीमान गणपतराव आरवाडे कारणीभूत होते. गणपतरावांच्या नावे कर्ज घेऊन, ते त्यांनी शाळेच्या बांधकामासाठी दिले. इतकी मोठी रक्कम स्वत:च्या नावावर कर्ज काढून शाळेला द्यायचे धाडस, केवळ दत्तोपंतांच्या शब्दाखातर त्यांनी केले!

मी पत्रकार या नात्याने खूप लिखाण केले, मुलाखती घेतल्या. त्यानंतरच्या काळात अलीकडे तंत्रज्ञानाच्या खूप सुविधा आल्या. आज मी वयाच्या ९०व्या वर्षी मोबाईलमधला रेकॉर्डर वापरण्यास शिकलो, त्याचे प्रात्यक्षिक केले. यापुढील लिखाण करायला हे ॲप मी वापरू शकेन. कारण 'शीक लेकाऽ!' -हेच दत्तोपंतांचे सांगणे होते.

दत्तोपंत कामगार युनियन चालवीत. कामगारांना घरकुले बांधायला, छोट्यामोठ्या गरजा भागवायला कर्जे लागत. दत्तोपंत अशा कामगारांना घेऊन येत. दत्तोपंतांच्या शब्दाखातर अशी कर्जे आमची बँक देत असे. सांगायचे म्हणजे, त्यांतले एकही कर्ज थकित गेले नाही. दत्तोपंतांचे जीवितकार्य आज सांगलीकरांसमोर यंगमेन्स मॉडेल सोसायटी व गणपतराव आरवाडे हायस्कूल रूपात उभे आहे. राजाबाई टॉवर किंवा लंडन शहरातील बिगबेन घड्याळांशी स्पर्धा करणारी शाळेवरील भली मोठी घड्याळे, एकेकाळी सांगलीचा मानबिंदू होती. दत्तोपंतांचे कार्य तसेच आहे.

*(लेखक : ज्येष्ठ पत्रकार, सांगली अर्बन बँकेचे माजी संचालक-अध्यक्ष, सहकारतपस्वी म्हणून ओळख)*

●●●

## चेस्टनट वृक्ष

-म. द. हातकणंगलेकर

डी.एन. सरांचा मी विद्यार्थी. यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे ते हायस्कूल, आणि या सोसायटीतले सर्वात 'यंग मॅन' म्हणजे डी.एन. सर होते. एखाद्या खळाळत्या ओढ्याप्रमाणे वेग ओसंडणाऱ्या डी.एन. सरांचे खरे नाव आम्हाला बरेच दिवस अज्ञात होते. डी.एन. व व्ही.एन् हे दोन भाऊ एकदमच शाळेत आले, असे आमच्या अगोदर बरेच दिवस शाळेत वहिवाट पाडून बसलेली अनुभवी मंडळी सांगत. हे दोन भाऊ म्हणजे दोन प्रकार - शरीराने आणि वृत्तीने. व्ही. एन.- विनायकराव - म्हणजे शीत व अति सौम्य. डी.एन.शी ते फारसे बोलताना आम्हा विद्यार्थ्यांना तरी आढळत नसत. त्या दोघांच्या पोशाखातही अजिबात साम्य नसे. व्ही.एनांचा पोशाख अगदी सभ्य, चारचौघांसारखा- स्वच्छ धोतर, शर्ट, कोट, काळी टोपी, पायात वहाणा. डी. एन. हे त्यावेळी कधीमधी धोतर नेसत दुटांगी, पण त्यांनी त्यावेळी कोट मात्र घातल्याचे आठवत नाही. नेहमीचा पोशाख म्हणजे रुंद पट्टा असलेली धारदार रेघेची काहीशी आखूड खाकी किंवा स्वच्छ पांढऱ्या ड्रीलची हाफपॅन्ट, व कोपरावर एक घडी दुमडलेला खादीचा अगर तलम ड्रीलचा हाफशर्ट. पायात कधी कोल्हापुरी वहाणा; तर कधी तांबूस टोकदार बूट आणि पांढरे मोजे. टाचेत पिळलेल्या तारा असल्यासारखी त्यांची चाल ठाम, ऐटदार व आव्हानात्मक! त्यांच्या एकंदर आविर्भावात विलक्षण आत्मविश्वास ठेचून भरलेला असे. डी.एन. यांचे

व्यक्तिमत्व धडपडणारे, बहिर्मुख (Extrovert) तर व्ही.एन् यांचे संयत आणि अंतर्मुख (Introvert).

डी.एन्. यांच्या वक्तृत्वाच्याही काही आख्यायिका प्रसृत झाल्या होत्या. या वक्तृत्वाचा प्रत्यय आम्हांस व सांगलीतील जनतेस त्या तीस वर्षांत अनेकदा आला आहे. त्या दोघांच्या मर्दानी खेळाच्या - कुस्ती, पोहणे, - छंदाबद्दलही आमच्या वर्गातील काही मुले मोठ्या उत्साहाने सांगत की डी. एन. सर आमच्या खेळात मोकळेपणाने मिसळतात; आम्हांस घाटावर पोहण्यासाठी घेऊन जातात; सकाळी दहा दहा वाजेपर्यंत आमच्या बरोबर पुराच्या फेसाळत्या पाण्यात हुंदडतात व अकरा वाजता कपडे बदलून पुन्हा शाळेत हजर होतात! तालमीच्या लाल मातीत त्यांचेही गोरेपान शरीर लाल धुरकट होते आणि हे करताना काहीशी असभ्य रांगडी भाषा ते सहजपणे वापरतात. ताज्यातवान्या, उसळत्या, भरदार तारुण्याच्या साऱ्या खुणा डी.एन. सरांच्या ठिकाणी एकवटल्या होत्या.

४थीच्या वर्गाला ते इंग्रजी शिकवीत. त्यांनी शिकविलेली पहिली इंग्रजी कविता मला आजदेखील आठवते. 'Village Blacksmith' असे त्या कवितेचे नाव होते. खेडेगावातील एका महाकाय वृक्षाच्या छायेत (under a spreding Chestnut tree') एका बलदंड लोहाराने आपले दुकान थाटले आहे; ऐरणीवर ठेवलेल्या लालभडक लोखंडावर घण मारताना त्याच्या पीळदार शरीराचे रेखीव स्नायू तट्ट फुगले आहेत... -ही साधी कविता शिकविताना डी.एन. सर रंगून गेले होते. तिच्या भाषेचा जोम, मारून ठोकून निढळाच्या घामाने आपले आयुष्य घडविणाऱ्या त्या श्रमसैनिकाचा आत्मविश्वास, जीवनप्रवाहात स्वत:ला झोकून देण्याची त्याची उर्मी हे सर्व त्यांनी आमच्यापर्यंत आणून भिडविले. त्यांच्या स्वत:च्या ठिकाणी वास करणाऱ्या विजिगीषु वृत्तीशी जुळणारी अशी त्या कवितेची धारणा होती, आणि म्हणूनच ते अगदी सहजपणे त्या कवितेत बुडाले होते. आमच्याही वृत्तींना एक जबरदस्त उठाव त्यांनी प्राप्त करून दिला होता.

या कवितेने माझ्या आयुष्याला एका अर्थाने वळण लावले. इंग्रजी भाषा संपन्न, जोमदार, व प्रयत्न केला तर समजायला अतिशय सोपी, अशी जाणीव या कवितेने व ती समरसून शिकविणाऱ्या डी.एन. सरांनी नकळत माझ्या मनात रुजवून दिली असली पाहिजे. त्यामुळेच इंग्रजीचा अभ्यास करावा अशी इच्छा मला कॉलेज अभ्यासक्रम निवडताना झाली. त्यानंतर वाचायला पुस्तके आणण्याच्या निमित्ताने मी एक-दोनदा त्यांच्या घरी गेलो होतो. उठल्या-बसल्या शिक्षकांच्या घरी जाण्याची तेव्हा प्रथा नव्हती. शिक्षकांच्याबद्दल जिव्हाळा असला तरी योग्य तो धाक आपोआप पाळला जाई.

मी घरी गेलो तेव्हा माडीवरच्या खोलीत ते टेबलाशी काही लिहीत होते. टेबल लांबलचक आणि कडेला पुस्तकांची ओसंडून जाणारी रांग. थोडा वेळ विचारपूस झाली. सुंदर नकाशे असलेला एक ॲटलास घेऊन मी घरी आलो. त्यातले बरेच टिपून-बिपून घेतले, पण भूगोलाच्या पुस्तकात माझे मन रमण्यासारखे नव्हते. त्यावेळी समाजवादावरची बरीच पुस्तके त्यांच्याकडे असावीत. त्यांचा ग्रंथसंग्रह मोठा होता. त्यांच्याकडून स्टॅलिनचे चरित्र आणून वाचल्याचे स्मरते. ललित साहित्याचीही त्यांना आवड होती. वाईल्ड, डिकन्स वगैरेंच्या पुस्तकांची संक्षिप्त भाषांतरे त्यांनी हातावेगळी केली आहेत.

१९४४च्या सुमारास शाळा सुटल्यावर माझा त्यांचा विशेष संबंध राहिला नाही. त्यांचे लेखन, वक्तृत्व, समाजकार्य, राजकारण, अधूनमधून ध्यानात येई - पण लांबूनच. ते स्वस्थ राहिले नाहीत याची जाणीव मात्र सतत होती. मध्यंतरीच्या काळात गुरांचा उग्र सहवास सोडून शाळा दुसऱ्या जागेत थाटली. तिच्यासाठी जागा मिळविणे, इमारत बांधणे, सरकार दरबारी अर्ज करणे, अधिकाऱ्यांच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेणे याची सर्व सूत्रे डी.एन. सरच हलवीत होते. शाळेचे जे नवीन स्वरूप आज दिसते आहे त्याचे बरेचसे श्रेय व जबाबदारी त्यांचीच आहे. शाळा आज बहुमुखी झाली आहे. तिचे हे स्वरूप सर्व संबंधितांना रुचले असे नाही.

बदलत्या समाजाच्या व शिक्षणाच्या ज्या गरजा पुढे येत चालल्या त्यानुसार शाळेला आकार देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जे काय भलेबुरे घडले ते एका माणसाचे

कर्तृत्व आहे, अशी कबुली मात्र द्यावीच लागेल.

माझ्यासारख्या तटस्थपणे घडामोडी पाहणाऱ्या माणसाला राहून राहून वाटते (असे तटस्थ राहणे डी.एन. सरांच्या कोष्टकात बसत नाही) की, गेल्या वीस वर्षांतला आपल्या देशाचा इतिहास एकप्रवाही राहिला असता, त्यात स्वार्थ, सत्तास्पर्धा, जातीयता, संधीसाधूपणा या वृत्तींचे प्राबल्य वाढले नसते आणि त्यासाठी निष्ठेची उमेद असणाऱ्या माणसांना उघड व अप्रत्यक्षपणे भलत्या तडजोडी करावयास भाग पाडले नसते तर डी. एन. सरांचे कर्तृत्व आणखी निर्भेळ व निर्विवादपणे सिद्ध झाले असते. तथापि ही एकप्रवाही - काहीशी संथ-गती त्यांना आवडली नसती. कारण त्यांचा पिंड संघर्षात रमण्याचा आहे. माझ्या नजरेसमोर मात्र वेगळ्या परिस्थितीतले त्यांचे निराळेच चित्र उभे राहते.

*(लेखक : शाळेच्या प्रारंभकाळातील विद्यार्थी. पुढे गणपतराव आरवाडे यांचे जामात. इंग्रजी वाङ्मयाचे जाणकार, मराठीतील समीक्षक, विलिंग्डनचे प्राचार्य होते.)*

●●●

## माझे बलदंड गुरुजी

**–गजानन हुद्दार**

माझ्या माध्यमिक शालेय जीवनातले बलदंड गुरुजी म्हणजे दत्त नारायण आपटे. त्यांच्या आठवणींनी अंत:करण भरून येते. दत्तोपंतांनी सांगली येथील पांजरपोळच्या इमारतीत प्रताप हायस्कूल सुरू केले, त्या प्रताप हायस्कूलचा मी विद्यार्थी. दत्तोपंतानी माझ्यावर असे संस्कार केले की, माझे जीवन उजळून निघाले.

माझ्या मनाचा मूळ पिंड, मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल अति अभिमानी असा. बखरी, इतिहास, ऐतिहासिक कथा-कादंबऱ्या आणि नाटके यांचा माझ्या मनावर फार परिणाम होता. भावी जीवनात मी हिंदुत्वनिष्ठ संघटनेचा घटक होण्याचा संभव होता. पण इतिहास कसा अभ्यासायचा, बुद्धिवादी दृष्टीने विचार कसा करायचा, प्रत्येक घटनेची दुसरी बाजू कशी पाहायची अशा अनंत गोष्टींचे संस्कार दत्तोपंतानी केले आणि मी पक्का राष्ट्रवादी बनलो. भावी जीवनात मी अखंडपणे कॉंग्रेस पक्षाचा झालो. आज 'स्वातंत्र्यसैनिक' ही बिरुदावली स्वत:ला लावताना अभिमान वाटतो.

१९४२चा स्वातंत्र्यलढा चालू होता. लोकांना स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचे आवाहन करणारी पत्रके(बुलेटीन) काढण्याची मोलाची आणि धोक्याची जबाबदारी नेत्यांनी माझ्यावर सोपविली होती. एक छापखाना हाताशी धरून माझा तो उद्योग चालू होता, पण त्याचा सुगावा लागून सरकारने तो छापखाना जप्त केला. माझ्या कामात खंड पडला. मी दत्तोपंताना भेटलो आणि शाळेचे 'सायक्लोस्टाईल मशीन' विकत मागितले. खुद्द दत्तोपंताचा या स्वातंत्र्यलढ्याशी निकट संबंध होताच. दहशतवादी क्रांतिकारकांना स्फोटके पुरविण्याचे काम ते करीत होते. त्यांनी माझी अडचण ओळखली. विश्वासातील एखाद्या व्यापाऱ्याला घेऊन येण्यास सांगितले. त्या व्यापाऱ्याच्या नावाने शाळेचे सायक्लोस्टाईल मशीन विकत घेतल्याचे कागदपत्र तयार केले, आणि ते मशीन मला दिले.

शालेय जीवनानंतर मी राजकारण, पत्रकारिता यात शिरलो. माझ्या पत्रकारितेचे दत्तोपंतानी नेहमीच कौतुक केले. एक योग असा आला की, मी खुद्द दत्तोपंतांचा 'गुरुजी' असा उल्लेख करून स्थानिक वृत्तपत्रातून थोडीशी बोचरी टीका केली होती. अंक प्रसिद्ध झाला, सकाळी वाटला गेला. अकरा वाजता मला दत्तोपंतानी गाठले. प्रेमाने दोन

शिव्या दिल्या, पण ''तुझी टीका रास्त आहे, माझेच चुकले'' असे म्हणून माझ्याकडून चहा मागून घेतला, आणि ते सायकलवरून गेले. शालेय जीवनात मी त्यांचा लाडका विद्यार्थी होतो; पण त्यानंतरही त्यांनी तो लोभ तसाच ठेवला. माझ्या काहीवेळा उथळ जहाल होणाऱ्या पत्रकारितेला कधी कधी मोलाची माहिती पुरवून मदतही केली.

मी आणि वसंतदादा पाटील हे समवयस्क, आणि एकाच दिवशी कॉंग्रेसचे सदस्य झालो होतो. त्यांचाही अतुलनीय विश्वास माझ्यावर होता. ते मुख्यमंत्री होते, त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीतच जनता सरकारने भूतपूर्व पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीना अटक केली होती. सांगलीत रात्री दोन ठिकाणी पेढे वाटले गेले, आणि फटाके वाजविले गेले. त्यातील एक ठिकाण मराठी शाळा नंबर दोनचा कोपरा होता, दत्तोपंतांच्या घराजवळच! त्यांची दृष्टी बरोबर काम देत नसताना, ते बंदूक घेऊन शाळेच्या त्या कोपऱ्यावर गेले, व मूर्खपणा करणाऱ्या तरुणांना त्यांनी हुसकावून लावले. तीसेक वर्षांपूर्वी गांधीहत्त्येनंतर जाळपोळ झाली तेव्हा जमावापुढे दत्तूकाका असेच उभे ठाकले होते. जाळपोळीची पुनरावृत्ती होईल का? अशी शंका यावी अशी याही वेळी स्थिती होती. दुसऱ्या दिवशी सकाळी गावात -विशेषत: गावभागात, थोडी गडबड झाली. मुंबईत मुख्यमंत्री दादांना सांगलीत प्रत्यक्ष काय घडले याची माहिती पाहिजे होती. मी तेव्हा जिल्हा परिषदेत प्रसिद्धी अधिकारी होतो. गाडी होती. गाडी घेतली, सर्व माहिती बिनबोभाट मिळविली. दत्तोपंताना 'सहज भेटावयास आलो आहे' अशी थाप मारली. पण मी एकदोन प्रश्न विचारताच त्यांनी हेतू ओळखून प्रेमाने दोन शिव्या दिल्या, आणि सर्व माहिती दिली. मीही त्यांना मुख्यमंत्र्यांच्या फोनची माहिती दिली. दत्तोपंतांचे आणि वसंतदादांचे संबंध निकटचे होतेच.

माझ्या पत्रकारी आणि राजकीय जीवनात दत्तोपंत हे मला आधार वाटत. माझ्यावर त्यांनी जे संस्कार केले ते आज वयाच्या ८५व्या वर्षीही जाणवतात.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, कृतिशील पत्रकार,जिल्हा कॉंग्रेसचे माजी पदाधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, लोककला व सावरकर साहित्याचे व्यासंगी)*

●●●

## माझे पालक डी.एन.सर

-प्रा.राम नलवडे

चौशिंगे गुरुजी वायफळेच्या शाळेला कुलूप घालीत होते. मे महिन्याच्या सुट्टीमुळे शाळा आता दोन महिने बंद राहणार होती. मी त्यांचा लाडका विद्यार्थी, आता ४थी पास झालो होतो. चौथी झालो तरी मी वयाने चांगलाच मोठा -म्हणजे १६ वर्षांचा- होतो. अंगा-पिंडाने थोराड होतो. सुट्टी चालू झाली, मला कोण होते? एक हे गुरुजी आणि दुसरी ही शाळा. ना आई ना बाप! एक आजी होती, ती पण वारली. गुरूजींनी थोडेफार सामान, माझी पुस्तके-वह्या असे एका गाठोड्यात बांधले. गाठोडे स्वत:च्या पाठीवर घेतले. माझ्या हातात गुरूजींची दोन अरग पिसुरी शिकारी कुत्री. अशी वारी निघाली कवठे एकंदकडे.

पुढील शिक्षण तिथेच होणार होते. वर्ग चालू झाले आणि ऐन दिवाळीत गावाला प्लेगच्या साथीने गाठले. शाळा बंद पडली, गुरुजीपण गाव सोडून गेले. मला एक मावशी सांगलीला असल्याचे कळले. अंगावरचे कपडे, चार पुस्तके पिशवीत, खिशात चार आणे असे घेऊन १९४६ साली सांगलीत दाखल झालो. मावशीच्या आश्रयाने ७वी पूर्ण केली. मावशीच्या मालकांचा धान्य वाहतुकीचा व्यवसाय होता. शाळा करून तेही काम मी करीत असे.

एक दिवस मावशी म्हणाली, ''राम, तुझी सोय आमच्याकडे आता होणार नाही. पण तुझं लग्न लावून देते, तू इथंच काम करीत रहा.'' लग्नाचा विषय निघताच मी

दचकलो. पुढे शिकायचे होते, आणि अद्यापि संसाराचे आकर्षण नव्हते. मावशीचे घर सोडले. आता जायचे कोठे? व्हावळ या मित्राची आठवण झाली. या मित्रानेच सातवीचे पेपर लिहायला ऐनवेळी पेन दिले होते, त्याच पेनवर आतापर्यंत चालले होते. चार पुस्तके आणि थोडे कपडे इतके ठेवायला मिळाले तरी काम भागणार होते, तेवढे व्हावळकडे साधले.

व्हावळने आठवीला, गरीब आणि बहुजनांना प्रवेश देणाऱ्या प्रताप मॉडेल शाळेत प्रवेश घेतला. मी त्याचे अनुकरण केले. त्यावेळी ही शाळा पांजरपोळात असे. दोघे मिळून शनिवारच्या बाजारात मीठ विकत असू. पोत्यामागे रुपायाभर सुटे, त्यात आठवडा भागत असे. झोपायला गणपतीचे देऊळ होते. आंघोळ आणि इतर गरजेसाठी कृष्णा नदी. भगवान गिडे या वस्तादांची ओळख झाली; आणि मी सरकारी तालमीत कुस्ती शिकू लागलो. रोजचे जेवण मिळायची मारामार, पण मी खूप मेहनत करू लागलो. मीठ विकून आलेल्या पैशांतून शेंगदाणे आणि हरभरे आणायचे, ते रात्री भिजत घालायचे, तो डबा व्हावळच्या घरात ठेवायचा, सकाळी तेच जेवण आणि तेवढाच खुराक! शाळेची फी थांबत होती. फी देणे तर शक्य नव्हते. मग शाळा सोडण्याचा निर्णय घेतला.

हे प्रकरण दत्त आपटे यांच्याकडे गेले. इथे या माझ्या गुरूंची पहिली गाठ पडली. आपटे सरांनी पर्याय ठेवला, ''हे बघ राम, शाळा तुला फुकट शिकवू शकत नाही, पण शासन अशा मुलांना मदत करते. तेव्हा तू नादारीसाठी अर्ज दे, म्हणजे तुझी फी माफ होईल.'' नादारी म्हणजे काय? नादारी म्हणजे गरीब मुलांसाठी शाळेची फी माफ! ''सर, मला हा अर्ज करायचा नाही.'' ''अरे तुला फी भरायला पैसे नाहीत म्हणतोस, आणि नादारीपण नको. म्हणजे काय?'' ''सर, मी पैलवान आहे. मी कुस्त्या करतो, मैदान मारतो, बक्षिसं मिळवितो; मग मी गरीब कसा? मी शिक्षण थांबवतो, पण मला गरीबीचा हा शिक्का नको.'' आपटे सर थक्क झाले. अनेक विद्यार्थी त्यांनी पाहिले होते; श्रीमंत असून नादारीसाठी धडपडणारे, निर्लज्ज. असे जग ते रोजच पाहात होते. आपटे सरांनी ''तुझे शिक्षण होईपर्यंत तुला कोणतीही फी द्यावी लागणार नाही.'' असे ठाम सांगितले आणि शाळा सोडण्यापासून मला परावृत्त केले. पण संस्थेकडे फी जाणे तर आवश्यक होते, त्याचे काय? माझी फी आता सरांच्या पगारातून जाऊ लागली. तेव्हापासून अनाथ रामचे पालक दत्त आपटे सर झाले.

आता माझ्याबाबतची प्रत्येक तक्रार सरांकडे जाऊ लागली. अभ्यासातील प्रगतीबाबत तक्रार असे. ती सोडल्यास मी सर्वांचाच लाडका विद्यार्थी होतो. अकरावीचा निकाल म्हणजे शाळेचे भवितव्य ठरवणारा. त्याच्यावरच अनुदानाची मदार असे. प्रत्येक शाळा मॅट्रिकच्या परीक्षेला निवडक मुले बसवत असे. चाचणी पूर्व परीक्षेस पास होणारेच बोर्डाच्या परीक्षेस बसत. चाचणी पूर्व परीक्षेचा निकाल लागून मी ४ विषयात नापास, आणि मार्क तर ५ नाहीतर १०! पुन्हा तक्रार आपटे सरांकडे गेली. आता मात्र सरांनी मला चांगलेच दमात घेतले, आणि परीक्षेस बसायला परवानगी नाकारली. पण पुन्हा ११वीत बसायला मात्र परवानगी दिली. ११वीचे दुसरे वर्ष चालू झाले. माझ्यासाठी स्वत:सह आणखीन जादा शिक्षकांची नेमणूक झाली. सर्वांनी मला घेरले, आणि मीपण मन लावून अभ्यास केला. आता मॅट्रिक पूर्वपरीक्षेत चांगल्या मार्कांनी पास झालो, मॅट्रिक परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली.

शाळेत ११वीच्या फायनल निकालाची धामधूम होती. पास विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या आनंदाने शिक्षकांना भेटायला येत होते. कोणी पेढे देत होते, कोणी फुले. चांगल्या मार्कांनी पास झालेल्या एका विद्यार्थ्याला मात्र आपटे सर शोधत होते, कारण त्याचे पालक नव्हते. आज सरांचा आनंद गगनात मावत नव्हता. आपल्या शिष्यास शोधत अखेर सर सरकारी तालमीत पोचले. सरकारी तालीम म्हणजेच माझे घर होते. मी होतो कुठे जागेवर? वर्षभर अभ्यासामुळे, व्यायाम आणि कुस्तीवर आलेले निर्बंध उठल्यामुळे मी कुस्ती फड मारीत मैदाने फिरत होतो. सरांनी माझ्या अनुपस्थितीत 'आपला राम पास झाला' म्हणून सगळ्यांना पेढे वाटले. मी परत आलो हे समजले आणि माझ्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. आयुष्यात मी प्रथमच रडत होतो. पण आता शाळा संपली होती, आणि सरांचा सहवासपण!

धनी वेलणकरांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे आणि

कुस्तीत कॉलेजला सलग दोन वेळा राष्ट्रीय स्तरावर मिळवून दिलेल्या सुवर्णपदकामुळे बी.ए. आणि पुढे बी.एड्.पर्यंत शिक्षण पूर्ण झाले. प्रताप मॉडेल हायस्कूल, आता 'जी.ए.हायस्कूल' या नावाने हरभट रोडवर दिमाखात चालू झाले होते. मी डिग्री घेतली आणि आपटे सरांनी कामावर रुजू करून घेतले.

त्या सुमाराला भारत-पाक युद्धाच्या बातम्या रोज धडकत होत्या. लालबहादूर शास्त्रींच्या नेतृत्वाखाली भारतीय सेना आगेकूच करीत होती. युद्धासाठी मदतीच्या हाका सगळीकडून येत होत्या. माझ्या हातात पहिला पगार रुपये नव्वद आला, तो घेऊन मी थेट काँग्रेस भवनात पोचलो. सर्व रक्कम वसंतदादांच्या हातात ठेवली. 'हा माझा पहिला पगार, युद्धनिधीसाठी घ्या.' दादांनी मला हेरले.

ग्वाल्हेर इथे फिजिकल डायरेक्टर कोर्ससाठी माझी निवड झाली, आणि नंतर दादांच्या सांगण्यावरून मी शांतीनिकेतन कॉलेजमध्ये फिजिकल डायरेक्टर म्हणून रुजू झालो. आरवाडे हायस्कूलच्या पहिल्या नोकरीत ना रजेचा अर्ज, ना राजीनामा, ना तोंडी सूचना!! दादांनी नोकरी दिली, लग्न जमवून दिले, कारखान्याच्या हौसिंग सोसायटीत पाच गुंठ्याचा प्लॉट दिला. कुस्ती केंद्राची धुरा सोपवली. 'वसंतदादा कुस्ती केंद्र' म्हणून ही संस्था अल्पावधीत नावारूपाला आली.

शांतीनिकेतनमध्ये १८ वर्षे नोकरी करून मी निवृत्त झालो. मुले रांगेला लागली, आता सेवा करायची ती कुस्तीची! पेन्शन कागदपत्रे तयार झाली. पण १८ वर्षे नोकरीला पूर्ण पेन्शन मिळणार नव्हती. मग आणखीन कुठे कुठे नोकरी झाली त्याचा शोध चालू झाला. गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये पहिली आठ वर्षे नोकरी झाल्याचे लक्षात आले. ते रेकॉर्ड मिळाले तर एकूण २६ वर्षे नोकरी भरत होती, आणि मी पूर्ण पेन्शनला पात्र ठरणार होतो. पूर्वी कोणतीही सूचना न देता जो शिक्षक १८ वर्षे गायब होता त्याच्या तिथल्या नोकरीचे काय झाले असणार? आता माझे पालक दत्तोपंतसुद्धा या जगात नव्हते. शेवटचा प्रयत्न म्हणून पहिल्या नोकरीचे कागदपत्र आरवाडे हायस्कूलमध्ये जाऊन धुंडाळले. सर्विस बुक मिळाले; 'मिटिंगमध्ये बिनपगारी दीर्घ रजा मंजूर' असा आपटेसरांच्या हस्ताक्षरातला शेरा होता. काम झाले. या शाळेच्या ८ वर्षांच्या नोकरीची भर पडली आणि पूर्ण पेन्शन मला चालू झाली. माझ्या गुरूला -ज्यांनी शिक्षणास मदत केली, नोकरी लावून दिली त्यांना -कोणतीही कल्पना न देता, नोकरी सोडण्याची प्रक्रिया न करता, मी खरंतर घोर अपमान केला होता. मनात आणले असते तर सरांनी मला नोकरीवरून कायमचे काढून टाकले असते. पण शिष्याचे अपराध पोटाशी घ्यायचे हे गुरूचे कर्तव्य आपटेसर मात्र विसरले नाहीत. अल्पांशाने उतराई म्हणून मी शाळेला सरांच्या नावाने ५१ हजारांची देणगी दिली.

आता दादांनी दिलेल्या प्लॉटवर 'दत्त निवास' बंगल्यात मी सहकुटुंब राहात आहे. वयाच्या ९४व्या वर्षीसुद्धा माझी तब्येत खणखणीत आहे. आज जो काही मी आहे, तो आपटे सरांमुळे आहे. त्यांची आठवण निघाली की माझ्या अश्रूंचा बांध फुटतो. अंत:करण जड होते. माझे रामचरित घडविणाऱ्या आपटेसरांचे मानस केवढे भव्यदिव्य होते!

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, कुस्तीगीर व प्रशिक्षक, निवृत्त प्राध्यापक)*

●●●

## सांगलीचे दिवस

-न.ना.किरकिरे

दत्त आपटे हे शाळेचे एक संस्थापक शिक्षक. ते पदवीधर नव्हते पण चौफेर बुलंद होते. त्यांना इतिहास समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राजकारण यात खूप रस होता. सखोल गाढा अभ्यास होता. दत्त आपट्यांचा तास म्हणजे नुसती चैतन्याची सळसळ, उत्साहाचे उधाण तर कधी घनगंभीर दरी. त्यांचे शिकवणे नेमलेल्या पुस्तकाच्या ठोकळ्यात व शाळांच्या भिंतींच्या मर्यादेत सामावणारे नव्हते. कारण ते आंखबंद वाटेने जाणारे वा मर्यादित पुस्तक सांगणारे शिक्षक नव्हते. त्यांच्या शिकवण्यात शिकणाऱ्याला पंख देण्याची ताकद होती.

त्या काळात, जागतिक स्तरावर, भांडवलशाही विचारसरणी व तदनुषंगिक करणी अर्थसत्तेच्या उरावर ठाम होती. जगातल्या अर्धपोटी जनतेस वेठीला धरून भांडवलशाहीने घातलेल्या व्यभिचारी धुमाकुळाचा, आपल्या ग्रंथात पंचनामा मांडून तो जगाच्या वेशीवर टांगणारा जॉन गुंथर, हा दत्त आपट्यांचा आवडता लेखक होता. त्याने लिहिलेले 'इन्साईड अमेरिका', 'इन्साईड युरोप' हे त्यांचे अभ्यासाचे आवडीचे मार्गदर्शक ग्रंथ होते. जागतिक अर्थसत्तेवर आपला दबाव मजबूत राहावा, म्हणून हे मूठभर धनदांडगे जगात निर्माण होणारी सगळीच कॉफी, तेलबिया, बराचसा गहू, कापूस अगदी पडेल किंमतीत विकत घेऊन ताब्यात घेत. त्यापैकी बराच भाग रेल्वे इंजिनात जाळत वा समुद्रात बुडवीत. भाव वरच्या पातळीवर नेत, अमाप नफा कमवत. अशा कितीतरी अभ्यासात नसलेल्या गोष्टी दत्त आपटे आम्हास वर्गात सांगत. बोलताना शब्दांत ठिणग्या व डोळ्यात अंगार असे. तरीही शाळेवर तोहमत येऊ नये म्हणून जपत. सहसा उघड्यावर भाषण करीत नसत.

अशा संपन्न व्यक्तिमत्वांच्या ओढीमुळे विद्यार्थी शाळेकडे चालून येत. शाळेची इमारत जुनाट खुजी, शिकवणारी व्यक्तिमत्वे उत्तुंग भारदस्त होती, नव्या विचारांनी भारलेली होती, आणि हीच समृद्धी विद्यार्थ्यांना आपल्याकडे खेचत होती.

दत्त आपट्यांनी युद्धपूर्वकाळापर्यंतचा(१९३९ पर्यंतचा) 'जागतिक-राजकीय-आर्थिक इतिहासाचे प्रवाह' असा मिश्र स्वरूपाचा जगाचा इतिहास लिहिला होता. त्यांनी केलेल्या अभ्यासाचे ते सारभूत नवनीतच होते. हस्तलिखित पाने त्यांच्या मित्राने पुण्याहून मराठीत टंकलिखित करून दिली. सरांनी तो दोन-अडीचशे पानांचा गठ्ठा शुद्धलेखन तपासायला माझ्याकडे दिला. तेव्हा (१९४२-४३) देवनागरी-टंकलेखन अगदीच प्राथमिक अवस्थेत होते. खूपच चुका झाल्या होत्या. लेखनाची पातळी आणि आवाका मात्र त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या तोलाचा होता. तो ग्रंथ अप्रकाशितच राहिला असावा.

वसंतराव पाटलांशी त्यांचा 'माननीय वसंतदादा पाटील' होण्यापूर्वीपासूनचा गुरु-शिष्य नात्याचा घनदाट स्नेह होता.

माझा सांगलीचा कालखंड म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे शेवटचे पर्व होते. अशा या काळात आमची शाळा, ध्येयनिष्ठ शिक्षक, समाजातील सदाचरणी कर्ती मातब्बर माणसे, चारित्र्यवान त्यागी आदर्श नेते, थोर विचारवंतांचे कसदार रोचक सूचक साहित्य, प्रतिभावंतांची रंजक चेतक काव्ये आणि अवघ्या समाजाचे सर्वांगांनी प्रबोधन करणारी भारदस्त अशी निर्भीड पत्रकारिता या सर्वांच्या प्रभावाखाली आम्ही वाढत होतो. या सर्वांतून त्या सांगलीच्या दिवसात मिळालेली शिदोरी, आपले आयुष्य समृद्ध करण्यास जन्मभर पुरावी इतकी मोठी, मोलाची आहे.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, राज्य परिवहन मंडळात अधिकारी म्हणून निवृत्त)*

●●●

# डी.एन.सर

-ब.ता.वाळवेकर

१९४७ साली मी प्रताप मॉडेल हायस्कूलमध्ये दाखल झालो. मी मूळचा भिलवडी गावचा शेतकरी कुटुंबातला. शिक्षणासाठी सांगलीत आलो. 'बहुजन समाजाची शाळा' अशाच शाळेत मी नाव घालणे साहजिक होते. त्या काळी काही शाळा सांगलीत नावाजलेल्या होत्या, पण त्या समाजातील ठराविक वर्गासाठी होत्या. डी.एन.सरांची पहिली गाठ त्यांच्या शाळेत पडली तेव्हा, पुढे माझे हेच आदर्श ठरतील आणि त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळेल याची तसूभर कल्पना नव्हती.

१९४७च्या जूनमध्ये स्वातंत्र्यसूर्याचे किरण क्षितिजावर आपली प्रभा फाकीत होते. गणपती मंदिराचा परिसर, संथ वाहणारी कृष्णा नदी. अशा रम्य वातावरणातील प्रताप मॉडेल हायस्कूलमध्ये सर्व थरांतील विद्यार्थी आणि एकापेक्षा एक शिक्षक होते! मनावर ठसा उमटविणारे व्यक्तिमत्व म्हणजे डी.एन.सर! विनायक आणि दत्त आपटे हे शिक्षक; त्यांना 'व्ही.एन.सर आणि डी.एन.सर' असेच म्हणायची पद्धत होती.

त्या काळी बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचा कर्दनकाळ किंवा राहू-केतू म्हणजे गणित आणि इंग्रजी. अनेक विद्यार्थ्यांना मॅट्रिक परीक्षेच्या वाऱ्या करायला लावणारे हे दोन विषय. इंग्रज गेले तरी इंग्रजीची दहशत आम्हा ग्रामीण भागातून आलेल्या मुलांना तशीच होती. त्या वेळी खाजगी शिकविण्याचे प्रस्थ नव्हते. शाळेतच इंग्रजीची तयारी व्हावी आणि विद्यार्थ्यांना पुस्तक नीट समजावे म्हणून, डी.एन.सर रोज सकाळी जादा तास घेत. तो ज्यादा तास सर निवृत्त होईपर्यंत चालू होता. विशेष म्हणजे कोणत्याही वैयक्तिक कारणासाठी त्यांनी या वर्गाला कधी सुट्टी दिली नाही.

'शिक्षण पूर्ण झाल्यावर काय' हा प्रश्न पडण्यापूर्वी मी माझ्याच शाळेत १९५८ साली शिक्षक म्हणून रुजू झालो. डी.एन.सरांचे निधन होईपर्यंत -म्हणजे १९८२ पर्यंत, सरांच्यासोबत मला २४ वर्षे काम करायला मिळाले; इतकेच नव्हे तर या संस्थेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्याची तयारी सरांच्या सहवासामुळे झाली. या काळातील अनेक प्रसंग उत्साहाचे, दु:खाचे, आनंदाचे, सत्वपरीक्षा पाहणारे!! -पण हताश, उदास करणारा प्रसंग अजिबात नाही.

सर अनेक कामांसाठी प्रवास करीत असत. विशेषत: मुंबईला जाणे वरचेवर घडे. बहुत करून प्रवास खाजगी वाहनाने होई. मी, सावईकर, विनायक पाटणकर, छत्रे, शाहीर निकम, नामदेव कऱ्हाडकर अशा आठ-दहा मंडळींपैकी सोबत तिघे चौघे नेहमी असत. खाजगी गाडीने असे प्रवास कसे परवडतात, हे मला प्रथम समजत नव्हते. तथापि सर अनेक संस्थांची कामे करीत. त्यासाठी मुंबईला जाणे आवश्यक असे. चार-पाच संस्थांची कामे एकाच वेळी घेऊन गेले की वेळ, पैसे सर्वांची बचत होत असे. स्वत:चे वाहन हातात असल्यामुळे मुंबईत सरकारी कार्यालयात येणेजाणे सुकर होत असे.

डी.एन.सर प्रवासात स्वत:कडे पैसे कधीच ठेवीत नसत. पैसे आणि हिशेब सोबतीच्या कोणावर तरी सोपवीत. प्रवासात सर्वजण आपापल्या घरातून एकेक पदार्थ आणत, वाटेत सर्वजण अंगत पंगत करून जेवत. सर स्वत: मुंबईत त्यांचे साडू गाडगीळ यांच्याकडे राहात. त्यांच्या राहण्या-जेवण्याचा खर्च कधी कोणत्याही संस्थेवर पडत नसे. साडूंच्याकडे राहूनही खर्चाची बिले संस्थेतून घेता आली असती, ते कधीही घडले नाही. मात्र शाळेत आलेल्या पाहुण्यांना स्वत:च्या घरी जेवू-खाऊ घालून त्याचे पैसे संस्थेतून घेणारे लोक पुढच्या पिढीत आम्हाला पाहायला मिळाले. वेगळ्या अर्थी, सरांचे व्यवहार पारदर्शक नव्हते; कारण स्वत:ला लागणारी तोशीस त्यांना उघड करण्याची नव्हती हे आम्हाला उशीरा कळाले. या प्रवासांतून सरांचा सरकार दरबारी किती दरारा होता, हे आम्ही अनुभवले.

त्यांनीच दिलेल्या शिकवणीवरून, काही धाडसी उपक्रम आम्ही शाळेत घेत असू, त्यावेळी सर त्यांच्या नेहमीच्या शैलीत, ''लेको, असले उपद्व्याप कोणाच्या भरवशावर करता?'' असे विचारीत. आमचे उत्तर ठरलेले असे, ''तुमच्याच तर भरवशावर'' विज्ञान आणि तंत्रज्ञान

ही भारताच्या प्रगतीची गुरुकिल्ली, त्या अनुषंगाने कुशल मनुष्यबळ आवश्यक होते. म्हणूनच उच्च माध्यमिक स्तरापासून याचे शिक्षण देण्याच्या योजना सरकारने आखल्या होत्या. सांगलीत 'दक्षिण सातारा टेक्निकल इन्स्टिटयूट' या नावाची संस्था चालूही झाली होती. राजकारणाच्या व्यापातून ती संस्था चालवणे कठीण होऊन बसले तेव्हा डी.एन.सरांच्या संस्थेत त्याचे विलीनीकरण झाले.

एके वर्षी काही कारणांनी शाळेचे वर्ग कमी झाले, त्यामुळे शिक्षक कमी करणे गरजेचे होते. शास्त्र विषय शिकविणाऱ्या जोशीबाई यांना कमी करावे लागले. ते प्रकरण कोर्टात गेले. बाईंच्या प्रश्नामागे शिक्षक संघटना उभी राहिली. शिक्षण उपसंचालक यांनी संस्थेचे अनुदान थांबविले. प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले. लढाई जशी लांबली तसे शिक्षकांचे पगार खोळंबून पडले आणि एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. सरांनी संस्थेच्या हितचिंतकांकडून उसनवारी करून पगार काही प्रमाणात चालू ठेवले. हायकोर्टात निकाल संस्थेविरुद्ध गेला, पण कोर्टाने अनुदान चालू करण्यास सरकारला भाग पाडले. त्यापुढे हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले. शाळेचा एक माजी विद्यार्थी सुप्रीम कोर्टात वकिली करीत होता, त्याच्यावर हे काम सोपविले होते. मात्र त्याच्या निष्काळजीपणामुळे एकतर्फी निकाल संस्थेच्या विरुद्ध लागला. तथापि आम्हाला चांगले आठवते की, जोशीबाई आणि त्यांचे पती नंतर आमच्या घरी मुद्दाम भेटावयास आले होते. शाळेचे शिक्षक आणि चालक यांत कोठेही कटुता आली नाही. हे केवळ डी.एन.सरांच्या दिलदारपणामुळेच शक्य होते.

शाळेने गॅदरिंगला प्रमुख पाहुणे म्हणून नामदार यशवंतराव चव्हाणांना आमंत्रित केले होते, तेव्हा संयुक्त महाराष्ट्र वाद जोरात होता. नामदार चव्हाणाना मोठा विरोध होता. शाळेच्या स्नेहसंमेलनाला चव्हाणांना बोलावणे म्हणजे विरोधकांना आयतेच कारण होते. शाळेसमोर विरोधकांनी निदर्शने सुरू केली, दबाव आणायचा प्रयत्न केला. 'शाळांच्या कामात राजकारण आणू नये' अशी भूमिका घेत डी.एन.सरांनी विरोध हाणून पाडला आणि स्नेहसंमेलन निर्विघ्न पार पडले. चव्हाणांची सभा रात्री सांगलीच्या स्टेशन चौकात झाली. सार्वजनिक जीवनात नामदार चव्हाणांवरील बहिष्कार मावळला. आमच्या शाळेचे स्नेहसंमेलन त्यास कारणीभूत ठरले!!

शाळेत अनेक वेळा अनेक कारणांनी वादविवाद होत असत. पण त्याचे रूपांतर संघर्षात, शत्रुत्वात कधीच होत नसे, याचा वस्तुपाठ अनेक वेळा डी.एन.सरांनी घालून दिला होता. एकदा सोमणसर आणि डी.एन.सरांचा असाच वाद झाला. 'शिक्षकदिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून रक्कम घ्यायची का नाही' असा विषय होता. वादावादी इतकी वाढत गेली की, आम्हास वाटू लागले आता हे प्रकरण विकोपास जाणार. वादावादीत शिक्षकसभा संपली. दुसऱ्या दिवशी काय होते याची धास्ती आम्हा सर्वांना होती. सोमणसर आणि डी.एन.सर यांचे कायमचेच वितुष्ट येणार ही शक्यता आम्हाला वाटत होती. प्रत्यक्षात दृश्य वेगळेच दिसले. दोघेही एकत्र गप्पा मारत चहा पीत होते. वरून उग्र-रुबाबदार दिसणारे डी.एन.सर खूप हळवे होते असे आम्हाला खूपदा अनुभवायला मिळाले. त्यांच्या एका पुतणीचे लग्न होते, आणि त्यांचे थोरले भाऊ व्ही.एन.सर आजारपणामुळे येऊ शकले नव्हते. ऐन मुहूर्ताच्या वेळी व्ही.एन.सरांच्या आठवणींनी डी.एन.सरांना गहिवरून आले.

व्ही.एन.सर नेहमी म्हणत, ''दत्तूला लोकांची पारख नाही, कोणावरही तो पटकन विश्वास ठेवतो'' घरगुती कामांत तोच अनुभव घरच्यांना येत असे. सरांच्यावर विश्वास ठेवून अनेकांनी आपली कामे करून घेतली; त्यांच्या विश्वासाला सरांनी कधी तडा जाऊ दिला नाही. लोकही आपल्यासोबत तशाच प्रकारे वागतील, असा त्यांचा ग्रह असावा. डी.एन.सरांना सर्वच जवळचे असत, आणि सर्वांना 'आपण डी.एन.सरांच्या जवळचे आहोत' असे वाटत असे.

'नूतन मराठी' हा संस्थेचा प्राथमिक वर्गांचा विभाग. माध्यमिककडे घेतलेल्या एका शिक्षिकेचा पूर्ण पगार मिळावा असा तिचा आग्रह होता. तसा तिने अर्जही दिला होता. ही शिक्षिका सरांच्या नात्यातील होती. शाळेस त्यावेळी दर विद्यार्थ्यामागे दहा रुपये इतकेच तुटपुंजे अनुदान मिळत असे. त्यात शाळेचे खर्च आणि पगारही भागवावे लागत. संस्थेचा उपकार्यवाह या नात्याने हे काम मी पाहात होतो. ही मागणी सरांच्याकडे पोचवणे आणि

वास्तव सांगणे हे माझे काम होते. सर्वच शिक्षकांना पूर्ण पगार देता येतच नव्हता. यावर सरांनीच उपाय सुचविला, ''त्याच शिक्षिकेवर प्राथमिक शाळेची जबाबदारी सोपवा.'' पुढे त्या शिक्षिकेने नोकरी सोडली.

शाळेच्या व्यवस्थापनात सहभागी होण्यासाठी, शिक्षकांमधून आजीव सेवक म्हणून ठराविक जागा निवडल्या जात. अशा एका शिक्षकानेच संस्थेच्या काही सभासदांच्या आडून, 'डी.एन.सर आणि जुन्या जाणत्या लोकांना संचालक मंडळातून बाजूला करावे' अशी मागणी करण्याचा उद्योग केला होता; पण तो त्याच्याच अंगाशी आला.

शिक्षण-संस्थाचालकांचे अनेक प्रश्न होते, पण शासनदरबारी म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नव्हता. भ्रष्ट नोकरशाही आणि क्लिष्ट नियम यांमुळे सरळ मार्गाने जाणारे संस्थाचालक मेटाकुटीला आले होते. यावर संस्थाचालकांनी संघटित होणे हाच एक उपाय होता. अशी संघटना डी.एन.सरांनी बांधली. १० अधिक २, म्हणजे ११वी आणि १२वी, मग पुढे तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम, अशी व्यवस्था आली. तेव्हा शिक्षणसंस्था-चालकांच्या या संघटनेने ठराव केला. शासन संपूर्ण अनुदान देत असेल तरच आम्ही 'ज्युनिअर कॉलेज' उघडू, असा तो ठराव होता. प्रत्यक्षात अनेक संस्था ज्युनिअर कॉलेजची परवानगी मिळवण्याच्या प्रयत्नात होत्या. आम्ही पण ज्युनिअर कॉलेजसाठी परवानगी मिळवण्यासाठी एकीकडे प्रयत्न चालू केले. सरांना हे आवडले नाही. कारण संघटनेने मिळून तसा ठराव केला होता. या संस्था त्या ठरावाचे पालन करतील असा त्यांचा दृढ विश्वास होता. खरी परिस्थिती कळल्यावर, सरांनी संमती दिली; व संस्थेला ज्युनिअर कॉलेज मिळण्यात यश आले.

इंदिरा गांधी सत्तेवरून पायउतार होण्याची चिन्हे दिसताच देशात त्यानी आणीबाणी जाहीर केली. विरोधकांच्या धरपकडीचे सत्र चालू झाले. यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांचा मोठा भरणा होता. शाळेत जसे अनेक जाती-धर्माचे विद्यार्थी होते, तसेच विविध राजकीय विचारांचे शिक्षक होते. बिंदुमाधव कुलकर्णी कट्टर संघाचे, तर सोमण कट्टर साम्यवादी, डी.एन.सर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे. 'विविधतेत एकता' म्हणतात तसेच शाळेचे स्वरूप होते. 'संघाचे काम करणाऱ्या तुमच्या शाळेतील तीन शिक्षकांना कामावरून काढून टाका' असे निरोप शासकीय यंत्रणेकडून आणीबाणीच्या काळात येत असत. 'सरकारी आणि लेखी आदेश आल्याखेरीज हे होणे शक्य नाही' असे डी.एन.सरांनी ठणकावून सांगितले. 'त्यांचे राजकीय विचार काही असले तरी, संस्थेच्या कामात कोणतीही कसूर त्यांच्याकडून होत नाही, तोपर्यंत त्यांना संस्थेचे अभय राहील.' अशी ग्वाही दिली. डाव्या विचारसरणीचे, स्वत:ला कामगार नेता म्हणविणारे ताराचंद शहा एक दिवस शाळेत आले, आणि 'तुमच्या शाळेतील संघाच्या शिक्षकांवर तुम्ही कारवाई का करत नाही?' असा जाब विचारू लागले. सरांनी त्यांचीच खरडपट्टी काढून त्याना पिटाळून लावले. पुढे शाळेतील तीन शिक्षकांना अटक झाली आणि येरवड्याला त्यांची रवानगी झाली. १८ महिन्यांच्या काळात डी.एन.सरांनी त्या शिक्षकांच्या कुटुंबियांना मोठा धीर दिला.

शाळेत शिक्षकांची, देणगीदारांची, संस्थाचालकांची मुले असत. आम्ही बाकीची सर्वसामान्य मुले शाळेत होतोच. डी.एन.सर सर्वांना 'विद्यार्थी' म्हणूनच वागवायचे, तसा सरांचा दंडक होता. शाळेच्या मोठ्या देणगीदारांच्या मुलांच्या सायकली उचलून आत नेणे, व शाळा सुटल्यावर पुन्हा उचलून रस्त्यावर काढून देणे असे काम शाळेतील एक शिपाई करीत असे. सरांच्या ते लक्षात येताच, असली सेवा बंद करायला त्यांनी सांगितले, आणि सदर विद्यार्थ्यांनाही सुनावले.

डी.एन.सरांनी स्वत:च्या वागण्यातून घालून दिलेल्या आदर्शाला धरून चालणारी माझी पिढी अस्तित्वात आहे, तोवर त्यांच्या मोठेपणाची जाणीव प्रकर्षानी होत राहीलच; पण ज्यांना हे दिवस जाणून घेण्याची आस वाटेल त्यांना भविष्यकाळातही त्या आदर्शांचे मोठेपण लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

*(लेखक : संस्थेचे माजी विद्यार्थी, नंतर शिक्षक व मुख्याध्यापक, दत्तोपंतांच्या घरोब्यातील निष्ठावंत कार्यकर्ता)*

●●●

# मला भावलेले डी.एन.सर

-डी.जे.आरवाडे

मी आरवाडे हायस्कूल संकुलाचा ११ वर्षे विद्यार्थी. नूतन मराठी विद्यालयाच्या एलेमेंटरी(एलपंडी)मध्ये पाचव्या वर्षी प्रवेश केला. त्या काळी ही शाळा सराफ कट्ट्यात भरत असे. आम्ही चौथी होईतो ही शाळा प्रताप मॉडेल हायस्कूलबरोबर संलग्न झाली. त्यामुळे स्वाभाविकच मी पाचवीला प्रताप मॉडेल हायस्कूलमध्ये प्रवेश केला. ही शाळा त्यावेळी कृष्णा नदीकाठी पांजरपोळ येथे भरायची, नंतर नवीन इमारत हरभट रोडवर झाली. माझी अशी त्रिस्थळी यात्रा झाली. आरवाडे हायस्कूलमध्ये दोघेही आपटे सर शिकवायचे. त्यामुळे गुरुजी-विद्यार्थी हे त्यांच्याशी माझे नाते जडले.

डी.एन.आपटेसर हे संस्थेचे आजीव सदस्य आणि संस्थापक होते, आम्ही विद्यार्थी त्यांच्याकडे मोठ्या आदराने पाहायचो, पण मनात थोडी भीती वाटायची. त्यांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त होते. त्यांनी अनेक इंग्रजी पुस्तकांचे मराठीत सुलभ भाषांतर केले होते, त्यांतील 'तीन शिलेदार' (Three musketeers) हे पुस्तक मला खूप आवडले. बहुधा नियमावलीची काही अडचण येत असल्याने त्यांनी काही पुस्तके पत्नी सौ.उषा आपटे यांच्या नावाने प्रसिद्ध केली. साहित्याबद्दल डी.एन.सरांचे आम्हाला खूप कौतुक वाटायचे.

वर्गाचे तास घेण्याची डी.एन.सरांची खुबी फारच चांगली होती. प्रथम ते त्या विषयातल्या घडामोडी रंगवून, एखादी गोष्ट सांगावी तसे सांगत; त्यात आम्ही समरस होऊन जायचो. तासाची शेवटची दहा मिनिटे उरली की ते 'लिहून घ्या' म्हणत, व पान दीड पानात त्या तासाचा सारांश लिहून देत. त्या नोटस् आम्हाला खूप आवडायच्या. परीक्षेच्या वेळेस तर आम्ही फक्त नोटस् वाचूनच परीक्षेला जायचो. सरांनी शिकविलेले 'वॉर ऑफ रोझेस', 'प्लासीची लढाई', 'ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना, तिचे भारतातील कार्य', 'जालियनवाला बाग' इत्यादी गोष्टी अजूनही मनामध्ये ताज्या आहेत. नववीनंतर शाळेची बहुतांशी मुले इंग्रजीची शिकवणी लावत असत. हणमंतराव गोखले पूर्वी आरवाडे हायस्कूलचे शिक्षक. त्यांनी राजीनामा देऊन इंग्रजीचे क्लासेस काढले. त्यांच्याकडे शिकत असताना Reciepe हा शब्द आला. त्याचा अर्थ डी.एन.सरांनी एक सांगितला होता, आणि गोखलेसरांनी दुसरा सांगितला. त्यामुळे आमचा गोंधळ व्हायचा. 'गोखले सरांनी लावलेला अर्थ बरोबर नाही' असे डी.एन.सर म्हणायचे, तर गोखलेसर आपटेसरांचा अर्थ खोडून काढायचे. इंग्रजी डिक्शनरी काढून आपल्या म्हणण्याचा पुरावा दोघेही द्यायचे. त्याकाळी डिक्शनरी कशी वापरतात याची कल्पनाही नव्हती, पण या वादामुळे आम्हाला त्याची माहिती झाली. शेवटी आम्ही एक मध्यमार्ग स्वीकारला. शाळेत अर्थ आपटेसरांसारखा सांगायचा, आणि क्लासमध्ये गोखलेसरांना अभिप्रेत असलेला अर्थ सांगायचा!

डी.एन.सर सुट्टीमध्ये किंवा सोयीच्या काळात सहली काढायचे, महत्त्वाची स्थळे दाखवायचे. आमच्या आधीच्या वर्गातील दहा-पंधरा मुलांना घेऊन ते मध्यप्रदेश वा गुजराथला गेले होते. तो वृत्तांत 'विकास' या शालेय हस्तलिखित मासिकात प्रसिद्ध झाला होता, तो आमच्या मनाला खूपच भावला होता.

डी.एन.सर हेडमास्तर होते, त्या साली मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई शाळेच्या गॅदरिंगला आले होते. मोरारजीभाई पहिले वाक्य म्हणाले, ''ही शाळा तशी लहान आहे. मुख्यमंत्र्यांच्या भरघोस कार्यक्रमांत आम्हाला वेळ काढणे अशक्य असते, पण तुमच्या हेडमास्तरनी आग्रह केल्यामुळे मला हे आमंत्रण नाकारता आले नाही. त्यामुळेच आपल्या भेटीचा योग आलेला आहे.'' आम्हा विद्यार्थ्यांच्या लक्षात आले की सरांचा राजदरबारी वट आहे!

मी ११वी परीक्षा पहिल्या नंबरने पास झालो. नंतर एफ.आर.सी.एस. ही पदवी मिळविण्यासाठी मी इंग्लंडला प्रयाण केले. पदवी व ७ वर्षे अनुभव घेऊन मी सांगलीत स्थिरावलो.

१९८२ साल होते. डी.एन.सर दत्त-मारुती रोडवरून चालले होते. दावलमलीकजवळ मागून येणाऱ्या टांग्याचा

त्यांना धक्का लागला व ते रस्त्यावर पडले. आजूबाजूच्या लोकांनी जवळच्या डॉ.पी.जी.आपटे यांच्या दवाखान्यात प्राथमिक उपचारासाठी त्यांना नेले. सकृत्‌दर्शनी फ्रॅक्चर झालेले नव्हते, त्यामुळे वेदनाशामक गोळ्या घेऊन ते घरी गेले. नंतर १५-२० दिवस ते लंगडत फिरायचे. पण नंतर त्यांना चालताना खूप त्रास होऊ लागला. डॉ.पी.जी.आपटे सराना घेऊन ते माझ्या दवाखान्यात आले. त्यांची तपासणी, एक्सरे केल्यानंतर त्यांच्या खुब्याचे हाड मोडून वर सरकलेले दिसले. त्या परिस्थितीत ऑपरेशन करणे हा एकच मार्ग होता. तुटलेले हाड काढून टाकायचे व त्याजागी स्टेनलेस स्टीलचा गड्डू बसवायचा असे ते ऑपरेशन असते. सरांनी अगदी शांतपणे ऑपरेशन करण्यास परवानगी दिली. सरांची रक्ततपासणी केली, त्यामध्ये त्यांच्या मूत्रपिंडाचे कार्य अगदी कमी झालेले दिसले. रक्तातील युरिया १००च्या वर गेला होता, व सोडियम पोटॅशचे प्रमाणही बिघडले होते. एवढ्या परिस्थितीतही सर धडधाकट दिसायचे, याचे सर्वांना आश्चर्य वाटले. त्यांचे व्यायामाचे शरीर याही परिस्थितीत त्यांना बाह्यदर्शनी उत्तम साथ देत होते. दोन तीन दिवस त्यांना सलाईन वगैरे देऊन, तसेच वैद्यकीय उपचार करून, त्यांच्या मूत्रपिंडाचे कार्य सुधारले. मग त्यांच्यावर शल्यक्रिया केली. तुटलेल्या हाडाचा तुकडा काढून टाकून त्या जागी स्टेनलेस स्टीलचा गड्डू बसविला.

रक्तातील युरिया ही समस्या त्यांना माहीत होती. त्यामुळे ऑपरेशनमध्ये येणारा धोकाही माहीत होता. त्यांच्या मुलांजवळ ते म्हणाले, ''ऑपरेशन टाळले तर औषध-उपचारावर काही दिवस काढता येतील; पण मला अंथरुणावरच जीवन कंठावे लागेल. ऑपरेशन यशस्वी झाले तर मी किमान हिंडूफिरू शकेन, नाही झाले तर मुक्ती मिळेल.'' ऑपरेशन व्यवस्थित झाले. तीन चार दिवसांत सर वॉकर घेऊन फिरू लागले. पण परत मूत्रपिंडाने हार खाल्ली, शरीरातील युरिया वाढला व पाणी कमी झाले. सर थकल्यासारखे दिसायला लागले. खाणे पिणेही कमी झाले. सर कधी कधी गुंगीत असत, क्वचितच बोलत.

त्यांच्या मुलांकडून समजले की, त्या दिवशी सकाळी त्यांना नैसर्गिक विधी झाल्याचे कळलेच नाही. त्या क्षणापासून ते निर्वाणीची भाषा बोलू लागले. त्यांनी मुला-मुलींना बोलावून घेतले. येणाऱ्या सर्वांशी जरा उत्साहात बोलले. शाळेच्या कामाविषयी भेटणाऱ्या सर्वांशी बोलले. त्या वेळी त्यांची मुले शरद आणि हर्षवर्धन तेथे होते. सरानी युरीन पॉट मागितला आणि नर्सबाईंना बोलविण्यास सांगितले. ते दोघे बाहेर गेले आणि पाठोपाठ नर्स धावत बाहेर आल्या. मला तातडीचा निरोप आला. मी धावत दवाखान्यात पोचलो. सर शॉकमध्ये गेले होते. नाडी लागत नव्हती. त्यांच्या घशात नळी घालून कृत्रिम श्वासोश्वास दिला. पण काही प्रतिसाद मिळाला नाही. तेवढ्यात डॉ.पी.जी.आपटे आले, त्यांनीही तपासणी करून प्रयत्न केला, पण थोड्याच वेळात सरांची प्राणज्योत मालवल्याचे जाहीर केले.

डी.एन.आपटे हे पर्व संपले, व आरवाडे हायस्कूलचा आधारस्तंभ कायमचा तुटून गेला.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, सांगलीतील प्रसिद्ध शल्यविशारद)*

●●●

## असे शिक्षक आणि अशी शाळा

-डॉ.मुकुंद फडणीस

गांधीहत्त्येनंतर आमचे कुटुंब कुरुंदवाडमधील वाडा, जमीनजुमला सोडून सांगलीत आले. मी आरवाडे हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण याच शाळेत झाले. शाळेत दत्त आपटे यांचा एक प्रकारचा दरारा जाणवे.

अभ्यासाबरोबर खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबीरे अशा अनेक उपक्रमांची रेलचेल असे. यात शाळेचे स्नेहसंमेलन म्हणजे आम्हा नाटकवेड्यांना पर्वणीच! सतत

पाच वर्षे मी नाटकात काम केले आणि पुढेही नाट्यकलेशी जोडून राहिलो, ते आजही आहे. नाटकाची ओळख मला याच शाळेत झाली आणि प्रत्यक्ष रंगमंचावर वावरण्याची संधी याच शाळेत मिळाली. या सर्वाची प्रेरणा, आमचे शिक्षक दत्त आपटे आणि यशवंत केळकर होते हे आता समजते! आपटे सरांशी माझे खरेतर सलोख्याचे संबंध नव्हते. सरांचे शिकविणे मती गुंग करणारे. जगाच्या इतिहासाचा त्यांचा गाढा अभ्यास होता हे जाणवे. शाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षीची श्रमदान शिबिरे. एक शिबीर डिग्रज गावाजवळ कृष्णा नदीकाठी होते. शिबिरात दत्त आपटे बौद्धिक घेत असत. मार्क्सचे तत्त्वज्ञान, साम्यवाद, रशियाची प्रगती, नेहरूंचे धोरण या विषयांवरही ते बोलत. आठवणीत राहिलेली गोष्ट म्हणजे त्यांनी करून दिलेली आकाशाची ओळख, लुकलुकणाऱ्या ताऱ्यांची ओळख! शाळेत पाठ केलेली नक्षत्रे आम्ही उघड्या आकाशात प्रत्यक्ष पाहात असू.

आमचे शिक्षक ध्येयांनी प्रेरित होते, त्याचा प्रत्यय एका प्रसंगाने येऊ शकेल. शाळेच्या व्हरांड्यात एक पितळी ड्रम आणि पितळी भांडे मुलांना पाणी पिण्यासाठी ठेवलेले असे. एकदा ते भांडे चोरीला गेले. शाळेतले बरेच विद्यार्थी अतिशय गरीब परिस्थितीतील असत. रोजच्या दोन घासाची भ्रांत असणारे विद्यार्थीही होते. फी भरणे शक्य नसले तर आमचे शिक्षक त्यांना पदरमोड करून सांभाळीत. भांडे चोरणारा मुलगा ते भांडे विकण्यासाठी दुकानात गेला. भांड्यावरचे शाळेचे नाव पाहून दुकानदाराने त्याला उद्या येण्यास सांगितले. दुकानदार भांडे घेऊन थेट शाळेत आला. प्रकरण सहस्रबुद्धे सरांसमोर गेले. सरांनी त्या व्यापाऱ्याला भांड्याचे पैसे दिले. दुसऱ्या दिवशी प्रार्थना झाली, आणि चोरीचा निवाडा सुरू झाला. ज्याने भांडे चोरले त्याने चोरी कबूल केली. सर्व विद्यार्थी आणि शिक्षक स्तब्ध. आता या मुलाची शाळेतून हकालपट्टी दिसत होती. सरांनी एक छडी मागविली, ती त्या मुलाच्या हातात दिली, आणि स्वत:ला मुलाकडून पाच छड्या मारून घेतल्या. का? तर माझ्या विद्यार्थ्यावर संस्कार करण्यास मी कमी पडलो. त्या विद्यार्थ्याची काय अवस्था झाली असेल! -आणि आम्हा पाहणाऱ्यांचीसुद्धा!! पुढे चोरी करण्याचे धाडस होणेच शक्य नाही!! आज हे कुणाला खोटे वाटेल.

असे शिक्षक होते. आज थोडाफार प्रामाणिकपणा शिल्लक आहे, तो अशा लोकांच्यामुळे आहे यात शंका नाही!

*(लेखक : माधवनगरचे प्रतिष्ठित डॉक्टर व हौशी नाट्यकर्मी)*

●●●

## कलागुणांना प्रोत्साहन देणारे डी.एन.सर

- एच.एस.पाटील

१९६७ साली मी वसंतदादा पाटील यांच्या पन्नासाव्या वाढदिवसाचे निमित्त साधून गौरवग्रंथ संपादित केला. आणि पुढे २०११ साली माझ्याच सामाजिक, साहित्यिक कार्याविषयी गौरवअंक माझ्या पंचाहत्तरीनिमित्त मित्रपरिवाराने प्रकाशित केला. मी साखर कारखान्यात सामान्य कारकून म्हणून सुरुवात केली. पुढे वसंतदादांचा स्वीय सचिव म्हणूनही काम केले. पण मी मनाने रमलो ते साहित्य आणि शैक्षणिक कामांत. आचार्य अत्रेंचे भाषण मी सांगलीत घडवून आणले; मित्रपरिवारातील कवितांचा 'जागृती' नामक कवितासंग्रह प्रकाशित केला; उपेक्षित तमासगीर मा.सो.कांबळे यांचे चरित्र प्रकाशित केले. वसंत व्याख्यानमाला, हिंदी ग्रंथालय असे उद्योग मी करीत होतो. मुलींच्या दडगे हायस्कूलची स्थापना, मॉर्डन इंग्लिश शाळा, शिवाजी हौसिंग सोसायटीची स्थापना असे अनेक उपक्रम करण्यात मी रमलो.

या कामांचे बीज कोठे रोवले गेले असावे याचा शोध

घेतला. हे बीज माझ्या मनात शिक्षकांनी रोवले असावे का? १९५० साली सांगलीतील प्रताप मॉडेल म्हणजे टवाळ भाषेत 'पडकेमोडके' हायस्कूलमध्ये व्ह.फा. या वर्गात प्रवेश घेतला. त्याच शाळेतून मी मॅट्रीक झालो. मला घडवण्यात तीच पाच वर्षे कारणीभूत आहेत असे आत्ता मला ठामपणे वाटते. त्यातही डी.एन.सरांचा वाटा निश्चितच सिंहाचा!

त्या शाळेतील सर्वच शिक्षक ध्येयवादाने शिकवीत. त्यातही लक्षात राहणारे म्हणजे बी.जी.नाईक, ते मराठी शिकवत. अतिशय रसाळ वाणी आणि विद्वत्तापूर्ण शिकविणे. दुसरे शिक्षक म्हणजे डी.एन.आपटे. ते इतिहास शिकवीत. पुस्तक कधी समोर न धरता, ते कथारूपात इतिहास शिकवीत. आम्ही मुले अक्षरश: वर्तमानातून उठून अलगद इतिहासात जात असू. जगभरातील घडामोडी, गांधीवाद, कम्युनिस्ट चळवळ, मार्क्सवाद अशी माहिती सर देत असत. सरांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मुलांच्यातील कलागुण ओळखून ते वाव आणि प्रोत्साहन देत.

१९५२ साली आरवाडे हायस्कूलच्या नूतन इमारतीचे उद्घाटन मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते निश्चित झाले. त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित करण्याचे व त्यात विद्यार्थ्यांचे लेख समाविष्ट करण्याचे सरानी जाहीर केले. मी त्या अंकासाठी 'उद्घाटन' नावाची कथा दिली. कथाभाग असा होता, 'प्रशस्त आणि आकर्षक अशा शाळेच्या इमारतीचे उद्घाटन होत आहे, पण ही वास्तू बांधणारे मजूर आणि त्यांची मुले मात्र शिक्षणापासून वंचितच होती.' सरांनी मला त्यांच्या ऑफीसमध्ये बोलावून माझे कौतुक केले. माझी ही पहिली साहित्यिक कृती. त्या घटनेपासून मी 'साहित्यिक' बनलो. पुढच्या काळात नावाजलेला माझ्या वर्गातील साहित्यिक म्हणजे श्रीनिवास कुलकर्णी. आजही आम्ही एकमेकांच्या संपर्कात आहोत. माझ्या वर्गातील मुले प्रामुख्याने ग्रामीण भागांतील असत, ती निसर्गत: धष्टपुष्ट असत. आमच्या शाळेत खेळाला फार महत्त्व होते. आमचे डी.एन.सर आणि व्ही.एन.सर दोघेही उत्तम कुस्ती खेळत. साहजिकच त्यांचे खेळावर प्रेम होते. माझ्याच वर्गातील राम नलवडे हा कुस्तीगीर पुढे राष्ट्रीय स्तरावर चमकला. त्याला डी.एन.सरांचे प्रोत्साहन होते.

डी.एन.सर नुसतेच शिक्षक नव्हते, ते लेखक होते. त्यांनी अनेक इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले होते, सार्वजनिक कामात त्यांचा हिरीरीने सहभाग होता. त्या काळातील कामगार चळवळीतले ते अग्रणी होते. मी सांगली साखर कारखान्यात नोकरीस लागलो, तेव्हा ते तिथल्या कामगार युनियनचे अध्यक्ष होते. पुढे मी युनियनचा जनरल सेक्रेटरी म्हणून सरांच्याबरोबर काम केले. संप, बंद अशा मार्गापेक्षा कामगारांचे प्रश्न सामोपचाराने सोडवण्याचे सरांचे धोरण असे. मला आठवते, कामगार चळवळीत काम करणाऱ्यांसाठी पन्हाळ्यात एक शिबीर आयोजित केले होते. कामगार कायदे, कामगार चळवळ असे मार्गदर्शन आम्हाला तज्ज्ञ लोकांनी केले होते. कामगारांच्या प्रश्नांवर अभ्यास करून उपाय सुचविण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती, मी त्या समितीवर होतो.

आज मागे वळून पाहतो, तेव्हा असे लक्षात येते की, शाळेत जे संस्कार माझ्यावर झाले त्याचाच परिणाम माझ्यात काही ध्येयवाद रुजण्यास कारणीभूत झाला. ते संस्कार आरवाडे हायस्कूलचे आणि डी.एन.सरांचे होते.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, सांगली साखर कारखान्यातून निवृत्त झालेले जनसंपर्क अधिकारी)*

●●●

# माझे आयडॉल

-डॉ.शशिकांत आरवाडे

प्रत्येक व्यक्तीस 'आपण कोणासारखे तरी व्हावे' असे वाटत असते; -म्हणजे एखाद्या खेळाडूसारखे, सिने नटनटीसारखे, एखाद्या पुढाऱ्यासारखे. त्या त्या काळातील प्रसिद्ध व्यक्तीसारखे आपण व्हावे असे प्रत्येक पिढीतील विद्यार्थ्यांना वाटत असते. शालेय जीवनात तर 'आपण आपल्या शिक्षकासारखे व्हावे' असे क्वचितच कोणाला वाटत असेल! परंतु माझ्या शालेय जीवनात मला नेहमी 'डी.एन.सरांसारखे आपण व्हावे' असे वाटे. सिने तारे-तारकांसारखी केशरचना, कपडे, बोलणे वगैरे साधून ही इच्छा थोडीफार पूर्ण होते, इतर बाबतींत मात्र तशी सोय नसते.

सरांचा पोशाख, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे चालणे-बोलणे-शिकवणे या सर्वांचाच माझ्यावर प्रभाव होता. पोशाख, बोलणे या गोष्टींची कॉपी करून हे साध्य होणारे नव्हते; त्यासाठी आपण खूप शिकले पाहिजे, वाचले पाहिजे हे जाणवत होते. म्हणूनच मग मॅट्रिक पास झाल्यावर शिक्षणास रामराम ठोकून प्रथेप्रमाणे घरचा व्यापार धंदा पाहावा, असे न करता मी मेडीकलचे शिक्षण घेण्यासाठी सांगली सोडली. बेळगावहून एम.डी.केले; मिरज मिशन हॉस्पिटलमध्ये रुजू झालो. पुढे सरकारी नोकरीत डिस्ट्रीक्ट टी.बी.ऑफीसर म्हणून सांगली, कोल्हापूर, अकोला अशा जिल्ह्यांत २८ वर्षे नोकरी करीत आहे. शिकवणे हा माझा आवडीचा विषय; त्यात मी आता काम करीत आहे. शिक्षकाचे किती महत्त्व आहे हे आज मला प्रत्यक्ष अनुभवांतून कळते आहे. शेवटी का होईना, आपटे सरांप्रमाणे शिक्षक व्हायची सुप्त इच्छा पूर्ण झाली आहे! ५ सप्टेंबरच्या शिक्षकदिनाला माझा जीवनादर्श असणाऱ्या या शिक्षकाची मला आठवण येतेच येते!

मी गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये शिकलो. सर आम्हाला इतिहास आणि इंग्रजी शिकवीत. डलहौसी, त्याचे कलकत्यात आगमन आणि पुढील कारकिर्द हा भाग जणू आम्ही सर्व प्रत्यक्ष पाहात आहोत असे वाटे. सरांनी एखादा धडा शिकविला, आणि तो पुन्हा वाचायला लागला असे कधी झाले नाही. सरांचा तास म्हणजे कधी कधी गोष्टींचा तास होई. स्पेन देशातील एलसीड या योध्द्याची कथा त्यांनी आम्हास सांगितली. मुस्लीम राजवटीविरुद्ध लढणारा तो योद्धा होता. रणांगणावर तो जबर जखमी होतो, त्यात त्याचा मृत्यू होतो. त्याच्या सैन्यात घबराट पसरते. पण त्याच वेळी त्याचे सहकारी त्याचा देह घोड्यावर बसवतात आणि पुन्हा रणांगणावर सोडतात. 'एलसीड अजून जिवंत आहे' असे समजून सैन्यात पुन्हा चैतन्य येते. एलसीड जिवंत आहे हे पाहून शत्रूसैन्यही पळून जाते; अशी ती कथा. योगायोग असा आला की, नंतर कधीतरी तो सिनेमा मला पाहायला मिळाला. सिनेमा पाहताना आमचे सरच गोष्ट सांगत आहेत, असे वाटून गेले. पुढे मला समजले की, 'एलसीड' या कादंबरीचा मराठीत अनुवाद डी.एन.सरांनी केला होता, मात्र तो प्रकाशित होऊ शकला नाही.

डी.एन.सरांनी खेळाचा तास सक्तीचा केला होता. 'तू अध्यक्षांचा मुलगा म्हणून कोणतीही सूट मिळणार नाही हे लक्षात ठेव' अशी 'दम'वजा जाणीव मला पहिल्याच दिवशी करून दिली होती. कबड्डी, खोखो असे मैदानी खेळ मी शिकलो. मल्लखांब हा असाच सक्तीचा खेळ. त्या खेळाचे महत्त्व कितीही पटले तरी तो खेळ लंगोट घालून खेळावा लागे, आणि शाळेत त्याची लाज वाटे. सर स्वत:च जेव्हा लंगोट कसून आमच्यासोबत आले, तेव्हा मात्र आमचा नाइलाज झाला. गंमत म्हणजे काही दिवसांतच आमची भीती, लाज लुप्त झाली. शाळेत एन.सी.सी. असणे किती महत्त्वाचे आहे हे, ज्यांनी तो कोर्स केला आहे तेच जाणू शकतात. मी तीन वर्षे यात आवडीने भाग घेतला. त्या शिस्तीचा आजही उपयोग होत आहे.

आमच्या शाळेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आमचे ग्रंथालय. अतिशय समृद्ध असे ते छोटेखानी ग्रंथालय होते. स्वत: डी.एन.सरांचे वाचन अफाट होते. तसे ते लेखकही होते. आमची बॅच 'हुशार मुलांची' म्हणून ओळखली जायची. सरांनी अवांतर वाचनाची आवड लावली. प्रत्येक

विद्यार्थ्याने आठवड्यातून किमान एक तरी पुस्तक वाचले पाहिजे असा दंडक घालून दिला होता. सर ग्रंथालयात जाऊन आम्ही पुस्तके खरेच नेतो का, हे तपासत. या सवयीचा भावी आयुष्यात फार उपयोग झाला. सरांचे मुलांच्यावर खूप प्रेम. हुशार मुलांवर ते जेवढे प्रेम करीत, तितकेच वर्गातील ढ मुलांवरपण करीत. मुलगा ढ म्हणून त्याचा दु:स्वास, अपमान त्यानी केल्याचे आमच्या पाहण्यात नाही. आमच्या वर्गात खूप गरीब मुले होती. राहायला पत्र्याची लहान खोली किंवा अगदी झोपडी अशी अवस्था अनेक मुलांची होती. अभ्यासासाठी रॉकेलचा दिवा मिळणेसुद्धा शक्य नव्हते. अशा विद्यार्थ्यांसाठी एक वर्ग शाळेच्या वेळेनंतर उघडून दिला जाई. सोबत एक शिक्षक आणि शिपाई नेमलेला असे. शाळेतील अनेक विद्यार्थी याचा लाभ घेत. घरी सर्व सोयी असणारी आमच्यासारखी मुलेसुद्धा तेथे अभ्यास करीत. त्या वर्गात असे वातावरण असे की आपोआपच उत्तम अभ्यास होई.

सर एकाच वेळी अनेक कामे करीत असत, त्यांतून त्यांची प्रशासनशैली दिसे. शाळेचे रोजचे काम, स्वत:चे तास, शिवाय शाळेच्या विकासासाठी सतत धडपड, लिखाण, कामगार-चळवळ असे अनेक विषय ते एकहाती सांभाळत. त्यांचा वक्तशीरपणा तर आमच्या सदैव लक्षात राहणारा आहे. सरांचा तास आहे आणि आम्ही त्यांची वाट पाहात थांबलो आहोत, असे कधीच होत नसे. पहिले शिक्षक बाहेर पडण्यापूर्वी सर दारात येऊन उभे असत. विद्यार्थी, शिक्षक, इतर कर्मचारी यांच्यावर त्यांचा इतका प्रभाव होता की, प्रत्येकजण आपापले काम चोख करीत. सरांनी मुलांना कधी शिक्षा केल्याचे पाहण्यात नाही. तसेच शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांवर आरडाओरड केली आहे, असेही कधी दिसले नाही.

आमचे दादा म्हणजे माझे वडील गणपतराव आरवाडे हे शाळेचे देणगीदार होते, तसेच यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष होते. आठवीपासून सिटी हायस्कूलमध्ये प्रवेश घ्यायचा माझा हट्ट होता. दादांनी मला एका शब्दात सांगितले, ''तू अध्यक्षांचा मुलगा आहेस, तेव्हा तू आरवाडे हायस्कूलमध्येच प्रवेश घेतला पाहिजेस. तू तिथे सर्वसामान्य विद्यार्थ्यासारखाच वागला पाहिजेस.'' खुद्द अध्यक्षांचा मुलगा दुसऱ्या शाळेत शिकतो, हे त्यांना मान्य नव्हते. तसे झाले तर संस्थेच्या दर्जाबाबत पालकांच्या मनात शंका उत्पन्न होणार, याची त्यांना काळजी होती.

डी.एन.सर कार्यवाह आणि आमचे दादा अध्यक्ष, असे व्यवहारिक नाते असले तरी प्रत्यक्षात ते एकमेकाचे परममित्र होते. सर आमच्या घरचेच सदस्य होते. सर्व महत्त्वाच्या गोष्टीत सरांचा सल्ला घेतला जाई. शाळेच्या कामाव्यतिरिक्त सर आमच्या घरी वरचेवर येत असत. पुढे या संस्थेचे अध्यक्षपद सांभाळण्याची संधी मलाच मिळाली. दादांनी आणि डी.एन.सरांनी घालून दिलेला आदर्श डोळ्यासमोर ठेवून ती पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. माझी नोकरी, माझा व्यवसाय आणि संस्थेतील बदलती परिस्थिती यांमुळे म्हणावे तितके परिणामकारक काम मला तिथे करता आले नाही.

सरांबद्दल नेमक्या कोणत्या भावभावना आमच्या मनात असत, त्यांचे शब्दांत वर्णन करणे शक्य नाही.... आदर वाटे, भीती वाटे, तितकेच प्रेमही!

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, प्रसिद्ध सर्जन, संस्थेचे काही काळ अध्यक्ष)*

●●●

# लढायला शिकविणारे आपटे सर

-अरुण नाईक

विद्यार्थ्यांच्या थेट मनापासून त्यांच्या अंत:करणाचा, आत्म्याचा परिपूर्ण विकास व्हावा, यासाठी आपल्या साऱ्या आयुष्याचे योगदान देऊन सांगलीच्या शिक्षणक्षेत्रात सदैव कार्यरत राहिलेले एक थोर कर्मयोगी म्हणजेच आदरणीय दत्त नारायण तथा डी.एन.आपटे सर! आदरणीय आपटे सरांनी जे कार्य केले आहे, ते आठवून त्यांच्या स्मृतीपुढे नतमस्तक व्हावेच लागते. आपटेसर शाळेत काय शिकवीत होते, हे सांगता येण्यासारखे नाही. पण गोरगरीब विद्यार्थ्यापासून सर्वांचे ते एक प्रकारे बाप असल्याचेच प्रत्ययाला येत राहिले.

विद्यार्थ्यांच्या सहली घेऊन जाण्यास ते नेहमी सज्ज असायचे! त्यांनी मुंबई आणि बडोदा इथे आम्हा विद्यार्थ्यांची नेलेली सहल आमच्या जीवनावर फार मोठा परिणाम करून राहिलेली आहे. त्या सहलीत, नंतरच्या काळात प्राध्यापक झालेले धनपाल देवर्षी, वसंत खराडे, मोहनभाई शहा असे आम्ही सात-आठ विद्यार्थी होतो.

आपटेसरांना कुस्ती फार प्रिय होती, त्यावेळी गाजलेले मल्ल राम नलावडे यांना सगळ्या सोयी सवलती देऊन त्यांनी हायस्कूलमध्ये सांभाळले. पोहण्याचीही त्यांना विलक्षण आवड होती. कृष्णा नदीला पूर आल्यावर हायस्कूलला दांडी मारून आम्ही पुरात उड्या मारीत असू. एकदा मी उडी मारण्याच्या तयारीत होतो, तर दत्तोपंत आपटेसर आणि त्यांचे बंधू विनायकराव आपटेसर नदीपात्रातून पोहत येत असलेले दिसले. मी मनातून घाबरलो. त्यावेळी आपटेसर म्हणाले, ''भिऊ नकोस, मार उडी! इथं पुढं भोवरा आहे, तिथंच मार उडी! तुला भोवऱ्यातून बाहेर कसं पडायचं ते शिकवतो!''

माझे वडील बी.जी.नाईक हे आपटेसरांचे सहकारी, पण आपटेसर हेच मला पितृतुल्य होते! मी टायफॉईडने आजारी पडलो. त्या काळात टायफॉईड म्हणजे मरणच होते! एकवीस दिवस मी अंथरूण धरून होतो. या काळात आपटेसरांनी माझी शुश्रुषा केली. ते रोज न चुकता मला एनिमा वगैरे देत, माझे अंग पुसून मला स्वच्छ ठेवत असत! विद्यार्थ्यांविषयी अशी कमालीची पितृभावना मला फक्त आपटेसरांमुळे अनुभवायला मिळाली!

आपटेसर तासावर येत तेव्हा सगळा वर्ग खूश असे. ते कोणता विषय म्हणून शिकवायला येतच नसत, कित्येकवेळा कुणी रजेवर वगैरे असलेल्या शिक्षकांचा(ऑफ) तास घेण्यासाठी येत. विशेष म्हणजे त्यावेळी महाकवी-नाटककार शेक्सपियरच्या नाटकाच्या गोष्टी ते सांगत. या गोष्टी सांगणेसुद्धा साधेसुधे नाही, साभिनय असायचे! हातवारे करून ते शेक्सपियरच्या नाटकातील ऑथेल्लो - तर कधी मॅकबेथ उभा करीत असत! त्यांचा तो अभिनय बघून आम्ही विद्यार्थी भारावून जात असू! तास संपल्याची घंटा झाली, तरी आपटेसर वर्गातून जाऊच नयेत, साभिनय गोष्टी सांगतच राहावेत, असे सर्वांना वाटायचे! आज मला कळून चुकले की, आपटेसरानी काय शिकविले! काय आमच्या रक्तात रुजविले!

माझ्या पुढील जीवनात एक रंगकर्मी - एक अभिनेता म्हणून मी रंगभूमीवर उभा राहिलो. रसिक प्रेक्षकांची दाद मिळवीत गेलो, त्या त्या वेळी मला आपटेसरांची आठवण येऊन डोळ्यात ऋणभावनेचे अश्रू दाटून आल्याशिवाय राहिले नाहीत! बोर्डाच्या परीक्षा वगैरे पास-नापास होण्यात माझे शालेय जीवन केव्हाच अडकले नाही, माझी शाळा-हायस्कूल सगळे 'आपटेसरच' होते! जीवनातल्या अनेक अडचणींच्या, संकटांच्या काळात आपटेसरांचीच प्रकर्षाने आठवण येते, आणि 'डगमगू नको, हटू नको - लढ' असे ते म्हणत असल्याचे जाणवते!!

माझ्या पत्रकारी कारकिर्दीत सांगली नगरपालिकेची निवडणूक त्यानी लढविली होती - पण ती पुन्हा कधी लढवायची नाही हा निर्णय घेण्यासाठीच ठरली! -कारण हा लढा नाही, तर फसवा तिढा आहे, याची प्रचिती त्यांना आली. या तिढ्याला ते तोंड देऊ शकलेही असते. पण हा खिलाडू वृत्तीचा मल्ल होता, ते तसल्या तिढ्यांत गुंतले नाहीत हे एका दृष्टीने बरेच!

*(लेखक : पत्रकार, नाट्यकर्मी, निवेदक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व)*

●●●

# हे ऋण फिटणारं नाही

-वसंत कुंभोजकर

ऐन पंचविशीमधली दत्तोपंतांची ती तगडी तालिमबाज मूर्ती अजून स्पष्टपणे आठवतीय्. अंगलट पैलवानाची, पण पेहराव मात्र काहीसा सैनिकी बाण्याचा. दोन खिशांचा खाकी शर्ट. हातोपे दंडापर्यंत दुमडलेले. खाकी अर्धी विजार आणि शर्ट आत खोचलेला. त्या काळातल्या अनेक तरुणांप्रमाणं 'हिटलर' हे दत्तोपंतांचं दैवत असावं. अर्थात इथं एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, 'हिटलर' या शब्दाला आज जी एक दुर्गंधी येते, ती त्या काळात नव्हती. ब्रिटिश साम्राज्याला आव्हान करणारा हिटलर हा त्याकाळी पुरुषार्थाचे आणि पराक्रमाचे प्रतीक मानला जात होता.

तर 'हिटलर'च्या व्यक्तिमत्वाची छाप त्यावेळी दत्तोपंतांच्यावर होती यात शंकाच नाही. त्यांच्या मिशांचा कट हिटलरसारखा असायचा. हिटलरच्या सैनिकी शिस्तीचंही त्यांना जबरदस्त आकर्षण होतं. शाळेमधल्या सगळ्याच विद्यार्थ्यांना सैनिकी संचलन आलं पाहिजे असा दत्तोपंतांचा कटाक्ष होता. तसं तर आमच्या शाळेचं स्वतंत्र क्रीडांगण नव्हतंच. पण केंगणेश्वरीच्या मैदानात आमच्या परेड्स चालायच्या. त्याचं नेतृत्व अर्थात दत्तोपंतांकडं. We are all sons of Hind या त्यांनीच शिकविलेल्या संचलन-गीतांचे स्वर आणि त्या तालावर पडणाऱ्या आमच्या पावलांचे आवाज अजून माझ्या कानात घुमताहेत.

वर्गामधलं दत्तोपंतांचं शिकवणं म्हणजे तर स्वातंत्र्यप्रेमाची आणि देशभक्तीची उपासना असायची. या उपासनेला मैदानावरची वीरवृत्तीची जोपासना पोषक ठरायची. अनेक देशी विदेशी स्वातंत्र्यवीरांच्या कथा ते इतिहासाच्या तासाला आम्हाला अशा रंगवून सांगायचे की तास कधी संपला याची, त्यांना आणि विद्यार्थ्यांनाही - जाणीव व्हायची नाही. त्यांच्या त्या आवेशपूर्ण वक्तृत्वाने आम्ही झपाटून निघायचो. दत्तोपंतांचा पिंडच असा खऱ्याखुऱ्या देशभक्ताचा असला तरी त्यांनी पत्करलेल्या शिक्षकाच्या पेशाचा त्यांना कधी चुकूनही विसर पडला नाही. वर्गात शिकवीत असलेल्या विषयांकडे त्यांचे कधीही दुर्लक्ष व्हायचे नाही. दत्तोपंतांनी वर्गात पाऊल टाकलं, की वर्गाचं सगळं वातावरण भारून टाकायचे.

'स्टँड अप्, सिडाऊन, सिट राईट' ची तालीम थोडावेळ झाली, की सर पुस्तक चक्क बाजूला सारून ठेवायचे आणि मोठ्या मिष्ठास इंग्रजीत बातचीत केल्यागत वर्गाशी बोलू लागायचे. कधी हे बोलणं म्हणजे एखादी मजेदार गोष्ट असायची, तर कधी रोजच्या जीवनामधला एखादा गंमतीदार अनुभव असायचा. सरांचं हे इंग्रजी बोलणं इतकं सोपं असायचं, की त्यांच्या बोलण्यामधला शब्दन् शब्द् आपल्याला कळतोय या भावनेनं मनं सुखावली जायची. 'आपण काही शिकतोय' याची जाचक जाणीव कधी व्हायचीच नाही. ही जाणीव मनातून दूर करण्यासाठीच जणू ते प्रारंभी मोठ्या नाट्यपूर्ण रीतीने पुस्तक दूर सारायचे. त्यांचं बोलणं संपलं की प्रश्नाला सुरुवात व्हायची. प्रश्नही मोठे अचूक आणि टोकदार असायचे. सगळ्या वर्गाचे हात वर असायचे. उत्तर देण्यासाठी अहमहमिका लागायची. सगळी पोरं इंग्रजीत आत्मविश्वासानं उत्तरं द्यायची. कुणी मागच्या बाकावरचा थोडा लाजरा बुजरा मुलगा उत्तरं द्यायची टाळाटाळ करतोय असं त्यांच्या ध्यानात आलं, तर त्याला मुद्दाम वर्गासमोर उभं करून बोलायला लावायचे. उत्तर चुकलं तर त्यालाच दुरुस्त करायला लावायचे. तासाच्या अखेरी अखेरीला जेव्हा ते आम्हाला पुस्तक उघडायला सांगायचे, तेव्हा आमच्या ध्यानात यायचं की पुस्तकातला एक नवा धडा आमचा झकास तयार झालाय. प्रत्येक इंग्रजीच्या तासाअखेरी सातआठ नव्या इंग्रजी शब्दांची भर आमच्या मनात पडलेली असायची. तर्खडकरी भाषांतराच्या घोकंपट्टीच्या दिवसात दत्तोपंत सर आम्हाला संभाषण पद्धतीने इंग्रजी शिकवायचे, याचं त्याकाळी वाटलं नव्हतं येवढं आज आश्चर्य वाटतं.

सहज दैनंदिन व्यवहारात, मातृभाषेतून बोलावं तितकं साधं सोपं आणि तरीही स्टायलिश इंग्रजी बोलणं, हे दत्तोपंत सरांचं खास वैशिष्ट्य होतं. मुलांनाही इंग्रजी आत्मविश्वासपूर्वक बोलता आलं पाहिजे, आणि

स्वतंत्रपणानं इंग्रजी पुस्तकं त्यांना वाचता आली पाहिजेत असा दत्तोपंतांचा आग्रह असायचा. हा आग्रह म्हणजे स्वत:चं मोठेपण मिरविण्यासाठी केलेल्या उपदेशाच्या चालीवरचा वावदूकपणा नव्हता. दत्तोपंतांच्या आग्रहाला त्यांचा स्वत:चा एक निग्रह पायाभूत होता. मुलांसाठी स्वत: राबण्याची त्यांची तयारी असायची. वर्गात मागं पडणाऱ्या मुलांना, ते सुट्टीच्या दिवशी मुद्दाम शाळेत बोलावून घेत आणि मग त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यास चाले. जरा बरी तयारी दिसणाऱ्या मुलांना ते आपल्या खोलीवर यायला सांगत. बक्षीच्या बोळात, दुसऱ्या मजल्यावर त्यावेळी दत्तोपंतांची एक छोटीशी खोली होती. त्या खोलीवर बोलाविलं जाण्याचा मान मलाही एकदा मिळाला.

दत्तोपंतांच्या खोलीवर आणि घरात जी हजारो पुस्तकं आम्ही पाहात होतो, ती सगळीच्या सगळी त्यांनी विकत घेतली आहेत हे ज्या दिवशी आम्हाला समजलं, त्या दिवशी जगामधलं नववं की दहावं-काय म्हणतात ते, आश्चर्य वाटलं. पुस्तकाबाबत माझ्या त्यावेळच्या कल्पना अगदी सरळ मध्यमवर्गीय होत्या. विकत घ्यायची पुस्तकं म्हणजे शाळेत नेमलेली फक्त पाठ्यपुस्तकं, तीही शक्यतर निम्म्या किंमतीत घ्यायची, आणि इतर जी पुस्तकं वाचावीशी वाटतील ती एकतर लोकांच्याकडून मागून आणायची, नाही तर लायब्ररीतून - नाहीतर मग येवढ्या मोठ्या मोठ्या लायब्ऱ्या असतात कशाला? पण दत्तोपंतांचा खाक्या काही औरच. दोन आकड्यात पगार असलेल्या काळापासून पुस्तकं विकत घेऊन वाचण्याचं त्यांना जबरदस्त व्यसनच. अजूनही मुंबईला गेले की त्यांची पहिली भेट 'तारापोरवाल्या'च्या पुस्तक दुकानाला असते. त्यांच्या आवडत्या विषयावरची - म्हणजे राजकारणावरची, अद्ययावत् पुस्तकं विकत घेऊन मगच ते मुंबईमधल्या इतर कामांकडं वळतात.

'राजकारण' म्हणताना फिरून विद्यार्थी दशेची आठवण झाली. खालच्या वर्गातून आम्ही जसेजसे वरच्या वर्गात यायला लागलो, तसा दत्तोपंतांच्या बोलण्यामधला हिटलरचा उल्लेख गळून पडायला लागला. त्याऐवजी एम्.एन्. रॉय, लेनिन ही नावं त्यांच्या बोलण्यातून यायला लागली. भारताच्या आणि एकूण जागतिक राजकारणाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. पण त्याच काळात आम्ही गावभागामधली आठ-दहा मुलं नकळत ज्या एका राजकीय विचारसरणीच्या छावणीत ओढलो गेलो होतो, त्या छावणीमधल्या विचारांशी दत्तोपंतांचे विचार मुळीच जुळेनात. आम्ही मॅट्रीकच्या वर्गात आल्यानंतर तर छावणीच्या विचारसरणीनं आम्हाला इतकं भारून टाकलं होतं की, एके काळी 'हिरो' असणारे दत्तोपंत आता आम्हाला दुष्मन वाटायला लागले होते. भर वर्गात दत्तोपंतांची आणि आमची वादावादी व्हायला लागली.

अर्थात वादात त्यांच्यापुढं आमचा टिकाव लागणं शक्य नव्हतं. 'बौद्धिक' वर्गात ऐकलेले आमचे विचार दत्तोपंत अत्यंत शांतपणानं आणि हसत हसत खोडून काढत, तसा आमचा तोल सुटे. एकदा तर भलतीच गंमत झाली. इतिहासाच्या तासाला आम्हीच काही तरी वाद उकरून काढला. दत्तोपंतांनी उत्तर देण्याच्या भरात आमच्या छावणीवर शाब्दिक हल्ला केला. त्यासरशी तिरीमिरीनं आम्ही सात-आठ मुलं वर्गाबाहेर पडलो. - वर्गाबाहेर पडलो खरं. पण मग मनातल्या मनात धागधुक वाटायला लागली. प्रिलिमिनरी परीक्षेत दत्तोपंत आमच्यावर सूड तर घेणार नाहीत? - कारण त्या काळात प्रिलिमिनरीत पास झाल्याशिवाय मॅट्रिकच्या परीक्षेस बसताच येत नसे. पण आमची भीती सर्वस्वी निराधार होती. त्या दिवशीचा प्रकार दत्तोपंतांच्या मनातही नव्हता. विद्यार्थी या नात्यानं ते अखेरपर्यंत आमच्यावर प्रेमच करीत राहिले. त्यांच्या आमच्यातलं गुरू-शिष्याचं नातं अतूटच राहिलं.

मी आता ९० वर्षे ओलांडली आहेत. तब्येत, स्मृती उत्तम आहे. 'डी.एन.सरांचा विषय निघाला नाही असा एक दिवस मला आठवत नाही,' हे वाक्य पी.एम.हायस्कूलच्या जितक्या विद्यार्थ्यांना भेटलो त्या प्रत्येकाकडून ऐकले आहे. सरांनी कोणत्याही विचाराशी स्वत:ला बांधून ठेवले नाही. काळाप्रमाणे जे चांगले, ते घेत गेले, जुन्यातील वाईट सोडून दिले. शाळा आणि शिक्षण हे त्यांचे ध्येय शेवटपर्यंत राहीले. त्याच्याआड त्यांनी कोणतीही गोष्ट येऊ दिली नाही.

माझे वडील पी.एम. हायस्कूलमध्ये चित्रकला शिकवीत असत. शिक्षकांच्या मुलांना फी नसे म्हणून माझी

रवानगी पी.एम. हायस्कूलमध्ये झाली. त्या काळात राजकारणात आणि समाजकारणात अनेक विचारप्रवाह होते. या विचारसरणींबद्दल सर मुलांशी संवाद करीत. वादविवादात सर आम्हाला निरुत्तर करीत.

सेवादलाचे शिबीर सांगलीत चालू होते. सरांचे बौद्धिक म्हणून आम्ही संघाची मुले त्यांच्या भाषणास गेलो होतो. सरांनी नामनिर्देश न करता संघावर सडकून टीका केली. दुसरे दिवशी संघाचे सांगलीचे प्रमुख माधवराव गोडबोले यांचेकडे मी गेलो, पाहतो तर तिथे सर गप्पात रमले होते. मला फारच राग आला. मी सरांना जाबच विचारायचे ठरविले. 'त्यांच्या संघटनेवर जाहीर टीका करता आणि पुन्हा त्यांच्या घरी जाऊन चहा पिता?' सरांनी मार्मिक उत्तर दिले, ''त्यात काय, आमचा वैचारिक मतभेद असेल, म्हणून व्यक्तीशी तो जोडणे किती योग्य? त्यांचे विचार ऐकायला हवेतच. वैर धरून ते कसे साधेल? आपण प्राणी पक्षांशी संवाद साधतो, ही तर माणसे आहेत.''

सांगलीत त्याकाळी 'माऊली' नावाचे साप्ताहिक एक काँग्रेस कार्यकर्ते चालवीत. त्याविषयी चांगले बोलले जात नसे. मी विचारले. 'सर, तुम्ही विरोधी पक्षावर टीका करता, तुमच्या काँग्रेसमध्ये काय चालले आहे, हे कसे दिसत नाही.' ते उत्तरले, ''वश्या अरे, 'या बाबतीत सगळे आतून सारखेच असतात.''

एकदा गंभीरपणे म्हणाले, ''वसंता, जग वाटते तितके सरळ नसते, मी आज संस्थेला हवा आहे, उद्या कदाचित माझी अडचण वाटू लागेल. तेव्हा मला कस्पटासारखे दूर करायला कमी करणार नाहीत. इतकेच काय अशावेळी बंधूसुद्धा पाठीशी उभे राहतील याची खात्री नसते.'' (त्याचा प्रत्यय पुढच्या काळात आलाच. अगदी जवळचा समजल्या जाणाऱ्या एकाने 'डी.एन.सर म्हणजे आता दात आणि नख्या काढलेला सिंह आहेत' अशी निर्भत्सना करायला मागे-पुढे पाहिले नाही.)

सर आमच्या घरी आले की माझे वडील आणि सर खूप गप्पा मारीत. अशा वेळी मला तेथून दूर पिटाळीत, सर काही रोमँटिकसुद्धा बोलत असावेत. सरांना विषयाचे कोणतेच बंधन नव्हते. सांगलीच्या गावभागात तीन व्यायामशाळा होत्या एक समर्थ, दुसरी आदिबलभीम आणि तिसरी बलभीम व्यायामशाळा. का कोणास ठाऊक, या तीनही व्यायामशाळांचे एकमेकांशी कट्टर वैर होते, मात्र सरांची तीनही व्यायामशाळांतील लोकांशी मैत्री असे. हे केवळ तेच करू जाणे.

सरांची शिकवण्याची पद्धत फारच वेगळी. मुलांशी गप्पा मारत त्यांना बोलते करत. साभिनय शिकवीत. 'मर्दानी झाशीवाली' म्हणताना मिशीवर ताव मारल्याचा आविर्भाव करीत. आम्ही लगेच 'सर राणी स्त्री होती, तिला मिशा कोठून आल्या?' विचारायचो; वश्या, 'मिशा लेका झुरळालासुद्धा असतात की, मिशा म्हणजे मर्दानगीचे लक्षण. झाशीची राणी स्त्री असूनही मर्दानी होती.'

एकदा शाळेची शिक्षण खात्याकडून तपासणी होती. गोखले नावाचे इन्स्पेक्टर आले होते. तास डी.एन.सरांचा होता. साहेब सरांच्या खुर्चीत बसले होते. आम्ही मुले घाबरूनच होतो. तास सुरू झाला नेहमीसारखा. मी पहिल्या बाकावर होतो. सरांनी मलाच पहिला प्रश्न केला. 'वश्या, आज पोहायला का आला नाहीस? पुन्हा दांडी मारलीस तर माझ्याशी गाठ आहे'. आपल्या वर्गावर इन्स्पेक्टर आहेत त्याचे कोणतेही दडपण सरांच्यावर नव्हते.

सर नेहमीच चांगल्या शिक्षकांचा आदर करीत. आम्हाला शं.गो.आपटे नावाचे शिक्षक संस्कृत शिकवीत. माझ्या वर्गात एक मुलगा होता; चापलुसी म्हणजे काय हे त्याच्याकडून शिकावे. आमच्या संस्कृत सरांना खूश करण्यासाठी तो सिटी हायस्कूलमधील दीक्षित नावाच्या संस्कृत सरांना नावे ठेवू लागला. तिथे डी.एन.सर होते. त्याचा कयास, आपण सिटी हायस्कूलमधील शिक्षकांना नावे ठेवली म्हणजे डी.एन.सरांना आनंद होईल. सिटी हायस्कूल आणि पी.एम. हायस्कूल यांत उघड स्पर्धा होती. दीक्षित सरांची ख्याती महाराष्ट्रात होती. त्यांच्या विद्यार्थ्यांनी शंकरशेठ बहुमान मिळविलेला होता. डी.एन. सर गरजले. 'डुबल्या काय म्हणालास, पुन्हा बोल कुणाविषयी बोलतोयस याची जाणीव आहे का? तुझी योग्यता काय, तू बोलतोस काय? पुन्हा असे केलेस तर थोबाड फोडीन हे लक्षात ठेव.'

सबुरी, सौम्यता असले शब्द त्यांना माहीत नव्हते.

तडकून, ठासून बोलणे असायचे. त्यांच्या देहबोलीवर आणि ठासून बोलण्यापुढे प्रतिस्पर्धक निम्मा गारद होत असे. पेशा आणि पेहराव शिक्षकी असला तरी सर ही एक भयंकर व्यक्ती असली पाहिजे असे मला नेहमी वाटे. आज तो माझा समज खरा ठरला. त्यांचे सशस्त्र क्रांतीचे अनेक उद्योग कळाले. बॉम्ब बनविणे, शस्त्रे पुरविणे, जाळपोळीत जमावावर चालून जाणे; हे सगळे अतिशय गुप्तपणे चालत असे. शाळा, शिक्षण यांत त्याचा कधीही अडथळा आला नाही, -ना त्याची चर्चा झाली!

मी पदवीधर झाल्यानंतर काही काळ सिटी हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करीत होतो. त्याच वर्षी भारताचे पहिले वैयक्तिक ऑलेम्पिक पदक खाशाबा जाधव यांनी मिळवले (१९५२ हेलसिंकी). त्यांचा सत्कार सांगली शिक्षण संस्थेत करायचा घाट मी पुढाकार घेऊन घातला. सगळ्या शाखांतील शिक्षकांची सिटी हायस्कूलमध्ये मी एक बैठक बोलावली. डी.एन.सर आमंत्रण नसतानाही तिथे आले. आम्ही आमंत्रण न दिल्याबद्दल त्यांची माफी मागितली आणि त्यांना सामील करून घेतले. ते सत्काराच्या दिवशी प्रेक्षकांत हजर होते. त्यांना व्यासपीठावर बोलावून घेतले. मी अचंबित झालो होतो, सर म्हणाले होते, 'खाशाबा काय फक्त तुमचाच आहे का? तो साऱ्या देशाचा आहे. प्रत्येकाने अशा कार्यक्रमात सहभागी झाले पाहिजे. यामध्ये शाळा कोणती, कोण कार्यक्रम घेत आहे, याचा संबंध कोठे येतो!' सरांचा दिलदार स्वभाव आणि कुस्तीवरचे प्रेम इथे दिसते.

माझी सिटी हायस्कूलमधील नोकरी उत्तम चालू होती. एकदा सर मला भेटले, 'मी ज्या शाळेत शिकलो, त्याच संस्थेत काम करायला मिळाले तर मला आनंद होईल' अशी इच्छा व्यक्त केली. सर म्हणाले, ''आमच्या कुंडल शाखेत काम करशील का?'' मी विचारले ही शाखा केव्हा चालू झाली?' ''झाली कुठली, तूच पुढाकार घेऊन चालू करायची, तू फक्त तयार हो. मी योग्य माणसाच्या शोधात आहे. बाकी मी बघतो. मी 'हो' म्हणतो तर कुंडल शाखा निश्चित चालू झाली असती. माझे धाडस झाले नाही आणि ती शाखा काही निघाली नाही.

सगळ्या आंबटगोड आठवणी आता जवळ जवळ इतिहासजमा झाल्यात. आठवणींचे रंग आता फिके फिके व्हायला लागलेत. पण विद्यार्थ्यांच्यावर देशभक्तीचे, ज्ञानाचे संस्कार करण्याच्या जिद्दीने पेटलेली गुरुवर्य दत्तोपंतांची मूर्ती मन:पटलावरून कधीही नाहीशी होणार नाही. अखंड ज्ञानाची साधना करण्याचा संदेश देणारी त्यांची वाणी मनात सदैव घुमतच राहील.

माझ्या आयुष्यातील कित्येक वर्षं मीही शिक्षकाचा पेशा करतोय. अनेकवेळा आपल्या पेशाबद्दल आणि एकूण जीवनाबद्दलच मरगळ जाणवून गेलीय. अशा प्रत्येक वेळी दत्तोपंतांमधल्या चैतन्यमय शिक्षकाची आठवण झाली आणि मरगळ झटकून मी फिरून उमेदीनं माझ्या शिक्षकी जीवनाशी समरस झालोय. दत्तोपंतांचं माझ्यावरलं हे ऋण न फिटणारं आहे.

*(लेखक : शाळेचे प्रारंभकाळातील विद्यार्थी. मराठवाड्यात प्राध्यापक, लेखक)*

●●●

## प्रसन्न बलदंड गुरू

-यशवंत श्रीपाद रास्ते

माझी सकाळ सांगलीच्या टिळक स्मारकानजिक असलेल्या दुकानाच्या पायरीवर उजाडत असे. दुधाचे रतीब, वर्तमानपत्र टाकणे, धुणीभांडी करणाऱ्या माझ्या आईला मदत करणे, ठरलेल्या वारी ठरलेल्या कुटुंबाकडे जेवणे, आणि शाळा नं.एक गाठणे! तसा मी वारकरी. वारकरी म्हणजे काय? वारकऱ्यांचे तीन प्रकार असत. पंढरीची पारंपरिक वारी करणारा,- त्याची पांडुरंगावर अपार श्रद्धा. दुसरा प्रकार, ठरलेल्या वारी एखाद्या सधन कुटुंबाकडे जेवणारा विद्यार्थी, -यासाठी पात्रता गरिबी. ही पात्रता माझ्याकडे होती. तिसरा वारकरी म्हणजे मॅट्रिक परीक्षेत सारखा नापास होणारा! त्या काळी तिसऱ्या प्रकारचे वारकरी विद्यार्थी खूप असत. एका विषयात जरी नापास झाला तरी, पुन्हा त्यास सर्व विषय घेऊन परीक्षा द्यावी लागे. मार्च आणि ऑक्टोबर अशा दोन वेळा त्या परीक्षा असत. त्यालाच 'आषाढी-कार्तिकी' म्हणत. 'ग्यानबा-तुकाराम' या दोन पालख्या त्या दोन्ही वाऱ्यांत असत; एक पालखी गणिताची आणि दुसरी इंग्रजीची! बरेच विद्यार्थी या दोनही पालख्या वाहात. एक वेळ पांडुरंग पावेल, पण हे दोन विषय पावणे कठीण!

शाळा नं. एक मधून ७वी उर्फ व्ह.फा.पास झाल्यावर, हायस्कूलमध्ये प्रवेश घेणे आलेच! त्या काळी सांगलीतील प्रथितयश अशा शाळेत प्रवेश हवा असेल तर दोनपैकी किमान एक पात्रता आवश्यक असे. एक उत्तम मार्क व दुसरी सामाजिक प्रतिष्ठा. यांपैकी कोणतीच गोष्ट माझ्याकडे नव्हती. मग मला पर्याय डी.एन.आपटे सरांचे गणपतराव आरवाडे हायस्कूल; नाहीतर सावईकर सरांचे सर्वोदय हायस्कूल. घराशेजारचे म्हणून मी आरवाडे हायस्कूलमध्ये दाखल झालो. आमच्या शाळेतील मुले खेड्यांतून येत असत. शेतकरी कुटुंबातील आडदांड विद्यार्थी रगेल असत. अशा मुलांना सांभाळणे आणि संस्कृतसारखे विषय त्यांना शिकविणे महाकर्मकठीण. थोडक्यात, खाणीतून आलेला ओबडधोबड दगड घडविण्याचे ते काम.

गुरुवर्य ज.पु.जोशी संस्कृत शिकवीत. ही मधुर भाषा तितक्याच शुद्ध आणि मधुर वाणीत सर शिकवीत. वाटायचे, साक्षात कालीदास वर्गावर आहेत. इंग्रजी विषयाला के.डी.साने आणि व्ही.एन.आपटे. इतिहास डी.एन., गणित करंदीकरबाई, शास्त्र माणगावकर असे एकापेक्षा एक शिक्षक होते. त्यांतून आम्ही किती घेतले, हा विषय वादाचा होऊ शकतो. साम्यवादी म्हणून ख्याती असणारे असेच एक शिक्षक सोमण सर; शिक्षक म्हणून ते आमच्या शाळेत येणे ही एक अजब कहाणी आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे सभापती साताऱ्याचे भाऊसाहेब सोमण यांचे हे चिरंजीव. एक दिवस भाऊसाहेब सोमणानी डी.एन.सरांना फोन करून 'या पोराला तुझ्या ताब्यात देतो, काय करायचे ते तू बघ' असे सांगून या चिरंजीवाना साताऱ्याहून सांगलीस धाडले, आणि हे आमच्या शाळेत आले. हे सांगायचे अशासाठी की, माझे डी.एन.सर मनाचे किती मोठे होते. आमच्या शाळेतील शिक्षक अनुभवी होते. या शाळेचा विद्यार्थी कधी बोर्डाच्या यादीत झळकला नाही, मात्र जीवनाच्या परीक्षेत तो कधी अपयशी ठरला नाही.

मॅट्रिक परीक्षेसाठी इंग्रजी विषयासाठी क्रमिक पुस्तकाच्या बरोबरीने रॅपिड रीडर म्हणून आणखी एक पुस्तक असे. मी मॅट्रिकला असताना चार्ल्स डिकन्स या लेखकाची जगद्‌विख्यात कादंबरी 'टेल ऑफ टू सिटीज' नेमली होती. कादंबरी कशीही, कितीही चांगली असली तरी, ती किमान वाचता तरी आली पाहिजे; समजणे दूरच. आमच्यासारख्या मुलांना फक्त शाळेतील शिकवण्यावर विसंबून राहावे लागे, त्यांना तर ते आणखीनच कठीण. डी.एन.सरांनी या रॅपिड रीडरसाठी जादा तास सकाळी ७ वाजता आयोजित केला. सलग पंधरा दिवस सर ही कादंबरी शिकवीत होते. सरांनी ना कधी पुस्तक उघडले, ना कधी नोटस् लिहून दिल्या. बॅस्टाईलचा तुरुंग, मादाम दफार्ज, सिडने कार्टन, लुसी मॅनेट ही पात्रे आणि प्रसंग डोळ्यासमोर उभे केले. परीक्षेत प्रश्नपत्रिका उघडली, उत्तरे आपोआप कागदावर उतरली. शिकविण्याच्या या पद्धतीचे महत्त्व तेव्हा कळले नव्हते. ग्रंथपाल म्हणून ४१ वर्षे पुस्तकांच्या सान्निध्यात मी घालवल्यावर, आणि थोर समीक्षक म.द.हातकणंगलेकर यांच्यासोबत काम केल्यावर याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवले.

हातकणंगलेकरही माझ्याच शाळेचे विद्यार्थी.

शाळेत गणवेशाबाबत कडक नियम असत. ते पाळले जात. खाकी अर्धी चड्डी, पांढरा शर्ट आणि गांधी टोपी इतका साधा गणवेश होता. तो स्वच्छ असणे सक्तीचे. नाहीतर सर्वांसमोर त्याचा पंचनामा होई. माझा आणि माझा मित्र कानडे याचा गणवेश फाटलेला, ठिगळे लावलेला होता; कारण उघडच होते. आमचे एक शिक्षक राम नलवडे यांनी आम्हास बोलावून घेतले, दोघांसाठी कापड घेऊन गणवेश शिवून दिले. आम्ही दोघे नवीन कपडे घालून सरांना दाखवायला गेलो. आम्हाला नव्या कपड्यात पाहून भर रस्त्यात नलवडे सर घळाघळा रडले होते. बऱ्याच जणांना वाटेल याचा डी.एन.सरांच्या आठवणीशी काय संबंध? आहे, फार मोठा संबंध आहे! राम नलवडे या एके काळच्या मुलाचे पालक डी.एन.सर झाले होते, म्हणून आज राम नलवडे 'सर' होऊ शकले. माझ्या शाळेतील अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. म्हणून म्हणतो, 'माझ्या शाळेसारखी शाळा नाही.'

आईला तिच्या भाचीच्या लग्नात आहेर म्हणून आलेली दोन लुगडी बाजारात विकल्यावर माझ्या हायस्कूल प्रवेशाचा दरवाजा उघडला. मी शाळेत प्रवेश घेतला खरा पण माझ्यापेक्षा माझी आईच शाळेत नियमित येऊ लागली! शाळा सुरू झाल्यावर एक फेरी मारून सर ऑफीसमध्ये येत. तोच माझी आई बेधडक त्यांच्या कार्यालयात घुसत असे. माझी गाऱ्हाणी एकदाची सांगून झाली की, 'सर काहीतरी मार्ग काढतील' या आशेवर ती दिवस रेटीत असे. मला खूप राग येत असे. आपली आई रोज शाळेत आलेली कोणाला आवडेल? त्याला कारण मीच होतो. मला सिनेमा पाहण्याचा खूप नाद होता. तास चुकवून आम्ही मॅटिनी शो पाहात असू. झाडून सगळ्या थिएटरांचे खेळ आम्ही पाहात असू. त्यासाठी वेळप्रसंगी छोट्या मोठ्या चोऱ्याही करत असू. अभ्यास, रोजची कामे यावर परिणाम होई. आईला काळजी, हा मुलगा एकमेव आधार. तो वाया जातो की काय? आमच्या उद्योगांवर सरांचे बारीक लक्ष असे. योग्य वेळ येताच ते नेमकेपणी बोलून दाखवीत.

मॅट्रिक परीक्षा दोन वाऱ्या करीत एकदाचा पास झालो. आता मात्र काहीतरी कामधंदा करून कुटुंबाला हातभार लावायलाच पाहिजे होता. मी सरांच्या पुढे उभा राहिलो. सरांनी चिठ्ठी दिली, ती घेऊन सरळ मी गणपती पेठेतील पी.के.दांडेकर यांच्या पेढीवर पोचलो. माझ्या मनात एकच शंका; दांडेकर कट्टर संघाचे, आणि सर कट्टर काँग्रेसचे. चिठ्ठी दांडेकरांनी पाहिली, कोणतीही विचारपूस न करता मला त्या क्षणापासून कामावर ठेवून घेतले. या गोष्टीचा मी आज विचार करतो तेव्हा, 'काय म्हणून सरांनी माझी शिफारस केली असावी', असा प्रश्न पडतो. आईच्या प्रयत्नाचे हे फळ असावे का? त्याही पलीकडे सरांची शिफारस आहे म्हटल्यावर दांडेकरांनाही माझ्याबद्दल खात्री वाटली! पुढे मी म.द.हातकणंगलेकर यांच्या शिफारसीमुळे, सरांच्या मदतीने विलिंग्डन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात नोकरीस लागलो. ४१ वर्षे इमाने इतबारे नोकरी करून ग्रंथपाल म्हणून निवृत्त झालो. १९९६ साली मी संकलित केलेली 'व्यंकटेश माडगूळकर : समग्र वाङ्मय सूची' पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. म.द.हातकणंगलेकरांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झालेल्या आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केलेल्या, 'मराठी वाङ्मयकोश खंड ३; ग्रंथपरिचय' या कोशासाठी उपसंपादक म्हणून काम पाहिले. या प्रवासात डी.एन.सर माझ्या पाठीशी आहेत, असे मला सतत वाटत असे. डी.एन.सरांचे चिरंजीव शरद हे माझ्याकडे आले, माझ्या घरी दोन घास त्यांनी खाल्ले तेव्हा, सराना घरी बोलावून जेवू घालायचे माझे स्वप्न सत्यात उतरले, असे वाटून गेले.

स्वातंत्र्याची चळवळ असो, सशस्त्र लढा, अथवा गोवा मुक्ती. शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा, कामगार, सहकार, राजकारण अशा मानवी जीवनाला भिडणाऱ्या सर्व क्षेत्रांत अधिकारवाणीने आणि लीलया वावरणारे डी.एन.सर ही सांगलीच्या इतिहासात एकमेव व्यक्ती असावी. या व्यक्तीचा या नगरीने ना उचित गौरव केला, ना त्यांच्या नावाचे उचित स्मारक केले! ज्या मतदारसंघातील नागरिकांची घरेदारे जाळपोळीतून त्यानी वाचवली, ज्यांची अनेक वैयक्तिक कामे केली, त्या मतदारसंघातून नगरपालिकेवर सराना निवडून देण्याची साधी कृतज्ञता तेथील नागरिकांनी केवळ पक्षीय राजकारणी विचाराने दाखविली नाही; यापेक्षा दुर्दैव ते काय? सरांच्या कर्तृत्वाचा विचार करता, 'सांगली शहराला सर समजले तरी नाहीत, किंवा झेपले तरी नाहीत' असे उद्विग्नतेने म्हणावे लागते.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी; विलिंग्डन कॉलेजचे ग्रंथपाल म्हणून निवृत्त)*

●●●

## दगडाला देवपण देणारी शाळा

-सी.आर.(शशीकान्त)फडणीस

पश्चिम महाराष्ट्रातील मोजक्या पेंट उद्योगांपैकी आमचा 'युनायटेड पेन्टस्' हा रंग तयार करणारा उद्योग १९६० साली मी चालू केला. आज पाच युनिटमधून अनेक प्रकारचे रंग बनविले जातात, वार्षिक उलाढाल कोट्यवधी रुपयांची होत आहे. 'मला फिनिक्स व्हायचंय' या पुणे आकाशवाणी केंद्राने सादर केलेल्या कार्यक्रमात माझी तीन व्याख्याने झाली; कारण आमचा व्यवसाय राखेतून जन्मावा तसाच होता. व्यवसाय मुलांच्यावर सोपवून सध्या मी निवृत्त झालो आहे. हे सारे सांगायचे कारण, मला व्रात्य म्हणून 'मोठी प्रतिष्ठित' म्हणविणाऱ्या एका शाळेतून काढून टाकले होते. मात्र गणपतराव आरवाडे हायस्कूलने मला प्रवेश दिला. इथे मला असे वाटले की, ही शाळा आणि येथील शिक्षक माझ्यासारख्या मुलांसाठीच आहेत.

माझे वडील प्रथितयश डॉक्टर. त्या काळात चौसोपी वाडा, दारात चारचाकी असे आम्ही सधन होतो. १ फेब्रुवारी १९४८च्या सकाळी माझ्यासारख्या सधन कुटुंबातील मुलाला आमच्या मोलकरणीच्या घरी आश्रित होण्याची वेळ आली. कारण महात्मा गांधी हत्येवरून झालेली जाळपोळ. अंगावरच्या वस्त्रानिशी आम्ही सांगलीत आलो, आणि इकडेच स्थायिक झालो. जळीत प्रकरणाने आम्हाला फार मोठी शिकवण दिली. माझ्या त्या पोळण्यातून मी 'ओजस प्रतिष्ठान'च्या माध्यमातून आज विद्यार्थ्यांना यथाशक्ती मदत करीत आहे. तो संस्कार माझ्या शाळेचा.

मी आरवाडे हायस्कूलमध्ये आलो माझ्या आजोबांच्यामुळे. माझे आजोबा हरी अक्किवाटकर हे याच शाळेत संस्कृत शिकवीत असत. डी.एन.आपटे, व्ही.एन.आपटे या दोघा बंधूंबरोबर एकापेक्षा एक शिक्षक होते. या शाळेत उच्च नीतिमत्ता सर्वच ठिकाणी प्रकर्षाने जाणवे. शाळेत ब्राह्मण मुले मोजकीच, बरीच मुले खेडेगावांतून शेतकरी-कामकरी घरांतून आलेली असत. या मुलांना समजेल असे शिकविण्याची हातोटी येथील शिक्षकांत होती. आम्हा वांड मुलांना समजून घेऊन आमच्या गुणांना वाव देणारे दोन शिक्षक म्हणजे डी.एन.आपटे आणि एस.पी.सहस्रबुद्धे. शाळेतील वातावरण खूप मोकळे आणि प्रसन्न होते. अभ्यासापेक्षा इतर उपद्व्यापांत रस असणाऱ्या माझ्यासारख्या विद्यार्थ्याला समजून घेणारे आणि घडविणारे शिक्षक याच शाळेत भेटले. शाळेच्या कॅमेऱ्यात रोल घालून, फोटो काढून मुलांनी ते स्वत: डेव्हलप आणि प्रिंट करणे हे त्या काळात फक्त आरवाडे हायस्कूलमध्ये घडू शकत होते. माणगावकर सरांच्या मार्गदर्शनाखाली तळघरातील डार्करूममध्ये, मंद लाल रंगाच्या उजेडात रोल डेव्हलप करून प्रिंट तयार केल्याचे आजही माझ्या स्मरणात आहे. विपरीत परिस्थितीत टिकून राहून, संकटात डगमगायचे नाही असे महत्त्वाचे संस्कार, नकळत आमच्यावर या शाळेतील शिक्षकांनी आणि खेडोपाड्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी केले. शाळाही त्याच परिस्थितीतून जात होती. मी तर म्हणेन भाजलेल्या मडक्याला रंग लावणे, त्यावर नक्षीकाम करणे हे सोपे आहे; पण माझी शाळा मातीपासून मडके बनविण्याचे काम करीत असे. आमच्या शाळेचे विद्यार्थी नंबरात झळकत नसले तरी जीवनाच्या प्रत्येक अंगाने यशस्वी होत.

मी रंगाचे उत्पादन करण्याचे ठरविले. सल्ला घ्यायला म्हणून त्या काळातील अनेक उद्योजकांना भेटलो. ते सर्व माझ्या वडिलांचे मित्र होते. त्यांनी मला प्रोत्साहन देण्यापेक्षा माझी टर उडविण्यात समाधान मानले. पण त्याच काळात या शाळेतील माझ्या वर्गमित्राने त्याच्या गणपती पेठेतील दुकानात मला थोडी जागा दिली. आणखी एकाने सहकार क्षेत्रातील ग्राहक मिळवून दिला. त्याच काळात वसंतदादा पाटील, रत्नाप्पाण्णा कुंभार, राजारामबापू पाटील या, जनसामान्यांच्या नेत्यांनी मोठे सहकार्य केले.

आज मागे वळून पाहतो, तेव्हा माझ्या यशात माझी शाळा आणि त्यातील शिक्षकांचा, त्या शाळेत माझ्यासोबत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचा वाटा मोठा आहे असे माझे ठाम मत असते.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, सांगलीतील रंग उत्पादक-कारखानदार)*

●●●

# डी.एन.ए.

-सुमन व सुशीला करंदीकर

डी.एन.ए.सरांचा विषय निघाला की मी भावनावश होते. हुंदका आवरणे मला कठीण होते, गहिवर दाटतो, हाताची मूठ घट्ट वळली जाते. शिक्षक खूप असतात. या सरांनी आम्हाला काय दिले? सरांनी आम्हाला निर्भीड बनविले. त्यांच्या शिकवणीवर आयुष्यात आम्ही गैर वागलो नाही, ना कोणाचे गैर खपवून घेतले! एका शिक्षकाबद्दल तब्बल ६० वर्षांनी बोलायचे झाले तर, ते असे 'दत्त' म्हणून नजरेपुढे उभे ठाकतात.

शाळेत 'सर' असले तरी आमच्या लेखी ते 'दत्तूकाका'च होते. त्यांनी शिकविलेला इतिहास, गुण मिळवण्यासाठी किती उपयोगी पडला माहिती नाही; मात्र त्यांनी कृतींतून समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तीन गोष्टी ठाम रुजवल्या. भारताच्या राज्यघटनेचे हेच तर तीन स्तंभ आहेत. शाळेचे आधारस्तंभ धनिक श्रीमान गणपतराव असोत, किंवा शाळेतला शिपाई गणपती असो; दत्तूकाकांच्या वागण्यातील समानता आम्ही पाहिली आहे. आमची शाळा म्हणजे समाजातील सर्व जातीधर्मांच्या, राजकीय विचारांच्या लोकांचा मुक्त वावर असणारी संस्था होती. समता, बंधुता आणि सामाजिक न्याय हाच दत्तूकाकांचा 'डीएनए'. 'दत्त नारायण आपटे' नाव सार्थ करणारा आहे!

दत्तूकाका कधीही पुस्तक आणि धडा समोर ठेवून इतिहास शिकवीत नसत. देशात आणि जगात कोणत्या राजकीय, सामाजिक घडामोडी होत आहेत त्याची चर्चा त्यांच्या तासाला होत असे. 'शिक्षकांनी राजकारण करण्याची गरज नाही, ते करूही नये. पण त्यांनी राजकारण, अर्थकारण हे समजून मात्र निश्चित घेतले पाहिजे' असा त्यांचा विचार होता. आमच्या शाळेत जसे सर्व जातीधर्माचे विद्यार्थी होते, तसेच शिक्षकही होते. विचार वेगवेगळे असले तरी सर्वांची मने एक होती; याचे श्रेय दत्तूकाकानाच द्यायला हवे. दत्तूकाकांना संस्थेबाहेरील लोक नेहमी विचारीत, ''तुम्ही कट्टर कॉंग्रेसचे, तुमच्या शाळेत आर.एस.एस.चे शिक्षक कसे?'' दत्तूकाकांचे ठाम उत्तर, ''त्यांचे राजकीय विचार कोणतेही असोत, ते एक उत्तम शिक्षक आहेत हेच आमच्यासाठी महत्त्वाचे आहे.''

आम्ही तिघी बहिणी. सुशीला, सिंधू आणि मी सुमन. विद्यार्थी म्हणून मी(सुमन) आणि सुशीला, आणि शाळेतील कर्मचारी म्हणून नंतर सिंधू आणि सुशीला सरांच्या संपर्कात आलो, आणि त्यांच्याच बनून गेलो. मी शिक्षणशास्त्र या विषयातील डॉक्टरेट पदवी घेतली. शिक्षणाचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांना प्रेरित करणे असा असला पाहिजे. आजच्या विद्यार्थ्याला गुण मिळविण्याची प्रेरणा दिली जाते; ज्ञानाची,-समता-बंधूता आणि सामाजिक न्यायाची नाही! सरांनी आम्हाला प्रेरित केले आणि स्वत:च्या वागण्यातून शिकविले.

१९४८च्या जळीत प्रकरणामुळे आमचे कुटुंब सांगलीत आले. मी प्रताप हायस्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केले, अर्थशास्त्र घेऊन बी.ए. झाले. माझी इच्छा पुणे विद्यापीठातून एम.ए. करण्याची होती मात्र पुण्यात होस्टेलवर राहून शिक्षण घेण्याची ऐपत नव्हती. आमचे गाडे सुशीलाच्या पगारावर चाललेले. माझी आणखी एक बहीण सिंधू पदवीधर होती, ती राणी सरस्वती कन्याशाळेत नोकरी करीत होती. शिकविण्याची हातोटी असूनसुद्धा तिची नोकरी कायम होत नव्हती. त्याचे कारण आम्हाला नंतर कळाले. समता आणि सामाजिक न्याय म्हणजे काय हे कळण्याचे ते वय नव्हते. सिंधूला जन्मत:च तिरळेपण होते, म्हणून तिची नोकरी कायम होत नव्हती. दत्तूकाकानी सिंधूला ताबडतोब आरवाडे हायस्कूलमध्ये नेमले, आणि माझा पुण्याला जाण्याचा मार्ग मोकळा झाला; तोच माझ्या वडिलांचे निधन झाले. दत्तूकाकानी जणू माझे पालकत्व आपण होऊन स्वीकारले. शाळेच्या आणि इतर संस्थांच्या कामानिमित्त ते नेहमी मुंबईस जात, तेव्हा पुण्यात आमच्या होस्टेलवर येऊन माझी विचारपूस करून पुढे जात.

आरवाडे हायस्कूलसमोरील रस्त्याचे डांबरीकरण चालू होते. ऑफ तासाला आम्ही मुली तिथले थोडे डांबर आणून

त्याच्या वस्तू बनवीत होतो. त्यावेळचे हेडमास्तर सदूभाऊ सहस्रबुद्धे होते. त्यांनी 'डांबर (सरकारी मालमत्ता) कोणाला विचारून आणलेत', असे विचारले. आम्ही कोणालाच विचारले नव्हते. रस्त्यावर पडलेले, त्यात विचारायचे काय? आम्हा सर्वांना रागावून घ्यावे लागले, शिवाय ते डांबर परत जागेवर ठेवून तिथल्या वॉचमनची माफी मागावी लागली. सार्वजनिक मालमत्ता म्हणजे काय, आणि त्याचे दायित्व जनतेकडे असते; ही शिकवण या शाळेने आम्हाला दिली.

शाळेतील एक शिपाई मारुती कांबळे रोज पहाटे डी.एन.सरांच्यासोबत फिरायला जात. त्यात कधी खंड होत नसे. मी एकदा कांबळेला विचारले, 'इतक्या नियमित रोज पहाटे, कधीही आळस न करता तुम्ही कसे जाता?' कांबळेचे उत्तर मार्मिक होते, ''सरांनी कधी शाळेच्या कामात सुट्टी घेतल्याचे पाहिले आहे काय?''

दत्तूकाकानी शाळेतील प्रत्येक कर्मचाऱ्याला घडविले, तसेच त्यांच्या आयुष्यास स्थैर्य दिले. शाळेच्या शिक्षकांची 'विकास हौसिंग सोसायटी' हे त्याचे एक उत्तम उदाहरण. त्यावेळच्या प्रत्येक शिक्षकास एक प्लॉट केवळ ७५०/- रुपयात दिला, इतकेच नव्हे तर दोन शिपायांना प्लॉट मोफत दिले. वर छोटे घर बांधायला रोख रक्कमसुद्धा दिली. सुशीला आणि सिंधू शाळेत शिक्षिका होत्या. दोघींना प्रत्येकी एक प्लॉट सरांनी देऊ केला. आम्ही 'एकच पुरे' म्हणून दुसरा नाकारला. अनेक लोक आम्हाला म्हणाले, '-मिळतोय तर घ्यायचा, नंतर विकून जास्त पैसे मिळवता आले असते.'-हाच विचार सरांनी, त्यांच्यासाठी एकच प्लॉट ठेवताना का बरे केला नसेल? सरांनी आम्हास दोन प्लॉट देऊ केले, तेव्हा सिंधू म्हणाली, ''आम्ही दोघी काय वेगळ्या आहोत काय, का आमची परीक्षा घेताय सर!'' सर एकदम 'कार्त्यानोऽ' असे म्हणत ऑफीसात गेले. ते बोलणे त्यांना खूप लागून राहिले होते.

एक शिक्षक भालबा केळकर होते. त्यांना नाट्यकलेत खूप गती होती. शाळेत होते तोपर्यंत त्यांनी अनेक नाटके विद्यार्थ्यांकडून बसवून घेतली. पुढे त्याना मोठी संधी मिळाली, आणि सरांनी त्याना प्रोत्साहन दिले. अभ्यासाखेरीज कला-क्रीडा याला सर तितकेच महत्त्व देत असत.

सर प्रवासाला जात, तेव्हा काही वेळी आम्हा बहिणींपैकी सुशीलाला आणि आमच्या आईला घेऊन जात. ''तुझ्या म्हातारीला यात्रा घडवून आणतो.'' असे म्हणत. येता जाता आमच्या घरी येऊन जात असत. शाळेचे संस्थापक, हेडमास्तर असा काही अभिनिवेश कधी नसे. प्रेमाने काही देऊ ते आवडीने खात. काही कामासाठी शाळेत उशीरा थांबलो, तर आमचे दत्तूकाका आम्हाला घरापर्यंत पोचविण्यास येत असत. सरांच्या भाच्या शांता, सिंधू, विमल या आमच्या शाळेत, आणि वर्गातही होत्या. त्यामुळे अगदी शालेय जीवनापासून सरांच्या घरी माझे येणे जाणे असे. सरांची बहीण अंबूताई विधवा होती. तिच्याही मुलींची जबाबदारी दत्तूकाकानी आणि विनूकाकानी समर्थपणे पार पाडली.

सुशीलाने सरांची लेखनिक म्हणून काही वर्षे काम केले. त्यांत विविध विषयांवरील स्तंभलेखन, लेख, राजकीय घडामोडींचे विश्लेषण असे. महत्त्वाचे काम म्हणजे त्यांनी केलेल्या पुस्तकांचे लिखाण. सरांनी पाश्चात्य कादंबऱ्यांचे मराठीत भाषांतर केले. डिक्टेशन देताना कथेचा मसूदा त्यांच्या डोक्यात तयार असे. पुस्तक किंवा कादंबरी समोर ठेवून त्यांनी कधीच डिक्टेशन दिले नाही. सरांकडे सतत कोणीतरी कामगार, विविध संस्थांचे पदाधिकारी वगैरे येत, आणि लिखाणाची लय बिघडे, संदर्भ चुके. अशा वेळी मी सरांच्या लक्षात चूक आणून देत असे. ती चूक मान्य करून पुन्हा लिखाण चालू होई. या लिखाणाच्या दरम्यान कधीतरी आरवाडे बंधू -रामभाऊ आणि गणपतराव -येत असत; त्यांचे घरगुती वाद सरांच्या समोर मिटत. अशा गंमतीशीर वातावरणात आमचे लिखाण चालत असे. भेटायला येणाऱ्या लोकांना 'लिखाणकाम चालू आहे' किंवा अन्य कारणाने सरानी ताटकळत ठेवल्याचे आठवत नाही.

दत्तूकाका म्हणजे अखंड उत्साहाचा झरा. त्यांना आम्ही कधी दुर्मुख होऊन बसलेले पाहिले नाही. शाळा आणि इतर संस्थांची कामे करताना अडचणी संकटे सतत येत असत, पण त्याला ते खिलाडू वृत्तीने तोंड देत असत. विनूकाका आणि साने सर थोडे गंभीर, नेमस्त. त्यांची आम्हा विद्यार्थ्यांना भीती वाटे. उलट आमच्या मनांतील

कोणतीही गोष्ट दत्तूकाकांसोबत शेअर करण्यास आम्हास संकोच वाटत नसे. एखाद्या प्रौढ स्त्री पुरुषाची मैत्री आजही शंकास्पद असते. दत्तूकाकांची मीरा भागवत यांच्याशी असलेली मैत्री, ही अशा मैत्रीचे आदर्श उदाहरण. मीराताईंशी बोलताना त्या मैत्रीतील मोकळेपणा व पावित्र्य जाणवत असे.

दत्तूकाकांच्या पत्नी म्हणजे आमच्या सर्वांच्या उषामामी. त्या शांत, मृदू स्वभावाच्या. दत्तूकाकांसारख्या झंजावातासोबत संसार करायचा म्हणजे सत्त्वपरीक्षा. या मामींनी ती भूमिका समर्थपणे सांभाळली. मोठे एकत्र कुटुंब, तितकेच बाहेरील लोकांचे येणे जाणे. सामाजिक कामांतून उद्‌भवणारे ताणतणाव, घरातील समस्या, या सगळ्यात उषामामी मोठ्या धीराने उभ्या असत. एक स्त्री या नात्याने मला मामींच्या त्यागाचे महत्त्व जास्त वाटते.

मी रोज शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांसमोर उभी असते. सरांचे उदाहरण दिले नाही; किंवा त्यांची आठवण झाली नाही असा दिवस आठवूनही सापडणार नाही!

*(लेखक : शाळेची माजी विद्यार्थिनी, दत्तूकाकांची सर्वकालीन पाल्य)*

●●●

## माझे नामान्तर

-भूपाल मसाजी कांबळे

२०१४च्या सुमारास आरवाडे हायस्कूलचा अमृत सोहळा होता. माजी विद्यार्थी म्हणून मी उपस्थित होतो. व्यासपीठावर नामदार शरद पवार, जयंतराव पाटील अशी राजकीय पुढारी मंडळी होती. भाषणे चालू होती. प्रत्येकजण शाळेच्या प्रगतीचे श्रेय स्वत:कडे घेऊ पाहात होता. परंतु गोठ्यात भरणाऱ्या शाळेस सांगलीतील मान्यवर दर्जा मिळवून देणाऱ्या, आणि माझ्यासारख्या गरीब वंचित विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या माझ्या डी.एन.सराना मात्र सारे विसरले होते.

मी भूतकाळात गेलो, ते दिवस चल-चित्रपटासारखे दिसू लागले. कोल्हापुरात एका ऑर्केस्ट्रातील हा प्रसंग. प्रख्यात सिनेनट देवेन वर्मा त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करीत होते. चुटके, नकला आणि हिट गाणी असा कार्यक्रम रंगात आला होता. मी प्रेक्षकांत होतो. मीही कलापथकांतून कामे करू लागलो होतो. नकला, विनोद, चुटके असले काम माझ्याकडे असे. दुष्काळ निधीसाठी आमच्या पथकाने अनेक कार्यक्रम केले होते. देवेन वर्माने, ‘माझ्याबरोबर कोण डॉयलॉगबाजी करेल?’ असे प्रेक्षकांना अचानक आवाहन केले. सर्व थिएटर स्तब्ध. कोणीच पुढे येईना. मी ताड् करून उठलो. ‘मी के.भूपाल तुमचे आव्हान स्वीकारतो.’ टाळ्यांच्या गजरात मी स्टेजवर पोचलो. आमची जुगलबंदी सुरू झाली. त्याने देवानंदचा डायलॉग फेकला, मी दिलीपकुमारचा. लोकांनी टाळ्या पिटून, शिट्या फुंकून प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली, मला जोर चढला. शेवटी संजयकुमारचा ‘काच के महलों में रहनेवाले’ हा डायलॉग मी असा फेकला की खुद्द देवेन वर्मांनी मला कडकडून मिठीच मारली. पुढे तर मला मराठी सिनेमात थोर अभिनेते निळू फुले यांच्यासोबत ‘धरतीची लेकरे’ या सिनेमात संधी मिळाली.

मी सांगलीजवळील वस्तीवरच्या दलित समाजातील, शेती आणि मजुरीवर काम करणाऱ्या एका गरीब कुटुंबातील मुलगा. आमची गुजराण मोलमजुरीवर चालत असे. शिक्षणाचे वातावरण गेल्या कित्येक पिढ्यांत नव्हते. अशा परिस्थितीत मी जिद्दीने सातवी चांगल्या मार्कांनी पास झालो. हायस्कूलची सोय त्यावेळी नव्हती, त्यासाठी सांगलीत जाणे भाग होते.

कृष्णा नदी ओलांडली की समोर बैलगाडीच्या चाकाइतक्या मोठ्या आकाराच्या तीन घड्याळांचा टॉवर असलेली भव्य इमारत दिसे. ही शाळा आता आपल्या नव्या इमारतीत आलेली होती. या शाळेत मला शिकायला

मिळावे असे स्वप्न मी पाहात असे. आमच्या वाडीतील अनेक मुले तिथे शिकत होती, त्यात दलित मुलांचा समावेश होता. त्यांच्या तोंडून डी.एन.आपटे आणि व्ही.एन.आपटे या शिक्षकांचे नाव कानी येत असे. 'डी.एन.सरांची शाळा' म्हणूनच ही ओळखली जात असे. मी या शाळेत प्रवेश घेतला. मी चांगले मार्क घेऊन सातवी पास झालो असल्याने आरवाडे हायस्कुलात 'अ' तुकडीत आलो होतो. मात्र आठवीत जाताना संस्कृतचे शिक्षक ज.पु.जोशींनी माझी बदली 'ब' तुकडीत केली, कारण मला संस्कृत जमणार नाही. मला तर 'अ' तुकडीतच बसायचे होते. माझी कैफियत डी.एन.सरांकडे गेली. सरांनी उत्तम मार्ग काढला. माझ्या संस्कृत भाषेची 'क्षमता चाचणी' घ्यायचे ठरले. ही परीक्षा मी पास झालो तर मला 'अ' तुकडीत बसण्याची परवानगी मिळणार होती. मी पाठांतर चालू केले. केसांना दोरीचे एक टोक आणि दुसरे टोक आढ्याला बांधून पाठांतर सुरू केले. आमच्या वस्तीतल्या आया बाया श्रावणात गाणी म्हणत, त्याच चाली धरून मी संस्कृत पाठांतर केले आणि चाचणी उत्तम मार्कांनी पास झालो.

'पुढारी पाहिजे' या नाटकात यशवंत केळकर सरांच्या दिग्दर्शनाखाली मी काम केले होते. आरवाडे हायस्कूलचे गॅदरिंग म्हणजे मुलांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ होते. आमच्या शाळेचे गॅदरिंग धुमधडाक्यात असे. गॅदरिंगमध्ये माझ्या प्राण्या-पक्ष्यांच्या, काही आवाजाच्या नकला, चुटके असत. मा.मुरारजीभाई देसाई यांच्या हस्ते माझा एकदा सरांनी सत्कारही घडवून आणला होता. पुढच्या काळात सिनेक्षेत्रातील देवेन वर्मांचे आव्हान मी स्वीकारले त्याची खरी तालीम माझ्या शाळेत झाली होती. सरांचा माझ्यावर लोभ होता. आमच्या शाळेत हस्तलिखित अंक काढीत त्यात मला लिहिण्याची संधी सरांनी दिली. सरांच्यामुळे मला व्यायामाची आणि खेळाची गोडी लागली. सरांच्या बलभीम व्यायाम शाळेत मी व्यायाम करीत असे. आमच्या शाळेत ए.सी.सी. हा आजच्या एन.सी.सी.सारखा उपक्रम चालत असे. त्यात माझी बेस्ट कॅडेट म्हणून निवड झाली होती.

सरांनी मला एकदा विचारले, 'भूपाल, पुढे काय करणार?' मला डॉ.बाबासाहेब आंबेडकरासारखा मोठा साहेब व्हावे असे वाटे. मी सरना म्हणालो, 'सर मला ऑफीसर व्हायचे आहे.' सर त्यावेळी म्हणाले होते, ''भूपाल, तुला ऑफीसर व्हायचं तर ध्येय, जिद्द, आणि चिकाटी ठेवायला हवी. स्वत:चा अपमान खपवून घ्यायचा नाही आणि आपणही दुसऱ्याचा अपमान करायचा नाही.'' हाच मंत्र मनात धरून माझी वाटचाल झाली. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळात साहाय्यक वाहतूक नियंत्रक म्हणून माझी निवड झाली. नंतर सावंतवाडी, वेंगुर्ला, कणकवली, विजयदुर्ग, राजापूर अशा बस स्थानकांचा व्यवस्थापक म्हणून काम केले. दापोली इथल्या माझ्या कामाचा परिणाम असा की, लोकांनी माझी बदली रहित करायला भाग पाडले. मी ज्या डेपोचा मॅनेजर म्हणून हजर होत असे, त्या गावातील पुढाऱ्यांना प्रथम मी त्यांच्या घरी जाऊन भेटत असे आणि त्यांचे सहकार्य मागत असे. या धोरणामुळे मला सर्वांचे सहकार्य मिळत गेले. माझे कोकणातील काम पाहून मला कोकण रेल्वे प्रकल्पात वेळोवेळी तांत्रिक सहकार्य करण्यासाठी बोलावले जात असे. माझ्या या सर्व कारकिर्दीत सरांचा आणि माझ्या शाळेचा फार मोठा वाटा आहे.

के.भूपाल या टोपणनावाने मी सर्वत्र ओळखला जात असे. मी भूपाल मसाजी कांबळे चा 'के.भूपाल' कसा झालो? - इतिहासाचा तास होता. डी.एन.सर वर्गात येण्याआधी मुलांचा दंगा चालू होता. वर्गात मांजराचे पिलू आल्याप्रमाणे सारखे 'म्यावऽऽ म्याव' असे आवाज चालू होते. सर आले, मुले सांगू लागली, ''सर, वर्गात मांजर आले आहे.'' सर म्हणाले, ''मांजर कुठले लेको, तुमचा नकलाकार के.भूपाल आवाज काढीत असेल.'' हे नाव ऐकून काही वेळ कोणालाच काही कळेना. सरांनी मला उठवले. तुझ्यासारख्या कलाकाराला, नकलाकाराला साजेसे नाव हवे. तेव्हापासून भूपाल मसाजी कांबळेचा मी 'के.भूपाल' झालो. आजपर्यंत ते नाव मला चिकटून आहे. माझे नाव हीच माझ्या सरांची आठवण आहे.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, (न)कलाकार, 'राज्य परिवहन'मधून निवृत्त अधिकारी)*

●●●

# माझे दत्तूकाका

-शशीकला साळुंखे

मी मूळची विजापूरची. विजापुरात मराठी व कन्नड अशा दोन्ही शाळा होत्या. विजापुरातच माझे मराठीतून एस.टी.सी.पर्यंत शिक्षण झाले होते. आमच्या घरात मीच एकटी शिकलेली. मी केलेल्या अर्जास उत्तर म्हणून एक दिवस माझ्या नावाने एक पोस्टकार्ड आमच्या विजापूरच्या पत्त्यावर पोचले. या पत्रामुळे माझ्या जीवनालाच कलाटणी मिळाली. सांगलीतील एका प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून माझी नेमणूक झाल्याचे ते पत्र होते. आमच्या कष्टकरी अडाणी घरात असे पत्र येणे म्हणजे गहजबच! मी नोकरी करणार म्हटल्यावर, सर्व पुरुष मंडळींनी विरोध चालू केला. पण माझा निश्चय पक्का असल्याने मी माझ्या चुलतभावाच्या मदतीने सांगली शहर गाठले.

पत्र घेऊन मी जी.ए.हायस्कूलच्या भव्य आवारात दाखल झाले, तेव्हा डी.एन.सरांना भेटण्यास सांगण्यात आले. मी घाबरत घाबरत सरांच्या ऑफीसात पोचले. कमावलेल्या बलदंड शरीरयष्टीचे आपटे सर खुर्चीत बसलेले होते. लाल गोरा रंग, घारे भेदक डोळे, चेहऱ्यावरचे भाव रागीट वाटावेत असेच. याउलट मी काळी कुळकुळीत, कृश, गावंढळ वेशभूषा, आणि त्याहून गावंढळ भाव चेहऱ्यावर घेऊन मी सरांपुढे भीतभीतच गेले. ''शशी, हा तुझा वर्ग.'' त्या वर्गात माझ्यासारखीच चारपाच गावंढळ मुले बसली होती. पहिल्याच भेटीत मला 'शशी' अशा एकेरी नावाने हाक मारणाऱ्या आपटेसरांनी माझ्या मनातील भीती आणि दडपण एका क्षणात पळवून लावले. त्या भीतीने माझ्या आयुष्यात पुन्हा कधीच दखल दिली नाही. मी या संस्थेत शिरले आणि चाळीस वर्षे सेवा बजावून निवृत्त झाले.

मी तिथे हजर झाल्यानंतर प्रत्येक वर्षी एक एक वर्ग वाढत गेला आणि काही वर्षात ही शाळा 'बहुजन समाजाची प्रतिष्ठित शाळा' म्हणून गणली जाऊ लागली. आपटे सरांनी सांगावे आणि आम्ही ते तडीस न्यावे, असे समीकरणच होऊन गेले. सरांचा माझ्यावर खूप लोभ आणि विश्वास होता. सरांचा तब्बल २३ वर्षे सहवास लाभला. 'डी.एन.' सरांचे 'दत्तूकाका' केव्हा झाले हे समजलेदेखील नाही. कदाचित पूर्वजन्मीचे ऋणानुबंध असावेत. परिचय वाढत गेला तसतसे त्यांच्या कोमल व दयाळू मनाचे दर्शन घडले. पुढे पुढे तर त्यांनी माझे पालकत्व स्वीकारले. आपसूक त्यांच्यामाझ्यात पिता-पुत्रीचे नाते जुळले. त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्या पितृछायेत मी अगदी सुरक्षित होते.

मी शाळेत रुजू झाले तेव्हा त्यांची कारकीर्द ऐन भरात होती. आमची संस्था म्हणजे एक कुटुंब होते. तेच मुळात उत्साहाचा अखंड वाहणारा झरा, ज्यामुळे शाळेतले वातावरण नुसते धमाल असे. संस्थेचे स्नेहसंमेलन गाजायचे, तीन तीन दिवस भोजनाच्या पंगती उठायच्या. दोन दोन दिवस करमणुकीचे कार्यक्रम चालत. नाटकांच्या तालमी पंधरा पंधरा दिवस चालत. क्रीडास्पर्धा, बौद्धिकस्पर्धा असा धुमधडाका असे. शैक्षणिक सहली हे आमच्या संस्थेचे खास वैशिष्ट्य असे. दत्तूकाका या सर्व कार्यक्रमांना जातीने हजर असत. मुलांच्या कार्यक्रमांचा आस्वाद घेत असत. भारतातील थोर नेते, लेखक, विचारवंत दत्तूकाकांच्या शब्दाखातर आवर्जून येत असत. थोर मंडळींना आम्हाला जवळून पाहता येई. त्यांचा साधेपणा काही शिकवून जाई. या उत्सवांची सांगता श्रमपरिहाराने होत असे. चांदण्यात स्नेहभोजनाचा कार्यक्रम होई. सर्व शिक्षक, शिपाई हजर असत. झुणका भाकर आणि कांदा असा साधा पण लज्जतदार बेत असे. दत्तूकाका सर्व स्वयंसेवकांसोबत त्याचा आस्वाद घ्यायचे. सर्वांचे तोंड भरून कौतुक करायचे. दत्तूकाका मांसाहारी नव्हते पण अंडा आम्लेट त्यांना खूप आवडे. मी बऱ्याच वेळा घरून करून नेत असे, किंवा शाळेतील शिपाई गणपती यांना ते करायला सांगत. अरोमा बेकरीचा ब्रेड आणि आम्लेट अशी पार्टी चाले.

अभ्यास करणारी दंगेखोर मुले त्यांना अधिक आवडायची. १९६२ साली पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी मार्गदर्शन करण्याचे काम माझ्यावर होते. शाळेची विद्यार्थिनी मोहिनी ठाणेदार ही शहर विभागात प्रथम आली. दत्तूकाकानी आमच्या कौतुकासाठी मोठी सभा घेतली.

प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याचे सभापती वि.स.पागे यांच्या हस्ते आमचा सत्कार झाला. दोघींना बक्षीस देण्यात आले. ही शाळा म्हणजे दत्तूकाकांचा जीव की प्राण! सदैव संस्थेचा ध्यास त्यांना असे. गुणवंत कर्मचाऱ्यांच्या स्थैर्याची काळजी असे; त्यातूनच कर्मचाऱ्यांची सहकारी हौसिंग सोसायटी करून अल्प दरात प्लॉट देऊ केले. जी.ए.हायस्कूलमध्ये जातपात-धर्म-गुणवत्ता अशा कोणत्याही अटी न घालता प्रवेश दिला जाई. त्यामुळे आसपासच्या खेड्यांतील, आणि शहरातील गरीब घरांतील मुलांचा भरणा असे. साहजिकच बोर्डाच्या परीक्षेच्या निकालावर त्याचा परिणाम होई. सरांना त्याची पर्वा नव्हती. त्यांचा प्रश्न असे, ''या मुलांनी जायचं कुठं?''

दत्तूकाकांची राहणी फार साधी होती, पण विचार फार उच्च होते. शालेय कामाचे उत्तम नियोजन, ठाम निर्णय, मुजोर अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याची क्षमता यांमुळे सरांचा दरारा सर्वत्र होता. काबाडकष्ट करणाऱ्या कामगार वर्गाबाबत त्यांना कणव होती. साहित्य, शिक्षण, सहकार, क्रीडा, कामगार, राजकारण अशा किती किती क्षेत्रांत त्यांचा वावर होता; आम्ही त्या परिवारात असूनही कल्पना यायची नाही. जी.ए.हायस्कूल हेच त्यांचे बोलके स्मारक आहे! त्यांच्या स्मृतीस कोटि कोटि प्रणाम.

*(लेखक : संस्थेत दीर्घकाळ अध्यापन करणारी निवृत्त महिला शिक्षक)*

●●●

## श्रमदानाची शिकवण

-व्ही.डी.काळे

मी शाळेत शिक्षक म्हणून १९६० साली रुजू झालो आणि पुढच्या ३४-३५ वर्षांच्या काळात दत्तोपंतांशी संबंध आला, शाळेच्या अनेक उपक्रमांत भाग घेता आला. एन.सी.सी.च्या १६व्या महाराष्ट्र बटालियन ज्युनिअर डिव्हिजनचे युनिट मी शाळेत सोळा वर्षे सांभाळले. शाळेत रायफल क्लब होता त्याचा मी पदाधिकारी नव्हतो, पण एन.सी.सी.मुळे बंदुका आणि त्याच्या गोळ्या माझ्या ताब्यात असत. 'स्वतंत्र भारताला राष्ट्र म्हणून ताठ राहायचे असेल तर संरक्षणासाठी सज्ज असले पाहिजे. लष्करी शिक्षणाची सुरुवात शालेय जीवनापासून झाली तर ती जास्त परिणामकारक ठरते' असे दत्तोपंतांचे म्हणणे होते. त्या उद्देशाने शाळेत रायफल क्लबची स्थापना १९५४ साली झाली. एखाद्या शाळेत रायफल क्लब असणे हीच मुळी अद्‌भूत गोष्ट होती. हा क्लब महाराष्ट्र व अखिल भारतीय क्लबशी संलग्न करण्यात आला होता. क्लबची स्थापना आणि शासकीय परवानगी वगैरे गोष्टी दत्तोपंतच करू जाणे. रायफलींची देखभाल करणे, मुलांना त्या चालवायला देणे, मुलांच्या स्पर्धा घेणे हे काम मी आवडीने केले. मी नववीत शिकत असताना अशा शालेय स्पर्धेत बक्षीस मिळवले होते. पुढे सरांनी या खेळातील आधुनिक प्रशिक्षण घेण्यास मला मुंबई येथील शूटींग रेंजवर प्रशिक्षणासाठी पाठविले होते. माझ्यासोबत सरांचा मुलगा हर्षवर्धन, क्लबचे कार्यवाह बी.आर.आपटेसर आणि प्रमोद उर्फ पंप्या होता. परंतु या प्रशिक्षणात जे तंत्र शिकविले ते आमच्या एनसीसीच्या लष्करी खाक्यात बसणारे नव्हते.

शाळेत एन.सी.सी.चे युनिट आणायची योजना दत्तोपंतांचीच, एन.सी.सी.च्या अधिकाऱ्यांनी माझी निवड करून माझ्यावर त्याची जबाबदारी सोपवली, त्याचे कारण माझे खेळातील नैपुण्य. खरेतर अरविंद आपटे सर -सरांचा पुतण्या, हेसुद्धा त्या पदासाठी इच्छुक होते. हे युनिट सर्वच बाबतीत सक्षम आणि आदर्श म्हणून नावाजले गेले. एन.सी.सी.च्या राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेसाठी माझी निवड झाली. एन.सी.सी.च्या रेंजवर मी रोज ३०३ रायफलचे १०० राऊंड फायर करीत होतो. रायफलच्या गोळीचा खांद्याशी दणका किती जोरात बसतो हे ज्यांनी अनुभवले आहे त्यांना, अशा शंभर दणके सहन करायला काय ताकद लागते याची कल्पना करता येईल.

दत्तोपंत 'भारत सेवक समाज' या संस्थेचे जिल्हा

संयोजक होते. जवाहरलाल नेहरू हे त्याचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. भारत सेवक समाजचे सांगलीतील कार्यालय आरवाडे हायस्कूलमध्ये होते. दत्तोपंतांच्या अनेक उपक्रमांपैकी 'श्रमदान' हा एक प्रोत्साहक उपक्रम असे. १९६०च्या सुमारास श्रमदानातून हरीपूर गावातील मुख्य रस्ता करण्याचे काम आमच्या शाळेने केले. या कामाचे नियोजन आणि कार्यवाही दत्तोपंतानी माझ्यावर सोपविली. दत्तोपंतांचा आदेश आम्ही प्रमाण मानीत असू. दोन आठवडे चाललेल्या त्या शिबिरात शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते. रोजच्या कामाची आखणी, प्रत्येक गटाला त्याची वाटणी, खोरे-पाट्या अशी अवजारे वाटप, रोज संध्याकाळी अवजारांची साफसफाई, रोजच्या रोज कामाचा अहवाल असे अगदी काटेकोर नियोजन मी केले. श्रमशिबिराच्या समारोपात नवीन रस्त्याचे उद्घाटन बॅ.जी.डी.पाटील यांच्या हस्ते झाले. त्या कार्यक्रमात दत्तोपंतानी माझ्या कामाचे खूप कौतुक केले. याच अनुभवावर सरांनी दुसरे शिबिर प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी शाळेतच घेतले. या शिबिरात शिक्षकांकडून संपूर्ण शाळा रंगवून घेतली गेली. शाळेच्या इमारतीचे बांधकाम सतत चालू असे. गवंडीकाम सोडून बाकी सर्व कामे -उदा.वाळू विटा वाहणे, खडी, सिमेंट जाग्यावर पोचविणे, बांधकामावर पाणी मारणे -हे आम्ही शिक्षक आणि विद्यार्थी मिळून करीत असू. त्याचेही नियोजन माझ्याकडे होते.

ग.दि.माडगूळकर हे त्या काळात प्रसिद्धीच्या शिखरावर होते. भक्तिसंगीतापासून लावणीपर्यंत त्यांची पदे मराठी माणसाच्या ओठावर होती. काही कामानिमित्त मी सरांची सही घेण्यासाठी एकदा ऑफीसमध्ये गेलो. सरांच्याजवळ एक पन्नासीचे जाड, काळे, आणि खादीचे कपडे घातलेले गृहस्थ बसले होते. त्यांची आणि दत्तोपंतांची काही चर्चा चालू होती. तिथून मी बाहेर पडलो आणि आमच्या क्लार्कला सहज विचारले, ''आज कोण पुढारी आले आहेत?'' ''सर हे पुढारी नाहीत, ते ग.दि.मा.आहेत.'' ऐकून मी अक्षरशः तीनताड उडालो. या दोघांची एवढी मैत्री मला ठाऊक नव्हती. दत्तोपंतांचा वावर सर्व क्षेत्रांत होता. दत्तोपंतांची क्षमता फार मोठी होती. त्यांना तशी साथ, किंवा काम पुढे नेणारे सहकारी मिळाले नाहीत. अनेक तडफदार लोकांच्या बाबतीत तसे घडते. का?

शाळेतील वातावरण काही कारणांनी गढूळ झाले होते. सरांना त्यांच्या उत्तर काळात हे दिसत होते, म्हणून त्यांना भविष्याची चिंता वाटत असावी. मला त्यांनी एक दिवस ऑफीसात बोलावले. मी मनातून चरकलोच. मी आत गेल्यावर सर बराच वेळ काही बोलले नाहीत. त्यांना गहिवरून आले होते. अचानक ते म्हणाले, ''काळे, कष्टानी उभा केलेला हा पसारा पुढच्या पिढीकडे सोपविताना काळजी वाटते. हे समर्थपणे सांभाळेल अशी एकही व्यक्ती मला दिसत नाही.'' मी काय बोलणार? काहीच बोललो नाही! सरांनी हे मला का सांगावे, हेही आजपर्यंत कळले नाही! मी वेळोवेळी केलेल्या नेटक्या कामांमुळे कदाचित माझ्याबद्दल सरांना विश्वास वाटला असावा, असेही असेल.

*(लेखक : संस्थेतील निवृत्त शिक्षक, प्रसिद्ध खेळाडू, गोपाळकाकांचे(म्हणजे दत्तूकाकांचेही) जावई)*

●●●

## विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा पालक

-शुभांगी जोशी

मी १९५७ ते १९६०पर्यंत आरवाडे हायस्कूलमध्ये शिकले. शाळेत कोणताही समारंभ असो, सरानी कधी प्रास्ताविक, कधी पाहुण्यांची ओळख, तर कधी आभार, असे करायचे. सर ते उत्तम रीतीने करीत, अगदी मोजक्या शब्दांत -एक शब्द कमी नाही की एक शब्द जास्त नाही! आभाराचे भाषण म्हटले की श्रोतेमंडळी पळून जायला बघतात, विद्यार्थी जांभया द्यायला लागतात. पण सरांच्या भाषणाला तसे कधीच झाले नाही. मी शिक्षक म्हणून पुढे नोकरीला लागल्यावर, माझ्यावर भाषणाची वेळ यायची; मग सरांच्या भाषणाची आठवण ठेवून मोजकेच बोलायचा मी प्रयत्न करत असे.

सर इंग्रजी गद्य शिकवीत, ते बोलणेही ठासून. आपोआप आमचे लक्ष पूर्णपणे त्यांच्या शिकविण्याकडे वळे, दुसरे कोणतेही विचार डोक्यात येत नसत. अकरावीला(मॅट्रिक) मे महिन्यातच अभ्यासाला सुरुवात होई. सर रोज सकाळी शाळेत इंग्लिश शिकवीत. व्हेकेशन बॅच, त्याची वेगळी फी असे काही नव्हते. त्या संस्थेच्याच प्राथमिक शाळेत मी शिक्षिका म्हणून नोकरीला लागले. वर्षातून एकदा प्राथमिक वर्गाची सहल न्यायची, हा तिथे नियम. एक सहल पंढरपूरला न्यायचे ठरविले. चार वर्गांतील ८० मुले, आम्ही शिक्षिका साऱ्या १८-२० वयाच्या, आम्हाला भरपूर उत्साह आणि आत्मविश्वास. आम्ही मुख्याध्यापक बाईंना सांगितल्यावर त्या म्हणाल्या, ''नको, मुले लहान आहेत, नदीवर जातील, ऐकणार नाहीत.'' आम्ही गप्प. सर त्यावेळी आमच्या शाळेला सुपरवायझर होते. त्यांना हे कळाल्यावर त्यांनी आम्हाला बोलावले, बरोबर मुख्याध्यापिका होत्याच. सर म्हणाले, ''काय गं, तुम्हाला खात्री आहे ना मुलांना सांभाळून नेण्याची? मग जा सहल घेऊन.'' आम्ही खूश. सरांनी आमच्याबरोबर हायस्कूलचे एन.डी.एस.चे शिक्षक व एक शिपाई दिला. सकाळी सहा वाजता बसेस निघायच्या होत्या, तर ५.३०वाजल्यापासून सर शाळेत येऊन बसलेले होते. आम्ही ठरलेल्या वेळेपेक्षा रात्री उशिरा परत आलो. सर १० वाजेपर्यंत शाळेत थांबलेले होते. सर्व मंडळी सुखरूप परत आलेली पाहून मग ते घरी गेले.

*(लेखक : माहेरच्या शोभा गोडबोले, शाळेची माजी विद्यार्थिनी, संस्थेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक)*

●●●

## माझे नोबेल

-पांडुरंग हरी साठे

डी.एन. सरांनी आरवाडे हायस्कूलविषयी तीन तपांची वाटचाल लिहिली त्यात माझ्याबद्दल दोन वाक्ये लिहिली आहेत, ''आरवाडे हायस्कूलचे तंत्र मंत्र जाणणारा सेवक म्हणजे साठे. याला पदवीधर होऊ देऊ नका, म्हणजे तो शाळेचे काम सोडून जाणार नाही. शाळेला अशा कर्मचाऱ्याची गरज आहे''. माझ्याकडून संस्थेची जी थोडीफार सेवा घडली, त्याबद्दल मला मिळालेला हा 'नोबेल पुरस्कार' आहे. हा पुरस्कार देणारे, आणि मला या पुरस्कारासाठी घडविणारेही डी.एन. सरच आहेत! गेल्या ४०-४५ वर्षांतल्या शाळेच्या आठवणी आणि डी. एन. सरांचे काम मी तारीखवार सांगू शकेन. मी ते सर्व अगदी समरसून अनुभवले आहे.

हरभट रोडवर माझ्या घराजवळच कऱ्हाडे वाडा होता, तो पाडला गेला आणि तिथे मोठ्या बांधकामासाठी पायाखुदाई चालू झाली. जोते, भिंती असे काम चालू होते. १९४७-४८ साल असावे. आम्ही चार भावंडे आणि आई-

वडील असे कुटुंब, हरभट रोडवर कोल्हटकर वाड्यात एका खोलीच्या घरात राहात होतो. शाळेचे बांधकाम ही आम्हा मुलांना हुंदडण्याची जागा होती. तेव्हापासूनच माझा आणि आरवाडे हायस्कूलचा संबंध आला.

मी याच शाळेत १९५९ साली इयत्ता ८वीत प्रवेश घेतला. जेवणखाण सोडता माझा सारा वेळ शाळेत जात असे. त्यावेळी शाळेत दोन शिपाई होते, कांबळे आणि गणपती. मी स्वयंस्फूर्तीने त्या दोघांना मदत करीत असे. झाडलोट, फळे साफ करणे अशी सर्व कामे मीही करीत असे. मला फळा साफ करणे आवडे. शाळा सुटल्यानंतर प्रत्येक फळा स्वच्छ करण्याचा दंडक डी. एन सरांनी घातला होता. शिक्षक वर्गात आल्यावर पूर्वीच्या शिक्षकांनी फळ्यावर लिहिलेले मुलांच्या डोळ्यासमोर नसावे. या सूचनेचे महत्व आज मला कळते. चांगले काम करण्याच्या पद्धतीचा माझा श्रीगणेशा असा झाला. याखेरीज शाळेत होणाऱ्या वेगवेगळ्या समारंभाची तयारी करणे, ध्वनिक्षेपकाची व्यवस्था, हार-तुरे, पाहुण्यांचे चहापान अशी कामे मी पद्धतशीर करू लागलो. माझ्या या कामामुळे डी.एन. सरांचे लक्ष माझ्यावर होते.

शाळेची शैक्षणिक सहल एकदा अजंठावेरूळला नेण्याचे ठरले. माझी जाण्याची खूप इच्छा होती पण चोवीस रुपये सहल शुल्क भरणे मला शक्य नव्हते; आमची गरिबी होती हे वेगळे सांगायला नको! सरानी मला बोलाविले, आणि ''तुला शाळेतर्फे सहलीला मदतनीस म्हणून पाठवायचं मी ठरविलं आहे; मात्र तुझं नाव 'शिपाई' म्हणून असेल, तुला मान्य आहे का?'' असे विचारले. माझ्या मनातील सुप्त इच्छा सरांना कशी कळाली? आणि त्या इच्छेला मूर्त स्वरूप सरांनी कसे दिले? -अचंबित करणारे आहे! इतर शिक्षकांनी यावर तक्रार करून पाहिली, तेव्हा सरांनी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले, ''हा मुलगा शाळेचं कोणतंही काम स्वयंस्फूर्तीनं करतो, याचं बक्षीस त्याला मिळायलाच हवं - इतकंच काय, मी याला शाळेत नोकरीसही ठेवून घेणार आहे.'' -असाच प्रकार पुढे दिल्ली सहलीच्या वेळीही घडला. सरांनी मला मदतनीस म्हणून पाठविले. ते साल १९६७ असावे.

१९६३ साली मी मॅट्रिक पास झालो. आता मला नोकरी करून घराला हातभार लावणे आवश्यक होते. सरांनी मला महिना पन्नास रुपयांवर 'प्रयोगशाळा साहाय्यक' म्हणून घेतले; माझी ऑर्डर मात्र 'शिपाई' अशी होती. त्यासाठी सरांनी माझी संमती घेतली. इथे एक समस्या आली. माझे वय १८ वर्षे पूर्ण नव्हते, हा मुद्दा साने सरांनी काढला. पुढे-मागे तपासणी आली तर संस्थेची अडचण होईल अशी साने सरांना भीती असावी. डी.एन. सरांनी 'ते माझ्यावर सोडा' असे म्हणून माझी नोकरी मंजूर केली. योग्य आणि प्रामाणिक उद्देश असेल तर, सर स्वत: त्याची जोखीम घेत असत. त्यांच्यासोबत काम करताना त्याची प्रचिती मला कित्येकदा आली.

आमच्या शाळेतील हेडक्लार्क गजानन बापट यांची शिक्षक म्हणून बढती झाली. डी. एन. सर कदाचित याच संधीची वाट पाहात असावेत. लगेचच माझी ज्युनिअर क्लार्क म्हणून नेमणूक झाली, ते साल १९६५. तिथून सरांचे निधन होईपर्यंत - म्हणजे १९८२पर्यंत मी सरांच्या सोबत काम करीत राहिलो. या १७ वर्षांत शाळेने विकासाचे मोठे टप्पे गाठले; तसेच अतिशय क्लेशकारक प्रसंगांनाही तोंड दिले. मी त्या प्रत्येक प्रसंगाचा साक्षीदार आहे.

१९६४साली शाळेचा टेक्नीकल विभाग चालू झाला. त्यासाठी मिळणाऱ्या अनुदानाचा प्रस्ताव शासनाने मान्य केला होता. अनुदानाच्या मंजुरीचे पत्र व त्याचा धनादेश आणण्याचे काम सरांनी माझ्यावर सोपविले. हे काम साठेला जमेल का; अशी संचालक मंडळाला शंका होती, पण सरांचा माझ्यावर विश्वास होता. तो मी सार्थ केला. तद्नंतर सरांनी अनेक मोठी कामे माझ्यावर सोपविली आणि ती मी करत गेलो.

१९६९सालापासून संस्थेस अनेक कारणांनी कोर्टात जावे लागले. प्रत्येक वेळी सरकारशी - म्हणजे शिक्षण खात्याशी - संघर्ष होई. शासनात घुसलेल्या भ्रष्ट आणि खुशमस्करे लोकांचा सरांना विलक्षण राग येई. तत्वाला मुरड न घालता शिक्षणाचे पवित्र काम करण्यावर त्यांची नितांत श्रद्धा होती. त्यामुळे 'अशा लोकांच्यापुढं नमतं घ्यायचं होतं, तर आम्ही स्वातंत्र्याचा लढा का दिला?' असे ते म्हणत.

याच सुमारास शाळेच्या क्रीडांगणाकडे जाणाऱ्या वाटेवर नगर-रचनाकारांनी एक डी. पी. रोड टाकला. - म्हणजे प्रत्येक वेळी विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडून मैदानावर जावे लागणार होते. हा प्रश्न फारच गंभीर होता. सरांनी हे आव्हान स्वीकारले. आम्ही पर्यायी प्रस्ताव तयार केला, तो घेऊन त्यावेळचे नगरविकास मंत्री पु.ग. खेर यांची भेट घेतली, आमचा प्रस्ताव आणि त्या प्रस्तावाची मांडणी मी इतक्या पद्धतशीर केली होती की, मंत्री महोदयांना शंकेस जागाच नव्हती. आमचे रास्त म्हणणे त्यांना मान्य करावे लागले. सरांचे मार्गदर्शन या कामी लाभले. मंत्री महोदयांनी आमच्या फाईलवर मारलेला तीन ओळींचा शेरा मी नेमका वाचला, आणि तसाच्या तसा आमच्या कॉपीवर उतरवला. तेव्हापासून 'मी लिहावे आणि सरांनी मंजुरी द्यावी' असे चालू झाले.

शाळेतील एका शिक्षिकेला कामावरून कमी करण्याचा निर्णय संस्थेला घ्यावा लागला. प्रकरण कोर्टात गेले. संस्थेचा टेक्नीकल विभाग चालू झाल्याने तिकडे दोन शिक्षक घ्यावे लागले. अनुदान-संहिता नियमाखाली ज्यादा होणारा शिक्षक कमी करण्याचा अधिकार संस्थेस होता; आणि त्याचाच आधार घेत ही कारवाई झाली होती. तसेच शिक्षणसंस्थेच्या प्रतिष्ठेला इजा पोचवणारे कृत्य, हेही एक कारण त्यामागे असावे. या केसमध्ये सर्व पातळींवर संस्थेच्या विरुद्ध निकाल लागला. सर्वोच्च न्यायालयात शाळेच्या वकिलांच्या निष्काळजीपणामुळे एकतर्फी निकाल संस्थेच्या विरुद्ध लागला. या काळात संस्थेचे अनुदान शासनाने थांबविले होते. त्या आदेशात शासनाने, 'वर नमूद केलेले प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने निकाल होईपर्यंत अनुदान थांबविण्यात येत आहे' असे कारण दिले होते. मुलांकडून मिळणारी फी, शिक्षकांच्या पगारापोटी मिळणारे अनुदान, आणि आर्थिक दुर्बळ मुलांना फी माफीसाठी विद्यार्थ्यांमागे सरकारकडून मिळणारी ठराविक रक्कम हे शाळांचे उत्पन्न असे. 'शासनाच्या कृतीचा आणि कोर्टातील प्रकरणाचा कोणताही परस्पर संबंध नाही. ही शिक्षणखात्याची कृती अन्यायकारक आहे' असा मुद्दा उपस्थित करून संस्थेने प्रतिवाद केला. हायकोर्टातील त्यावेळचे न्यायमूर्ती मा.चितळे यांनी संस्थेचे म्हणणे उचलून धरले, आणि शासनाच्या त्या कृत्याबद्दल कडक समज दिली. ती सुमारे दोन वर्षे, संस्थेच्या सेवकांचे पगार थांबलेले होते. कर्मचाऱ्यांनी विनापगार दोन वर्षे कशी काढली असावीत, याची कल्पनाच आज करता येत नाही. आमचे तर ७ जणांचे कुटुंब यातून गेले. काही थोड्या शिक्षकांनी खळखळ केली, मात्र सरांच्या आणि संचालकांच्या मागे इतर सर्व शिक्षक ठाम उभे राहिले. शाळेतील दोन शिपाई आणि काही शिक्षक - ज्यांची परिस्थिती हा भार पेलण्याइतपत नव्हती, - त्यांचे पगार सर करीत, अर्थात त्यासाठी संस्थेच्या हितचिंतकांकडून उधारी उसनवारी करावी लागे.

एक शिक्षिका होत्या, त्यांना शिकविता येत नसे. तसेच त्या शाळेचे नियमही पाळत नसत. त्यांनाही शाळेने कमी केले. हे प्रकरण कोर्टात गेले. शिक्षण संचालक चित्रा नाईक यांच्यासमोर आम्ही आमची बाजू मांडलीच होती. त्यांच्या शिफारसीमुळे तक्रारीचा निकाल संस्थेच्या बाजूने लागला.

शिक्षणसंस्था-चालकांना सरकारी जाचक नियमांचा आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचा जाच होत असे. 'आपण एकत्र आल्याखेरीज आपणास सरकार-दरबारी न्याय मिळणार नाही' म्हणून 'महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्था संचालक-संघ महामंडळ' नावाची एक संघटना होती. १९७०साली सर शिक्षक म्हणून निवृत्त झाले, तथापि संस्थेचे ते सचिव होते. त्यानंतर या संघटनेत सरांनी लक्ष घातले. संघटनात्मक बांधणी केली. महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था चालकांची सम्मेलने भरविण्याचा महत्वाचा निर्णय सरांनी घेतला; जेणे करून संस्था-चालकांच्या प्रश्नांना व्यासपीठ मिळावे. सरांच्या कारकिर्दीत नाशिक, कोपरगाव, पुणे, सांगली, अकलूज, मुंबई, सोलापूर या ठिकाणी सम्मेलने झाली. त्या सम्मेलनांचा संस्थांच्या संचालनाच्या दृष्टीने चांगला परिणाम झाला.

शाळेच्या अनेक कामांसाठी पुणे-मुंबई अशा खेपा कराव्या लागत. सरांच्या संबंधित चार-पाच संस्थांची कामे एकत्र करून हे दौरे होत. त्यामुळे एकाच संस्थेवर आर्थिक ताण येत नसे. सर स्वत: मुंबईत त्यांचे साडू गाडगीळ यांच्याकडे राहात. आम्हीसुद्धा काही वेळी तेथे

राहात असू. पुढे आमच्या शाळेच्या विकास हौसिंग सोसायटीत एक प्लॉट सरांनी गाडगीळांना विकत दिला, तेव्हा काहींनी यावर आक्षेप घेतला. सरांनी त्यावेळी सांगितले, ''माझ्या मुंबईतील मुक्कामाचे राहणे आणि जेवणाचे बिल किती होते ते काढा, म्हणजे तुम्हाला प्लॉटची किंमत कळेल.'' पुण्यात राहण्याचा प्रसंग आला तर ते थत्ते यांच्याकडे राहात. संस्थेचे एक देणगीदार आणि हितचिंतक, चिप्री गावचे पाटील होते. त्यांचा खाऊच्या पानाचा व्यापार होता. मुंबईत पानाच्या गल्लीत त्यांचे एक पेढीवजा दुकान होते, तिथे माझी राहण्याची मोफत सोय होत असे. थोडक्यात, संस्थेचे काम कमीत कमी खर्चात कसे होईल, ते सर नेहमी पाहात असत.

शिक्षकांचे निवृत्तीचे वय ५८ वर्ष आहे. मात्र संस्थेने प्रस्ताव दिला तर पुढे दोन वर्षे मुदतवाढ मिळत असे. त्यापुढे पुन्हा दरवर्षी प्रस्ताव सादर करून प्रत्येक वर्षी एक एक वर्षाची मुदतवाढ सेवेत मिळत असे. थोडक्यात, वयाच्या ६५ वर्षापर्यंत शिक्षक काम करू शकत असे. आधीच्या सर्वांना हा फायदा मिळाला. मात्र डी.एन. सरांचा प्रस्ताव फेटाळला गेला. त्याचे एकमेव कारण म्हणजे शिक्षण खात्यातील भ्रष्ट प्रवृत्तींशी सरांनी सतत केलेला विरोध, असे मला वाटते. प्रत्यक्षात या मुदतवाढीची सरांना फार गरज होती. सरांची मुले अजूनही शिकत होती. तथापि त्याबद्दल कधी शब्द न काढता संस्थेचे कार्यवाह म्हणून सर अखेरपर्यंत कार्यरत होते.

आज जिथे मी राहतो ती वसाहत पूर्वी 'विकास हौसिंग सोसायटी' म्हणून स्थापन झाली. यापैकी निम्मीअर्धी जागा यंगमेन्स सोसायटीने त्या वेळच्या आजीव सभासदांसाठी 'रहिवासी प्लॉट' म्हणून विकत घेतली होती. आपण केवळ जुन्या आजीव सभासदांनीच घरे बांधावीत, अशी संकुचित वृत्ती सरांची नव्हती. शाळेतील सर्वच शिक्षकांना प्लॉट मिळावेत म्हणून, पुन्हा तितकीच जागा सांगलीचे संस्थानिक हिज हायनेस चिंतामणराव पटवर्धन यांच्याकडून मिळवली. शाळेतील त्या वेळच्या सर्व शिक्षकांना रहिवासी प्लॉट देण्यात आले. इतकेच नव्हे तर, शाळेतील दोन शिपाई कांबळे आणि गणपती - यांना मोफत प्लॉट देण्यात आले. सरांनी जर स्वार्थी आणि संकुचित विचार केला असता तर, आज कोट्यवधी रुपयांची मालमत्ता ते स्वत:साठी ठेवू शकले असते.

या सोसायटीत ज्यांना प्लॉट दिले, त्यांपैकी काही मंडळी शाळेशी प्रत्यक्ष संबंधित नव्हती. मात्र या लोकांनी संस्थेच्या कामात वेळोवेळी मोलाची मदत केलेली होती. गाडगीळांच्या प्लॉटचा उल्लेख आलाच आहे, तसाच एक प्लॉट पी. जी. चिन्मुळगुंद, (ICS) संस्थान काळातील जिल्हाधिकारी यानाही देण्यात आला होता. पुढे सोसायटी बरखास्त झाली, अनेकांनी आपापले प्लॉट त्या त्या वेळच्या वाढीव दराने विकले.

त्या वेळेपर्यंत मी भाडोत्री जागेत राहात होतो. शाळेच्या सोसायटीत मलाही प्लॉट मिळावा, आणि पुढे मागे स्वत:चे घर व्हावे असे माझे स्वप्न होते. तथापि सद्य परिस्थितीत प्लॉट शिल्लक नव्हते. मी बोलल्यावर सरांनी काही मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. याच वेळी नलवडेसर नोकरी सोडून गेले, त्यांचा प्लॉट सरांनी मी आणि ए. व्ही. आपटे (डी. एन. सरांचे पुतणे) यांना निम्मा निम्मा दिला. ए. व्ही. आपटे सरांनी घराचे बांधकाम काढले आणि मला त्यातील दोन खोल्या मोफत देण्याच्या बोलीवर संपूर्ण प्लॉटवर बांधकाम केले. परंतु माझ्यासाठी कबूल केलेले घर प्रत्यक्षात मिळालेच नाही. माझे घराचे स्वप्न इथे पुन्हा भंग पावते की काय, असे वाटू लागले. सरांच्या कानावर जेव्हा हे प्रकरण गेले, तेव्हा मात्र सरांनी ''साठेला तेवढ्याच आकाराचा आणि याच सोसायटीत प्लॉट तू दिला पाहिजेस'' असे ए. व्ही. सरांना बजावले. त्याचा परिणाम म्हणून- आत्ता मी जिथे राहातो ती जागा मिळाली. केवळ सरांच्यामुळे हे शक्य झाले, आणि नंतर माझ्या घराचे स्वप्नही साकार झाले.

माझ्या आईवडिलांच्या आठवणी मला सांगता येणार नाहीत, पण सरांच्या आठवणींनी माझ्या स्मृतीग्रंथाचा कानाकोपरा व्यापलेला आहे. सर पहाटे फिरायला जात असत, परतताना ते सकाळी माझ्या घरी वेळोवेळी येत. त्यावेळी आंबेडकर रोडवर वस्ती नव्हती, त्यामुळे माझे घर मुख्य रस्त्यावरून दिसत असे. सर तेथूनच, ''काय रे

साठ्या, काय करतोयस्?'' अशी ओरडून हाक मारीत. कधीतरी घरी येत, चहा घेत. माझ्या पत्नीला ''साठ्या नीट पगार घरी देतो ना?'' असे विचारीत. हा अधिकार फक्त सरांनाच होता.

माझ्या हातून अशीच एक आगळीक झाली. त्यामध्ये शाळेचा काही संबंध नव्हता, तर ती गोष्ट माझ्या व्यक्तिगत जीवनातील होती. पण शाळेतील काही सेवकांनी त्याचे भांडवल करून, माझ्यावर कारवाई व्हावी असे प्रयत्न चालवले. सरांच्याकडे प्रकरण पोचले. चौकशी झाली. याबाबत सरांचे मत अगदी स्पष्ट होते. 'माणूस कधीतरी नकळत चुकतो. त्याला सुधारण्याची संधी दिली पाहिजे. दुसरे, त्याच्या चुकीमुळे संस्थेस नुकसान नाही ना होत? '

आरवाडे हायस्कूलमध्ये कामाच्या कोणत्याही दिवशी कोणीही आले तर तिथे कांबळे, गणपती, सर आणि मी या चार व्यक्ती शाळेत हमखास दिसत असत. सरांनी कधी रजा काढल्याचे आठवत नाही, आणि ते शाळेत येत होते तोपर्यंत मीही कधी रजा काढली नाही!

माझ्या व्यक्तिगत जीवनात मी समाधानी आहे. माझ्या तीनही मुली आपापल्या क्षेत्रात यशस्वी आहेत. हे सारे श्रेय मी सरांना देणे उचित समजतो. त्यांचे ऋण माझ्यावर सदैव राहील, ते मला या जन्मी तरी फेडता येणार नाही.

*(लेखक : आरवाडे हायस्कूलमध्ये विद्यार्थी व कर्मचारी; संस्थेत उत्तम प्रकारचे कार्यालयीन व्यवस्थापक होते.)*

●●●

## दणकट देहाचे गुरू

-मकरंद कुलकर्णी

माझ्या शाळेबद्दल, डी.एन. सरांबद्दल, घडामोडींबद्दल कोणी ऐकणारे भेटले तर मला किती सांगू असे होते; डी.एन. सरांची लख्ख प्रतिमा माझ्यासमोर प्रकट होते. दणदणीत(रोबेस्ट), निर्भीड, आपल्या विचारांना घट्ट, शब्दाला पक्के, चांगल्याशी चांगले आणि वाईटाशी वाईट, चांगले ते स्वीकारण्याची दिलदारी, संघटनकौशल्य असे त्यांचे अनेक पैलू माझ्या मनात उचंबळत असतात. माझे वडील बिंदुमाधव हे त्याच शाळेत शिक्षक होते. माझे स्वत:चे अनुभव, वडिलांनी सांगितलेल्या आठवणी, आणि त्या काळच्या घटनांचे आकलन असा एक अमूल्य ठेवा, डी.एन. सरांच्यासंबंधी माझ्याकडे आहे.

मी 'नूतन मराठी'त ४थी पर्यंत, आणि नंतर ५वी ते ११वी गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये होतो. मी आज जे थोडेफार यश संपादन केले आहे, ते केवळ मी या शाळेत होतो म्हणून! आमची शाळा ब्राह्मणी गंड नसलेली सांगलीतील एकमेव शाळा होती; नाहीतर 'मी शहाणा' पेक्षा 'तुम्ही गाढव' ही विचारसरणी घेऊन मीही वाढलो असतो, आणि कोता बनून राहिलो असतो. माझ्या शाळेत तसा 'ब्राह्मणी गंड' असणारे शिक्षक नव्हतेच असे नाही, मात्र डी.एन. सरांच्या प्रभावामुळे ते निष्प्रभ ठरत. माझ्या घरातील संघाची शिकवणसुद्धा तशीच समतेची, बंधुभावाची होती. माझ्या शाळेत येणारी मुले कर्नाळ-डिग्रज-अंकली-सांगलीवाडी अशा सांगलीच्या आसपासच्या खेड्यांतून येत असत. तशीच शहरातील गवळी गल्ली, बुरुड गल्ली, महारवाडा, शिकलगार गल्ली अशा- शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागातून आलेली असत. त्यामुळे ती मुले, त्यांची संस्कृती, त्यांचा चांगुलपणा हे सारे मला ओळखता आले. शाळेतील विद्यार्थीगण पाहिला तर त्यांच्याकडे शैक्षणिक गुणवत्ता फार मोठी असेल असे अपेक्षित नव्हते; आणि याची पूर्ण जाणीव डी.एन. सरांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना होती. वंचितांना शिक्षणाची संधी देणे, हा त्यांचा मूळ उद्देश होता. अशा मुलांचे गुण जाणून, शाळेत खेळाला फार महत्व दिले जात होते. पोहणे, कुस्ती, कबड्डी, अशा खेळात शाळा नेहमीच अग्रेसर असे. शाळेच्या वतीने कृष्णेच्या महापुरात पोहायच्या स्पर्धा, कुस्त्यांची मैदाने होत. सर स्वत: उत्तम

कुस्तीगीर होते, उत्तम पोहणारे होते. अभ्यासाखेरीज विद्यार्थ्यांच्या अंगच्या इतर कलागुणांचे सरांना कौतुक होते, ते वेळोवेळी व्यक्त करीत. मला एक प्रसंग आठवतो. शाळेत एका कार्यक्रमाला मोरारजीभाई देसाई आले होते. भारत-पाकिस्तान युद्ध नुकतेच संपले होते, त्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाची सुरुवात गीतेतील एका श्लोकाने केली. श्लोक 'रणभूमीवर वीरमरण आलेल्या जवानांना श्रद्धांजली' हा आशय प्रगट करणारा, तो श्लोक संस्कृतचे शिक्षक ज.पु. जोशी यांनी निवडला होता. डी.एन. सरांनी या कार्यक्रमाची जबाबदारी माझ्यावर सोपविली होती. विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी देणे, हे तर सरांचे आणखी एक वैशिष्ट्य! मी हा कार्यक्रम उत्तम सादर केला, यामुळे मंत्रीमहोदय प्रभावित झाले होते असे त्यावेळी मला जाणवले. सरांनी नंतर मला बोलावून माझे कौतुक केल्याचे आजही स्पष्ट आठवते.

माझ्या वर्गातील खेड्यांतून येणारी अनेक मुले, शनिवारी सकाळी शाळेत येताना हातापायाला तेल चोपडून येत. आम्ही शहरी मुले त्यांना 'तेल्यामारुती' म्हणून चिडवीत असू. एका मुलाने मला म्हटले. ''एकदा सकाळच्या थंडीत सात आठ मैल उघड्या पायांनी सायकलवरून ये, म्हणजे आम्ही तेल का लावतो हे तुला कळेल.'' अशा अनेक गोष्टी या मुलांच्या सहवासात मला शिकायला मिळाल्या.

माझ्या शाळेची आणखी एक गोष्ट विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांची जात, धर्म, आर्थिक वा सामाजिक परिस्थिती कोणतीही असली तरी सर्वांना वागणूक समानतेची असे. डी.एन. सरांची मुले, त्यांचे पुतणे आणि अनेक जवळचे नातेवाईक याच शाळेत शिकत; तसेच खुद्द गणपतराव आरवाडे यांचा मुलगा शशिकांत माझ्याच वर्गात होता, त्यांतल्या कुणालाही मुद्दाम वेगळी वागणूक दिली आहे; जाणूनबुजून त्यास पुढे पुढे केले आहे, असे कधीही दिसले नाही. आरवाडे हायस्कूलचे सर्वेसर्वा असलेल्या डी.एन. सरांच्या सौभाग्यवतींना तर मी कधीच शाळेत मिरवताना पाहिले नाही. त्याउलट आजच्या राजकारणात, सहकारात आणि शिक्षणक्षेत्रात, पाळण्यातल्या स्वत:च्या मुलाचासुद्धा उदो उदो करून तो वारस समाजाच्या माथी मारला जात आहे.

सरांना कोणी फॅसिस्ट म्हणत, कोणी त्यांना समाजवादी म्हणत, तर कोणी त्यांना रॉयिस्ट म्हणत. दत्तोपंतांचे वाचन, लिखाण आणि वेगवेगळ्या विचारसरणीच्या लोकांशी असलेला त्यांचा संवाद पाहिला तर प्रत्येकाला तसे तेवढ्यापुरते वाटणे साहजिकच आहे. काँग्रेसचे तर ते सक्रिय कार्यकर्ते होतेच, पण त्याचवेळी एस.एम. जोशी, सर्वोदयी नेते विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते, असे माझे वडील बिंदुमाधव नेहमी सांगत. नूतन मराठी शाळेच्या भूमीपूजनास खुद्द जयप्रकाश नारायण आले होते. एका बाजूला देशातील 'थिंकटॅंक'शी सरांचे घनिष्ट संबंध होते, त्याचवेळी शाहीर निकम, नागनाथ नायकवडी, नामदेव कऱ्हाडकर, जी.डी. लाड अशा, जनसामान्यांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. इतकेच नव्हे तर आमची शाळा हे त्या साऱ्या कार्यकर्त्यांचे आश्रयस्थान होते, हे मी स्वत: पाहिले आहे! आज मला जाणवते की, ही मंडळी काही साधीसुधी नव्हती. भारत सेवक समाजाचे तर कार्यालयच आमच्या शाळेत होते.

आमच्या शाळेत हिंदुत्ववादी संघाच्या विचारसरणीचे खुद्द माझे वडील श्री.बिंदुमाधव आणि बी.व्ही. कुलकर्णी हे शिक्षक होते. तसेच डाव्या विचारसरणीचे सोमण होते. समाजवादी विचारांचे माणगावकरही होते. थोडक्यात आमच्या शाळेवर एकाच विचारसरणीचा किंवा राजकीय पक्षाचा शिक्का मारलेला नव्हता; याचे श्रेय डी.एन. सरांना द्यायला हवे. सर प्रत्येक विचारधारेतील, शाळेला काय उपयुक्त आहे त्याचा उपयोग करून घेत असत असे आज मला ठामपणे वाटते.

आणीबाणीच्या काळात मी स्वत: राजकीय चळवळीत होतो. संघाशी संबंधित असणाऱ्या शिक्षकांना संस्थेने शाळेतून काढून टाकावे, असा ठराव संस्थेचे एक सभासद इनामदार यांनी त्या काळात सर्वसाधारण सभेत मांडला. 'शाळेच्या हे हिताचे आहे, कारण संस्थेने सरकारशी निष्कारण वैर पत्करू नये' असे त्यांचे म्हणणे होते. या ठरावाला कडाडून विरोध करणारे डी.एन. सर होते. तो ठराव अखेर फेटाळला गेला! ताराचंद शहा नावाच्या तथाकथित समाजवादी नेत्याने असाच एक प्रयत्न केला.

'' संघाशी संबंध असणाऱ्या आपल्या शाळेतील शिक्षकांवर आपण का कारवाई करीत नाही?'' असा जाब ते सरांना विचारू लागले. आपण कोणाला हे विचारतो आहे, याची या शहांना कल्पना नव्हती असे वाटते. सरांनी त्याची अशी खरडपट्टी केली की पुन्हा हे गृहस्थ त्या वाटेला गेले नाहीत!

ऐन आणीबाणीत मला संघ कार्यकर्त्यांची एक बैठक घ्यायची होती. बैठकीसाठी योग्य जागा हवी होती. ऐन आणीबाणीत संघाच्या प्रत्येक हालचालीवर गुप्तहेर खात्याची करडी नजर होती. तेव्हा अन्य कोणी बैठकीला जागा देईल, याची शक्यता नव्हतीच! मात्र असे धाडस करणारी एकमेव व्यक्ती मला सांगलीत दिसत होती, ती म्हणजे माझे सर - डी. एन. आपटे! मी सरांच्याकडे गेलो, आणि त्यांनी एका क्षणात मला परवानगी दिली. संभाव्य कारवाईची सरांना कल्पना नसेल, असे म्हणणे तर धाडसाचे ठरेल. ही बैठक निर्विघ्न पार पडली. पुढे आणीबाणी उठली आणि निवडणुका जाहीर झाल्या. राष्ट्रीय स्तरावर जनसंघ, समाजवादी, साम्यवादी अशा अनेक राजकीय विचारप्रवाहांच्या पक्षांनी एकत्र येऊन 'जनता पक्षाची' स्थापना केली. मी जनता पक्षाचा सांगली जिल्ह्याचा निमंत्रक म्हणून काम करीत होतो. या राजकीय पक्षाच्या सांगली शाखेची स्थापना पुन्हा गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये डी.एन. सरांच्याच अध्यक्षतेखाली झाली. सर स्वत: काँग्रेसचे कट्टर कार्यकर्ते असले तरी, त्यांना आणीबाणी मान्य नसावी असे त्यांच्या एकूण वागण्यावरून वाटते. तसेच काँग्रेसचे बदलते स्वरूपही त्यांना मान्य नसावे. नंतरच्या काळात सरांनी काँग्रेसशी दुरावाच ठेवला होता असे मला जाणवत असे.

वेळ आलीच तर, मनगटाची ताकदसुद्धा वापरायला मागेपुढे पाहणाऱ्यातले सर नव्हते. गांधी हत्येनंतर झालेली जाळपोळ रोखण्यासाठी हातात बंदूक घेऊन सर जमावासमोर ठाकले, तेव्हा दंगलखोर जमाव पांगला. सरांनी आम्हा मुलांना स्वत:च हा प्रसंग कधीतरी एकदा सांगितला होता.

एक शिक्षक म्हणून सर आम्हाला अल्पकाळ मिळाले. ते इतिहास आणि इंग्रजी शिकवीत, परंतु संस्थेच्या इतर कामांत, कामगार सहकार क्षेत्रांतील कामांत, संघटनात्मक कामात ते व्यस्त असत. शालान्त अकरावीच्या सर्व तुकड्यांचा मिळून एखादा तास ते शाळेच्या प्रशस्त ड्राइंग हॉलमध्ये घेत. या तासाला क्रमिक पुस्तकांबाहेरच्या अनेक विषयांवर सर बोलत. इतिहासातील आणि चालू काळातील राजकीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचा त्यांत समावेश असे. शास्त्र - त्यातही अवकाशविज्ञान हा खरेतर सरांचा विषय नव्हता. असे असूनही एका तासाला सरांनी आम्हाला 'ग्रेट नेब्युला' या खगोलशास्त्रातील नव्या शोधाबद्दल रंजक माहिती दिल्याचे आजही आठवते.

शाळेत शिस्तीबद्दल सर आग्रही असत, मात्र ही शिस्त विद्यार्थ्यांच्या प्रगतीत अडसर असू नये असा त्यांचा आग्रह होता. आम्ही एस.एस.सीच्या वर्गात - म्हणजे ११वीत होतो. बोर्डाच्या मुख्य परीक्षेपूर्वी प्रत्येक शाळा एक पूर्वपरीक्षा घेत असे, त्यात पास होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच बोर्डाच्या परीक्षेस बसायला परवानगी असे. माझ्या वर्गातील एक विद्यार्थी त्या पूर्व परीक्षेदिवशी टोपी आणायचा विसरला. सांगलीत आमची एकच शाळा अशी होती, जिथे गणवेशात पांढरी गांधी टोपी घालणे बंधनकारक होते. हा मुलगा कर्नाळ गावातून सायकलवरून येत असे. त्या दिवशी परीक्षक धोपाडेसर होते, त्यांनी त्या विद्यार्थ्याला पेपरला बसू दिले नाही, आणि डी.एन. सरांची परवानगी आणायला सांगितले. सरांनी त्याची अडचण ओळखून परवानगी दिली; मात्र धोपाडे सरांनी 'डी.एन. सरांची चिठ्ठी मला हवी, तुझ्यावर माझा विश्वास नाही' असा पवित्रा घेतला. बिचारा विद्यार्थी पुन्हा डी.एन. सरांकडे गेला. डी.एन.सरांनी शाळेच्या शिपायाबरोबर पुन्हा निरोप पाठविला. तरीही धोपाडेसर चिठ्ठीचाच आग्रह धरून बसले. काही मिनिटांतच स्वत: सर वर्गावर आले, आणि धोपाडेसरांची अशी हजेरी घेतली की धोपाडे सर वरमले. सारवासारव करू लागले. डी.एन. सरांचा क्रोध आम्ही प्रथमच पाहात होतो. त्यांनी धोपाडे सरांना बजावले, ''शिस्त असलीच पाहिजे, शिस्तीचा आग्रहही असावा; पण विद्यार्थ्यांचे नुकसान होत असेल तर ही शिस्त त्याच्या प्रगतीला अडसर बनेल.'' शिस्तीच्या नावाखाली खडूसपणा सरांना कदापि मान्य नव्हता!

आम्हाला गोडबोले नावाचे शिक्षक होते. त्यांची शिक्षा

करण्याची तऱ्हा वेगळी होती. ते मुलांना पालथ्या हातावर डस्टरने मारीत. एकदा त्यांचा तसा मार शशिकांत आरवाडे या मुलास बसला, तो जरा जोरातच बसला! शशिकांतने त्याचे वडील गणपतरावांच्याकडे तक्रार केली. आता गणपतराव म्हणजे संस्थेचे अध्यक्ष, मोठे देणगीदार. मुलाची तक्रार घेऊन ते स्वाभाविकच डी.एन. सरांच्याकडे गेले. गणपतरावांना 'डस्टर' म्हणजे काय हेदेखील माहीत नव्हते. सरांना त्यांनी विचारले, ''डस्टर म्हणजे काय असते? शाळेतील एक शिक्षक त्याने मारतात, अशी शशिकांतची तक्रार आहे.'' सगळा प्रकार डी.एन. सरांच्या लक्षात आला. सर म्हणाले, ''अहो डस्टर म्हणजे फळा पुसायचे फडके!'' ''एवढ्या-तेवढ्याची हल्ली मुले तक्रार करतात.'' असे म्हणून गणपतराव निघून गेले, आणि ते प्रकरण तिथेच मिटले. नंतर स्टाफ मीटींगमध्ये शिक्षा अघोरी नसावी असा सल्ला सरांनी सर्वांनाच दिला. आज असा प्रसंग झाला असता तर, त्या शिक्षकास वर्गातून ओढून मारहाण झाली असती. त्या वेळची माणसे कदाचित कमी शिकलेली असतील, पण ती सुज्ञ निश्चित होती.

'अभ्यासात मागे, पण अन्य कुशल कामांत पुढे असणाऱ्या मुलांसाठी, आमच्या शाळेत तांत्रिक विभाग चालू करून, सरांनी फार मोठी सोय केली. सुतारकाम, लोहारकाम, इलेक्ट्रिककाम असे अनेक कोर्स चालू करून तरुण मुलांना रोजगारपात्र बनविले. आमच्या शाळेचे ग्रंथालय फार समृद्ध होते. स्वत: सरांचे वाचन अफाट, आणि सगळ्या विषयांतील होते, त्याचे प्रतिबिंब शाळेच्या ग्रंथालयात दिसे. पुस्तकांची निवड सर्व प्रकारच्या विचारांना सारखा न्याय देणारी होती. शिवाजी महाराजांचे ब.मो.पुरंदरे लिखित दहा भागांतील चरित्र मी स्वत: आमच्या शाळेतून वाचले होते.

माझ्या वडिलांवर, म्हणजे बिंदुमाधव कुलकर्णी सरांवर - माझ्या वडिलांच्या भाषेत सांगायचे तर - 'दत्तोपंतांची मर्जी' होती. ते वैयक्तिक गोष्टी बिंदुमाधवना सांगत. स्थूलपणा कमी करण्यासाठी स्वत:वर केलेला प्रयोग त्यांनी एकदा सांगितला. पूर्ण आठवडा नुसत्या डाळीच्या पाण्यावर सर राहिले होते. त्यांचा अनुभव म्हणजे, 'मला हलके वाटते, आणि मुख्य म्हणजे थोडाही अशक्तपणा जाणवत नाही. थोडक्यात, आपल्याला अन्नाची गरज फारच कमी असते.'

सरांच्याकडे अफाट क्षमता होती. त्यांच्या काळात संस्थेने जबरदस्त प्रगती केली. मात्र ती गती, शाळेबद्दल जनमानसात असलेला आदर, हे क्रमश: घटत गेले. बदलता काळ हे जसे त्याला कारण आहे, तसेच तितक्या ताकदीचे नेतृत्व संस्थेला मिळाले नाही हेही आहे. पुढे पुढे शाळेबद्दल ज्या गोष्टी कानावर आल्या त्या तर क्लेशदायकच होत्या. ते काहीही असले तरी, मी डी.एन. सरांच्या गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये शिकलो, याचा मला सार्थ अभिमान आहे.

*(लेखक : आरवाडे हायस्कूलचे शिक्षक बी.व्ही.कुलकर्णी यांचे सुपुत्र, संघ स्वयंसेवक, सुप्रसिद्ध वकील)*

●●●

## दत्तूकाकांनी लढायला शिकविले

-चिंतोपंत गोखले

मी एका रविवारी हरीपूर रस्त्याने चाललो होतो. पावसाळी दिवस, सकाळचे साडेसहा वाजले असतील. पावसाची रिपरिप चालू होती. सायकलीला दोन मोठ्या थैल्यात दुधाच्या रतीबाच्या पिशव्या भरून मी सायकल ढकलत चाललो होतो. ती सायकल पिशव्यांचे ओझे पेलीत होती, तसेच मलाही आधार देत चालली होती. दत्तोपंतांचा मुलगा त्याच रस्त्याने झाडे आणि त्यातले पक्षी निरखत चालला होता. मला पाहून जवळ येऊन थांबला. माझे कुतुहल वाढले. तो माझ्या मुलाचा मित्र. माझ्या चेहऱ्यावरचे भाव त्याने ओळखले, मग मीच जाणून त्याला म्हटलं, अरे कोणत्याही संकटाला तोंड द्यायला तुझ्या दत्तूकाकांनीच तर आम्हाला शिकविले. म्हणून या परिस्थितीला मी डरत नाही.''

मुलाच्या आकस्मिक निधनामुळे, आमच्या कुटुंबावर मोठे संकट आले होते, मानसिक आणि आर्थिकही! कुटुंबाला हातभार लावण्यासाठी दूध टाकायची वेळ सत्तरी ओलांडल्यावर आली होती. आम्ही आधीचेच अतिशय गरीब कुटुंबातले. मॅट्रिकपर्यंत शिकलो, आणि खाजगी नोकरीस लागलो. 'लवकर निजे लवकर उठे, त्यास आरोग्य भेटे' म्हणून सारे कुटुंब लवकर निजून पहाटे उठे. खरं म्हणजे त्याचे कारण 'तत्व' नव्हते, तर गरीबी! रॉकेलच्या चिमणीसाठी पैसे नसत, म्हणून लवकर झोपायचे, आणि आपोआपच पहाटे उठायचे. आम्ही सावरकरांचे भक्त, आणि हिंदू महासभेचे विद्यार्थीदशेपासून कट्टर कार्यकर्ते.

गोवा मुक्तीची चळवळ जोरात होती. दत्तूकाका गोवा मुक्ती आंदोलन समितीचे सांगली अध्यक्ष होते. गोवा संग्रामातील काही अप्रिय घटनांमुळे त्यांच्या निषेधार्थ हिंदू महासभेने 'सांगली बंद' पुकारले होते. शाळा, दुकाने बंद करीत आमचा मोर्चा आरवाडे हायस्कूलवर पोचला. हायस्कूल चालू होते. तिथे घोषणा, धरणे चालू झाले. परिसरात घबराट निर्माण झाली. दत्तूकाका त्या आंदोलकांना सामोरे झाले. 'शाळा बंद होणार नाही' असे त्यांनी निक्षून सांगितले. मोर्चातील काहींनी सरांना, 'हे वागणे गोवा मुक्ती चळवळीच्या विरोधी आहे' असे बोलून दाखवले. त्यावर दत्तूकाका ठामपणे म्हणाले, ''शाळा बंद करून गोवा मुक्ती मिळत नसते; त्यासाठी गोवा सीमेवर काम करायला हवे. मी इंग्रजांशी लढलो आहे. कोण कोण माझ्यासोबत येणार? आत्ताच आपण गोवा सीमेवर जाऊ.'' त्या मोर्च्यात मी अग्रभागी होतो. तसा मी पोरसवदा. माझ्यावर दत्तूकाकांचे लक्ष गेले होते. नंतर त्यांनी मला शाळेत बोलावून घेतले.

सरांचा पहिला प्रश्न, ''शाळा सोडून तू इथे कसा?'' मी माझी परिस्थिती सांगितली. गांधीहत्येनंतर काही हिंदू संघटनांवर बंदी घालण्यात आली होती. त्या संघटनेशी संबंधित आम्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेतून काढून टाकण्यात आले होते. मी त्यावेळी सांगली शिक्षण संस्थेच्या सिटी हायस्कूलमध्ये शिकत होतो. शाळेने मलाही काढून टाकले होते. अशा तऱ्हेने माझ्या शिक्षणाचे दरवाजे बंद झाले आहेत, हे मी दत्तूकाकांना सांगितले. दत्तूकाकांनी ताबडतोब मला त्यांच्या आरवाडे हायस्कूलमध्ये प्रवेश दिला. आणि बजावले, ''तुझ्या xxx वर एकदा मॅट्रिकचा शिक्का मारतो आणि मग तुला काय आंदोलने करायची ती कर!'' खरोखरीच दत्तूकाकांनी ते करून दाखविले. त्यासाठी शासनाचा रोष पत्करला.

जी शाळा सावरकर तत्वांचा सदैव डांगोरा पिटत असे, त्या संस्थेने सरकारी आदेशाला भिऊन मला शाळेतून काढून टाकले. उलट दत्तूकाका - जे काँग्रेसचे म्हणून ओळखले जायचे, - त्यांनी सरकारी आदेशाला माझ्या शिक्षणासाठी केराची टोपली दाखविली. हे धारिष्ट्य दत्तूकाकाच करू जाणे.

त्यानंतरच्या काळातील माझा हा प्रापंचिक संघर्ष, दत्तूकाकांच्या तडफदार सार्वजनिक संघर्षापुढे काय सांगावा?

*(लेखक : चिंतोपंतानी प्रसंग कथन केला, त्याचे हे शब्दांकन. चिंतोपंत गोखले त्यानंतर निवर्तले. ते निष्ठावंत माजी विद्यार्थी व व्यावसायिक होते.))*

●●●

## दत्तूकाका आणि विनूकाका

-गोपाळ खाडिलकर

आमचे मूळ गाव सांगली जिल्ह्यातील जायगव्हाण. घर, शेती आजही आहे.

आम्ही सांगलीत आलो त्यावेळी आमची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. शाळेची फी भरणेही शक्य नसे. माधुकरी मागून उदरनिर्वाह होत असे. माझे मामा म्हणजे सांगलीतील बलभीम व्यायाम शाळेचे संस्थापक रास्ते मास्तर. शाळा वगळता बाकीचा आमचा वेळ त्यांच्या व्यायामशाळेत जात असे.

माझे शिक्षण आरवाडे हायस्कूलमध्ये झाले. दत्तूकाका हे रास्ते मास्तरांचे विद्यार्थी, आणि बलभीम व्यायामशाळेतील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व. मला शाळेची फी भरणे नेहमीच अशक्य असे, शिकायचे तर होते. माझे मामा आणि दत्तूकाका यांच्यात या विषयावर बोलणे होत असावे. दत्तूकाका आणि विनूकाका हे त्यावेळी आम्हाला 'राजे' आहेत असे वाटे. तसेच त्यांचे वागणे बोलणे होते. या दोन व्यक्ती सदैव माझ्यासारख्या मुलांच्या पाठीशी असत. दत्तूकाकानी काय केले माहीत नाही, पण मला त्यांनी कधी फी मागितली नाही. तसेच मला आय.टी.आय.मध्ये, त्यांचे दोस्त शाहीर निकम यांना सांगून प्रवेश मिळवून दिला. मी आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण करून पुण्यात टाटामध्ये नोकरीस लागलो. तिथेच निवृत्त झालो. पुढील सर्व भूत आणि वर्तमान मी सांगायचे तर इतकेच म्हणेन की, दत्तूकाकांची साथ नसती तर आज मी कोठे असतो, हा विचार करण्याचे धारिष्ट्य होत नाही!!!

*(लेखक : आपटे बंधूंचा मानसपुत्र व पुढच्या पिढीचा जिगर दोस्त)*

●●●

## मागासांचा पुरोगामी पालक

-उस्मान शिकलगार

नगरपालिकेच्या शाळेमधून सातवी झाल्यावर आम्हासारख्या गरीब, मागासवर्गीयांची शाळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये मी १९५७ साली प्रवेश घेतला. माझा ओढा खेळाकडे जास्त. कबड्डी, धावणे, थाळीफेक, भालाफेक, लांब उडी अशा सगळ्या खेळांत मला गती होती; पण आवडता खेळ म्हणजे कबड्डी. मी आरवाडे हायस्कुलात असताना शाळेच्या वार्षिक सामन्यात खेळाला फार महत्त्व होते. स्वत: डी.एन. आणि व्ही.एन. सर उत्तम कुस्तीगीर होते. वार्षिक सामन्यात त्या वर्षीची फायनल कुस्ती, मी आणि सरकारी व्यायामशाळेतील पैलवान मुरलीधर गवळी यांच्यात होती. गवळी हा खरा पैलवान होता, मी मात्र आवड म्हणून कुस्ती खेळत होतो. माझा 'दम' हा माझा खरा आधार होता. तसेच या दोन्ही सरांचे मार्गदर्शन हाही मोठा आधार.

ही कुस्ती लागली आणि थोड्याच वेळात मुरलीधरने मला खाली घेतले. मुरलीधर हा भारीभक्कम गडी. त्यामुळे त्याच्याशी ताकदीचा फारसा उपयोग नव्हता. मी माती धरून जमिनीला चिकटून राहिलो. सरकारी तालमीचे मल्ल आणि गवळी-गल्लीतील त्याचे समर्थक प्रेक्षकांत होते, त्यांचे मुरलीधरला प्रोत्साहन होते. माझ्या बाजूने मात्र माझे दोन्ही गुरू डी.एन., व्ही.एन., दोघेही मैदानावर हजर होते. अंगावर माती टाकण्याच्या निमित्ताने मला मार्गदर्शन मिळत होते. 'दमवून कुस्ती मार' असा त्यात सल्ला होता. कुस्ती चालू होऊन जवळजवळ तास उलटला. मुरलीधर मला उताणे पाडायचा प्रयत्न करीत होता, आणि मी माती सोडत नव्हतो. हळूहळू मुरलीधर चांगलाच दमला.

व्ही.एन.सरांनी मला खुणेनेच डाव सुचवला, मी क्षणात 'बगल' डाव केला; आणि मुरलीधर चारी मुंड्या चीत झाला. व्ही.एन.सरांनी मला 'ताबडतोब कपडे घाल आणि मागील दाराने पळ काढ' असा सल्ला दिला. ''पुढं आठ-दहा दिवस गवळी गल्लीकडं फिरकू नको'' अशी सूचना दिली. तोपर्यंत मला धरायला मुरलीधरचे समर्थक गोळा झाले होते, पण मी चपळाईने पळ काढला.

शालेय विद्यार्थ्यांसाठी 'भाऊसाहेब माळी शिल्ड' नावाची अतिशय मानाची कबड्डी स्पर्धा त्या काळात होती. डी.एन.सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही ही ढाल सलग दोन वर्षे जिंकली. पुढे खुल्या वर्गातील स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी शाळा प्रोत्साहन देत असे. माझी आणि माझा भाऊ इस्माइल शिकलगार याची कोल्हापूर विभागाकडून शालेय टीममध्ये निवड झाली. या खुल्या स्पर्धा आंध्रप्रदेशमध्ये होत्या, ती स्पर्धा आम्ही जिंकली. या स्पर्धा चालू असताना इकडे शाळेत एस.एस.सी. परीक्षेचा फॉर्म भरायचा होता; मी तर आंध्रप्रदेशात होतो. मी सरांना फोन करून, माझी फॉर्म भरायची इच्छा व्यक्त केली. आमचे पाटणकर सर साशंक होते. त्यांचे म्हणणे पडले, तू पुढच्या वर्षी बसावेस. डी.एन.सरांनी मात्र मला विचारले, ''राहिलेल्या दोन महिन्यांत तू झोकून देऊन अभ्यास करणार असशील तर तुझा फॉर्म पाठवतो.'' मी सरना तसे वचन दिले. पाटणकर सरांनी 'पास झालास तर माझ्याकडून ५० रुपयांचे बक्षीस' अशी पैज लावली. ज.पु.जोशी सरांनी संस्कृतची तयारी करून घेण्याचे आश्वासन दिले. मी कसून अभ्यास करून पाटणकर सरांनी लावलेली पैज जिंकली, आणि डी.एन.सरांना दिलेले वचनही पूर्ण केले.

शाळेच्या कार्यक्रमांच्या वेळी भाषणात सर आम्हा खेळाडूंचे आवर्जून कौतुक करत असत. 'हे विद्यार्थी म्हणजे आमच्या शाळेचे भूषण आहेत' असे म्हणत. अभ्यासात हुशार असणाऱ्या मुलांबरोबरीने खेळाडूंचे कौतुक सरांकडून आवर्जून होत असे, त्यामुळे आम्हालाही हुरूप येत असे.

शाळा संपून मी विलिंग्डन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथेही खेळात प्रगती चालू ठेवली. पुणे विद्यापीठाकडून मी राष्ट्रीय स्तरावरच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा खेळलो. उज्जैनमध्ये झालेल्या स्पर्धेत आम्ही अजिंक्य ठरलो. माझ्याबरोबर लवंगारे, नरेंद्र दाभोलकर हे सह-खेळाडू होते. या विजेतेपदाबद्दल पुणे महाविद्यालयाचे चॅन्सलर म.म.दत्तो वामन पोतदार यांनी आमचा सत्कार करायचे ठरविले. ही बातमी डी.एन.सरांना कळाली. त्यांनी मला बोलावून त्याबद्दल विचारले. मी सरांना सत्य परिस्थिती सांगितली, ''सर, माझ्याकडं पैसे नाहीत. मी जाऊ शकत नाही.'' सरांनी मला भाड्याचे पैसे दिले आणि बजावले, ''अशी संधी क्वचित येते, ती चुकवू नकोस.''

एक वर्षी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते. बक्षीस समारंभाच्या वेळी मला कबड्डी, पोहणे, धावणे, उंच उडी, लांब उडी अशी एकंदर १४ बक्षिसे होती. त्यात एक बक्षीस भावगीत गायनातही होते. इतकी सारी बक्षिसे एकाच मुलाने पटकावलेली पाहून मा.चव्हाणांनी ''याला 'सर्व खेळात प्रवीण' असे एकच सर्टिफिकेट द्या'' असे म्हटले. तसे प्रशस्तीपत्र मला खरोखरीच द्यायला लावले.(हे प्रशस्तीपत्र आजही माझ्याकडे आहे) याही पुढे जाऊन त्यांनी डी.एन.सरांना, ''याला मॅट्रिक पास करा आणि माझ्याकडे पाठवा, पुढचे मी बघतो.'' असे सांगितले. मी पास झालो, पण मुंबईला गेलो नाही. प्रत्येक शालेय वार्षिक स्पर्धेत मी अनेक बक्षिसे मिळवीत होतो. मुरारजीभाई देसाई, जयंतराव टिळक अशा मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते मी बक्षिसे स्वीकारली आहेत. डी.एन.सरांच्या शब्दाखातर ही मंडळी शाळेत येत असत. यशवंतराव चव्हाण डी.एन.सरांना खाजगीत 'दत्तू' म्हणत, हे मी ऐकले आहे!

मला पोहायला डी.एन.सरांनी शिकविले. मी उत्तम पोहत होतो. कृष्णा नदीत महापुरात शाळेच्या पोहण्याच्या स्पर्धा होत्या. चिमटा ते सांगलीवाडी आणि तिथून पुन्हा विष्णूघाट असे अंतर होते. आम्ही जवळजवळ ३५ मुले होतो. डी.एन.सर समोर नावेत होते. स्पर्धा सुरू झाल्याचा इशारा म्हणून त्यांनी बंदुकीने हवेत बार काढला. त्या आवाजाबरोबर एका मगरीने धाड्शिरी पाण्यात उडी घेतली. मगर बघून बाकी सगळी मुले मागे पळाली, आणि फक्त ६ मुलांनी नदीत उड्या मारल्या. कांबळे नावाचा मुलगा पहिला, मी दुसरा आलो. बंदूक घेऊन पाण्यातल्या नावेत सर सावध होते त्यामुळे मगरीची मला भीती वाटली नाही.

आम्हाला सर्व शिक्षकांबद्दल आदर होता, त्यातल्या त्यात डी.एन.सरांबद्दल प्रेम होते. ते सांगतील ते आम्ही आदराने ऐकत असू. एके वर्षी 'आंबेडकर जयंतीची सुट्टी हवी' म्हणून आमच्या वर्गातील सर्व मुले वर्गातून बाहेर पडली. डी.एन.सर आमच्याकडे आले. म्हणाले, ''आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त तुम्ही त्यांच्यासारखे अभ्यास करून मोठे होणार; की सुट्टी घेऊन दंगा करीत बसणार? तुम्हीच ठरवा!'' आम्ही अभ्यास करण्याचे कबूल केले आणि निमूटपणे वर्गात जाऊन बसलो.

सर स्वत: बलभीम व्यायामशाळेत व्यायाम करीत. मी तिथेच व्यायाम करत असे. माझा व्यायाम बघून सरांनी 'काय खुराक खातोस' विचारले. मी सरांना स्पष्ट सांगितले, ''सर आम्ही मागून खाणारे, भाकरीशिवाय काय मिळणार?'' सरांनी साळुंखे वस्तादांच्या 'मध्यंतर' या हॉटेलात मला दुधाचा रतीब लावून दिला. त्याचे पैसे सर देत असत. त्याचबरोबर मला 'कोणताही वाईट नाद केलास तर माझ्याशी गाठ आहे हे लक्षात ठेव' असा दम दिला.

आमच्या शाळेत श्रमदानाला फार महत्त्व होते. शाळेच्या दुसऱ्या मजल्याचे काम चालू होते. सरानी आम्हाला 'श्रमदान करण्याची इच्छा ज्यांची आहे त्यांनी सकाळी लवकर शाळेत यावे' असा आवाहन केले. आम्ही अनेक मुले सिमेंट वाहणे, वाळू-विटा पोचविणे अशी कामे सकाळी करत असू. ११च्या सुमारास 'शाळा चालू होईल' म्हणून सर स्वत: येऊन आम्हाला वर्गावर जायला सांगत.

एके वर्षी कृष्णेच्या महापुराने औदुंबरच्या दत्तमंदिरात खूप गाळ साठला होता. सरांनी आम्हाला ते मंदिर स्वच्छ करण्याची विनंती केली; सांगली ते औदुंबर हा प्रवास बैलगाडीतून केला. आम्ही तिथे जाऊन मंदिर स्वच्छ केले. तिथे दोन दिवस राहिलो. गाणी म्हणत एकदिलाने काम करण्याचा अनुभव, शब्दांत वर्णन करता येणार नाही.

पुढच्या काळात डी.एन.,व्ही.एन. रोज फिरायला जात. दोघांना पाहून आम्हाला खूप अभिमान वाटत असे. वय झाले असले तरी ताठ मानेने त्यांची दमदार चाल तशीच होती. आम्ही रस्त्यात भेटलो तर, ''काय रे, व्यायाम करतोस ना?'' असे हमखास विचारीत. सरांच्या मार्गदर्शनामुळे व प्रोत्साहनामुळे अभ्यास आणि खेळात मी प्रगती केली. अनेक चांगल्या नोकऱ्या मला चालून आल्या, पण आईच्या आग्रहाखातर आणि तिच्या प्रेमापोटी सांगली सोडून जाता आले नाही. वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्यात नोकरी करून मी आज निवृत्त आहे. वय ऐंशी गाठत आले आहे, तब्येत उत्तम आहे, रोज पोहण्याचा व्यायाम चालू आहे. 'शिकलगार' या मागास समाजवर्गातील आम्हा मुलांना आपटे बंधूंसारखे शिक्षक मिळाले हे आमचे परमभाग्य!

*(लेखक : शाळेचा माजी विद्यार्थी, क्रियाशील कार्यकर्ता, सांगली साखर कारखान्यातून पर्यवेक्षक म्हणून निवृत्त)*

●●●

## योग्य शाळेची निवड

-विजयकुमार प्रथमशेट्टी

गणित सोडता इतर विषयांत चांगले मार्क घेऊन मी सातवी पास झालो. आता वेध लागले होते हायस्कूलमध्ये जाण्याचे. मी गणपतराव आरवाडे हायस्कूलला पसंती दिली. त्या शाळेचा लौकिक चांगला होता. दत्त आपटे आणि बी.जी.नाईक असे नावाजलेले शिक्षक त्या शाळेत होते.

५ सप्टेबर १९५२ रोजी मुरारजीभाई देसाई हे शाळेत स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. भारतातील नेत्यांपैकी पंडित जवाहरलालनंतरची महत्त्वाची व्यक्ती इतक्या नव्या शाळेत येते, ही गोष्ट सामान्य नव्हती. मी त्या समारंभाला हजर होतो. शाळेत स्नेहभोजनाचा कार्यक्रम होता. पाहुण्यांना थोडा उशीर झाला. मुलांच्या पंगती

जेवायला बसल्या, तेव्हा डी.एन.सरांनी मोरारजी देसाई यांना 'यू आर लेट' असे ऐकविले. ११वी ला असताना सरांनी सुट्टीत सलग एक महिना इंग्रजीचा तास घेऊन क्रमिक पुस्तक शिकविले. सरांची शिकविण्याची पद्धत इतकी उत्तम होती की, इंग्रजी विषयाची शिकवणी लावायची गरज पडली नाही, बऱ्याच मुलांना ते शक्यही नव्हते.

ऑउल्स ऑफ टू सिटीज् (बसरा आणि बगदाद या दोन शहरांतील परिस्थितीची चर्चा दोन घुबडे करत आहेत); मिसेस ॲडीस या कथेतील मुलाचा खुनी पोलीसांना गुंगारा देऊन तिच्याच घरी लपतो; केमाल पाशा या तुर्कस्थानच्या सुधारणावादी नेत्याने इस्लामी रीतीरिवाज, परंपरा बाजूस ठेवून आधुनिक शिक्षणाची कास धरली आणि जनतेच्या प्रगतीसाठी खिलाफत चळवळही गुंडाळली; फ्रेंच क्रांती आणि इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती यांमुळे जगावर झालेले परिणाम.... हे सगळे रंगतदार करून त्यानी शिकविले. एरवीच्या रटाळ विषयातसुद्धा आम्हाला गोडी निर्माण होई.

आमच्या शाळेच्या गणवेशात पांढरी गांधी टोपी बंधनकारक असे. हे बंधन विद्यार्थी आणि शिक्षक दोघांनाही असे. याची सुरुवात त्यावेळचे हेडमास्तर सहस्रबुद्धे यांनी केली. मुलांना आणि शिक्षकांना टोप्या घेण्यासाठी वेळ दिला. हा नियम लागू झाला त्या दिवशीची गोष्ट. सहस्रबुद्धे सर शाळेच्या प्रवेशद्वारात उभे होते. त्यांच्या शेजारी वष्ट सर टोप्यांचा खोका घेऊन उभे होते. ज्याच्याकडे टोपी नाही त्याला, कोणतेही कारण न विचारता, न रागावता - हातात एक टोपी दिली गेली. नियम करणे आणि तो प्रेमाने लागू करणे अशी पद्धत इतरत्र क्वचित पाहायला मिळेल. शाळेच्या स्नेहसंमेलनाला येणारे पाहुणे आठवले तर आश्‍चर्य वाटे. नगरपालिकेच्या नगरसेवकाने शाळेत यावे, तितक्या सहजतेने केंद्रीय मंत्री शाळेला भेट देत असत. आरवाडे हायस्कूलमधील ती वर्षे 'आयुष्यातील उत्तम काळ' म्हणून सांगता येतील.

आमच्या घराशेजारील दोन व्यक्तींचा वहिवाटीवरून थोडा वाद होता. रामभाऊ आरवाडे यांच्या मध्यस्थीने हा वाद मिटविण्याचे, आणि दत्त आपटे जो निर्णय देतील तो मान्य करण्याचे त्यांचे ठरले. रामभाऊ आरवाडे हे दत्त आपटे यांचे मित्र; त्यामुळे सर त्यांच्या मित्राची बाजू घेतील असा सर्वांचाच कयास होता. प्रत्यक्षात झाले वेगळेच. सरांनी सर्व बाजू ऐकून घेतली, आणि रामभाऊंची मागणी फेटाळून लावली. ही निष्पक्ष वृत्ती सहसा दिसणारच नाही.

*(लेखक : शाळेचा माजी विद्यार्थी, औषधी उत्पादक, संस्कृतप्रेमी, सामाजिक कार्यकर्ता)*

●●●

## माझ्या वडिलांचे बालमित्र - दत्तूकाका

-सौ.कोकिलाबेन शहा

''सोम्या!'' अशी जोरात हाक आली की आम्ही ओळखायचो, दत्तूकाका आले आहेत. मी काकांना - म्हणजे माझ्या वडिलांना, ''हे तुम्हाला एकेरीत बोलावणारे गृहस्थ कोण आहेत?'' असे विचारी. कारण माझे वडील सोमचंद हे सांगलीतील व्यापारी जगतात बडे प्रस्थ. त्यांच्याकडे येणारे लोक त्यांना 'शेठजी' म्हणत. ''हा दत्तू, माझा शाळासोबती'' -असे माझे बाबा सांगत. नंतर शाळेत माझे सर झाले, एरवी ते आमचे 'दत्तूकाका' होते.

मला एक प्रसंग दत्तूकाकांच्याच घरातून समजला. एके सकाळी माझे वडील त्यांच्या आलीशान कारमधून गावभागातील दत्तूकाकांच्या घरी आले. त्या घरात येण्यासाठी तीन पायऱ्या चढाव्या लागत. वजन आणि पायाच्या दुखापतीमुळे एरवी वडिलाना ते शक्य नव्हते. तरीही ड्रायव्हर आणि कठड्यांचा आधार घेत कसेबसे ते पायऱ्या चढले. तीनच पायऱ्या चढून घामाघूम झालेल्या शेठजींचे वाक्य असे होते, ''दत्तू, तुझ्या घराच्या पायऱ्या म्हणून चढून आलो बघ -नाहीतर ब्रह्मदेवालासुद्धा खाली यायला लावले असते.'' आमचा व्यापारउदीम ज्यांना

माहीत आहे त्यांना या म्हणण्याचा अर्थ लगेच कळेल.

माझे बाबा आणि त्यांची आई -म्हणजे माझी आजी - पूर्वी जुनी सांगली म्हणजे गावभागात राहात होते. माझ्या बाबांचे शिक्षण गावभागातील शाळा नं.२ मध्ये झाले. दत्तूकाका आणि माझे बाबा एकाच वर्गात होते. त्यावेळी माझे बाबा आणि माझी आजी रस्त्यावर बसून तवे, कढया वगैरे लोखंडी सामान विकत असत. चिकाटीने आणि धडाडीने पुढे आमचे कुटुंब सांगलीतील मोठे प्रस्थ बनले. व्यापार, प्रवासी वाहतूक, सिनेमा थिएटर असे अनेक उद्योग बाबा चालवीत.

बाबा इकडे व्यापार उद्योगांत उच्च स्थानावर आणि तिकडे दत्तूकाका शिक्षण, कामगार, सहकार अशा क्षेत्रांत उच्चस्थानी वावरत होते. असे असले तरी दत्तूकाकांची फेरी आमच्या घरी मात्र आपल्या मित्राला भेटण्यासाठी होत असे. 'महाराष्ट्र राज्य परिवहन' ही प्रवासी वाहतूक करणारी संस्था सरकारने चालू केली, तेव्हा आमचा प्रवासी वाहतूक व्यवसाय बंद करावा लागला. आमच्या प्रवासी बसेस व त्यांवरील कामगार या सगळ्यांवर बेकारीचे संकट आले. दत्तूकाकांनी मध्यस्थी करून आमच्या बसेस महामंडळासाठी विकत घ्यायला लावल्या, तसेच ड्रायव्हर, कंडक्टर यांना महामंडळाच्या सेवेत सामावून घ्यायला लावले.

माझे सातवीपर्यंत शिक्षण झाल्यावर बाबानी पुढे शिकण्यास मनाई केली, कारण मुलींची शाळा जवळ नव्हती; आणि मुलांच्या वर्गात मुली पाठवण्यास बाबा तयार नव्हते. ही मन:स्थिती जवळजवळ सर्वच व्यापारीवर्गात होती; मला शिकायचे होते आणि घरात तर विरोध होता. त्याच सुमारास दत्तूकाका आमच्या घरी आले आणि मी त्यांना माझी शिकण्याची इच्छा सांगितली. दत्तूकाकानी आपल्या मित्राची समजूत काढून माझा मॅट्रिकपर्यंत शिकण्याचा मार्ग प्रशस्त केला. दत्तूकाका बाबांना म्हणाले, ''तू का काळजी करतोस, मी आहे ना शाळेत!'' त्याच वर्षी त्यांच्या शाळेत आठवीची खास मुलींची तुकडी चालू केली होती. मी आठवी ते अकरावी गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये शिकले. माझ्या आणखी एका बहिणीला आधी बी.ए., नंतर एम.ए. करायचे होते. बाबांची संमती मिळवून देण्याचे काम पुन्हा दत्तूकाकांनी केले. थोडक्यात, आमच्या घरात शिक्षणाची गंगा आणण्यास दत्तूकाकाच कारणीभूत झाले.

आरवाडे हायस्कूलने समाजातील सर्वांना शिकविले. धनिकांची, शेतकऱ्यांची, नोकरदारांची आणि मोलमजुरी करणाऱ्यांची मुले शिकवली. शाळेला मोठी देणगी देणारे गणपतराव आरवाडे यांचा मुलगा, दत्तूकाका संस्थापक- त्यांची मुलगी पुष्पा, शिवाय व्यापारी पेढीच्या मालकांची मुले, पेढीवरील दिवाणजींची आणि पेढीवरच्या हमालांचीसुद्धा मुले माझ्याच वर्गात असत. त्यांना वागवण्यात कधी भेदभाव केला जात नसे, ही शिकवण दत्तूकाकांची. माझ्या वडिलांनी त्यांच्या आईच्या नावाने बांधून दिलेला 'समरत हॉल' आम्ही रोज पाहात असू तेव्हा अभिमानाने ऊर भरून येत असे. आजही 'समरत हॉल' अशी पाटी त्यावर आहे.

दत्तूकाकांची आणखी एक खासीयत म्हणजे ते सर्व लहानथोरांना त्यांच्या घरी जाऊन भेटत. माझे लग्न झाल्यावर मी किर्लोस्करवाडीत राहात होते, नंतर आम्ही सांगलीत आलो. माझ्या घरी आवर्जून येऊन ते भेटत. मित्राच्या मुलीला तिच्या सासरी जाऊन भेटणे हे फार विशेष होते. माझ्या आग्रहाखातर ते जेवायलासुद्धा थांबत. माझ्या नवऱ्याबरोबर दत्तूकाकांचे छान जमत असे. आमच्या घरातील सर्व समारंभांना दत्तूकाका आवर्जून उपस्थित असत. दत्तूकाकांची मुलगी पुष्पा माझ्या बरोबरीची, त्यामुळे दत्तूकाकांच्या घरी माझे जाणे होई. ब्राह्मण लोकांत असलेल्या सोवळ्या ओवळ्याची मला भीती असे. पण दत्तूकाकांकडे मात्र असले प्रकारच नसल्यामुळे आमचे स्वागत होई. सौ.उषामामीसुद्धा आम्हाला खूप अगत्याने वागवत.

आज माझी सत्तरी पार करते आहे. अनेक प्रकारची भली बुरी माणसे मला आजवर भेटली; मात्र दत्तूकाकांसारखा स्वभाव हुडकूनही कुठे सापडणार नाही.

*(लेखक : प्रतिष्ठित व्यापारी व दत्तूकाकांचा बालमित्र सोमचंद मानचंद यांची कन्या)*

●●●

## भारदस्त शिक्षक डी.एन.सर

-ना.का.साने

त्या अर्धशतकाच्या काळात गावभागातील एक भारदस्त व्यक्तिमत्व म्हणजे दत्तोपंत आपटे! माझे वडील का.द.साने त्यांचा तसाच उल्लेख करीत. विद्यार्थ्यांचे ते डी.एन.सर होते. त्यांनी आम्हाला इतिहास, इंग्रजी विषय शिकवले. त्यांनी खडू फळ्याचा वापर केलेला मी तरी बघितला नाही. इतिहास शिकवण्याची त्यांची खास पद्धत होती. विषय आणि तद्नुषंगाने येणारी सर्व माहिती विद्यार्थ्यांना सांगून त्याचा ऊहापोह करीत. दुसऱ्या तासाला तो भाग सलग लिहून देत. अन्य तुकड्यांस तो भाग लिहून देताना ते माझी वही मागून घेत; व त्यातील सर्व चुका त्यांच्या खास जांभळ्या शाईच्या पेनने दुरुस्त करून देत. आरवाडे हायस्कूलमध्ये मुलांना इतिहासाचे पुस्तक विकत घ्यावे लागत नसे. आपटे सरांच्या तासाची वही हेच पुस्तक व परीक्षेची तयारी असे.

दत्तोपंत आपटे आणि माझे वडील का.द.साने यांनी १९३४-३५ सालापासून ते उभयतांच्या सेवानिवृत्तीनंतरही काही वर्षे एकत्रित काम केले. हायस्कूलच्या उभारणीत दत्तोपंताना माझ्या वडिलांनी साथ दिली. त्या उभयतांच्या व्यक्तिमत्वात बाह्यात्कारी कमालीचा फरक होता, पण मनोमनी त्यांची खूपच जवळीक होती. १९७५च्या दरम्यान आम्ही आमच्या घरी साखरझोपेत असताना 'विठ्ठल' अशी मोठी हाक भल्या पहाटे ऐकू येई. दत्तोपंत, विठ्ठलराव जोगळेकर आणि मारुती कांबळे यांची प्रभातदौडीची ती वेळ असे.

बाणेदार, करारी, पैलवानी थाटाचे डी.एन.आपटे सर आजही सतत डोळ्यासमोर येतात.

*(लेखक : संस्थेचे संस्थापक सदस्य का.द.साने यांचे चिरंजीव, शाळेचे माजी विद्यार्थी)*

●●●

## सामाजिक न्यायनिष्ठा

-राजाराम नीळकंठ

मी सांगलीत शिक्षणासाठी माझ्या आजीकडे म्हणजे श्रीमती यमनाबाई गुरव हिच्याकडे आलो. माझे मूळ गाव कवठेमहांकाळ तालुक्यातील कोगनोळी. दुष्काळाने सर्वत्र हाहाकार माजला होता. त्यामानाने सांगलीत परिस्थिती चांगलीच! माझी आजी मला आरवाडे हायस्कूलमध्ये घेऊन गेली. प्रवेशास उशीर झाला होता, आणि आमची आर्थिक परिस्थिती महाबिकट. 'दत्त आपटे यांची शाळा' हा एकच आशेचा किरण आजीला दिसत होता. आजीच्या शब्दाखातर दत्त आपटे यांनी माझा प्रवेश निश्चित केला. मी आपटे कुटुंबासोबत जोडला गेलो, ते आजअखेर!

सांगलीत आमच्या कुटुंबाकडे कृष्णा नदीकाठी 'तपोवन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील काही देवळांचे गुरवपण होते. त्यात महादेव मंदिर आणि हनुमान मंदिर (तपोवनातील मारुती) अशी दोन मंदिरे महत्त्वाची होती. तपोवनातील मारुती तर समस्त गावभागवासियांचे दैवतच. वासुदेव गोसावी नावाचे एक गृहस्थ तपोवन परिसराचा विकास करू पाहात होते. माझ्या आजीशी त्यांचा परिचय झाला. त्यांनी माझ्या आजीचा विश्वास संपादन केला. वयामुळे माझ्या आजीलासुद्धा मंदिरांची देखभाल करणे शक्य होत नसे. वासुदेव गोसावी यांची मदत मिळते हे तिला हायसं करणारे होते. आजीचा विश्वास संपादित होताच त्यांनी एक दिवस दोन्ही मंदिरांवर पूजेचा हक्क सांगून, माझ्या आजीला तेथून हाकून लावले. गुरव कामातून मिळणारी मुळातच अत्यल्प मिळकतही अचानक

बंद झाली. या अन्यायाविरुद्ध लढण्याची तिची शारीरिक, आर्थिक वा मानसिक तयारी होती, पण कुणाची तरी समर्थ साथ हवी होती. तसे रोजच असंख्य मारुतीभक्त येत असत, पण संकटकाळी कोण मदतीला येईल? रोज संध्याकाळी तपोवनात दत्त आपटे येत असत. तिने आपली व्यथा दत्त आपटे यांच्यासमोर मांडली. दत्त आपटे यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. त्या काळात नावाजलेले वकील ल.गो.रेठरेकर यांनी आजीच्या वतीने वकीलपत्र घेतले, तेही दत्त आपटे यांच्यामुळे.

कोर्टात केस उभी राहिली. जो युक्तिवाद आजीच्या वकिलांनी केला तो फार महत्त्वाचा ठरला. 'भारतात जेवढी म्हणून शंकराची आणि मारुतीची मंदिरे आहेत, त्यांचे पुजारी म्हणून गुरव काम पाहतात. कोठेही हे काम ब्राह्मणाकडे नाही.' हा युक्तिवाद कोर्टाने मान्य करीत वासुदेव गोसावी यांना मंदिरांचा ताबा सोडायला लावला. आज आमचे गुरव बांधव हे गुरवपद आनंदाने सांभाळीत आहेत. 'मारुती पावतो' म्हणतात तो असा, दत्त आपटे यांच्या रूपाने! त्यांची सामाजिक न्यायाप्रति निष्ठा इथे दिसते; आणि त्याचे साक्षीदार आम्ही गुरव कुटुंबीय आहोत.

*(लेखक : शाळेचे माजी विद्यार्थी, 'शिवसदन' संस्थेत लेखाधिकारी)*

●●●

## देणाऱ्याने देत जावे

-नारायण केळकर

मी एका पायानी अपंग होतो. वडील फारसे काही काम करत नव्हते. आम्ही पाच भावंडे आणि आई-वडील असे कुटुंब, आमची आई इंदिराकाकू ही धुणी भांडी करून ते रेटत होती. दारिद्र्य पाचवीला पूजलेले. दोनवेळा जेवण मिळणे म्हणजे चैनच!

असे दिवस आले की, घरातील दाणागोटा पार संपला. ही वार्ता दत्तूकाकांपर्यंत पोचली. त्यावेळी आरवाडे हायस्कूलमध्ये 'युनो'च्या मदतीने सकस आहार योजनेअंतर्गत, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दूध आणि न्याहरी दिली जात असे. १९६५-६७ साली ही योजना सांगलीत तरी गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्येच होती. दत्तूकाका किती काय काय करीत होते हे आम्हाला बालवयात काय कळणार? त्या योजनेसाठी रवा, साखर, दुधाची पावडर आणि पामतेल 'युनो'कडून येत असे. रोज शेकडो मुले हा आहार घेत होती, मीसुद्धा त्यात होतो. पण आमचे बाकी कुटुंब मात्र उपाशी होते. त्या शिध्यातून दत्तूकाकानी आमच्या कुटुंबाला मदत करून उपासमारीतून वाचविले. नियमानुसार म्हटले तर असे पदार्थ बाहेर देणे योग्य नव्हते. पण आमचे दत्तूकाका नियम केव्हा आणि कसे वापरायचे हे पक्के जाणत असत. आज हे आठवताना डोळे भरून येतात.

दहावीला मी मिरजेच्या शासकीय अपंग शाळेत प्रवेश घेतला. नंतर अपंग मुलांसाठी एक वर्षाचा तांत्रिक कौशल्य कोर्स नागपूर येथे जाऊन केला, ट्रेड होता मोटर वाईंडींग. दरम्यान मी डॉ.पी.जी.आपटे यांच्याकडे कंपौंडर म्हणून काम करीत होतो. लायन्स क्लबने जयपूर फूट प्रायोजित केले होते, तिथे डॉ.आपटेनी माझे नाव दिले. त्यासाठी रक्त तपासणी करून घेण्यास सांगितले, त्यावेळी रक्तदानाचे महत्त्व कळले आणि मी भरपूर रक्तदान करायचे ठरवले. तिथपासूनच सुरुवात केली. वयाची ५८ वर्षे होईपर्यंत मी वर्षातून चारवेळा रक्तदान करीत आलो. तेव्हापासून माझी कुबडी जाऊन कृत्रिम पाय मिळाला. मी 'स्वत:च्या पायावर' उभारलो. आता चारचौघांसारखा चालू शकत होतो.

माझा कोर्स झाला, मात्र सांगली परिसरात नोकरी मिळत नव्हती. 'कुलकर्णी ब्लॅक ॲन्ड डेकर' कारखाना कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ औद्योगिक वसाहतीत होता. इथे माझा उपयोग होता. दत्तूकाकांची चिठ्ठी घेऊन खासदार

आबासाहेब खेबूडकर कुलकर्णींना भेटलो. सवयीने ''दत्तूकाकांनी आपल्याला भेटायला पाठविले आहे'' असे सांगून चिठ्ठी आबासाहेबांना दिली. मला पाहून आबासाहेब संभ्रमात पडले. दत्तोपंतांची चिठ्ठी म्हणजे माझे काम झालेच. नोकरी मिळाली. आईची धुणीभांडी सुटली. सांगलीहून शिरोळला रोज जाऊन येऊन करत मी २८ वर्षे नोकरी केली. या मिळकतीतून मी सतत 'देता हात' राखला.

''नारायण तू इतकी आर्थिक मदत कशी करू शकतोस, आणि का?'' असा प्रश्न मला कितीतरी लोक विचारतात. मला असा किती पगार असणार, त्यात विवाह झालेला होता, मात्र अपत्य नव्हते. राहायला दाटके तरी स्वत:चे घर होते.

आता तर मी एकटा आहे. माझा खर्च तसा अगदीच कमी. तेवढी गरज भागून जे राहते ते सारे मी देतो. मला गरिबीत अनेकजणांनी मदत केली. कुणी कपडे, कुणी पुस्तके, कुणी अन्नधान्य. त्याची परतफेड करणे माझे कर्तव्य आहे. विंदा करंदीकरांची प्रसिद्ध काव्यपंक्ती मी मनाशी जपून ठेवतो, 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे...' मी, माझी मिळकत, माझा खर्च असा हिशोब घालत बसलो तर जगात काहीच घडणार नाही. आमच्या दत्तूकाकांनी जर तसेच म्हटले असते, तर आम्ही उपाशीच राहिलो असतो!

*(लेखक : बालपणापासून दत्तूकाकांच्या सहवासातील शेजारी, प्रयत्नवादी दानशूर कार्यकर्ता)*

●●●

## कर्तृत्ववान व धीरोदत्त व्यक्तिमत्व

-बी.व्ही.कुलकर्णी

मी मूळचा कर्नाटक राज्यातील पट्टणकुडीचा. शिक्षणासाठी १९४० साली सांगलीत आलो. अनेक पदव्या संपादित केल्या. वाचनाचा आणि लेखनाचा व्यासंग जोपासला. ४ पुस्तके प्रकाशित झाली. १९६० साली आरवाडे हायस्कूलमध्ये नोकरीस लागलो. आमची शाळा हे आमचे स्फूर्तिस्थान होते. माझा व दत्तोपंत आपटे यांचा परीचय झाला, आणि तो योग त्यांच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत जुळला.

'एक जग' ही योजना दत्तोपंतांनी सरकारकडून स्वीकारली व त्या योजनेचा प्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी सोपविली. राष्ट्रीय अखंडता आणि 'सारे जग हे एक कुटुंब' अशी उदात्त कल्पना भित्तीपत्रांद्वारे मांडायची होती. आमच्या प्रकल्पास केंद्रशासनाचे रु.१० हजाराचे पारितोषिक मिळाले. आम्हा साऱ्या जणांचे प्रयत्न आणि मुख्य म्हणजे दत्तोपंतांची प्रेरणा हे या यशाचे गमक होते. सर्वांना नेतृत्व करण्याची संधी दत्तोपंत देत असत.

दत्तोपंतांचा आधार मोठा होता. दत्तोपंत करारी दृढनिश्चयी व सारासार विचार करून पाऊल टाकणारे असल्यामुळे शाळेकरिता काहीही करण्यास मोकळीक होती. वसंतदादा यांना भेटण्यास दत्तोपंत आम्हा सहकाऱ्यांना बरोबर नेत असत. मी संघाचा सक्रिय कार्यकर्ता. माझ्यासोबत आरवाडे हायस्कूलमध्ये बिंदुमाधव कुलकर्णी, भाऊसाहेब परांजपे, आणि वसंतराव पाटणकर हेही संघाचे होते. दत्तोपंत राष्ट्रीय काँग्रेसचे. आमचे तात्त्विक वाद होत असत, मात्र ते तेवढ्यापुरते. शाळेच्या कामावर त्याचा परिणाम होत नसे. आमची शाळा म्हणजे एक कुटुंब आणि दत्तोपंत हे कुटुंबप्रमुख. आणीबाणीच्या काळात संघावर बंदी आली. दत्तोपंतांनी 'माझ्या शाळेतील शिक्षक हे जरी संघाचे कार्यकर्ते असले तरी देशाच्या आंतरिक सुरक्षेसाठी धोका पोचेल असे कोणतेही कृत्य त्यांच्याकडून होणार नाही याची खात्री मी देतो' अशी भूमिका घेतली.

दत्तोपंत कठोर होते तसे खळखळून हसवणारे होते.

एक प्रसंग असा आला की, शाळेतील शिपायांचे कामाकडे दुर्लक्ष आहे अशी तक्रार त्यांच्या कानावर गेली. त्यांनी सर्व शिपायांना एकत्रित ऑफिसमध्ये बोलाविले व त्यांना खडसावून विचारले, काय रे, ''तुमच्च्यामध्ये हेडप्यून कोण आहे?'' क्षणभर शांतता पसरली. त्यांच्यामधील चोखोबा या शिपायाने उत्तर दिले, ''तुम्हीच की सर!'' या उत्तराने दत्तोपंतांसह सर्वजण खळखळून हास्यफवाऱ्यात रंगून गेले.

त्यांनी आपल्या शिक्षण संस्थेला आपल्यासोबत असणाऱ्या साथी सहकाऱ्यांसह मोठे केले. दत्तोपंतांचा सामाजिक दृष्टिकोण कधी ढळला नाही. नीतिमान, धीरोदात्त, कठोर व व्रतस्थ असा हा श्रेष्ठ पुरुष होता.

●●●

## एक अश्वत्थ वृक्ष

-बा.गो. नाईक

तीन तपाहून अधिक काळातील उन्हाळया-पावसाळ्यांत ज्यांचा स्नेह आणि जिव्हाळा थोडाही कमी झाला नाही, त्या दत्तोपंत आपटे यांच्याबद्दल लिहीत असताना स्वत:चा उल्लेख मला अजिबात टाळता येणार नाही. दत्तोपंत केवळ स्नेही नसून ते आमच्याच कुटुंबातील एक अधिकारी व्यक्ती आहेत ही अनुभवसिद्ध भावना असल्यामुळे माझ्या पूर्वायुष्यातील शेकडो स्मृती माझ्यापुढे उभ्या रहातात.

१९३६ साल, मुंबई विश्वविद्यालयामधून पदवी घेऊन नुकतेच बाहेर पडलेल्या आम्हा काही तरुणांच्या दृष्टीसमोर एक सुंदर स्वप्नसृष्टी उभी होती. पैसा अगर स्वास्थ याची कोणालाच पर्वा नव्हती. पारंपारिक विचार बदलून नवीन काहीतरी केले पाहिजे या ईर्ष्येनं आम्ही एक छोटीशी शाळा सुरू केली. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा स्वतंत्र आणि तेजस्वी कर्तृत्वाचं शिक्षण दिलं पाहिजे, ही एकमेव भावना त्या छोट्या प्रयत्नात होती. त्या शाळेतून मिळणाऱ्या मासिक रु. २ ते ४ वेतनावर उत्साहाने अक्षरश: रात्रंदिवस काम करणारी ही माणसे अस्तित्वात होती, ही गोष्ट आज कोणाला खरीही वाटणार नाही. पण ही वस्तुस्थिती होती. दत्तोपंतांचे सर्व आयुष्य या व अशाच ईर्ष्येने भारलेले आहे, त्याचमुळे ते आपल्या सर्व सहकाऱ्यांमध्ये स्फूर्ती निर्माण करू शकले. त्या काळात कौतुक आणि हेटाळणी या दोन्हींचाही पुरेपूर अनुभव आम्ही घेतला. हेटाळणीचे विष पचवूनही आज सांगलीतल्या हरभट रोडवर उभ्या असलेल्या 'जी.ए. हायस्कूल'च्या भव्य इमारतीसाठी सर्वांत अधिक परिश्रम कोणी घेतले असतील, तर ते एकट्या दत्तोपंतानीच! ही गोष्ट आम्ही कदापि विसरू शकणार नाही. खिशामध्ये एक पैसाही नसता इमारतीसाठी लाख-लाख रुपयांची आम्ही एस्टिमेट्स केली, बांधकामांची कंत्राटे दिली, आणि जादूच्या किमयेप्रमाणे खरोखरीच पैसे निर्माण झाले. शब्द खाली पडला नाही, प्रत्येक गोष्टीची पूर्तता होत गेली. हे कसे घडले याचे आकलन आजच्या लोकांना होणे अवघड आहे. दत्तोपंतांच्या खऱ्या व्यक्तिमत्वाची ज्यांना जवळून ओळख आहे, त्यांनाच हे समजणे शक्य आहे. एरवी लक्षावधी रुपयांची सरकारी आणि सावकारी अनुदाने मिळवून आजच्या काळात अनेक भव्य संस्था निर्माण झाल्या असतील! अक्षरश: शून्यामधून उभे केले गेलेले जी.ए. हायस्कूल हे दत्तोपंतांचे बोलके स्मारक आहे यात तिळमात्र शंका नाही.

पारंपरिक शिक्षणपद्धती सर्वथैव चुकीच्या पायावर आधारलेली असून तिच्यात आमूलाग्र बदल झाला पाहिजे हे मानणाऱ्या, निर्भयपणे मांडणाऱ्या आणि त्यानुसार प्रत्यक्ष कृती करणाऱ्या आम्हा आजीव सेवकांत श्री.दत्तोपंत अग्रेसर होते. या ठाम भूमिकेमुळे संस्थेने सरकारी अधिकाऱ्यांचा अनेक वेळा रोष ओढवून घेतला, पण मान

वाकविली नाही. १९५०च्या सुमारास खेर मंत्रिमंडळाने माध्यमिक शाळांतून इंग्रजी अजिबात बंद करण्याचा आदेश काढला. या हुकुमाच्या सक्तीच्या अंमलबजावणीला सुरुवातीला निर्धाराने कोणी विरोध केला असेल, तर तो याच संस्थेने. हा हुकूम किती हटवादी व हेकटपणाचा होता हे आज कळून चुकले आहे.

शाळांच्या बाबतीत सरकारी अधिकाऱ्यांची भूमिका मित्रत्वाची व सुधारणा करण्यास साहाय्यभूत असली पाहिजे ही भूमिका त्यावेळी दत्तोपंतांनी ठामपणे मांडलेली होती. त्यामुळे काही सरकारी अधिकाऱ्यांच्या एककल्ली व औद्धत्यपूर्ण वागणुकीस न्यायालयामधून सरळ करण्याचे एकमेव श्रेय कोणी मिळविले असेल तर दत्तोपंतांनीच होय! याबाबत दुसरे उदाहरण निदान माझ्या तरी आढळात नाही.

दत्तोपंतांचा उत्साह आजही एखाद्या तरुणाला लाजविणारा आहे. कष्टपीडित कामगारांची बाजू आजही ते धडाडीने लढवीत आहेत व त्याना बिनमोल साहाय्य देत आहेत. कामगारांच्या बाजूने काम करणे ही गोष्ट मुळीच फायद्याची नाही; याचा दीर्घकाल अनुभव घेतल्यानंतर मी स्वत: केवळ आर्थिक स्वास्थासाठी ही बाजू बदलली. पण महाकवी गटेच्या डॉ.फाऊस्टने ऐहिक सुखासाठी ज्याप्रमाणे आपला आत्मा सैतानाला विकून टाकला, त्याप्रमाणे आपल्या सुखासाठी आत्मा सैतानाला विकण्यास दत्तोपंत कधीही तयार होणार नाहीत, व झालेही नाहीत. बेकार कामगारांसाठी याच निष्ठेने त्यांनी सहकारी पद्धतीवर सिमेंट पाईप फॅक्टरी काढली. तेच बेकार श्रमजीवी कामगार आज त्या फॅक्टरीचे मालक झालेले आहेत, आणि अत्यंत आदर्श अशी ही एकमेव सहकारी संस्था या भागात अभिमानाने उभी आहे.

अन्यायाविरुद्ध झगडण्याची दत्तोपंतांची ईर्ष्या फार जुनी आहे. याच त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यामुळे कोणताही न्याय्य झगडा देण्यासाठी एक खंबीर आणि धडाडीचा सोबती म्हणून कोणीही त्यांच्या खांद्यावर निर्धास्तपणे मान टाकावी. स्वत: झीज सोसतील, पण स्वप्नातही दगा-फटका होणार नाही. माझ्या आयुष्यात वरिष्ठ व कडक समजल्या जाणाऱ्या काही सरकारी अधिकाऱ्यांना सरळ करण्याचे काही महत्वपूर्ण प्रसंग येऊन गेले. अनेकांनी त्यावेळी माझ्या यशाचे कौतुक केले पण आज मी जाहीरपणे सांगू शकेन की, त्यावेळी दत्तोपंतांचे बिनमोल साहाय्य मला लाभले नसते तर त्या अभूतपूर्व गोष्टी घडल्याही नसत्या.

खरा मित्र तोच की जो आपल्या मित्राचे दोष झाकून ठेवतो, व लहान गुणांची सर्वत्र प्रसिद्धी करतो. मी ज्या काही थोड्या बऱ्या गोष्टी करू शकलो त्याचे फार मोठे श्रेय कृतज्ञपणे दत्तोपंताना दिले पाहिजे. माझ्यात असणाऱ्या मोठ्या दोषांची मला जाणीव आहे. पण त्यांचा पुसटही उच्चार न करता त्यांनी अनेक वेळा मला अवास्तव मोठेपणा देऊ केला. त्याच शिदोरीवर आज माझा उत्साह आणि अल्प कर्तृत्व जिवंत आहे.

दत्तोपंतांचे माझ्यासारखे आणि माझ्याहून कितीतरी मोठे असंख्य कर्तृत्ववान मित्र आहेत. त्यांच्या भावना नि अनुभव माझ्यासारखेच असणार यात मला तरी तीळमात्र संशय नाही. अनेक संस्थांनी आणि कर्तृत्वाच्या अनेक पैलूंनी विस्तारलेला हा पुरुष अश्वत्थ वृक्षाप्रमाणे आहे. वयाने तो वृद्ध होत नसतो. त्याच्या कर्तृत्वाच्या अनेक शाखा अनेकांना स्फूर्ती आणि निवारा देत राहणार म्हणून दत्तोपंतांना मी खऱ्या अर्थाने अश्वत्थ वृक्षाची उपमा देतो.

*(लेखक : शाळेच्या प्रारंभकाळातील सहकारी शिक्षक-संचालक, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ, नगरपालिकेचे अध्यक्ष होते.दत्तोपंतांच्या एकसष्टीला हा लेख त्यांनी लिहिलेला होता.)*

●●●

## मी जो आहे, तो सरांच्यामुळे

-जी.डी.साळुंखे

आज माझे वय ८६. तो प्रसंग जसाच्या तसा माझ्या डोळ्यासमोर उभा राहातो. सांगली मार्केट कमिटी कामगार हौसिंग सोसायटीचे आम्ही काही पदाधिकारी, डी. एन. सरांबरोबर केंद्रीय रेल्वेमंत्री स. का. पाटील यांच्या खास आमंत्रणावरून त्यांच्या ऑफीसात जमलो होतो. मंत्र्यांच्या प्रशस्त टेबलावर रेल्वेलाईनचे नकाशे अंथरले होते. रेल्वेच्या मिरज विभागाच्या इंजिनीअरपासून दिल्लीच्या मुख्य इंजिनीअरपर्यंत सर्व अधिकारी भोवती बसलेले; आणि आमच्या वतीने डी. एन. सर! आमच्या हौसिंग सोसायटीच्या जागेवर मिरज ते पुणे रेल्वेसाठी जमिनीचे आरक्षण, असा विषय होता.

मी मूळचा कर्नाळचा डी. एन.सरांचा विद्यार्थी. प्रताप हायस्कूलमध्ये स्पेशल वर्गात दाखल झालो त्यावेळी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना 'स्पेशल' वर्गातून ८वी ९वी असे शिक्षण घ्यावे लागे. सर्वसामान्य आणि ग्रामीण भागातील मुलांना सांगली परिसरात शिक्षणाची दारे कोणी उघडली असतील, तर ती डी. एन. सरांनी! जात-पात-गुण-प्रतिष्ठा अशा कोणत्या अटी नव्हत्या. मी विद्यार्थी असल्यापासून सरांना सार्वजनिक कामात मदत करीत असे. शाळेला देणग्या गोळा करतानासुद्धा सरांबरोबर मी असे. संस्थेचे देणगीदार गणपतराव आरवाडे यांच्याकडे गेल्याचे मला आजही स्मरते. शिक्षण पूर्ण झाले तरी सरांशी अखेरपर्यंत माझा संबंध राहिला; अगदी ते दवाखान्यात असतानाही मी त्यांना भेटत होतो.

विषयाकडे जाण्यापूर्वी, या हौसिंग सोसायटीबद्दल थोडे सांगतो. रोज एक रुपाया रोजगाराने मी मार्केट कमिटीत माळी म्हणून नोकरीस लागलो. डी. एन. सरांनी स्वत: मला बरोबर घेऊन वसंतदादांच्याकडे नेले, आणि मला हे काम मिळवून दिले. मी सचोटीने आणि हुशारीने काम करीत याच संस्थेत वरच्या पदावर पोचलो. सरांच्या सहवासात सार्वजनिक कामाचा श्रीगणेशा गिरविला होता. त्यामुळे मार्केट कमिटीच्या आम्ही काही कामगारांनी मिळून आमची हौसिंग सोसायटी स्थापन केली. मार्केट कमिटीने त्यांच्या जागेपैकी काही जागा आमच्या सोसायटीला देऊ केली. मात्र सरकारी नियमानुसार अशी जागा कमिटी देऊ शकत नाही, म्हणून आमच्या घराचे स्वप्न तसेच राहाणार असे वाटू लागले.

-तर सोसायटीच्या जागेची समस्या आम्ही सरांच्याकडे घेऊन गेलो. सरांना कायद्याचे ज्ञान, सरकारी नियम, माहीत असत. शिवाय सरकार दरबारी वजन, आणि कामगारांविषयी कणव असे. यामुळे आमचा प्रश्न सर सोडवतील याची खात्री होती. वसंतदादांच्या मदतीने हा प्रश्न सोडवण्याचा यापूर्वी प्रयत्न झाला होता, पण तो यशस्वी होऊ शकला नव्हता. सरांनी आमची केस समजून घेतली, आणि उत्तम पद्धतीने प्रस्ताव मांडला. सरांच्याबरोबर मुख्यमंत्र्यांना भेटलो, महसूलमंत्री बाळासाहेब देसाईना भेटलो. त्यावेळी मुख्यमंत्र्यांचे स्वीय सचिव, पी.जी. चिन्मुळगुंद; ते सांगलीचे माजी जिल्हाधिकारी, सरांचे खास मित्र होते. त्यांच्यामार्फत ठराव करून तो सादर केला. 'स्पेशल केस' म्हणून खास ठराव करून आमच्या सोसायटीला जमीन मिळाली.

या आनंदात असतानाच, प्रयासाने मिळालेल्या त्या जागेवर आता रेल्वेने आरक्षण आणल्याचे कळले. पुन्हा सरांची मदत! रेल्वे मंत्रालयाशी पत्रव्यवहार चालू झाला. अर्थात सर आता आमच्या पाठीशी होते. मा. स.का. पाटलांना सरांनी आमचा मुद्दा पटवून दिला. ''एखादा भूखंड एकदा कायदेशीर प्रक्रियेतून कामगारांच्या हौसिंग सोसायटीला दिलेला असताना, तीच जागा रेल्वे अधिगृहित कशी करू शकते?'' आमची न्याय्य बाजू सरांनी मांडली. मंत्रीमहोदयांना ती पटली. स.का. पाटलांचे, ''यस, ऑल राईट. इट विल बी डन'' हे ठोस वाक्य मला अजूनही आठवते. तेव्हा सर लगेच म्हणाले, ''विल बी नको!'' आराखडा बदलण्याच्या सूचना तिथेच झाल्या, आणि मंत्रीमहोदयांनी, ''नवीन आराखड्याने समाधान झाले का ते मला सांगा,'' अशी विचारणा त्यांच्या दत्तोपंतास केली. आपल्या हौसिंग सोसायटीच्या कोनशिला समारंभाचे प्रमुख

पाहुणे म्हणून येण्याचे आमंत्रण आम्ही लगेचच दिले, आणि मा.स.का. पाटील यांच्या उपस्थितीत नंतर समारंभ पार पडला.

आम्ही होऊनच सरांना एक प्लॉट दिला. तो पुढे सरांनी काही कारणाने त्यांचा विद्यार्थी कोठारी यास विकला. या व्यवहाराला आमच्यातल्या काही लोकांनी विरोध केला, कारण कोठारी हा आम्हा कर्मचाऱ्यांतील नव्हता. सरांनी कोठारींना एकदा शब्द दिला होता, तो त्यांनी विरोधाला न जुमानता पाळला.

सांगलीच्या उद्योगक्षेत्रात एकमेव मोठा उद्योग म्हणजे आजचा वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना! सहकारी तत्वावर स्थापन झालेला हा जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना. अद्यापि तिथे कामगारांची संघटना नव्हती. मी आणि सरांनी कामगार युनियनची स्थापना केली. सर संस्थापक अध्यक्ष, आणि मी कार्यवाह होतो. सामोपचाराने आणि न्याय्य मार्गांनी आम्ही कामगारांचे प्रश्न सोडवीत असू. त्यामुळे संप, धरणे असे कामगार जगातले प्रसंग उद्‌भवले नाहीत. दादांच्या नेतृत्वाखाली संचालक-मंडळही कामगार-प्रश्नांना योग्य दाद देत असे. युनियनचे काम पुढे सुरळीत चालू झाल्यावर कारखान्यातील कामगारांकडे नेतृत्व सोपवून आम्ही बाजूला झालो. मार्केट कमिटीतील कामगारांची युनियनही सरांच्या पुढाकाराने स्थापन केली. याच कालात भूविकास बँक आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील कर्मचाऱ्यांच्या संघटनाही सरांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झाल्या. पुढे कोणत्याही अधिकार पदावर नसताना कामगार प्रश्नांवर सर आम्हा सर्वांना मार्गदर्शन करत असत.

सर राष्ट्रीय काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी केलेले काम अजोड आहे. सर शेवटपर्यंत एक सामाजिक कार्यकर्ता म्हणूनच पक्षात राहिले. केंद्रीय मंत्री नामदार के.के. शहा, नामदार मोरारजीभाई देसाई, रेल्वेमंत्री नामदार स.का.पाटील, जयप्रकाश नारायण यांसारख्या, केंद्रातील नेत्यांच्या सांगली भेटी केवळ सरांच्या शब्दाखातर झाल्या. यासाठी गणपतराव आरवाडे हायस्कूलचे कार्यक्रम हे मुख्य निमित्त असे.

माझ्या आठवणीप्रमाणे सरांनी नगरपालिकेची निवडणूक दोन वेळा काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर गावभाग वॉर्डातून लढवली. गावभाग हा त्यावेळच्या जनसंघाचा बालेकिल्ला, त्यामुळे दोन्ही निवडणुकीत सरांना पराभव पत्करावा लागला. जाळपोळीत गावभाग वाचविण्याचे कारण केवळ सर होते, हे या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्यासारखे आहे! 'वॉर्ड बदलून निवडणूक लढवावी' असे सरांना अनेक वेळा सुचविण्यात आले. तथापि असल्या पळवाटा मान्य करण्यातले माझे सर नव्हते! 'मी ज्या वॉर्डात राहतो तेथूनच निवडणूक लढवीन' या तत्वास ते शेवटपर्यंत चिकटून राहिले. आणीबाणीनंतर राजकीय गणिते झपाट्याने बदलत गेली. काँग्रेसमधील अनुभवी निष्ठावंत बाजूला फेकले गेले. पुढे जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाची स्थापना झाली. सांगलीत या पक्षाच्या प्रचाराचा नारळ सरांच्या हस्ते वाढविला गेला.

सांगलीच्या राजकीय पटलावर एक अद्‌भुत घटना म्हणूनच नोंद करायला हवी अशी आहे. मी त्या सर्व घटनेचा साक्षीदार आहे. सांगलीतून मा.वसंतदादा हे वादातीत व्यक्तिमत्व उदयास येत होते. काही कारणांनी नामदार यशवंतरावांशी त्या मंडळींनी वैर धरले होते. त्यात सीमावादाने भर घातली. याच सुमारास सरांनी शाळेच्या स्नेहसंमेलनास चव्हाणांना आमंत्रित केले. शाळेचे स्नेहसंमेलन हाणून पाडण्याचा विचार काही विरोधकांनी केला, परंतु सम्मेलन निर्विघ्न पार पडले. इतकेच नव्हे तर सरांच्या पुढाकाराने सांगलीच्या स्टेशन चौकात नामदार यशवंतराव चव्हाणांची त्याच दिवशी भव्य सभा झाली. नामदार यशवंतरावांचा त्यानंतरचा राजकीय प्रवास आपणासमोर आहेच.

माझी शाळा म्हणजे सतत नवनवीन उपक्रमांचे केंद्रच होते. संमेलने, श्रमदान शिबिरे, सफाई मोहीम, सांस्कृतिक कार्यक्रम तेथे चालत. माझ्या शाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे आमची स्नेहसंमेलने. नेमके साल आठवत नाही, पण मी त्या साली शाळेचा जनरल सेक्रेटरी होतो. स्नेहसंमेलनाच्या आयोजनात आम्हां मुलांचा मोठा सहभाग असे. अशा कामांत सर आम्हाला प्रोत्साहन देत. आम्ही शाळेत

हस्तलिखित मासिक काढीत असू. मी स्वत: कधी लिखाण केले नाही, पण प्रकाशनात माझा सहभाग असे. त्याचा उपयोग पुढील आयुष्यात निश्चितच झाला.

आमच्या शाळेत खेळाला फार महत्व होते. हुतुतू (आजचे कबड्डी), खोखो, कुस्ती, मल्लखांब असे खेळ असत. राष्ट्रीय स्तरावर चमकलेले राम नलवडे आमच्या शाळेचेच. रघुनाथ पाटील हाही एक उत्तम कुस्तीगीर होता. आखाड्यात उतरून त्याच्याबरोबर सर कुस्ती खेळत. याखेरीज पुरात पोहणे वगैरे स्पर्धा चालत. आमच्या शाळेतील मुलींच्या संघांनी अलीकडेच राष्ट्रीय स्तरावर मोठ्ठे यश मिळविल्याचे मी ऐकले; इतकेच नव्हे तर तीन विद्यार्थिनींना मानाचा 'छत्रपती पुरस्कार' मिळाल्याचे समजले. यावरून एक गंमतीदार गोष्ट आठवली. राम नलवडे हा कुस्तीगीर खूप लाजरा होता. वर्गात मुली आल्या की तो चक्क डोळे झाकून घेई, किंवा उठून सरळ वर्गाबाहेर जाई. यावरून आम्ही मुले रामची खूप चेष्टा करीत असू.

डी.एन आणि व्ही.एन. आपटे, एस.पी गोखले, ज.पु. जोशी, सोमण असे एकापेक्षा एक भारी शिक्षक आम्हाला शिकवत. डी.एन सर इतिहास शिकवत. सरांचे हातात पुस्तक कधीच नसे. इतिहासातील घटना ते साभिनय शिकवीत. त्यामुळे वर्गात गाढ शांतता असे. 'झाशीची राणी लक्ष्मीबाई' हे प्रकरण शिकविताना युद्धाचा तो प्रसंग आमच्यासमोर जिवंत केला होता; या वयातही तो माझ्यासमोर जसाच्या तसा उभा राहतो, आणि आजही गहिवरून येते, रोमांच येतात. शाळेत मी नाटक वगैरे केले नाही, मात्र मार्केट-कमिटीत आम्ही कामगारांनी एक नाट्यसंस्था स्थापन केली. या संस्थेने 'काचेचे घर', 'बेबंदशाही' अशी नाटके सादर केली. माझ्या शाळेला आर्थिक मदत व्हावी असे वाटून आम्ही शाळेच्या इमारत फंडासाठी 'एखाद्याचे नशीब' या नाटकाचा एक खेळ केला. सरांनी आम्हाला खूप मदत केली. सारा खर्च वजा जाता आम्ही शाळेला आठ दहा हजाराची मदत मिळवून दिली. माझ्या शाळेने आम्हाला घडविण्यात केलेल्या उपकाराची थोडीतरी फेड करून उतराई होऊ शकल्याचे तेव्हा समाधान झाले.

*(लेखक : शाळेचे विद्यार्थी, ते कामगार संघटनेचे कार्यवाह होते.)*

●●●

## दत्तूकाका आणि उषामामी

-चंपाताई उर्फ विजया कुलकर्णी

थोर क्रांतिकारक अनंत हरी क्षीरसागर, राम आणि जगन्नाथ हे माझे तीनही भाऊ स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. वडील खादीचे प्रचारक, ते सूत कातायचे, कापड विणायचे, लहान वस्तू बनवून गावोगावी विकायचे. आमची आई रोज रडत असे, ''इतकी मुले, पण एकही जवळ नाही!'' तिघे भाऊ भूमीगत. 'अनंताला पकडून देणाऱ्यास १६ हजाराचे बक्षीस'-अशी दवंडी गावात व्हायची. आईचे काळीज तीळ तीळ तुटायचे. पोलीस यायचे, घराची झडती घ्यायचे. त्यांना माझा भाऊ अनंताचा फोटो हवा असे. बाबाराव सावरकरांच्या सूचनेवरून अनंताने १५ ऑगस्ट १९४७पर्यंत स्वत:चा फोटो काढून घेतला नव्हता, ना ते कोणत्याही फोटोत दिसले. या भाऊने आम्हाला नंतर, तो ज्या विहिरीत लपत होता ती जागा दाखविली. विहिरीच्या भिंतीत एक कोनाडा खोदला होता. त्याची वाट विहिरीच्याच घडीव दगडांनी बंद करण्याची खास सोय केलेली होती. घराची झडती चालू असताना अनेक वेळा स्वत: भाऊच पोलिसांना बाकीच्या सगळ्या जागा दाखवीत. भाऊचा फोटो पोलिसांजवळ नसल्याने, अनंत हरी क्षीरसागर -म्हणजे भाऊ - ही व्यक्ती नेमकी कोण कशी हे त्यांना माहीत नव्हते. मी सर्वांत धाकटी. माझे शिक्षण चौथीपर्यंत कऱ्हाडजवळच्या शामगावात झाले. भाऊला चंपाने - म्हणजे मी - पुढे शिकावे असे

वाटे. त्याचाच पत्ता नसे, तेव्हा हे कसे घडावे?

मला पुढे शिकवावे तर शामगावात सोय नाही. मुलीच्या जातीला शहरगावात पाठवायचे तर जवळच्या नात्यातले कोणीतरी हवे. रक्तातल्या नात्यातले नसले तरी, त्याहीपेक्षा जवळच्या नात्यातले दत्तूकाका आणि उषामामी सांगलीत होत्या. दत्तूकाकानी तर शाळाही काढली होती. एक दिवस माझी रवानगी सांगलीला झाली. मी पी.एम.हायस्कूलमध्ये पाचवीत प्रवेश घेतला. आपट्यांच्या घरात मी केव्हाच मिसळून गेले. माझ्यासोबत दत्तूकाकांच्या विधवा बहिणीच्या तीन मुली- शांता, सिंधू आणि विमल होत्या. मी त्यांच्याबरोबरीने शाळेत जात असे. शाळा कसली, गायीगुरांचा गोठा तो. त्यातील एका बोळात नदीकडे तोंड करून आमची शाळा. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विनूकाका होते इतके आठवते.

दत्तूकाकांच्या पत्नी - त्यांना सर्वजण उषामामी म्हणत. त्यांनी माझी जबाबदारी स्वीकारली. वेणीफणी, कपडे, दप्तर अशा सर्व गोष्टी त्या अगत्याने आणि नीटनेटके करत. माझे जेवणखाण, शाळेत जाताना डबा त्याच करीत. दत्तूकाका सतत बाहेर असत. उषामामीना त्यावेळी अजून मूलबाळ नव्हते. पूजा करणे, व तसलीच लहानसहान कामे करून मी त्यांना मदत करीत असे. शाळेत मला गोडी वाटू लागली. या शाळेत पाचवीपासून इंग्रजी होते. उषामामी मॅट्रिक पास होत्या, त्या अभ्यासात मदत करीत. सांगलीतील माझे वास्तव्य केवळ उषामामींच्या जिवावर होते. उषामामी आणि दत्तूकाका माझे तसे कोण होते? माझ्या भावाचे मित्र; तो भाऊ तर, मला कळते तेव्हापासून भूमीगत!

आपटे कुटुंबात येऊन फारतर तीन महिने झाले असतील. पण मी घरचीच होऊन गेले होते. तिथे सगळ्यांना सारखी वागणूक; डावे-उजवे कधीही नाही. इकडे माझ्या आईने मात्र माझा, मी सांगलीत आल्यापासून धोसरा काढला होता. 'तिला शामगावला परत पाठवा' असे तिचे निरोप येत होतेच. तिला सहा मुले; तीन मुलगे भूमीगत, दोन मुली लग्न होऊन गेलेल्या, राहिली ती मी -चंपा; तिलासुद्धा दूर नेले. ती रोज शोक करू लागली. अखेर माझा सांगलीचा आपट्यांच्या घरातील शेर संपला. आज त्या गोष्टीला सत्तर वर्षांपेक्षा जास्त काळ होऊन गेला. ८३ वर्षांची मी आज अशी अंथरुणावर! दत्तूकाकांच्या आठवणींच्या लाटा एकमेकींत मिसळून जातात.

अनंताचा पुतण्या बंडा -म्हणजे माझा भाचा, त्याच्याकरवी दत्तूकाकांच्या ऋणानुबंधाचा धागा आज पुन्हा माझ्यापर्यंत आला. माझे वय झालेले, प्रकृती क्षीण आहे. ऐकायला येत नाही, तरीही माझी मुलगी माझ्याजवळ आली आणि तिने हा विषय सांगायचा प्रयत्न केला. 'दत्तूकाका - सांगलीची शाळा...' असे काहीतरी विचारून ती माझ्या स्मृतींना साद घालत होती. मला कळत होतं, पण डोक्यात सगळी सरमिसळ झाली होती. स्वैपाकघरात जिरे-कारळ्याचा मिसळण्याचा डबा असतो, तो हातून पडला की सारे जिन्नस वेगळे करता न येण्याइतके मिसळतात; तसे माझ्या अंधूक डोळ्यापुढे होते. माझ्या लेकीने विचारले, ''उषामामी आठवतात का?'' -आणि मला ते दिवस स्पष्ट दिसू लागले. माझ्या आठवणींशी साचलेला पाचोळा दूर झाला आणि प्रवाह झुळझुळू लागला.

मी प्रयत्नपूर्वक बोलू लागले. माझे बोबडे बोल समोरच्यांना कळत असावेत. दत्तूकाका-उषामामी, विनूकाका-शारदामामी, शिवाय अंबूआत्या, तिच्या मुली या साऱ्यांची आठवण मी काढत होते. मी सत्तर वर्षांपूर्वीच्या जगात पोचले होते. सांगलीच्या घराची चौकशी करत होते. ती सगळी माझी माणसं 'ठीक आहेत' असं मला सभोवतीचे समजावत असावेत. त्या बिचाऱ्यांना अलीकडची पाच पंचवीस वर्षे ठाऊक. ते धगधगते दिवस शांत झाले, आता दूरवरून ते रम्य भासतात. ते पाहात, आठवत त्यांच्यात एकाकी रमून जावं असं स्वत:शी म्हणते. पुढच्यांना वाटणार, ''म्हातारी त्या गुंगीत गेली.'' मला त्यातून बाहेर यावं, असं नाही वाटत!

*(लेखक : दत्तोपंताच्या जहाल क्रांतिकारक बंधुतुल्य मित्राची -मुनींची धाकटी बहीण)*

●●●

# बेदरकार देशभक्तांची टोळी

-विनायक क्षीरसागर

सकाळपासून अन्तूकाका हमसून हमसून रडत होते. त्यांनी अन्नाला पाण्याला हातही लावला नव्हता. सांगलीहून दु:खद बातमी आली होती. त्यांचे बालमित्र, शाळासोबती आणि स्वातंत्र्यलढ्यातील सहकारी दत्तू(दत्त आपटे)च्या निधनाची बातमी होती. दु:खावेगाने इतके उमळून यावे असे, सांगलीचे आपटे कुटुंब आणि आम्ही क्षीरसागर हे नाते कसे, कोणत्या शब्दांत सांगावे हे कोडेच आहे.

मे महिन्याची सुट्टी जवळ आली की दत्तूकाकांचे माझ्या वडिलांना पत्र येत असे, त्याचा मजकूरही वेगळ्या धाटणीचा असे, जणू फोनवर बोलत आहोत असा. 'जग्या, अंत्याला, राम्याला आणि गोप्याला पत्र टाकले आहे. मे महिन्यात तुम्ही सहकुटुंब सांगलीस चार दिवस सुट्टीला यायचे आहे.' झाले! आम्ही क्षीरसागर, कुलकर्णी मिळून सतरा-अठराजण सांगलीस दत्तूकाकांच्या घरी जमत असू. दत्तूकाकांचा उत्साह काही विचारायला नको. पेट्यांनी हापूस आंबे ते आणत, स्वत: रस काढत. आग्रहानं सर्वांना वाढत. चार दिवस कसे जात कळत नसे. सकाळी भाकरी घेऊन दत्तूकाका आणि आम्ही मुले नदीवर जात असू. तिथे ते आमच्यासोबत पाण्यात धुडगूस घालत पोहायला शिकवत. मग बंदूक घेऊन आम्ही शिकारीला फिरत असू. एखादे चित्तर, लावरी मिळे. ती त्यांच्या शाळेतील शिपाई मारुती कांबळे घेऊन जात असे. हा शिपाई जन्माने महार, मात्र तो सावलीसारखा दत्तूकाकांच्या सोबत असे. दत्तू, मुनी, गोप्या, जग्या असे चार मित्र कृष्णेच्या वाळवंटात त्यांच्या आठवणीत रमत. ते दिवस कसे संपायचे, त्याचा पत्ता लागत नसे. एक दिवस नाराजीने सांगली सोडावी लागे.

आता हे सारे आठवतच समाधान मानायचे! अंत्या, राम्या, गोप्या ही मंडळी कोण होती?

अनंत हरी क्षीरसागर हे माझे काका. त्यांना आम्ही अंतूकाका म्हणत असू; त्यांच्या मित्रमंडळीत ते मुनी या टोपणनावाने ओळखले जात. एम एम २(मुनी महाराज) असे त्यांचे चळवळीतील सांकेतिक नाव (कोड नेम) होते. एम एम १ म्हणजे शहीद राजगुरू. मुनी हे मूळचे सातारा जिल्ह्यातील शामगावचे. मसूरच्या आश्रमशाळेतून सातवी होऊन पुढील शिक्षणासाठी ते १९२६च्या सुमारास सांगलीला आले. ब्राह्मण मुलांच्या अनाथाश्रमात त्यांच्या राहण्याची सोय झाली, सांगली हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यांच्या वर्गात धष्टपुष्ट शरीरयष्टीचा लाल गोरा एक तगडा मुलगा सर्व विद्यार्थ्यांचे आकर्षण होता. भगतसिंगसारखे कोपरापर्यंत हातोपे दुमडलेला पांढरा शर्ट, तरतरीत चेहरा, आत्मविश्वासाने भरलेले बोलणे, हे सगळे कुणावरही सहज छाप पडावी असेच होते. तो उमलता तरुण म्हणजे दत्त आपटे. साहजिकच मुनी त्या गटातील मुलांच्यात सामील झाला.

अन्तूकाकांचे वडील हरिपंत कुलकर्णी हे स्वदेशीच्या चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते. स्वदेशी वस्तू बनवून, पायी फिरून ते विक्री करीत असत. त्यासाठी हे गृहस्थ कराड ते अकोलापर्यंत पायी प्रवास करीत असत. त्यांचे बोलणे स्वातंत्र्यचळवळीत भाग घेण्यास मुनीसाठी प्रेरक ठरले. ते म्हणत, ''अरे अनंता, स्वराज्य म्हणजे सुसरीने गिळलेले माणिक आहे. ते परत मिळवायला हिमतीने खटपट केली पाहिजे. या बाबतीत समाधानाने मरण येईल इतके काम आपण केले पाहिजे.'' मुनींचा जीवनपट म्हणजे, तशी हिंमत धरून केलेली सततची खटपट! वडिलांचे स्वप्न त्यांनी सत्यात उतरविले!

दत्तू आपटेनं मुनीला आपल्या घरी नेले, आपल्या आईची ओळख करून दिली, आणि सांगितले, 'हा आश्रमात राहतो, माधुकरी मागून जेवतो.' पुढे एकदा प्रसंग असा घडला की, आश्रमात मुंग्या जाळल्या एवढ्या खोडीवरून मुनी आणि त्याच्या भावाला आश्रमातून काढून टाकले. या निराधार मित्रांना दत्तू आपल्या घरी घेऊन आला. दत्तूच्या आईने त्यांना आश्रय देण्याचे मान्य केले; मात्र त्यांनी त्यांच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था माधुकरी मागून करावी असे सुचविले. मुले दत्तूच्या घरी सोप्यावर राहू

लागली आणि माधुकरी मागून जेवू लागली. एक दिवस दत्तूची आई -अक्का म्हणाली, ''हे बघ, तुझ्या माधुकरीमधील दोन घास माझ्या दत्तूलाही देत जा; माधुकरीतले अन्न पवित्र असते -त्याने चांगली बुद्धी येते.'' मुनी आपल्या माधुकरीतील दोन घास दत्तूला देऊ लागला. अशी ही मैत्री माधुकरीच्या घासातून सुरू झाली, ती या दोघांच्या हयातभर टिकली, त्याचे रेशीमधागे पुढील पिढीतही टिकून आहेत.

गो.द.(गोप्या) कुलकर्णी -उर्फ सांगलीचा नकली चंद्रशेखर आझाद. र.ग.क्षीरसागर(कुसगावकर) हे पुढे संघटनेसाठी पंजाबात गेले. तिथे अमृतसर गांधर्व महाविद्यालयाचे ते संस्थापक. दत्ता भिलवडीकर, वा.वि.पेंडसे, याळगी, दातार, दामले, बोडस आणि दत्त आपटे असा कंपू होता. तो काळ सायमन कमिशनच्या बहिष्कार आंदोलनाचा होता. उत्साहाने भरलेल्या या मुलांना, काय करू काय नको असे झाले होते!

सावरकरांचा उभयनिष्ठ चळवळीचा सल्ला मानून ही मंडळी काम करीत होती. तो सल्ला असा होता, 'गुप्त चळवळीत काम करणाऱ्यांनी उघड आंदोलनात भाग घेऊ नये, उलटपक्षी त्याची टवाळी करावी. म्हणजे त्यांच्याबद्दल कुणाला संशय येणार नाही. आपला फोटो कोठेही काढला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.' त्याप्रमाणे मुनींनी स्वत:चा पहिला फोटो स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काढला. त्या काळच्या पोलिसांना हा 'मुनी' कोण हे शेवटपर्यंत कळले नाही. कंपूतील ही मंडळी बाबाराव सावरकरांच्या सहवासात, इतिहास अभ्यासत असत. मूळची धाडसी वृत्ती वाढण्यासाठी पायी प्रवास, व्यायाम, कुस्ती, कृष्णेच्या महापुरात रात्री अपरात्री पोहणे, नाव वल्हवत मैलोन्‌मैल जाणे असे उद्योग सांगलीच्या बलभीम व्यायामशाळेच्या माध्यमातून चालत.

दत्तूकाकांच्या कंपूतले इरसाल पात्र म्हणून ज्यांची ओळख साऱ्यांना होती तो राम हा, अनंत उर्फ मुनींचा सख्खा धाकटा भाऊ. मुनी एक दिवस त्याला सांगलीत घेऊन आले आणि तो या कंपूत सामील झाला. रामपाठोपाठ भास्कर, जगन्नाथ ही भावंडे सांगलीत आली, आणि दत्त आपटे यांच्या घरीच राहिली.

या विधायक 'उपद्‌व्यापी' मंडळींच्या सर्व कारनाम्यात रामचा सक्रीय सहभाग असे. बॉंब बनविणे, हत्यारे तस्करी करून आणणे, हे काम तर होतेच, पण चळवळीसाठी उदारहस्ते कोणी पैसे देत नसत म्हणून मग लागणारा पैसा चोऱ्या-दरोडे यांतूनही उभा करणे, हे तर राम लीलया करीत असे. सांगलीतील एका व्यापाऱ्याकडे राम काम करीत असता, त्याने तिथेच असा डल्ला मारला होता. एका लग्नाच्या गर्दीत दागिन्यांची ट्रंक त्यांनी, हुबेहूब तसलीच ट्रंक बदलून लंपास केली होती. राजापूरच्या मंदिरातील देवीच्या दागिन्यांची चोरी खूप गाजली. त्या चोरीचा वहीम रामवर होता, आणि तसे वॉरंटसुद्धा होते. भारत स्वतंत्र झाला तरी ते वॉरंट चालू होते. दत्त आपटे यांनी मध्यस्थी करून रामला एकदा पोलिसांत हजर करून ते शेवटी रहित करून घेतले. या कामी मोरारजीभाई देसाई यांचीही मोठी मदत झाली.

पेंढे मास्तर हे नाव धारण करून गोव्यात 'आत्मोध्दार विद्यालय' राम चालवीत असत. विद्यालयाचे काम काय;- तर क्रांतिकारकांना चोरट्या मार्गाने शस्त्रास्त्रे पाठविणे. गोवा पोर्तुगीजांच्याकडे असल्याने त्यांचे हे 'विद्यालय' जोरात काम करीत होते.

सावरकर अंदमानाहून सुटल्यानंतर, एकदा गोवा भेटीवर होते. राम त्यांना भेटायला गेले. आदरपूर्वक नमस्कार करून ''आम्ही तुमचा आदर्श ठेवून काम करीत आहोत.'' असे त्यांनी सांगितले. त्यावर सावरकर म्हणाले, ''सशस्त्र क्रांती हा पोरासोरांचा खेळ नाही, ते सावरकर बंधूच करू जाणोत'' यावर रामनी, आपल्या गळ्यातली झोळी त्यांच्यासमोर टाकली. त्यात दोन रिव्हॉल्वर आणि जिवंत काडतुसे होती. सावरकर या प्रकाराने सटपटले, राम त्यांना म्हणाला, ''किमान आमचा उपमर्द तरी करू नये.'' असा सडेतोड होता राम!

नाझी अधिकारी कॅप्टन व्हॉज याच्यामार्फत शस्त्रास्त्राने भरलेले एक जहाज भारतीय क्रांतिकारकांना मिळवून देण्याची योजना रामने आखली होती. त्याची किंमत दोन कोटि रुपये सोन्याच्या रूपात द्यायची होती. 'एक कोट घालायची ऐपत नाही आणि दोन कोटीचे सोने मागतो

आहे' अशी संभावना त्या वेळच्या धनिकांनी केली.

अहमदाबादच्या कॅलीको मिलचे व्यवस्थापक श्री.खेर हे दत्त आपटे यांच्या परिचयातील होते. त्यानी रामची शिफारस करून रामला नोकरी लावून दिली. तिथेही त्यांनी मजूर संघटना बांधली. ते नगरसेवक म्हणून निवडून आले. राम आणि यशवंतराव चव्हाण यांचा फार घनिष्ट परिचय होता. यशवंतराव चव्हाण अर्थमंत्री असताना तेथील व्यापाऱ्यांनी चव्हाणसाहेबांची फक्त भेट घडवून आणण्यासाठी रामला लाखो रुपये देऊ केले होते. खरे तर ते मिलमध्ये केवळ एक मजूर होते. पण रामनी असले काम कधीच केले नाही. अखेरपर्यंत हे रामकाका अहमदाबादमध्ये राहिले. त्यांनी तर स्वातंत्र्यसैनिकासाठीची सरकारी पेन्शनसुद्धा नाकारली.

या चौकडीतले नकली चंद्रशेखर आझाद म्हणजे गोपाळ द. कुलकर्णी. ते मूळचे कराड तालुक्यातील तळबीडचे. हे शालेय जीवनापासूनच या कंपूत होते. गोपाळ जेवढे उंच, तेवढेच रुंद होते. कमावलेले शरीर आणि रेड्याची ताकद असे त्यांचे वर्णन करता येईल. मालवाहतूक करण्याचा त्यांचा व्यवसाय होता. ट्रकचे चाक पंक्चर झाले तर ते काढण्यासाठी खाली जाऊन खांद्यानी तो ट्रक उचलत असत, असे सांगतात. रेल्वेत बाकावर जागा अडवून अडेलपणी झोपलेल्या एका पठाणाला त्यांनी उचलून आपटल्याचा किस्साही सर्वश्रुत होता. खाणेही असेच अचाट.

कंपूच्या सर्व उपद्व्यापात ते सामील असत. बॉंब दारूगोळा बनविण्यासाठी लागणारी रसायने वगैरे सामान ते आपल्या ट्रकमध्ये इतर सामानातून लपवून आणत असत. लॉर्ड आयर्विन सांगली भेटीवर असताना त्याचा खून करण्याची जबाबदारी गोपाळवर सोपविली होती. हा कट मात्र फसला, तरीही तो उघड झाला नाही; सर्वजण वाचले. काही कारणांनी त्यांचा व्यवसाय बुडाला. पुढे त्यांना हृदयविकाराचा तथाकथित त्रास सुरू झाला. 'तथाकथित' म्हणायचे कारण ते तपासणी करून घ्यायला कराडहून सायकलने मिरज मिशन हॉस्पिटलला जात असत. अर्थातच वाटेत दत्त आपटेकडे सांगलीत मुक्काम पडत असे.

जगन्नाथ क्षीरसागर म्हणजे अनंत क्षीरसागर यांचे सर्वात धाकटे बंधू आणि माझे वडील. टोळीतल्या या 'जग्या'ने अकोल्यात महिलांवर झालेल्या लाठीहल्ल्यात अनंत या आपल्या मोठ्या भावाला मार पडू नये म्हणून त्यांच्या अंगावर लोळण घेऊन काठीचे तडाखे आपल्या अंगावर झेलले, त्याच क्षणी त्यांनी चळवळीत पडण्याचा निश्चय केला. मात्र अकोला नगरपालिकेतील ज्येष्ठ अभियंता पोंक्षे यांनी त्यांचे मन वळविले. त्यांनी युक्तिवाद असा केला, ''आज तुम्ही तिघेही भाऊ चळवळीत आहात. कोणाचेही शिक्षण पूर्ण झालेले नाही. शेती-गाव केव्हाच सुटले आहे. उद्या स्वातंत्र्य मिळाले तर अशा परिस्थितीत कोण तुम्हाला जेवू घालणार?'' तो सल्ला मानून जगन्नाथने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि पू.बाळूकाका कानिटकरांच्या ग्रामोद्धाराच्या कामात सामील झाले. पुढे त्यांनी आपल्या गावी म्हणजे शामगावला दवाखाना काढला आणि अखेरपर्यंत रुग्णसेवा केली.

अशी ही मंडळी होती. त्यांचे या देशावर अनंत उपकार आहेत. दत्तूकाकांवरील ग्रंथाच्या या निमित्ताने हे लोकांसमोर येत आहे, याची धन्यता वाटते.

*(लेखक : दत्त आपटे यांचे बंधुतुल्य क्रांतिकारक मित्र अनंत क्षीरसागर(मुनी) यांचे पुतणे, टोपण नाव 'बंडा')*

●●●

# आत्मविश्वास जागवणारे आपटे सर

-टी.डी.लाड

आमचे शैक्षणिक संकुल आता कुपवाडजवळ प्रशस्त जागेत विस्तारले आहे. तिथे येणाऱ्या नव्या माणसाला या संस्थेचा 'स्वभाव' प्रवेशद्वारातच कळेल. डी एन सरांनी आपले कार्य जुन्याशा छपराखाली सुरू करून ते पुढे विस्तारले; माझ्या बाबतीत तसेच घडले. आज मी आमच्या शाळेच्या दाराशी विजार-टोपी या 'शिक्षकी अवतारा'त उभारतो तेव्हा डी.एन.सरांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. माझ्या पहिल्या प्रयत्नास डी.एन.सरांनी जी मदत केली, तो प्रभाव माझ्यावर आजही असावा.

माझा जन्म कुंडल गावचा, १९३५चा. तेच डी.एन.सरांच्या प्रथम प्रयोगाचे जन्मसाल. कुंडल म्हटले की आठवते ते प्रति-सरकार(पत्री सरकार)! गावातच माझे पाचवीपर्यंत शिक्षण झाले, आणि शाळेला रामराम ठोकावा लागला. मात्र शेतीचे काम करायचे या अटीवर माझी शाळा पुन्हा चालू झाली. अकरावीचे वर्ष मला शेती कामांतून सूट देण्यात आली. याच सुमारास गोवा मुक्ती आंदोलन चालू झाले. 'केसरी'ने त्या लढ्यासाठी मदतीचे आवाहन केले. आम्ही मुलांनी निधी गोळा केला आणि ३२ रुपये १० आणे 'केसरी'ला पाठवले. आमची नावासहित बातमी 'केसरी'त छापून आली, आणि मी सामाजिक कार्यात ओढला गेलो.

'गोवा मुक्ती'पाठोपाठ संयुक्त महाराष्ट्राची चळवळ चालू झाली. मी मुलांना संघटित करून 'तासगाव बंद' पुकारले. ७०० मुलांचा सायकल-मोर्चा काढला. सांगलीच्या कलेक्टर ऑफीसवर मोर्चा काढला. अटक होऊन आम्हाला १२ दिवसांसाठी कैदेत पाठविण्यात आले. १९५५ला मॅट्रिक पास झालो आणि पुन्हा शिक्षण थांबले. नोकरी करता करता १९७२मध्ये बी.ए. झालो, ७७ ला बी.एड., १९८६ ला इतिहास घेऊन एम.ए., आणि अलीकडे वयाच्या ७९व्या वर्षी बी.एस्सी.(ॲग्री) उत्तीर्ण झालो. शिकण्याची ही ओढ मला डी.एन.सरांच्या प्रोत्साहनातून मिळाली. शिक्षक म्हणून नोकरीस सुरुवात केली आणि ग्रामीण भागासाठी काही करावे या जिद्दीने नामचीन गाव बहादूरवाडी (जि.सांगली) या गावची बिकट शाळा निवडली. १९६० साली शाळेत रुजू झालो आणि १९६३ साली एक आदर्श शाळा आणि गाव म्हणून तिथे निरोपसमारंभ स्वीकारला. कवठेपिरान येथील शाळेचा निकाल आणि शाळेची परिस्थिती अगदीच डबघाईला आली होती. एस.एस.सी.चा निकाल केवळ १४% होता. 'बहादूरवाडी पॅटर्न' राबवून निकाल ७०% वर पोचविला. नंतरच्या काळात १९९३ मध्ये विश्रामबाग शिक्षणसंस्थेचा कार्यवाह झालो. आज या संस्थेचा अध्यक्ष आहे. २२०० विद्यार्थी, शंभर शिक्षक, अद्ययावत इमारती, प्रशस्त क्रीडांगण असा मोठा डोलारा दिमाखात उभा आहे. ना कोणा राजकीय पक्षाचा, ना कोणा पुढाऱ्याचा मी मिंधा! जे उभे केले ते स्वत:च्या हिंमतीवर, वेळप्रसंगी स्वत:ची मिळकत कामी आणून!! शिक्षक संघटना, पतसंस्था, सहकारी बँक अशा २५-३० संस्थांत विविध पदे भूषवीत आता वयाच्या ८२व्या वर्षी त्याच उमेदीने काम करत आहे. मनाच्या कोपऱ्यात मात्र निवृत्तीचे विचार डोकावू लागले आहेत.

शिक्षण-शेती-सामाजिक काम अशी माझी कसरत तरुण वयात चालू होती. 'काही भरीव करायचे असेल तर गाव सोड' असा सल्ला वडिलांनी दिला. सांगलीत आलो. बोर्डिंगमध्ये कामाच्या मोबदल्यात राहण्याची आणि जेवणाची सोय झाली. सांगलीत आल्यावर 'एस.टी.सी' हा शिक्षक होण्यासाठी कोर्स केला. पोटापाण्यासाठी वृत्तपत्र विक्रीचे काम चालू केले. माझ्यासारखी असे काम करणारी, हॉटेलात काम करणारी, दूध टाकणारी मुले भोवती जमू लागली. त्यांना शिकायची इच्छा होती पण पोटापाण्यामुळे वेळ देऊ शकत नव्हती. या मुलांसाठी रात्रशाळा काढावी; असा विचार आला. उमेद होती खरी, पण ही शाळा कोठे भरवावी, कशी चालवावी, याचा गंधही नव्हता. आमच्यासारख्या कार्यकर्त्याला समजून घेणारी एकच व्यक्ती सांगलीत होती, -ती म्हणजे दत्त आपटे. त्यांच्याशी

ना ओळख ना पाळख. मी एक दिवस आरवाडे हायस्कूलमध्ये पोचलो, थेट सरांना भेटलो आणि मनोदय सांगितला. यापूर्वी रात्रशाळा काढायचे काही प्रयत्न सांगलीत झाले होते.

माझा प्रस्ताव मी सरांपुढे ठेवला, 'रात्री ८ ते १० असा त्यांच्या शाळेतील एक वर्ग मला वापरण्यास द्यावा'! का, ते माहीत नाही पण सरांनी त्वरित मला एक वर्ग, आणि त्यासोबत शाळेचा एक शिपाई दिला. माझी पहिली शाळा 'रात्रशाळा' म्हणून सुरू झाली. त्यांची नेहमीची शाळा संध्याकाळी सुटली की, मी तो वर्ग झाडून विद्यार्थ्यांची वाट पाहात वर्गाबाहेर बसत असे. एखादा जरी विद्यार्थी आला तरी त्यास शिकवावे, असे अनेक दिवस चालले. मी हातात टकळी घेऊन सूत कातीत बसे. विद्यार्थ्यांची वाट पाहताना वेळ काढण्याचा हा एक उत्तम मार्ग होता. सर हे पाहात असत. अधूनमधून विचारपूस करीत. एके दिवशी माधवनगरमधील गद्रे कारखान्यातील दोन कामगार शाळेत आले आणि ते नियमित येऊ लागले. हे दोघे एका सायकलवरून डबलसीट येत असत. मी दोघांना नियमित शिकवू लागलो. हळूहळू संख्या वाढू लागली. आरवाडे हायस्कूलमधील रात्रशाळेचे कौतुक होऊ लागले. सर्वोदय शाळेतील नावाजलेले शिक्षक सावईकर, ए.आर.कुलकर्णी हे आपण होऊन बिनामोबदला शिकवू लागले. मुलांची संख्या वाढली तसे डी.एन.सरांनी दुसरा वर्ग उघडून ताब्यात दिला. राणी सरस्वती कन्याशाळेतील वा.गो.शिराळकर आम्हास येऊन मिळाले. याच सुमारास 'दक्षिण महाराष्ट्र' या साप्ताहिकात फडके वकिलांनी रात्रशाळेच्या कामाविषयी पानभर वृत्त छापले, त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या चांगलीच वाढली. आठवी आणि नववी असे दोन वर्ग भरू लागले.

शाळेला मान्यता आणि अनुदान मिळण्यासंबंधी जानेवारी १९५९ मध्ये शिक्षणखात्याची तपासणी आली. महाडिक नावाचे शिक्षण अधिकारी तपासणी करणार होते. सर्व शिक्षक आणि सर्व विद्यार्थी हजर होते. पण शाळेला कार्यालय आवश्यक होते. डी.एन.सर तिथे मुद्दाम थांबले होते, त्यांनी स्वत:चे कार्यालय उघडून दिले. तपासणी संपन्न झाली. वार्षिक अनुदान रु.४७५/- आणि शिक्षण-खात्याची मान्यता आमच्या 'नाईट स्कूल'ला मिळाली. डी.एन.सरांनी मदतीचा समर्थ हात दिला, आणि माझा पहिला प्रयत्न बेहद्द यशस्वी झाला. त्या आत्मविश्वासावर मी आज इथंपर्यंत पोचलो आहे.

आरवाडे हायस्कूलमधील आमची रात्रशाळा पुढे वेगळीकडे स्वतंत्र चालू झाली आणि आपटे सरांचा संपर्क कमी झाला. सतत कोणत्या ना कोणत्या चळवळी चालवणारे सर्वश्रुत नागनाथआण्णा नायकवडी माझ्या घरी एके दिवशी आले. मी कामानिमित्त परगावी होतो. अण्णांना काही कामासाठी पैशाची गरज होती. पैसे घरात नव्हते, ना बँकेत! अण्णांनी माझ्या पत्नीकडून चेकबुक मागून घेतले, आणि त्यातला एक चेक घेऊन ते बाहेर पडले. अण्णा थेट डी.एन.सरांच्या ऑफीसमध्ये जाऊन बसले. सर म्हणत होते, ''अरे अण्णा! आता तुला कोठून पैसे देऊ? माझी परिस्थिती तुझ्यापेक्षा वेगळी नाही.'' माझा बिनसहीचा बिनतारखेचा तो चेक अण्णांनी सरांच्या हातात ठेवला आणि म्हणाले, ''हे तारण ठेवा. चेक मात्र मी सांगेपर्यंत बँकेत भरू नका.'' डी.एन.सरांनी विचारले, ''अरे अण्णा, हा चेक कोणाचा आहे ते तरी सांग. ना त्यावर सही, ना तारीख.''

''चेक टी.डी.लाडाचा आहे.'' अण्णा उत्तरले.

''मग काळजी नाही. चेक पास झाला असं समज.''

मी सरांचा विश्वास संपादन केला होता हीच माझी खरी कमाई, असे मी समजतो.

*(लेखक : महाराष्ट्र रेसि.स्कूलचे संचालक, विश्रामबाग शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष)*

●●●

# अभ्यासू कामगार नेता

-बिराज साळुंखे

कामगार आणि क्रांती माझ्या मनात कशी रुजली? माझा जन्म १९३८ साली विट्याजवळील कार्वे या गावात झाला. चौथीनंतर माझे वडीलबंधू मला पुढे शिकायला मुंबईला घेऊन गेले. मुंबईत असतानाच गोवामुक्ती आंदोलनात, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यावेळी माझ्यावर कम्युनिस्ट विचारांचा पगडा होता. मला असे वाटू लागले की, कामगार चळवळीत काम करायचे तर पुस्तकी शिक्षणाचा काहीही उपयोग नाही. माझ्या बंधूनी 'शिक्षण सोडू नकोस' असा सल्ला दिला. 'कामगारांच्यात काम कर, त्यासाठी तू वकील हो. वकिलीच्या ज्ञानाचा कामगारांसाठी उपयोग कर,' हा सल्ला खरोखरी मोलाचा होता. तथापि मी ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हतो. मार्क्स तत्वज्ञानाच्या आधारे कामगार चळवळ उभी करून, कष्टकरी कामगारांचे हक्क प्रस्थापित करावे या उद्देशाने मी मुंबई सोडून १९६०साली सांगलीत आलो. इथेच माझी दत्त आपटे यांच्याशी पहिली भेट झाली.

सांगलीत मी आलो तेव्हा माझा पहिला परिचय मोहनराव माणगावकर या पतिपत्नींशी झाला, आणि मी समाजवादी विचारांकडे खेचला गेलो. सांगलीत कामगार युनियनचे काम चालू केले. शेतकरी, शेतमजूर, हॉटेल कामगार, शिंपी अशा असंघटित क्षेत्रांतील लोकांना या चळवळीत समाविष्ट करू लागलो. बैठका, मेळावे, सभा, प्रशिक्षणवर्ग घेण्यासाठी एखादी जागा, एखादे छोटे कार्यालय म्हणून आम्हाला गरजेची होती. सांगलीतील सिटी हायस्कूल, राणी सरस्वती कन्या शाळा अशा ठिकाणी आम्ही विचारणा केली. पण कामगार चळवळ म्हणून कदाचित नकार मिळाला असावा.

सांगलीच्या शैक्षणिक तसेच कामगार चळवळीत दत्त आपटेंचे नाव सर्वश्रुत होते. आम्ही सरांना भेटलो, आणि पहिल्या भेटीतच जागेचे सर्व प्रश्न सुटले. लहान खोली 'ऑफीस' म्हणून मिळाली. त्यांच्या शाळेच्या वेळा सोडून 'संस्कार हॉल' आमच्या सर्व उपक्रमांना मोफत मिळू लागला. तेव्हापासून गणपतराव आरवाडे हायस्कूल आमचे केंद्र बनले. कालांतराने आमची इमारत, कार्यालय सर्व गोष्टी आम्ही निर्माण केल्या. आज मी एस.टी.कामगार संघटनेचा विभागीय अधिकारी म्हणून काम करत आहे. पण आमच्याकडे काहीही नसताना दत्त आपटे यांनी केलेली मदत कधीही विसरता येणार नाही.

दत्त आपटे हे इंटकप्रणीत कामगार युनियन चालवीत होते. सांगलीतील छोट्या मोठ्या औद्योगिक संकुलात या युनियनचे काम चाले. कामगार प्रश्न सोडविताना पारदर्शीपणा व कामगारहित जपून, मालक-कामगार समझोता असे सूत्र दत्त आपटे हे वापरीत असत. त्यामुळे कामगार व मालक असे संघर्ष त्यांच्या संघटनेत कधी आढळले नाहीत. त्यांच्यासोबत नामदेव कराडकर, शाहीर निकम असे लोक होते.

कामगार चळवळीत आम्ही नवोदित होतो. कामगार चळवळीचा आणि कायद्याचा अभ्यास नव्हता. तेव्हा दत्त आपटे यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळत असे. १९४८च्या औद्योगिक विवाद कायद्याचा सरांइतका अभ्यास माझ्या माहितीप्रमाणे कोणाचाही नव्हता. त्या काळात अनेक नेत्यांवर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. यांना 'रॉयवादी' म्हणत. दत्त आपटे, यशवंतराव चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ह.रा.महाजनी, आत्मारामबापू पाटील इत्यादी मंडळी 'रॉयवादी' म्हणून ओळखली जात. माझा अनुभव असा आहे की हे सर्वजण खूप अभ्यासू होते.

सर्व कामगार संघटना मिळून आम्ही कामगार हितासाठी अनेक उपक्रम करीत असू. त्यांत जागतिक कामगार दिन अनेक उपक्रमांनी साजरा होत असे. एकदा सर्व कामगार संघटनांनी मिळून दत्त आपटे यांच्या नेतृत्वाखाली एक प्रभातफेरी काढल्याचे आठवते.

१९६२साली चीनने भारतावर आक्रमण केले त्याचा निषेध करण्यासाठी सर्व कामगार संघटनांची एक सभा आरवाडे हायस्कूलमध्ये झाली. ठरावाच्या मसुद्यावरून सरांचे आणि आमचे मतभेद झाले. चीनचे आक्रमण

म्हणायचे, का सीमोल्लंघन की सीमावाद? त्यावेळी दत्त आपटे यांनी मॅकमोहन रेषेबद्दल असलेली संदिग्धता व तशा मूलभूत गोष्टींची बरीच माहिती दिली. तरीही निषेधाचा ठराव एकमुखाने होऊ शकला नाही, आमचा विरोध कायम राहिला. आजही त्या भागात अतिक्रमणे होत आहेत. दत्त आपटे यांच्याशी मतभेद झाल्यामुळे आमच्या आरवाडे हायस्कूलमधील सोयी बंद होणार की काय, असे आम्हाला वाटू लागले. परंतु तसे काही झाले नाही, हेही सरांचे एक वैशिष्ट्य. मतभेद झाले तरी उद्देशाला बाधा येता कामा नये, ही शिकवण आम्हाला त्यांच्याकडून मिळाली.

सर कोणत्याही गोष्टीचा विचार अनेक अंगानी करत आणि त्यातले योग्य ते निवडत. लोकशाही, मार्क्सवाद, भांडवलशाही, कामगार चळवळ, राजकीय पक्ष, राजकारण आणि राजकारणी अशा सर्व विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. त्याचबरोबर त्यांचे स्वच्छ, शुद्ध चारित्र्य होते. कोणा राजकीय पक्ष अगर संघटनेचे ते मिंधे नव्हते. स्पष्टवक्तेपणा, विचारांची ठाम बैठक हे खास गुण सरांच्याकडे होते. त्या काळात वि.स.पागे हे राजकारणी आणि विचारवंत म्हणून सर्वत्र गणले जात होते. तथापि माझ्या ६० वर्षांच्या चळवळीतील अभ्यासातून मी ठामपणे सांगतो की, दत्त आपटे हे सर्वांत जास्त प्रभावी होते.

दत्त आपटेनी जर तडजोड केली असती तर, ते महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या राजकारणात मोठे स्थान मिळवू शकले असते. तत्वांशी तडजोड न करणे हे दत्त आपटे यांचे वैशिष्टच, आणि राजकारणात तर तडजोडीशिवाय चालत नाही. त्यांच्यात आणि इतर नेत्यांत महत्वाचा फरक मला हाच दिसला. 'व्यावहारिक दृष्ट्या दत्त आपटे मागे राहिले, त्यांना आवश्यक ती प्रसिद्धी-मानसन्मान मिळाला नाही' असे अनेकांना वाटे. तथापि माझे असे मत आहे की, व्यक्तिगत स्वार्थ, पैसा, सत्ता अशा गोष्टी त्यांच्या गावी नव्हत्याच. त्या आधारे पुढे जाण्याचे त्यांनी मनात आणलेच नाही. सांगलीच्या जडण-घडणीत त्यांनी फार मोलाचे काम केले. दत्त आपटे यांचे कार्य जनतेसमोर येईल, तेव्हा ते प्रेरकच ठरेल.

*(लेखक : कामगार नेता, संघटक व रा.प.म. कर्मचारी संघटनेत पदाधिकारी)*

●●●

## कामगारांचे हित चिंतणारे दत्तोपंत

-भूपाल नवले

दत्तोपंतानी स्थापन केलेल्या 'शिवसदन सहकारी संस्थे'च्या संचालक पदावर मी आजही काम करीत आहे. इथवर पोचण्याचे कारण दत्तोपंत किंवा डी.एन.सरच! मी सांगलीच्या गावभागात राहात होतो, तेव्हा दत्तोपंत आणि विनायकराव या बंधुद्वयाला पाहिले होते; तितकाच परिचय! नंतर माझी कारकीर्द सांगलीच्या साखर कारखान्यात त्याच्या स्थापनेपासून झाली आणि तेथेच मी निवृत्त झालो.

कारखान्यात युनियन असावी का? कोणती असावी? त्याचे नेतृत्व कोणाकडे असावे? ते किती काळ असावे, या गोष्टी मॅनेजमेंटच्या अखत्यारीतील होत्या. कारखान्यातील कामगार युनियन काँग्रेसप्रणित 'इंटक'ची. त्याची स्थापना डी.एन.सरांच्या नेतृत्वाखाली झाली. सरांनी ही धुरा साधारण पाच वर्षे समर्थपणे सांभाळली. डी.एन.सर हे अध्यक्ष आणि नामदेव कराडकर हे कार्यवाह होते. या काळात कामगारांच्या अनेक समस्या आल्या. त्या सोडविताना सरांचा भर 'कामगार हित' असाच असे. तथापि अवास्तव मागण्या, अडवणुकीचे धोरण सरांनी कधीच अवलंबिले नाही. साखर कारखान्याचा लेबर वेलफेअर ऑफीसर म्हणून मी ते प्रत्यक्ष पाहिले आहे. वसंतदादा हे कारखान्याचे सर्वेसर्वा होते. दादा डी.एन सरांना मानीत, आणि दादांचा सरांबद्दल असलेला आदर ठायी ठायी जाणवे. सरांच्या कारकिर्दीत सामोपचारांनी कामगारांचे प्रश्न सोडविले जात.

कारखान्यातील कामगारांकडेच युनियनचे नेतृत्व

असावे, अशा मागणीचा जोर सतत वाढत होता. त्यावरून काही कामगारांनी गैरमार्ग वापरण्याचा प्रयत्न केला, तेव्हा सरांना त्यांच्याविरुद्ध न्यायालयात जावे लागले. वास्तविक याचा निकाल सरांच्या बाजूने लागणार हे उघड दिसत होते, आणि संबंधित कामगारांना गैरमार्गाबद्दल शिक्षा होणेही शक्य होते. या कामगारांनी सरांची माफी मागितली, सरांनी त्यांना मोठ्या मनाने माफही केले. पुढे 'बाहेरील -म्हणजे थोडक्यात -सरांचे नेतृत्व नको' असे पुन्हा सुरू झाले. ते का नको? त्यामागे नेमके कारण काय? याबाबत 'नोकर' या नात्याने माझा फारसा संबंध आला नाही. पण पुढे ही मागणी फार जोर धरू लागली. अखेर सरांनी 'जाऊदे' म्हणून येथील नेतृत्व सोडून दिले, तरी कामगारांना ते सल्ला देत राहिले. काहीही असले तरी, सरांमुळेच कारखान्यातील ट्रेड युनीयनचा पाया घातला गेला हे निश्चित!

(लेखक : धुळाप्पा नवले यांचे चिरंजीव, सांगली साखर कारखान्यातून लेबर ऑफीसर म्हणून निवृत्त)

●●●

## मुलांचे दत्तूकाका

-विजया पेंडसे

''गंगणे गधडे, आधी इकडं ये!'' अशी एक दिवस दत्तूकाकांची रागाची हाक आली. आमच्याशी नेहमी प्रेमाने वागणारे दत्तूकाका आज रागात का बरं असावेत? मी घाबरतच सोप्यावर आले. एका हातात पेढ्याचा पुडा आणि दुसऱ्या हातात साडी घेऊन दत्तूकाका उभे होते. मी मॅट्रिक पास झाल्याचे त्यांनी सांगितले, 'तू आपटे घरातील मॅट्रिक पास होणारी पहिली मुलगी आहेस.' आनंदाची गोष्ट सांगायची दत्तूकाकांची वेगळीच तऱ्हा होती. ते प्रथम रागावले आहेत असे भासवीत, आणि मग हसत बातमी सांगत. तो त्यांचा आनंद ओसंडत असे. मी विनूकाकांची सर्वांत थोरली मुलगी, गंगा. हे नाव माझ्या आजीची आठवण म्हणून ठेवले म्हणे. मी नववी पास झाले तोवरच घरात माझ्या लग्नाची चर्चा चालू झाली. त्या काळात ते चालायचे. माझे वडील आणि किर्लोस्करवाडीचे गोपाळकाका यांनी स्थळे पाहायला सुरू केले. मला 'दाखवायला' काका किर्लोस्करवाडीस घेऊनही गेले. मला तर पुढे शिकायचे होते. मला सारखी दत्तूकाकांची आठवण येत होती. तेच एक मला या पेचातून बाहेर काढू शकणार होते. मी किर्लोस्करवाडीला गेले खरी, पण मी सर्वांशी अबोला धरला, जेवायला नकार दिला, एका ठिकाणी बसून राहिले. हे दत्तूकाकाना कळाले. दत्तूकाका ताबडतोब आले आणि मला सांगलीस घेऊन गेले. मला अकरावीपर्यंत शिकू देण्यासाठी त्यांनी सर्वांचे मतपरिवर्तन केले, म्हणून मी मॅट्रिक होऊ शकले. मग मात्र बोहल्यावर उभे राहणे क्रमप्राप्त होते. यावेळीही दत्तूकाका पाठीशी उभे होते. 'तुला जो मुलगा आवडला आहे त्यासच होकार दे, इतरांच्या आग्रहाकडे लक्ष देऊ नकोस.' असे ते म्हणत. मी पसंत केलेल्या मुलाशीच माझा विवाह झाला.

दत्तूकाका स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय असताना त्यांचे एक मित्र मुनी क्षीरसागर असेच घरी आश्रयास येत. एकदा ते आले तेव्हा, त्यांनी कोठेतरी रेल्वेगाडी पाडल्याचे बोलले जात होते. आम्हा मुलांना याबाबत कोठे वाच्यता न करण्याची ताकीद असे. दत्तूकाका स्फोटके तयार करून क्रांतिकारकांना पुरवीत. स्फोटकांची चाचणी घेताना एकदा स्फोट होऊन त्यांना भाजले होते. दवाखान्यात जाण्याची चोरी, त्यामुळे घरगुती उपचार करावे लागले. क्रांतिकारकांना पुरविण्यासाठी आणलेली हत्यारे-पिस्तुले आमच्या घरात लपविलेली असत. त्यामुळे आमच्या घरावर पोलिसांची करडी नजर असे. घरावर छापा पडला होता, पण माझ्या आत्याच्या चतुराईमुळे पिस्तुले सापडली नाहीत.

महात्मा गांधींचा खून झाला आणि महाराष्ट्रात

ब्राह्मणांची घरे जाळण्याचे सत्र चालू झाले. आमच्या गल्लीतील ब्राह्मणांची घरे दत्तूकाका-विनूकाकांमुळे वाचली. ज्यांची घरे वाचली ते एक दिवस आमच्या घरी जमले. आमच्या घराच्या सोप्यावर छोटी सभा झाली. सर्वांनी दत्तूकाका आणि विनूकाकांचे आभार मानले. ती सभा मला आजही आठवते.

आमच्या काकांच्या पिढीत जमीनजुमल्याच्या वाटण्या समन्वयाने झाल्या, कुठे वादावादी नाही. सांगली गावभागातील घरी दत्तूकाका आणि विनूकाका दोघे आयुष्यभर राहिले. यांची एक विधवा बहीण, आमची अंबूआत्या आणि तिच्या तीन मुली आमच्यासोबतच राहात. आत्या आणि तिच्या मुलींची हे दोघे भाऊ काळजी घेत. आमची अंबूआत्या नेहमी म्हणे, ''या माझ्या राम-लक्ष्मणासारख्या दोन भावांमुळे मी आणि मुली इथं सुरक्षित आहोत.'' दत्तूकाका कोठेही बाहेरगावी जाणार असतील तर विनूकाकांना सांगून जात, कोणतीही महत्त्वाची गोष्ट करताना विनूकाकांचा सल्ला घेत. मोठ्या भावानी हाक मारताच दत्तूकाका हातातले काम टाकून धावत येत असत. आपल्या या थोरल्या भावाचा खूप आदर दत्तूकाका करीत. तसेच प्रेम विनूकाकांचे त्यांच्या दत्तूवर होते. विनूकाका शिस्तप्रिय आणि कडक होते, ते कोणाशी फार बोलत नसत. दत्तूकाका अगदी उलट; प्रेमळ आणि भावनाप्रधान!

माझ्या शाळेच्या वयात आमचे आणि दत्तूकाकांचे कुटुंब एकत्र होते. आम्ही दहा-पंधरा मुले आणि उत्साहाचा अखंड झरा असलेले दत्तूकाका. सणवार धुमधडाक्यात होत असत. पाडवा, दसरा, दिवाळी या सणांचे विशेष महत्त्व असे. माझे आणखी दोन काका -बापू आणि आबा - शेजारीच राहात असत. दिवाळीत प्रत्येक घरी एक एक फराळ असे. आमच्या घरी सोप्यात पंगती बसत. त्यावेळी कपड्यालत्त्याचे फार लाड नसत, मात्र खाण्यापिण्याची चंगळ असे. काही कारणांनी दत्तूकाका परगावी गेले तर घर सुनंसुनं वाटे. ते येताच पुन्हा घरात आनंद भरत असे. माझ्या आजी-आजोबांचे श्राद्ध म्हणजेसुद्धा एक सणच व्हायचा. झाडून सगळे नातेवाईक जेवायला असत. शिवाय मित्र, शाळेतील काही शिक्षकसुद्धा जेवायला असत.

आमच्या घरातील गणपतीउत्सव विसरणे शक्य नाही. दत्तूकाका आम्हा मुलांना जमवत. आम्ही सर्व पोरं मिळून सोपा रंगवून काढीत असू. सोप्यातील एका कोनाड्यात गणपतीची प्रतिष्ठापना होई. दीड दिवसाचा उत्सव, पण उत्साहाचे अक्षरश: उधाण असे. विसर्जनाच्या दिवशी इतर दोन्ही काकांचे गणपती आमच्या 'मोठ्या'(गावभागातील आमचे घर हे आपट्यांचे सांगलीतील मूळ घर होते) घरी येत. आम्ही मुले, काकांची मुले सगळ्यांनी सोपा फुलून जात असे. सामुदायिक आरती, आणि मग गणपती विसर्जनासाठी आम्ही सगळे जात असू. आज दुरावलेले अंतरलेले सर्व नातेवाईक, सारी भावंडे सोप्यात जमलेली मला स्पष्ट दिसतात. आम्हा मुलांत रमणारे दत्तूकाका, त्यांची आठवण आली तर आम्ही क्षणात भूतकाळात जातो.

आम्ही मोठे होत गेलो, आमच्या आमच्या संसारात रमलो. मुले-नातवंडे-पतवंडे आम्ही पाहिली. खूप जग पाहिले. काका-पुतणे अशी आजची नातीही पाहात असते. पण जेव्हा मी माझे लहानपण आठवते, तेव्हा ते किती वेगळे, कसल्या आनंदाचे होते ते जाणवते; आणि ते माझ्या दत्तूकाकांच्यामुळे, यात कोणतीच शंका नाही!

विनूकाकांच्या निधनानंतर दत्तूकाकाना खूप व्यथित झाल्याचे पाहिले. अखेरीस ते 'विनायक' अशी आठवण सतत काढत. विनूकाकांच्या निधनानंतर ते कसेबसे अकरा महिने जगले. विनूकाकांचे वर्षश्राद्ध आणि दत्तूकाकांचा अकरावा दिवस एकाच दिवशी होता. दत्तूकाकांच्या कर्तृत्वात विनूकाकांचा खूप मोठा वाटा होता.

*(लेखक : माहेरच्या गंगू आपटे, विनायकरावांची ज्येष्ठ कन्या, दत्तूकाकांची पुतणी)*

●●●

# माझे मामा - दत्तूकाका

-विठ्ठल जोगळेकर

१९६७ सालातल्या डिसेंबर महिन्यातील त्या दिवशी, धोतर कोट गांधी टोपी घातलेली गोरी उंचीपुरी बलदंड व्यक्ती सांगलीतील आरवाडे हायस्कूलच्या दारात आतुरतेने वाट पाहात होती. कोयनानगरच्या भूकंपातून वाचलेले आमचे कुटुंब घेऊन शाळेसमोर कार थांबली, गाडीतून तीन लहान मुले आणि त्यांची आई उतरली. या तिघांना पोटाशी धरून हमसून, हमसून ती व्यक्ती रडू लागली. दत्तूकाकांचे माझ्या कुटुंबाशी नाते हे असे होते. कोयनेतील प्रलयकारी भूकंपात सहीसलामत बचावलेले आमचे कुटुंब, त्यांना आणायला खास टॅक्सी दत्तूकाकानीच कोयनेला धाडली होती.

मलाही त्या आधीच्या काही महिन्यांपासून सरकारी नोकरीचा कंटाळा येऊ लागला होता. ''विठ्या, बस झाली तुझी सरकारी नोकरी! ये सांगलीत, आपण सहकारी तत्वावर काही उद्योग चालू करू!'' असा प्रस्ताव दत्तूकाकानी माझ्यासमोर ठेवला होता. त्याप्रमाणे कोयनेच्या भूकंपानंतर मी माझे कुटुंब सांगलीत आणले.

सोप्यातील मोठ्या आरशासमोर, धोतराचा काचा मारून, लेझीम खेळावी तसे -वय विसरून नाचणारे आठवणीतील दत्तूकाका; आणि लेकरे सुखरूप आल्यावर आज अस्वस्थ अनावर झालेले दत्तूकाका! नात्यांनी माझे सख्खे मामा असलेले दत्तूकाका. त्यांचे व्यक्तिमत्व कोणत्या चौकटीत बसवायचे, याचे उत्तर अद्यापि मला सापडलेले नाही! माझे जीवनच या मामानी भारून टाकले होते!

दत्तूकाकानी मजपुढे, सहकारी तत्वावर रेडीमेड घरे बनविण्याचा उद्योग चालू करायचा प्रस्ताव ठेवला. मी ताबडतोब होकार दिला. तयार घरे म्हणजे 'प्री फॅब्रिकेटेड हाऊस' ही कल्पना नवी होती. जगभरात त्याचे कोठे कोठे तुरळक प्रयोग झाले होते, मात्र भारतासाठी ही कल्पना अगदीच नवखी होती. दत्तूकाकाना ती कशी सुचली? आश्चर्य म्हणावे लागेल! शिक्षण, सहकार, कामगार अशा अनेक क्षेत्रांत दत्तूकाकांचा वावर होता हे जरी खरे असले तरी, पूर्णत: अभियांत्रिकी क्षेत्राशी निगडीत अशी ही नवी संकल्पना होती. एकदा निर्णय झाल्यावर आम्ही कामाला लागलो. सहकार क्षेत्रातील माझ्या कामास अशा तऱ्हेने सुरुवात झाली, आणि पुढे हा प्रवास शाश्वत ऊर्जेच्या शोधाच्या दिशेने चालू झाला, तो अद्यापि चालू आहे. या कामात (वसंत)दादा, (भिडे)मामा आणि (दत्तू)काका या तीन व्यक्ती सदैव माझ्या पाठीशी होत्या.

सांगलीत येऊन नवी आखणी केल्यावर सर्वप्रथम दत्तूकाका मला वसंतरावदादांच्याकडे घेऊन गेले. दादांनी 'या पंत' असे स्वागत केले. राजकारणातील, समाजकारणातील मंडळी त्याना सलगीने 'पंत' किंवा 'दत्तोपंत' म्हणत असत. दत्तूकाकानी माझी ओळख ''हा माझा भाचा, सिव्हील इंजिनीअर आहे. कोयना धरणावरील कामाचा त्याला अनुभव आहे. शासनाने त्याला परदेशीसुद्धा पाठविले होते.'' अशी करून दिली व पुढे ''सहकारी तत्वावर तयार घरे बनविण्याचा उद्योग सुरू करायचा म्हणतो'' हे दत्तूकाकांचे वाक्य पुरे होते ना होते तोच दादांचा प्रस्ताव आला, ''मग, केव्हा चालू करताय?'' इथून पुढे दादा आमच्या सर्व कामांत आमच्या पाठीशी उभे राहिले.

त्या त्रिकुटातील दुसरी व्यक्ती म्हणजे रघुनाथराव भिडे मामा. हे नात्याने माझे मामा नव्हते, पण सगळी सांगली त्यांना भिडेमामा म्हणायची. सांगलीच्या उद्योगक्षेत्रात नावाजलेली ही व्यक्ती होती. दत्तूकाकानी त्यांना माझी ओळख आणि सांगलीत येण्याचा उद्देश सांगितला. मामांची व्यवहारिक प्रतिक्रिया, ''सरकारी चांगली नोकरी, रहायला बंगला, दिमतीला गाडी हे सोडून ही अवदसा का आठवली?''- तरीही माझे मत ठाम दिसल्यावर मग मात्र मामानी आम्हाला काही कमी पडू दिले नाही. भिडेमामा हे तर खाजगी उद्योजक; ते सहकार क्षेत्रात कसे आले हे एक गूढच. मामांच्या कारखान्यातील कामगार-युनियनचे अध्यक्ष दत्तूकाका होते. खरे तर व्यवहारत: ही परस्पर विरोधी टोके, पण 'शिवसदन'मध्ये मात्र दोघे संचालक. इथे मामा अध्यक्षही झाले. याचे श्रेय पुन्हा दत्तूकाकांच्या कार्यपद्धतीला द्यायला हवे.

तिसरी व्यक्ती म्हणजे आमचे दत्तूकाका. सहकार क्षेत्राच्या बाबतीतही ते माझे सर्व काही होते! मी सांगलीत प्रथम काम सुरू केले ते 'यशवंत सिमेंट'मध्ये. ही संस्था सिमेंट पाईप आणि सिमेंटच्या वस्तूंचे उत्पादन करीत असे. यशवंतची स्थापना दत्तूकाकानीच केली होती, त्यामुळे कामाला सुरुवात करायला तिथे आधार होता. पुढे 'शिवसदन' ही तयार घरे बनवणारी सहकारी सोसायटी अस्तित्वात आली. सोसायटी रजिस्टर करण्यासाठी, एक हजार रुपयाचे अकरा शेअर विकणे आवश्यक होते. अकरा हजार ही रक्कम आज क्षुल्लक वाटेल, पण त्यावेळी त्याचे मूल्य खूपच होते. दत्तूकाकानी एकहाती अकरा शेअर-होल्डर्स मिळवले. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे काम आणि धनिक लोकांचा त्यांच्यावर विश्वास, तो इथे उपयोगी आला. संस्था नोंदली गेल्यावर आम्ही अल्पावधीत तिला भागधारकांच्या विश्वासास पात्र बनविले.

दत्तूकाका कागदोपत्री जसे भांडत, तसे ते मैदानात उतरून दोन हात करायला कमी करीत नसत. आमच्या कारखान्याला मिळणाऱ्या पाण्यावर जवळपासच्या अनेकांचा डोळा होता. सांगली औद्योगिक वसाहतीच्या तत्कालीन अध्यक्षांना पुढे घालून काही लोकांनी आमच्या विहिरीवर कब्जा करायचा प्रयत्न केला, तेव्हा दत्तूकाकांच्या नेतृत्वाने त्यांची साधने - मोटार त्याच विहिरीत बुडवून, त्यांचा तो डाव उधळला. दत्तूकाकाना तिथे खडे पाहून त्या अध्यक्ष महाशयांनी थेट माघार घेतली.

असाच पुढे एक प्रसंग आला. कारखान्याच्या जागेवर शेजारील कारखानदारांनी त्यांचे सिमेंट पाईप्स ढकलून आमची वाटच बंद करून टाकली. दत्तूकाकानी त्यावर नामी शक्कल लढविली. त्यावेळी दिनकरआबा पाटील हे सांगली साखर कारखान्याचे चेअरमन होते. त्यांच्या हस्ते कारखान्याच्या इमारतीच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम ठरविला. ही संधी साधून, आम्ही अतिक्रमण हटविले. भारतीय राजकारणातील अनेक अग्रणी 'शिवसदन'ला खूपदा भेट देत असत, दत्तूकाकांमुळे! अशा लोकांच्या भेटीमुळे औद्योगिक वसाहतीत 'शिवसदन'बद्दल दबदबा निर्माण झाला.

आम्ही कारखान्याच्या कामासाठी वरचेवर मुंबईला जात असू. तिथे दत्तूकाकांचे साडू गाडगीळ यांच्याकडे राहणे होई. गाडगीळ हे एका अमेरिकन औषधी कंपनीचे भारतातील प्रतिनिधी होते. त्यांच्याकडे ते मला नेहमी मोठमोठ्या कंपन्यांचे अहवाल पाहायला लावीत. त्यांतून, कोणत्याही उद्योगात संशोधनाचे किती महत्त्व असते हे समजू लागले. शिवसदनमध्ये अशी एक प्रयोगशाळा हवी, असे वाटू लागले. लगेच आम्ही दत्तूकाकाना घेऊन दिल्ली गाठली. वसंतदादा तिथे होते. दत्तूकाका आणि दादा असल्यावर कोणतीही कामे धडाधड होत.

दत्तूकाकांचा दबदबा तसा सर्वच क्षेत्रांत होता. शिक्षण संस्था-संचालकांची एक राज्यव्यापी संघटना होती, त्यात दत्तूकाका कार्यवाह, वसंतदादा कार्याध्यक्ष, आणि गोविंदभाई श्रॉफ हे अध्यक्ष होते असे मला आठवते. त्यांच्या मिटींग मुंबईत दादांच्या ऑफीसात चालत, त्यावेळी मला हजर राहण्याचा योग येत असे. एकदा आम्ही बेळगावला मोरारजीभाई देसाईना भेटायला गेलो होतो. दत्तूकाका खोलीत येता येताच मोरारजीनी 'या दत्तोपंत' अशी जोरदार हाक मारून दत्तूकाकांचे स्वागत केले. पंतप्रधानपदावर पोचलेला माणूस अशा खेळीमेळीत आला की, त्यांची नाती किती उंचावर आहेत हे समजून येई. मोरारजीभाई पंतप्रधान झाल्यावर पुण्याच्या भेटीवर आले होते. दत्तूकाका मुद्दाम त्यांना भेटावयास पुण्यास गेले होते. सुरक्षा-रक्षकांच्या गराड्यातून भेट होणे मुश्कील वाटू लागले. विनंती करून तिथले अधिकारी दाद देईनात. अखेर दत्तूकाकानी एक चिठ्ठी लिहून 'तेवढी प्रधानमंत्र्यापर्यंत पोचविण्या'ची विनंती केली. ''या दत्तोपंत'' असे म्हणत मुरारजी स्वत: बाहेर आले, आणि आपल्या या मित्राला हाती धरून आत घेऊन गेले.

दत्तूकाकांचा सहवास मला अगदी लहानपणापासून मिळाला, तो त्यांच्या निधनापर्यंत. मला असे वाटते की मी त्यांचा सर्वात लाडका भाचा होतो. मला ते 'झिटूरमिया' या टोपणनावानी बोलावीत. अशी टोपणनावे त्यांनी आमच्या गोतावळ्यासह प्रत्येकाला ठेवली होती. माझ्यावर त्यांचा विशेष लोभ होता. कदाचित दत्तूकाकांच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला तसेच वाटत असावे.

दत्तूकाका आम्हा मुलांत रमायचे. शाळा, लिखाण,

वाचन या सर्वातून ते वेळ काढत. एका सुट्टीत मी तासगावहून सांगलीत आलो होतो. आम्ही १२-१५ मुले रात्री दत्तूकाकांच्या माडीवर -आंब्याची अढी पडावी तसे, लोळत होतो. दत्तूकाकापण आमच्यासोबत होते. त्या रात्री त्यांनी आम्हाला 'वीरधवल'ची कथा रंगवून सांगितली. त्याचा प्रभाव माझ्यावर इतका झाला की, मलाही वाचनाची गोडी लागली, ती आजपर्यंत टिकून आहे. दत्तूकाका प्रवासात बाबूराव अर्नाळकरांचीसुद्धा पुस्तके वाचीत. त्यांचे वाचून झाले की ते आम्हास देत. त्यांतली काळापहाड, झुंझार, धनंजय ही पात्रे अजूनही मनात तरंगतात. त्यांच्या वाचनात ललित, वैचारिक, राजकीय, आर्थिक अशा साऱ्या विषयांचा समावेश असे. माझेही वाचन त्याच अंगांनी सुरू झाले. दत्तूकाकांनी अनेक इंग्रजी कादंबऱ्यांचे मराठीत भाषांतर केले. त्यांतले आमच्या आवडीचे पुस्तक म्हणजे 'प्राणीगावच्या मौजा', वाल्ट डिस्नेच्या कार्टून मालिकेवर ते आधारित होते. अनुवादित पुस्तकांतील पात्रे आणि त्यांच्या कथा अस्सल मराठीत उतरल्या होत्या. उदा.माकडाच्या हॉटेलात मिसळीवर ताव मारणारे प्राणी; त्यांचे संवादही तसेच चटकदार!

दत्तूकाका डबल बॅरल बंदूक घेऊन आम्हा मुलांसह शिकारीला जात. पाण्यावरचे पक्षी, घुबड असे काहीना काही मिळे. पण त्यात निसर्गाच्या भटकंतीला जास्त महत्त्व. पुढे मी कोयनेला गेलो तेव्हा त्यांची बंदूक मजकडेच होती. दत्तूकाका मुलांचा गोतावळा जमवून स्वयंपाकही करीत. डाळमेथीचे वरण हा त्यांचा लाडका पदार्थ असे. परंतु पदार्थ कसाही झाला तरी 'तो चांगलाच झाला आहे' असे म्हणावयाचे असा दंडक असे. दत्तूकाकांचा उत्साह इतका की, त्या पदार्थापेक्षा त्या उत्साहाचा स्वाद-आस्वाद लज्जतदार असे. दत्तूकाकाना हॉटेलातील पदार्थ आवडत. शनिवारी काही कामकाजासाठी शाळेत गेलो की त्यांच्याबरोबर भाजीबाजार होई. मग दत्तूकाकाच म्हणत, ''काय रे, इडली खायची आहे वाटतं.'' मग यथासांग हॉटेलींग होई.

शिवसदन कामानिमित्त दत्तूकाकांच्याबरोबर खूप प्रवास होत असे. तीन चार संस्थांची कामे एकत्र करून स्पेशल गाडीने पुण्या-मुंबईस जात असू. सोबत भावे नाट्यमंदिरचे छत्रे, आदर्श हायस्कूलचे सावईकर, शाहीर निकम असा काहीजणांचा गट असे. गप्पा मारत, घरच्या दशम्या खात, वाटेतील भजी-वड्यांचा आस्वाद घेत प्रवास होत असे. प्रवासात ड्रायव्हरला जागे ठेवणे हे दत्तूकाकांचे काम असे. जाताना पुण्यात सुमन करंदीकर या, होस्टेलवर शिकणाऱ्या त्यांच्या विद्यार्थिनीस भेटून जात. तिला वडील नव्हते; दत्तूकाकाच तिच्या वडिलांची भूमिका बजावीत. स्वातंत्र्याच्या चळवळीतील दत्तूकाकांचे एक स्नेही असणारे आत्मारामबापू पाटील; त्यांच्या कुटुंबाकडे भेट हमखास असे. आत्मारामबापूंचा अकाली मृत्यू झाला होता. त्यांच्या पत्नीची, मुलींची विचारपूस करून मग आम्ही पुढे जात असू. प्रवासाला जाताना सावईकर मोठी लोखंडी ट्रंक आणत, त्यात त्यांचे देव असत. 'रेल्वेत एका ट्रंकमध्ये मुडदा सापडला' अशी बातमी एकदा सर्वत्र चर्चेत होती. दत्तूकाकाना फिरक्या घ्यायची सवय होती. सावईकरांची ट्रंक बघून, ''काय सावईकर, ट्रंकेतून मुडदा आणलाय का?'' म्हणून त्यांची थट्टा करत.

दत्तूकाका, मी आणि मारुती कांबळे रोज पहाटे फिरायला जात असू. घरी आल्यावर दत्तूकाका चहा करीत. दत्तूकाकांचा चहा म्हणजे बासुंदीचा चहा असे. धोतराचा काच्या मारून चहासाठी ते दूध आटवायला उभारत. त्या फर्मास चहानंतर दही, चटणी, भाकरी अशी भरभक्कम न्याहरी असे. या सगळ्या राबत्याचा ताण उषामामींवर पडत असे, पण त्या शांतपणे सर्व करीत. सुट्टीच्या दिवशी पत्त्याचा अड्डा बसे. मी, दत्तूकाका, विनूकाका, सुरेश अशी चारपाच मंडळी असू. 'पैसा पॉईंट' असा रमीचा दर असे. ते पैसे एकत्र केले जात, आणि एक दिवस सामुदायिक भडंग, वडे, आईस्क्रीम अशी जंगी पार्टी सर्वांसाठी असे.

दिवस भराभर मागे निसटत होते. दत्तूकाकांचे मोठे ऑपरेशन झाले होते. दवाखान्यात त्यांना भेटायला गेलो. चर्चा शिवसदनच्या उपक्रमांची होती. आम्ही त्या दिवशी दवाखान्यातून बाहेर पडलो, कामावर पोचलो, आणि पाठोपाठ दत्तूकाका गेल्याची बातमी आली. अमरपट्टा तर कोणीच घेऊन येत नाही. दत्तूकाकांनी त्यांच्यासोबत आमच्यासारख्या अनेकांची आयुष्ये समृद्ध केली. ही समृद्धी पैशात मोजता येणार नाही. शाश्वत ऊर्जेच्या शोधाच्या प्रवासात मला लाभलेली एक सच्ची आणि शाश्वत ऊर्जा, दत्तूकाकांच्या आठवणींची आहे, हे मात्र निश्चित!!

*(लेखक : दत्तूकाकांचा भाचा, निकटचा अनुयायी, प्रसिद्ध अभियंता, व्यासंगी अभ्यासक)*

●●●

# आठवणीतील दत्तूकाका

-अरविंद उर्फ बिंदू आपटे

१९४२-४३ साल असावे, आमच्या दत्तूकाकानीच हौसेने मला आणलेले काळे चकचकीत पठाणी बूट पायात घालून, त्यांचे बोट धरून मी व्यायामशाळेत येऊ लागलो. माझे वय सहा वर्षांचे. त्यांच्या सहवासातील ही पहिली आठवण, मनावर कोरली गेली आहे. त्या सुमारास आमच्या घराभोवती सतत पोलीसांची वर्दळ असायची. पोलीस दिसला की मोठ्यांनाही कापरे भरे, माझ्यासारख्या बालवयीची बोबडीच वळे. एक थरारक प्रसंग आठवतोय; त्याचा तपशील त्यावेळी समजण्याचे वयच नव्हते. सकाळी दहा-अकराचा सुमार असावा. आमच्या आत्याच्या स्वयंपाकघरातील चुलीवर वाकून दत्तूकाका काहीतरी करत होते. तिथेच मध्यावर असलेल्या खांबाला एका हाताचा वळसा घालून मी त्याभोवती फेऱ्या मारीत होतो. एकदम चुलीमधून प्रचंड ज्वाळा उसळली आणि धडाड्धुम असा प्रचंड आवाज झाला, दत्तूकाका दोन्ही हात चेहऱ्यावर धरून मागे कोसळले. मग एकच धावपळ सुरू झाली. दुपारी पोलीस येऊन ठेपले. काहीतरी भयंकर घडले होते, हे निश्चित! पुढे समज आल्यावर कळाले की, बाँब बनविण्याच्या साहित्याची चाचणी घेताना झालेला तो एक स्फोट होता. पोलीस चौकशी सुरू झाली होती. ''आत्याने आमटीला फोडणी देताना भडका उडाल्यामुळे चेहरा भाजला'' अशी साक्ष दिल्यामुळे दत्तूकाका सहीसलामत सुटले. एक गंमत अशी की, घरामध्ये सतत येणाऱ्या पोलिसदलामध्ये अच्युतराव दामले नावाचे फौजदार होते. ते लहानपणापासून सवंगडी असल्यामुळे, ते दत्तूकाकाना आणि घरातील इतरांनाही प्रत्येक वेळी सावध करीत. त्यामुळेच अनेक प्रसंगांतून दत्तूकाका व त्यांचे मित्र पोलीसी कारवाईतून सुटून जात.

त्यांनीच आम्हाला मोठेपणी सांगितले, त्यातील दोन प्रसंग. गोव्याहून त्यांच्या एका सहकाऱ्याने १०-१५ पिस्तुले असलेली एक कापडी पिशवी रात्री घरी आणून दिली. सकाळी योग्य ठिकाणी पोच करण्यासाठी म्हणून, ती पिशवी माजघरातील एका भल्यामोठ्या तिजोरीच्या बाजूला असणाऱ्या कोनाड्यात ठेवली होती. पण कसा काय पोलीसांना सुगावा लागला. पोलिसांनी घरावर धाड टाकली. तिजोरीसकट सर्व घराचा कसून शोध घेण्यात आला. पण पिस्तुल असलेल्या पिशवीची एक नाडी बाहेर लोंबत असूनही त्याकडे पोलीसांचे कसे काय लक्ष गेले नाही? खरेतर, 'आपण आता संपलो' असे ते आणि इतरही समजून चुकले होते, कारण घरात घातक शस्त्रे सापडणे म्हणजे फाशी, जन्मठेप अशी कोणतीही शिक्षा निश्चित, पण दैव पाठीशी होते, म्हणून निभावले!

दुसरा असाच थरारक, पण नंतर स्फूर्तीदायक प्रसंग म्हणजे बाँब कारखाना! दत्तूकाकानी बाँब तयार करण्याचे तंत्र अवगत करून, माळबंगला परिसर म्हणजे आजचे माधवनगर रेल्वे स्टेशन इथे बाँब तयार करण्याचा कारखाना एका खोपटात चालू केला होता. त्यांचा एक विद्यार्थी त्यांना मदत करीत असे. पुढे पोलिसांना याचा सुगावा लागला, आणि त्यांनी कारखान्यावर धाड टाकली. त्या विद्यार्थ्याला बेदम मारहाण करून त्याच्याकडून दत्तूकाकांचे नाव वदवून घेतले. पुढे कोर्टात केस उभी राहिली. 'दत्तूकाका यातून सुटणे शक्यच नाही' अशी सर्वांची खात्री पटली. घरातील सर्वजण चिंतातुर झालेले. न्यायाधीश महोदयांनी त्या विद्यार्थ्यास ''तू तुझे सर दत्तोपंत आपटे यांचं नाव जबानीत घेतलेस ते खरं आहे का?'' असं विचारलं. गंमत म्हणजे त्याने, ''कोण दत्तोपंत आपटे? कोण सर? मला तर काहीच माहिती नाही.'' असा ठाम पवित्रा घेतला. ''मग जबानीमध्ये तू हे नाव का घेतलंस?'' असे दरडावून त्याला विचारले. गंभीर परिणाम माहीत असूनही त्या विद्यार्थ्याने सांगितले की, ''पोलिसांनीच जबर मारहाण करून, मला हे नाव घ्यायला लावले; आणि मारहाणीमुळे मी नाइलाजाने ते मान्य केले.'' झालं! दत्तूकाका निर्दोष सुटले. अर्थात त्या विद्यार्थ्याचे कौतुक शब्दांत करणे शक्यच नाही! ते शिक्षक आणि ते विद्यार्थी दोघेही धन्यच! पुढे हा क्रांतिकारक सांगलीत पकडणे शक्य होईना, कारण सांगलीच्या राजेसाहेबांनी 'मी माझ्या संस्थानात अटक करू देणार

नाही. तुम्ही संस्थानाबाहेर अटक केल्यास माझी हरकत नाही' असा पवित्रा घेतला. साहजिकच त्यांना मिरजेस नेऊन अटक करण्याचा प्रयत्न पोलीसांनी अनेकवेळा केला. पण तो लक्षात आल्याने दत्तूकाका पूर्ण सावध होते. अखेरपर्यंत ते सहीसलामत सुटले.

चळवळीसाठी पैसा गोळा करणे, हा कामाचा मोठा भाग; प्रसंगी त्यासाठी एखाद्या धनदांडग्यावर डल्ला मारणे हेही त्याकाळी गैर ठरू नये! सांगलीतील एका गर्भश्रीमंताच्या घरी त्याच्या लेकीचे लग्न होणार म्हणून, बरेच दागिने तयार केले असून ते एका ट्रंकेत ठेवलेले आहेत अशी बातमी, त्याच घरच्या नोकराने दिली. हा नोकर दुसरा तिसरा कोणी नसून, क्रांतिकार्यात सहभागी असलेला राम क्षीरसागर. अनाथाश्रमातील हा तरुण पोरगा होता. योजना तयार झाली. लग्नासाठी आलेले सर्व नातेवाईक पुण्याला जाण्यासाठी रेल्वे स्टेशनकडे निघाले. दागिन्याची बॅग घेऊन राम होताच. ठरल्याप्रमाणे स्टेशनच्या आवारात, बरोबर तशाच आकाराची आणि रंगाची खडे-विटकरे भरलेली ट्रंकेची अदलाबदल करून नकली बॅग गाडीत सर्वांसमक्ष ठेवली. त्या काळात २५-३० हजाराचा ऐवज क्रांतिकारकांच्या हाती पडला. कोर्ट खटला चालू झाला. झडती होऊनही रामकडे काहीच मिळाले नाही. सर्व माल घरी आला होता, आणि त्वरित विल्हेवाट लावणे जरूर असल्याने, रातोरात दत्तोपंतांचे भाऊ -माझे वडील विनूकाका, हा माल घेऊन नागपूरला लेले सराफ या त्यांच्या मावसभावाकडे रवाना झाले होते. दुर्दैवाची गोष्ट ही की, दागिने चोरीचे आहेत हे कळल्यावर, ते कशासाठी चोरले आहेत याचा जराही विचार न करता, लेले यांनी त्याची अत्यल्प किंमत हातावर ठेवली. काय म्हणणार?

खादीचा पायजमा, नेहरू शर्ट घातलेला पांढरीशुभ्र भरघोस दाढीधारी इसम, एका सकाळी सोप्याच्या माडीत मांडी घालून बसलेला होता. सकाळी उठून बाहेर आल्यावर मला या व्यक्तीचे दर्शन झाले. बालसुलभ भीती मनात आली. त्यांनी प्रेमाने बोलावूनही 'जवळ जावे की नको' अशा विचारात मी असताना त्यांनी, 'मी तुला एक गंमत देणार आहे' असे म्हणून मला बोटाला धरून, भिंतीतल्या एका मोठ्या कपाटाकडे नेले. कपाट उघडताच एका पुठ्ठ्यावर लावलेली, त्या काळी जत्रेत मिळणारी निरनिराळ्या आकाराची मनगटी घड्याळे, चक्रे, मुखवटे असले अनेक प्रकार होते. मग जवळ जवळ महिनाभर रोज एक नवीन घड्याळ, खेळणं, चक्र अशी आमची चैन चालली होती. त्या काळात ती तसली शोभेची प्लॅस्टिक घड्याळं ही चैन होती. पुढे समज आल्यानंतर खरा प्रकार कळाला तो असा की, ती व्यक्ती म्हणजे त्याकाळी ब्रिटीश पोलीसांना हैराण करून सोडणारे प्रसिद्ध क्रांतिकारक अनंत क्षीरसागर उर्फ आमचे मुनिकाका होते. अकोल्याजवळ लष्करी साहित्य नेणारी ट्रेन त्यांनी उलथून टाकली होती. पोलीस मागावर होते, त्यांना चुकविण्यासाठी फेरीवाल्याचा वेश घेऊन ते घड्याळे, चक्रे विकत विकत आमच्या घरी येऊन पोहोचले होते. त्यांनी आणलेली ही घड्याळे, चक्रे आम्हा बालमित्रांना फुकट मिळत होती.

स्वातंत्र्यासाठी या क्रांतिकारकांनी काय काय दिव्य केली असतील? १९४७ साल उजाडलं. मी दहा वर्षांचा होतो. १५ ऑगस्ट, पहिला स्वातंत्र्यदिन घरोघरी साजरा झाला. आमच्या घराच्या पत्र्यावर तीन रंगीत दिवे आणि तिरंगा विनूकाकानी लावला होता.

१९४८ साल उजाडलं आणि गांधीहत्येची धक्कादायक घटना येऊन थडकली. दुसऱ्या तिसऱ्या दिवशी सर्वत्र जाळपोळ सुरू झाली. सांगली पेठभाग, खणभाग येथील ब्राह्मण समाजाची घरे, दुकाने जाळत जमाव गावभागात घुसला. तेथील बहुतेक घरे त्यांच्या 'यादी'त असल्याने त्यांनी सुरुवात नदीतीराच्या अनाथाश्रमापासून करायची ठरवले. हे वृत्त समजताच परिणामाचा विचार न करता दत्तूकाका आणि पाठोपाठ विनूकाका विरोध करीत जमावात शिरले. काही अज्ञात व्यक्तींनी दत्तूकाकांच्या डोक्यात कसला तरी प्रहार केला. ते खाली कोसळले. त्यांना संरक्षण देण्यासाठी विनूकाका वाकून उभे राहिले. त्यांच्यावर काठ्याबांबूचा मार बसला, पण जमावात ज्यांनी दत्तूकाकाना ओळखले, त्यांनी मारहाण थांबविली. त्यांच्या साहाय्याने विनूकाका त्यांना घरी घेऊन आले. त्यांचे ते रक्तबंबाळ रूप पाहून घरातील सर्वजण हादरून गेले होते. त्यांना पाहण्यासाठी घरापुढे रीघ लागली होती. त्यांचे सहकारी दु:खद अंतकरणाने सांत्वन करीत होते. या

वेळेपर्यंत ही बातमी वसंतदादांना समजली होती. त्यांनी त्वरित जाळपोळ बंद करण्याचे आदेश दिले, आणि ब्राह्मण वस्ती असलेला गावभाग या जाळपोळीतून वाचला. दुर्दैवाची गोष्ट की आपटे बंधूंच्या धाडसामुळे आपली घरे वाचली, हे माहीत असूनही अपवाद वगळता ब्राह्मण मंडळी भेटायलाही आली नाहीत. सायंकाळी संचारबंदी झाली, तीन दिवस घराबाहेर पडणेच शक्य नव्हते.

दत्तूकाकानी काही निश्चय करून तडीला नेले, त्यात वैशिष्ट्यपूर्ण पहिला निश्चय म्हणजे सत्तेत सहभागी व्हायचे नाही; पण सत्ताधीशांचा उपयोग इतरांसाठी आणि शिक्षणसंस्थेसाठी करून घ्यायचा. हा निश्चय जीवनाच्या अखेरपर्यंत सोडला नाही. नाही म्हणायला नगरपालिकेची निवडणूक त्यांनी लढवली पण तिथेही स्वत:च्या समाजाकडून, आणि त्यांच्याच काँग्रेस पक्षाकडून स्वार्थी राजकारणामुळे ते निवडून आले नाहीत; तेव्हा तो नादही त्यांनी सोडून दिला.

आश्चर्याची बाब म्हणजे स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिलेल्या या क्रांतिकारी माणसाने शिक्षणावर प्रभुत्व केव्हा आणि कसे मिळविले असावे? शिक्षण प्रसारासाठी यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. काँग्रेस पक्षाचे असूनही त्यांनी, या संस्थेत कोणतेही राजकारण येऊ दिले नाही. त्यांच्याच आग्रहामुळे पुढे बी.ए. झाल्यानंतर, माझी फारशी तयारी नसतानाही मी शिक्षक म्हणून रुजू झालो. शिक्षक म्हणून मी किती यशस्वी झालो हा वादाचा मुद्दा होऊ शकेल; पण संस्थेच्या हितासाठी मी मनापासून शक्य ते सर्व केले, दत्तूकाकांचे संस्कार हेच त्यासाठी मुख्य भांडवल.

त्यांचे घरगुती किंवा कौटुंबिक जीवनही खरंच आदर्श होते. ते 'सकलजनांचे आधारू' होते. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांचे सहकारी असलेले अनंत क्षीरसागर, व त्यांचेच भाऊ राम आणि भास्कर ही तर घरचीच होऊन गेलेली. त्याशिवाय व्यायामशाळेतील- त्यांच्याच भाषेतील राम्या कोल्हा, बन्या कुलकर्णी, गोंद्या, शंकऱ्या सिधये अशी जवळजवळ ३० ते ४० मंडळी कायम त्यांच्या सहवासात असत. शिक्षक या नात्याने त्यांच्याकडे अनेक विद्यार्थी येत आणि घरचेच होऊन जात. केतकर, नरा कुलकर्णी, पीच्या, गडकरी असे कितीतरी विद्यार्थी सतत घरात सहजपणे वावरत असत. सगळ्यांशीच आपुलकीने, जिव्हाळ्याने आणि तितक्याच थट्टामस्करीने बोलणाऱ्या दत्तूकाकांनी सगळ्यांना फक्त मदतच केली. वास्तविक स्वत:च्या विद्वत्तेवर, सत्ताधारकांच्या मदतीने या माणसाने अमाप पैसा मिळविला असता, पण हा क्षुद्र विचारही कधी दत्तूकाकाना शिवला नाही.

दत्तूकाका आणि विनूकाका हे आपटे बंधू 'रामलक्ष्मण' या नावांनी ओळखले जात. त्यापैकी विनूकाका १९८१ला गेले. सर्वांना आधार देणारे दत्तूकाका भावाच्या निधनामुळे मात्र पार खचून गेलेले आम्ही प्रत्यक्ष पाहात होतो, पण नियतीपुढे कोणी काही करू शकत नाही. एक वर्षाच्या आतच दत्तूकाकानीही जीवनयात्रा संपविली.

*(लेखक : विनायकरावांचा मुलगा, दत्तूकाकांचा पुतण्या, क्रीडाप्रेमी- माजी विद्यार्थी)*

●●●

## दत्तूकाका

-सुरेश आपटे

१० डिसेंबर १९६७ रोजीची ती एक सुंदर संध्याकाळ होती. कोयना प्रकल्पावरचे आम्ही चार इंजिनियर- तरुण, नव्या उमेदीचे. तितक्याच आव्हानात्मक कोयना प्रकल्पावर एकत्र जमून आमचे कौशल्य अजमावू पाहात होतो. रात्रीच्या उदरात काय दडलेले असते, याची कल्पना कधी कोणास नसते. उद्याची पहाट आमचे आयुष्यच बदलून उगवणार होती, हे त्या रात्रीलाच माहिती असावे. रात्र संपत आली. काही क्षणात धरणी कंप पावत आहे असे

जाणवले. खोलीच्या भिंती खळखळत ढासळू लागल्या. प्रतिक्षिप्त क्रिया व्हावी तसा मी चट्कन खिडकीतून उडी मारून बाहेर पडलो. काय झाले, कसे झाले काही कळत नव्हते. पहिला मानसिक धक्का ओसरला आणि भान आले. आमची कॉलनी पूर्णपणे जमीनदोस्त झाली होती. दिवस वर आला आणि प्रलयकारी भूकंपाचे रुद्र रूप दिसू लागले.

'भूकंप आणि त्याचा केंद्रबिंदू कोयनानगर' ही बातमी दिवस उगवता उगवता देशभर पसरली. सांगलीतील आमच्या आपटे कुटुंबात आणि तासगावच्या जोगळेकर कुटुंबात ही बातमी जणू मृत्यूची घंटाच होती. मी आणि माझा आतेभाऊ विठ्ठल जोगळेकर असे दोघे या परिसरात होतो. मृतांचे आकडे जसजसे वाढत होते तसतसा इकडे कुटुंबियांचा धीर सुटत चालला होता. दत्तूकाकानी एव्हाना वाईंगडे यांची गाडी बोलावून दोन मदतनीसांबरोबर आमच्या शोधास कोयनेला रवानाही केली होती. सुदैवाने आम्ही सुखरूप होतो.

या भूकंपानंतर मी कोयना सोडले आणि सोलापूर येथे रुजू झालो. दत्तूकाकानी स्थापन केलेल्या यशवंत सिमेंट वस्तू कारखान्यामध्ये विठ्ठल जोगळेकर दाखल झाला, काही दिवसांनी मीही त्यात सामील झालो. दत्तूकाकानी स्थापन केलेला सहकारी तत्त्वावरचा सिमेंट पाईप बनविणारा हा कारखाना. इथे हजर होतानाच 'ही नोकरी नाही, हे व्रत आहे' असे ठरवूनच आम्ही दाखल झालो होतो. ते साल १९६९-७०. दिसायला सामान्य, पण विचार केला तर फार मोठी प्रेरणादायी अशी घटना यशवंत सिमेंटच्या स्थापनेमागे होती. सांगलीमध्ये औद्योगिक वसाहतीत सिमेंट पाईपचा कारखाना होता. कामगार समस्येमुळे हा कारखाना मालकांनी बंद केला. या कारखान्यातील बेकार कामगार त्यांचा प्रश्न घेऊन दत्तूकाकांकडे आले. कामगार युनियन, कामगार प्रश्न हे दत्तूकाकांचे महत्त्वाचे क्षेत्र होते. एखादा उद्योग चालू करणे आणि तो चालवणे हा कारखानदारीचा एक भाग झाला. उद्योगाची कल्पना सुचणे; -आणि बेकारीची कुऱ्हाड कोसळलेल्या कामगारांचा प्रश्न सोडविताना अशी कल्पना सुचणे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. दत्तूकाकांच्याकडे आलेले कामगार, हे एका सिमेंट पाईप कारखान्यातील अनुभवी कामगार होते. 'तुम्हीच सहकारी तत्वावर सिमेंट पाईप कारखाना चालू करावा' असा प्रस्ताव दत्तूकाकानी मांडला. याला कामगारांचा पाठिंबा असणे साहजिकच होते. मात्र संस्था स्थापन करून प्रत्यक्ष तिथे उत्पादन सुरू होईपर्यंतच्या कामांत कामगारांची फारशी मदत मिळणार नव्हती. हे उपद्व्याप दत्तूकाकानाच करावे लागले. कामगारांची सहकारी संस्था स्थापन करणे, ती योग्य पद्धतीने नोंदणी करणे, कारखान्यासाठी जागा संपादित करणे, बाजारातून भांडवल उभे करणे, भाग विक्री, वित्तीय संस्थांची मदत ही कामे दत्तूकाकानी कामगारांच्या वतीने केली. त्यांना या कामी सहकार्य करणारे काही लोक म्हणजे बावडेकर, चव्हाणमामा, आणि 'दत्तूकाकांचा उजवा हात' म्हणून ओळखले जाणारे नामदेव कराडकर. कामगारांची सहकारी संस्था म्हणून स्थापन झाली असली तरी, त्या संचालक मंडळात सांगलीतील प्रमुख उद्योजकांचा समावेश होता. कारण कारखाना चालविण्यासाठी लागणारा अनुभव आणि नियोजन त्या लोकांकडे होते.

पाटबंधारे प्रकल्पांतून पाण्याची उपलब्धता वाढली, तसतशी लिफ्ट इरिगेशनची कामे चालू झाली. यशवंत सिमेंटला खूप ऑर्डर्स मिळू लागल्या. अल्पावधीत 'यशवंत'ने कामाचा विस्तार झपाट्याने केला. याच सुमारास दत्तूकाकांचा भाचा विठ्ठल जोगळेकर शासकीय पदाची नोकरी सोडून 'यशवंत'मध्ये दाखल झाला होता. सिमेंट पाईपखेरीज यशवंतमध्ये आणखी काय करता येईल? याचा विचार चालू होताच. कोयनेतील भूकंप, त्या धक्क्यात घरांची पडझड, त्यामुळे झालेली हानी त्यानी समोर पाहिली होती. सामान्य माणसाला परवडतील, भूकंपात तग धरू शकतील, दहा-पंधरा दिवसांत ग्राहकाच्या जागेवर उभी करता येतील अशा घरांच्या उत्पादनाची अभिनव कल्पना त्या अनुभवांतून दत्तूकाकानी मांडली. ही कल्पना दत्तूकाकाना कशी सुचली, हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल. या प्रकल्पावर संशोधन, प्रयोग असे काम विठ्ठल जोगळेकरांच्या नेतृत्वाखाली 'यशवंत'मध्ये चालू झाले. घराचे सुटे भाग-म्हणजे भिंती, छत, दारे, खिडक्या यांचे उत्पादन कारखान्यात करायचे, आणि क्रेनच्या मदतीने जागेवर नेऊन जोडायचे अशी साधारणपणे योजना होती.

तसे एक प्रायोगिक, चार खोल्यांचे टुमदार घर यशवंतच्या आवारात उभेही केले गेले. नामजोशी सरांनी दिलेल्या पहिल्या ऑर्डरमुळे या घरांच्या उत्पादनास व्यवहार्य सुरुवात झाली.

दरम्यान 'यशवंत'मधील अपहार डोळ्यासमोर येऊ लागला. तसेच तयार घरांच्या उत्पादनास तिथून विरोधही चालू झाला. पुढे जाऊन 'ही सहकारी संस्था कामगारांची म्हणून नोंद आहे. तेव्हा त्याचे व्यवस्थापन कामगारांचेच असले पाहिजे' असा तांत्रिक मुद्दा काहींनी उपस्थित करून, तत्कालीन संस्थापक-सभासदांना संचालक-मंडळातून बाहेर जाण्यास भाग पाडले. ज्या कामगारांसाठी दत्तूकाकानी धडपड करून, संस्था स्थापन करून त्यांच्या जीवनात स्थैर्य आणले, त्याच कामगारांनी दत्तूकाका आणि इतर तज्ज्ञ मंडळींचे सभासदत्व 'ते कामगार नाहीत' या मुद्द्यावर रद्दबादल ठरविले. परिणामी पुढे 'यशवंत' थोड्याच काळात बुडीत निघाली.

पण या घडामोडींतून 'शिवसदन' ही तयार घरे उभारणारी सहकारी संस्था -कदाचित भारतातील पहिलीच, चालू झाली आणि आजही उत्तम चालू आहे. याही संस्थेसाठी पुन्हा एकदा दत्तूकाकानी संस्था स्थापणे, भाग भांडवल गोळा करणे, बँकेचे कर्ज मिळवणे अशी कामे केली. दरम्यान मीपण 'शिवसदन'मध्ये रुजू झालो होतो.

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सर्वांगीण प्रगतीसाठी २० कलमी कार्यक्रम मांडला. त्यात बेघरांना घरे, हे एक कलम होते. ५०० चौरस फुटाचा प्लॉट, आणि त्यावर एका खोलीचे पक्के घर, अशी ती योजना होती. गावांनी असे प्लॉट उपलब्ध करून द्यायचे होते, राज्य शासनाने आणि सांगलीच्या साखर कारखान्याने अशा घरांना अर्थसाहाय्य करायचे अशी तयारी झाली. दत्तूकाकांचे आणि सांगली सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा वसंतदादा पाटील यांचे घनिष्ट संबंध असल्यामुळे १४०० घरांचे काम संस्थेस मिळाले. या कामांची बिले जिल्हाधिकारी यांच्याकडून न मिळता, ती बिले साखर कारखान्यानेच शिवसदनला थेट अदा करण्याचेही दादा आणि दत्तूकाकांच्यामुळेच शक्य झाले. त्या कारणाने शिवसदनची कधी आर्थिक अडचण झाली नाही.

त्या काळात सिमेंट खुल्या बाजारात मिळत नसे. आमचा उद्योग सिमेंटवरच अवलंबून होता म्हणून आम्हाला विशिष्ट कोटा असे. बागलकोट सिमेंट कंपनी आम्हाला सिमेंट पुरवीत असे, मात्र यात नियमीतपणा नसे. कदाचित कंपनी आमचा कोटा अन्यत्र वापरत असावी. दत्तूकाकाना हे कळाले तेव्हा आम्ही थेट बागलकोट येथे कंपनीत गेलो. कपूर म्हणून व्यवस्थापक होते. दत्तूकाकानी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने त्या साहेबाची हजेरी घेतली, मग मात्र सिमेंट पुरवठा सुरळीत झाला. प्रश्नाला थेट भिडणे हे दत्तूकाकांचे धोरण होते, त्याचा प्रत्यय असा येत असे.

जनावरांच्या शेणामुतापासून स्वयंपाकाचा गॅस ही अभिनव कल्पना सरकारच्या विचाराधीन आली, आणि त्यासंबंधी पाठपुरावा सुरू झाला. यातही शिवसदनचे संशोधन, दर्जा आणि संचालक मंडळाचे पाठबळ या त्रिसूत्रीमुळे आमचे गोबरगॅस प्लांट जागतिक दर्जाचे ठरले. या सर्व काळात दत्तूकाका कधीच संस्थेचे अध्यक्ष नव्हते, पण नेतृत्व त्यांचेच होते.

पुढे दत्तूकाका निवर्तले, वसंतदादा गेले, परिस्थिती बदलली. १९९५ साली मंदीमुळे मी शिवसदन सोडले आणि माझ्या व्यवसायात शिरलो. दत्तूकाका असते तर त्या मंदीवर आम्ही मात करू शकलो असतो. वीस वर्षांच्या कालखंडानंतर मला शिवसदनच्या व्यवस्थापक मंडळाने पुन्हा एकदा संस्थेची धुरा सांभाळायची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन, मी माझा बांधकाम व्यवसाय बंद करून पुन्हा 'शिवसदन'च्या कामात स्वत:ला झोकून दिले आहे. ही शिकवण दत्तूकाकांचीच आहे असे माझे प्रामाणिक मत आहे.

दत्तूकाकांच्या शब्दास बाहेरच्या जगात किती मान होता, त्याचा प्रत्यय माझ्या उगवत्या वयातच आला. मी सिव्हील इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षात होतो. त्या वर्षात एक सर्व्हे प्रोजेक्ट करावा लागत असे. त्या दिवशी लेआऊटचे महत्त्वाचे प्रॅक्टिकल अंकली येथे होते. काही कारणांनी मला उशीर झाला, आणि ठरलेली गाडी विद्यार्थ्यांना घेऊन निघून गेली. माझ्यासारखेच आणखी चारपाच विद्यार्थी होते. प्रॅक्टिकल चुकले तर आमच्या पदवीचा प्रश्न होता. ही समस्या आम्ही दत्तूकाकाना

सांगितली. त्यावेळी बर्वे नावाचे प्राचार्य होते. आम्हा चार-पाच जणांचे प्रॅक्टिकल केवळ या काकांच्या शब्दाखातर पुन्हा आयोजित केले गेले.

मोरारजीभाई देसाई आणि दत्तूकाकांची मैत्री जगजाहीर होती. स्वातंत्र्यचळवळीच्या काळात दत्तूकाकांवर इंग्रज सरकारचा डोळा होता. क्रांतिकारकांना शस्त्रे पुरवणे, स्फोटके बनविणे असे गंभीर आरोप त्यांच्यावर होते. आमच्या घरावर पोलिसांचे छापेही पडले होते. मात्र दत्तूकाका त्यात सापडले नाहीत. स्वातंत्र्यानंतर मोरारजीभाई देसाई मुंबई प्रांताचे गृहमंत्री झाले तेव्हा त्यांनी दत्तूकाकाना बोलावून याबाबत माहिती दिली, आणि 'त्या फाईलींचे काय करायचे' असे विचारले. ''आता देश स्वतंत्र झाला आहे. आणि आम्ही देश उभारणीच्या कामात वाहून घेतले आहे तेव्हा तुम्हीच याचा निर्णय घ्यावा.'' असे दत्तूकाकानी सुचविले. दत्तूकाकानीच पुढे हे आम्हाला एकदा सांगितले होते. सद्सद्विवेक बुद्धीने लोकहिताचे काम तडफेने करावे, त्याचे परिणाम वा यश यांची चिंता आपण करावी लागत नाही असा त्यांचा खाक्या होता. ती कार्यपद्धती आजही आम्हा सर्वांना आश्चर्याची, तितकीच प्रेरणादायी वाटते.

*(लेखक : विनूकाकांचे चिरंजीव, दत्तूकाकांचा पुतण्या, 'शिवसदन'मध्ये दीर्घकाळ अभियंता, बांधकाम व्यवसायिक)*

●●●

## सांगलीचे वादळी व्यक्तिमत्त्व

-शरयू सहस्रबुद्धे

इचलकरंजी? — डफळापूर संस्थानाचे धाडसी व शूर कारभारी कै.नारायणराव आपटे यांनी नाना म्हसाळ नावाच्या दरोडेखोरास पकडून, निशस्त्र करून लोकमान्य टिळकांसमोर हजर केले, व त्याचे मन वळवून देशभक्तीच्या मार्गास लावले. अशा वडिलांचे दत्तोपंत हे चिरंजीव. धाडस व देशभक्ती यांचा उपजत वारसा त्यांच्याकडे आला होता. बंगालमध्ये क्रांतिकारी संघटनेची स्थापना झाली, 'हिंदुस्थान समाजवादी प्रजातंत्र सेना' हे तिचे नाव. या सेनेत वेगवेगळ्या भागांतून अनेक तरुण सामील झाले. या सेनेतील राजगुरू पुण्याचे; सेनापती बापट-सदुभाऊ गोडबोले या लोकांच्या ओळखीमुळे दत्तोपंत आपटेही राजगुरू यांच्या संपर्कात आले. पुणे, अकोला, नागपूर अशा ठिकाणी काम करू लागले.

बलभीम व्यायामशाळा १९१७ला स्थापन झाली होती, परंतु व्यायामशाळेची स्वतंत्र जागा १९२६ साली बांधून झाली. या कामी पां.वि.रास्ते, विनायकराव आपटे, बाळकृष्ण खाडिलकर यांच्याबरोबर दत्तोपंताचा सहभाग होताच. या व्यायामशाळेच्या माध्यमातून त्यांना संघटनेचे काम करणे सोपे जाऊ लागले. तरुणांना धाडसी व बलवान बनविणे, त्यांच्यात देशभक्तीचे बीज पेरणे, व मग त्यांचा उपयोग स्वातंत्र्यकार्यासाठी करून घेणे अशा कामांसाठी व्यायामशाळा फारच उपयुक्त ठरत होती.

पुढे पुढे घरगुती अडचणींमुळे पुणे, नागपूर इत्यादी लांबच्या ठिकाणी जाणे शक्य होईना, त्यामुळे सांगलीमध्ये राहूनच त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. घरगुती अडचणी व जबाबदारी बरीच होती. पाच वर्षांचे लहान वय असतानाच वडील गेलेले. आई गेली तेव्हा दत्तोपंत पंचवीस वर्षांचे होते, परंतु तेव्हा विधवा बहीण व तिच्या तीन मुली यांची जबाबदारी होती. आणखी काही सहकारी जमवून त्यांनी यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी व प्रताप मॉडेल हायस्कूल सुरू केले. या कामाचा व प्रपंचातील अडचणींचा बराचसा भार विनायकराव यांच्यावर सोपवून, दत्तोपंत क्रांतिलढ्यात जास्त भाग घेऊ लागले.

या वेळेपर्यंत त्यांच्या कार्यामुळे व त्यांच्यावरील प्रेमामुळे अनेक नामवंत लोक संस्थेस भेटी देत असत. पं.धुंडीराजशास्त्री विनोद, शंकराचार्य कुर्तकोटी, मानवेंद्रनाथ

रॉय यांच्यापासून मोरारजीभाई देसाई, जयप्रकाश नारायण यांच्यापर्यंत बऱ्याच मान्यवरांनी सांगलीस भेटी दिल्या; त्या मुख्यत: दत्तोपंतांच्या शब्दाखातर. परिणामी विद्यार्थी व नागरिक या दोहोंमध्ये दत्तोपंत व त्यांच्या संस्थांविषयी आदर वाढला. विद्यार्थ्यांमध्ये स्फूर्ती निर्माण झाली. जेलफोडो आंदोलनांत भाग घेणारा नामदेव कराडकर हा या शाळेचा विद्यार्थी. गोवा विमोचन आंदोलनासाठी सांगलीतील पहिली तुकडी दत्तोपंतांनी तयार करून पाठविली. त्यात नामदेव कराडकर होते. दत्तोपंतांनी या तुकडीबरोबर औषधे, रुग्णवाहिका, डॉक्टर इत्यादी तरतूद करून दिली होती. हैद्राबाद चळवळीत मराठवाड्यातील क्रांतिकारक बाबासाहेब परांजपे यांना हत्यारे पुरविण्याचे काम त्यांनी केले. १९४८ साली झालेल्या दंगलीत सांगलीतील अनाथाश्रम वाचवायला गेल्यावर त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला, त्यात एक डोळा थोडा अधू झाला होता.

स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी भारत सेवक समाज, सांगलीचे भावे नाट्यमंदिर, साखर कारखाना युनियन, इतर कामगार युनियनचे काम केले. ज्यांना स्वार्थ साधायचा होता ते लोक त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांच्यापासून दूर राहिले. त्यांच्या कामाचे श्रेयही त्यांच्यापासून दूर राहिले, पण स्वत:ची तत्त्वे त्यांनी कधी सोडली नाहीत. केवळ पैशासाठी माणसे जोडली नाहीत. मोठमोठे क्रांतिकारक, राजकारणी हे त्यांच्याकडे येत; तसे साहित्य, नाट्य क्षेत्रातील कित्येक कलाकार त्यांना घरी येऊन भेटून जात. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वसंपन्न होते. कुठल्याही क्षेत्रातील माणसास ते आपले वाटत. मला त्यांची कन्या म्हणून अभिमान मिरविता आला.

*(लेखक : माहेरच्या पुष्पा आपटे, दत्तूकाकांची ज्येष्ठ कन्या)*

● ● ●

## आधारवड दत्तूकाका

-शैलजा वेलणकर

'दत्तू आपटे', 'दत्तोपंत आपटे' हे बाहेरच्या जगात कुणी काही म्हणो, आमच्या साऱ्या गोतावळ्याचे ते 'दत्तूकाका' होते. 'दत्तूकाका' म्हटले की 'विनूकाका' आलेच! सुरुवातीला ते 'ए दत्तूकाका, ए विनूकाका' होते, त्यांचे 'अहो' केव्हा झाले कळले नाही.

सुट्टीत आम्ही सारी भावंडे जमत असू. मे महिना म्हटला की आंब्याचा मोसम. मुलांच्या त्या आनंदाबरोबर दत्तूकाकाना जो आनंद होई. तो वरकरणी नसे; तर त्याची अंमलबजावणी लगेच होई. ''काय रे पोरानो, आज आमरस करायचा का?'' ''होऽऽऽ!'' मुलांचा आनंदाने होकार. तासाभरात हापूस आंब्याची मोठी करंडी दारात हजर. ''चला रे पोरांनो आमरस करायला'' असा पुकारा करत मोठे पातेले घेऊन, धोतराचा काचा घालून तेही आंबे पिळायला बसत. एकाने आंबे धुवायचे, दुसऱ्याने पुसायचे, तिसऱ्याने मऊ करून द्यायचे, आणि पिळलेल्या आंब्याच्या साली कोयी एकाने वेगळ्या करायच्या, असा सामुदायिक आमरस होई. तोपर्यंत दोन्ही काकूंचा बाकी स्वयंपाक होई. आमरस करण्यात सामील न झालेली मुले पाट-पाणी करीत. सगळ्या पंगतीत दत्तूकाकांना आमरस वाढायला आनंद वाटे. चमचा वाटी घेऊन आमरस खाणे कुणाला कधी मान्य नव्हते, म्हणून आंबरसाचे ओगराळे वाडग्यात किंवा ताटात रिकामे होई. त्यांचा आग्रहपण तसाच दांडगट. एखाद्याच्या पानात आमरस शिल्लक दिसला की लगेच, ''ए भोसडे, संपव लवकर, आणखी घालणार आहे तुला.'' असा सज्जड दम असे. 'भोसडे आणि भोसड्या' हे त्यांचे मुलांसाठी लाडके संबोधन. आमरसाप्रमाणे श्रीखंडाचे असे जेवण द्यायला त्यांना आवडे. मात्र श्रीखंडाच्या बेतासाठी मुलांऐवजी मित्रपरिवार पंगतीला

असे.

का कोणास ठाऊक, लग्नापूर्वी मला ते 'दुधोंडी' किंवा 'अव्वा' म्हणत; आणि गंमत म्हणजे, लग्नानंतर मला सासरचे गाव दुधोंडीच मिळाले.

दत्तूकाकांचे अनेक स्नेही-सोबती होते, त्यांपैकी गोपाळराव कुलकर्णी, विसूभाऊ लिमये इत्यादींसह विनूकाकांच्याकडे बऱ्याच वेळा बुद्धिबळाचा खेळ चाले. त्यांचे एक मित्र विसूभाऊ लिमये तालीम मास्तर 'डाव टाकायला' येत. ते अतिशय सरळसाधे बाळबोध स्वभावाचे होते. त्यांच्याकडून क्वचितच डाव होई, तेव्हा आनंदाने फुलून येत. परंतु ते डाव हरले की पट उधळून देत. त्यांचा लालगोरा रंग, रागाने आणखीनच लालेलाल होत असे. दत्तूकाकांचा आवडता दुसरा बैठा खेळ म्हणजे पत्ते. तो खेळही खूप उशीरापर्यंत चाले. बुद्धीच्या विकासासाठी जशी शाळा, तशी शरीराच्या विकासासाठी तालीम हवी असे त्यांचे म्हणणे.

दत्तूकाका म्हटले की माझ्या साऱ्या पिढीच्या मनात आदराची भावना उत्पन्न होते. पण माझ्यापुरते त्याला आणखी एक कारण घडले. मला काही कटू कारणांनी माझे सासरगाव दुधोंडी सोडणे भाग पडले. बाहेर पडायचे तर काही ना काही अर्थार्जन हवे. शिक्षणाशिवाय ते कसे शक्य होईल? मी माझ्या मुलाबरोबर अभ्यास करून मॅट्रिक पास झाले. शिक्षकाची नोकरी करायची तर डी.एड. व्हायलाच हवे. मग मी सांगलीत राहून डी.एड. करायचा निर्णय घेतला. इथे मोठी अडचण आली, कारण माझे वय डी.एड.साठी बसत नव्हते. माझे डी.एड.होण्याचे स्वप्नच राहणार असे वाटू लागले. इथे माझ्या मदतीला दत्तूकाका आले. त्यांच्या एका चिठ्ठीने मला डी.एड.ला प्रवेश मिळाला. डी.एड.झाल्यावर मला नोकरीची खूप गरज होती. पुढे काही अटींवर त्यांनी मला त्यांच्याच शाळेमध्ये नोकरीसुद्धा दिली. त्या अनुभवावर मला पुढे मिरज येथील कन्याशाळेत कायमची नोकरी मिळाली. माझ्याप्रमाणे दत्तूकाकांनी अनेक नातेवाईकांना आधार दिला.

रंग गोरा, त्यात उठून दिसणारे मोठे नाक; पण डोळे मात्र बारीक. या बारीक डोळ्यांतूनच त्यांना अनेकांच्या अडीअडचणी दिसत असाव्यात. घरी आले की ते हसत यायचे. कुठल्या तरी मुलाला उचलून, नाचवत उभे करायचे. त्यामुळे त्यांची भीती वाटत नसे. आमची आतेबहीण सिंधू संधीवाताने खूप आजारी होती. तिला उठताही येत नव्हते. दत्तूकाका तिला उचलून घेत. काहीतरी गमतीशीर बोलून हसवत. अशा प्रकारे ते सर्वांची सेवा करीत. दत्तूकाका असले की सर्वांना आधार वाटायचा. दत्तूकाकाना 'आधारवड' म्हणावे हे अगदी योग्य.

*(लेखक : गोपाळरावांची मुलगी, दत्तूकाकांची पुतणी, माहेरची सुधा आपटे)*

●●●

## महाबळेश्वर ट्रीप

-विनया काळे

आमचे वडील म्हणजे दत्तूकाकांचे थोरले भाऊ गोपाळ नारायण. ते किर्लोस्करवाडीजवळ स्थायिक झाले.

एक दिवस पहाटे तीन वाजता नामदेव कऱ्हाडकर किर्लोस्करवाडीस आमच्या घरी आले. दत्तूकाकांनी त्याना मला सांगलीस घेऊन येण्यासाठी पाठविले होते. दत्तूकाका माझे सख्खे काका. मी घरी किर्लोस्करवाडीत होते. प्रवास ट्रीप अशा गोष्टी आमच्या गावीही नव्हत्या. ती.काका (माझे वडील) मुलांना ट्रीपला पाठविण्याला उत्सुक नसत, आणि तशी परिस्थितीही नव्हती. हे दत्तूकाकांना माहीत होते. ''गोपा (माझे वडील) तुला कोठे पाठवीत नाही, म्हणून मुद्दाम तुला महाबळेश्वर ट्रीपला घेऊन जात आहे'', असा निरोप दत्तूकाकानी दिला होता. दत्तूकाकाना अनेक पुतणे, भाचरं होती. माझी आठवण त्यांना का व्हावी? मला काका कोठे पाठवीत नाहीत, याची काळजी त्यांना का वाटावी?... असे अनेक प्रश्न मला आजही पडतात.

कृष्णा नदीला मोठा पूर आला होता. मी सांगलीत

आलेली होते. मी, माझी आतेबहीण विमल, आणि घरातील भाच्या-पुतण्यांना गोळा करून दत्तूकाकांनी नावेतून लांबवर फेरी मारली. नाव जेव्हा पुलाजवळ येऊ लागली तसतसे त्यांनी आमची गंमत सुरू केली. आम्हाला भीती दाखवायला सुरुवात केली. आम्ही पार खचून गेलो. पाचावर धारण बसली. काठावर येऊन पोचल्यावर त्यांनी, ''हात् तुमची भवान्यांनो; येता का पुन्हा नावेत बसायला'' अशी टर उडवली.

लग्न झाल्यानंतर मी सासरी काळ्यांकडे सांगलीला आले. आम्ही यथावकाश साधे छोटे घर बांधले. पहाटे दत्तूकाका फिरायला जात. लहर आली की ते आंबेडकर रोडवरील माझ्या घरी येत. ते आले म्हणजे आमटी भाकरी हा त्यांच्या न्याहरीचा बेत ठरलेला; ते आनंदाने आस्वाद घेत.

शाळेत एकदा काहीतरी वादावादी झाली. त्या भरातच एकानी दत्तूकाकाना उद्देशून अपमानकारक शब्द वापरले. ते माझ्या कानी पडताच ते मला खूप लागले. मी माझ्या भावना तिथेही आवरू शकले नाही. दत्तूकाकानी या गृहस्थाना अडचणीच्या काळात आधार दिला होता, हे मलाही ठाऊक होते. पण तात्विक कारणाने का असेना, या थराला वाद जाऊन पोचणे मला तरी अगम्य होते.

भूतकाळात डोकावले तर अशी प्रेमळ वडीलधारी माणसे मिळाली, हेच आमचे भाग्य म्हणावेसे वाटते!

*(लेखक : गोपाळकाकांची कन्या-दत्तूकाकांची पुतणी, माहेरची सुनंदा आपटे काही काळ संस्थेत शिक्षक)*

●●●

## उत्तुंग व्यक्तिमत्व

-अशोक गाडगीळ

माझे वडील जगन्नाथ गाडगीळ, त्यांना आम्ही 'अण्णा' म्हणत असू. दत्तूकाका आणि माझे वडील नात्यांनी एकमेकांचे साडू. दत्तूकाका स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले, तो मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. याउलट अण्णा अहिंसा मार्गाने सत्याग्रहात सामील झाले होते. त्यासाठी त्यांना सहा महिने तुरुंगवास भोगावा लागला. त्यांना राजमुंद्री-आंध्रप्रदेश येथे राजकीय कैदी म्हणून ठेवले होते. ते काही असले तरी या दोघांची गाढ मैत्री होती आणि एकमेकांबाबत खूप आदर होता. अण्णांच्या सोबत तुरुंगवास भोगलेले सर्वश्रुत आचार्य जावडेकर आणि आचार्य भागवत हे आमच्या घरी येत असत, आणि त्यांना भेटण्यासाठी म्हणून अनेक समाजवादी नेते मंडळीही आमच्या घरी येत. भारतीय राजकारण या विषयावर त्यांच्या चर्चा चालत. आम्हाला तिथे उपस्थित राहाण्याचे स्वातंत्र्य होते. मी त्या गप्पांत श्रोता असे. दत्तूकाका मुंबईत कामासाठी आले की, आमच्याकडे उतरत असत. त्यामुळे आमच्या मनावर सच्चा समाजवादाचा पगडा होता आणि आहे.

साम्यवादाबद्दल मला खूप आकर्षण होते, म्हणून मी दत्तूकाकांशी एकदा या विषयावर बोललो. दत्तूकाका मला म्हणाले, 'भारतानं लोकशाही राज्यपद्धती आणि समाजवादी समाजरचना स्वीकारली आहे. भारताची आजची समाजरचना, तसंच धर्म आणि जातींचा पगडा, यांचा विचार करता रशिया आणि चीन यांनी अंमलात आणलेला साम्यवाद भारतात जशाचा तसा अंमलात आणता येणार नाही. त्याच्याशी समांतर सहकारात निश्चितच दोष आहेत; पण म्हणून ग्रामीण भागाला आणि विशेष करून शेतकरी वर्गाला गरिबीतून वर येण्यास सहकाराने मदत केली आहे हे नाकारता येत नाही. स्वत:ला साम्यवादी म्हणवणाऱ्या भारतातील नेत्यांची योग्यता पाहाता, खराखुरा साम्यवाद आपल्या जनतेच्या गळी उतरवणे शक्य नाही.''

आम्हा मुलांना आमचे आई-वडील आवर्जून सांगलीला सुट्टीसाठी पाठवत. जेणेकरून आमचे दत्तूकाकांच्या मुलांशी असलेले नाते दृढ व्हावे. सांगलीत आम्हाला दत्तूकाका

बंदूक हाताळायला देत, ती कशी चालवायची ते शिकवत. त्या काळात हा अनुभव आश्चर्यकारक आणि थरारक होता. एकदा आमच्या घरी मुंबईला आले असताना त्यांनी आम्हाला रिव्हॉल्व्हर दाखविले. त्यात त्यांनी नुसत्या आवाजाचे काडतूस घालून दिले. मला आमच्या घराच्या गॅलरीत नेऊन आकाशाकडे पिस्तुलाचे तोंड करायला सांगितले आणि 'चालव' म्हणाले. मी घोडा दाबला. धाडऽऽऽ असा आवाज झाला, आजूबाजूचे कावळे आणि कबुतरे उडाली. क्षणभर धुराचा लोट समोर पसरला. इतका वेळ गर्भगळीत झालेला मी, सर्व ठीक आहे पाहून एकदम 'रिव्हॉल्व्हर चालविले' म्हणून फुगून गेलो. दत्तूकाका पिस्तुल का बाळगत, हे त्यावेळी कळाले नाही. नंतर समजले की, दत्तूकाका कामगार चळवळ चालवितात. कामगार चळवळ म्हणजे जोखमीचेच काम. -म्हणजे स्वातंत्र्य चळवळ संपली तरी दत्तूकाकांची जोखमीची कामे चालूच होती.

दत्तूकाकांनी लिहिलेले साहित्य हे माझ्या लहानपणात आमची दृष्टी आणि मने विशाल करण्यास मदत करणारे होते. ड्यूमा, टॉलस्टॉय, डिकन्स अशा महान पाश्चात्य लेखकांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांचे, मुलांना समजेल अशा सुलभ मराठीत अनुवाद करून त्यांनी आम्हा मुलांना एक नवीन दालनच उपलब्ध करून दिले. त्यांनी अनुवादित केलेले 'तीन शिलेदार, लोखंडी मुखवटा आणि वीस वर्षांनंतर, यांची तर आम्ही पारायणे केली आहेत. आम्हीच काय पण आमचे मित्रही ती पुस्तके आमच्याकडून नेत असत.

माझ्या आईकडून ऐकलेल्या दत्तूकाकांच्या स्वातंत्र्य चळवळीतील घटना मला आजही आठवतात. माझी आई सौ.शशिकला जगन्नाथ गाडगीळ हिने कला शाखेतली पदवी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयातून १९४७ साली संपादन केली. पहिली दोन वर्षे तिने लाहोर (आजचे पाकिस्तान) इथे पूर्ण केली, कारण माझे वडील एका औषधी कंपनीत लाहोर इथे होते. फाळणीचे वारे वाहू लागले आणि हिंदू स्त्री पुरुषांच्यावर पाकिस्तानमध्ये अत्याचार चालू झाले. आईने लाहोर सोडायचा निर्णय घेतला. तिने लाहोर ते अमृतसर हा रेल्वे प्रवास एकटीने केला. ट्रेन अडवून स्त्रियांना पळवून नेऊन बाटवणे असे प्रकार सुरू झाले होते. माझी आई संपूर्ण प्रवास आजारी व्यक्तीचे सोंग घेऊन बर्थवर झोपून राहिली. तिने सोबत एक जंबिया ठेवला होता. वेळ प्रसंग आलाच तर स्वतःला संपवून घ्यायचे असा तिचा बेत होता. सेनेतील एक डॉक्टर तिच्याच बोगीत होता, म्हणून तिला हा प्रवास सहीसलामत करता आला. ती सरळ सांगलीस तिच्या बहिणीकडे आली, आणि पुढील शिक्षण तिथे पूर्ण केले. त्या निमित्ताने १९४६-४७ या काळात ती सांगलीत राहिली होती.

पोलिसांना हवा असणारा कोणी क्रांतिकारक दत्तूकाकांच्या घरी लपलेला होता. याचा सुगावा लागताच पोलीस तपासासाठी आले. दत्तूकाकांनी त्या क्रांतिकारकाला आणि आपली पत्नी यांना एकाच कॉटवर झोपायला सांगून पांघरूण घातले म्हणे. दत्तूकाकांची पत्नी म्हणजे माझी कुशीमावशी होय. पाव्हणे म्हणून आलेल्या त्या 'दाम्पत्या'ला, सभ्यतेला धरून पोलीसांनी तपासले नाही.

दुसरा एक प्रसंग आई नेहमी सांगे. दत्तूकाकांच्या घरावर पोलिसांचा छापा पडला होता, तेव्हा दत्तूकाका क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा पुरवितात, असा पोलिसांचा संशय होता. दत्तूकाकांनी तपास अधिकाऱ्याला बाजूला बोलावून घेतले आणि ते म्हणाले, 'माझा मृत्यू या कपाटात आहे' तेव्हा त्या अधिकाऱ्याने दत्तूकाकांना त्या वस्तूंची विल्हेवाट लावण्यास मदत केली आणि दत्तूकाका वाचले.

आमच्या लहानपणी आम्हाला मोठ्या लोकांचा सहवास लाभला. नातेवाईक होतेच, तसेच साहित्यिक, स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्ते, विचारवंत अशांचा त्यात समावेश होता. त्यात आमचे दत्तूकाका हे स्वातंत्र्यलढ्यात प्रसंगी प्राणावर बेतेल अशा कारवाया करणारे, आणि त्याचवेळी सांगलीसारख्या गावात बहुजन समाजासाठी शाळा स्थापन करणारे, कामगार चळवळ चालविणारे, लालमातीच्या आखाड्यात शड्डू ठोकून प्रतिस्पर्ध्याला आव्हान देणारे, आम्हा मुलांच्यासाठी उत्तम साहित्य निर्माण करणारे आणि आम्हा मुलांवर मनस्वी प्रेम करणारे दत्तूकाका हे एक विलक्षण व्यक्तिमत्व होते. कदाचित कोणाला सुपरमॅनसारखी ही काल्पनिक कथा वाटेल. मी अशी व्यक्ती दत्तूकाकांच्या रूपाने याची डोळा याची देही पाहिली आहे. म्हणून दत्तूकाकांना 'टॉवरींग जायंट' म्हणावेसे वाटते.

*(लेखक : दत्तूकाकांच्या मेव्हणीचा मुलगा, अमेरिकास्थित इंजिनियर)*

●●●

## पाठीशी असणारे सासरे

-विष्णू गोपाळ गोखले

सांगलीचे दत्तोपंत आपटे, एक कणखर कार्यकर्ते, स्वातंत्र्यसैनिक आणि कडक शिस्तीचे शिक्षक! विनायकराव आपटे हे त्यांचे वडीलबंधू. १९६० साली विनूकाकांच्या मुलीशी -प्रेमाशी माझं लग्न झालं. मी जावई झालो. कधीतरी सासुरवाडीला जायचो. विनूकाका-मामी माझ्या दिमतीला सज्ज असायचे! दत्तूकाका माझा आदर करायचे तसे चेष्टाही करायचे.

दत्तूकाकांच्या मुलीचं -पुष्पाचं लग्नही पुढं लगेचच झालं. त्या सोहळ्यात मी मंगलाष्टक रचलं. त्याचं संगीतमय काव्य त्यावेळच्या कॅसेटवरच तयार करून घेऊन आम्ही लग्नाला गेलो. माझ्या या उपक्रमाचं सगळ्यांनीच फार कौतुक केलं. लग्न मंडपात ते ऐकवण्यासाठी विनूकाका-दत्तूकाका दोघंही मला घेऊन गजानन मिलमध्ये गेले. त्यांचा टेपरेकॉर्डर आणून त्यावर हे काव्य सर्वांना ऐकवलं.

त्यांच्या गोतावळ्याचा मेळा अनुभवण्याजोगा असायचा. या दोघांनी एकवेळ यशवंत मंगल कार्यालयात धुंधुरमास म्हणजे थंडीत अगदी लवकर जेवणाचा कार्यक्रम केला. आम्हाला बोलावलं होतं. मुगाची खिचडी, वांग्याची भाजी, ज्वारी-बाजरीची भाकरी, लोणी-तूप-साखर असा मस्त बेत. सांगलीचे एकेक व्यायामपटू- पट्टीचे पोहणारे-शरीरयष्टी जपणारे मेहनती लोक, ताटात लोण्याचा गोळा मिरवत चढाओढीनं कसं आणि किती खातात हे पाहूनच मी चक्रावून गेलो.

मी कोल्हापूर जिल्ह्यात आजरे गावी होतो. एकवेळ आजऱ्याला आमच्याकडं काही अडचण निर्माण झाल्यानं ती दूर करण्यासाठी हे दोघे काका बंधू काही मंडळींसह गाडी घेऊन आले होते. ते येणार म्हणून माझी पत्नी प्रेमा हिनं सर्व तयारी करून ठेवली. पण त्यांनी आम्हालाच चकीत केलं. येतानाच त्यांनी डाळमेथीचं वरण-भाकरी आणल्या होत्या. वाटेतच कुठंतरी शेतात बसून या भोजनावर त्यांनी यथेच्छ ताव मारला आणि 'बराच माल' आमच्या घरी आणून आम्हालाही त्याचा आस्वाद दिला.

आमच्या आजरा बँकेच्या वर्धापनदिनाची स्मरणिका काढायचं ठरलं. त्यावेळी मी जाहिराती मिळवण्यासाठी सांगलीला गेलो. दत्तूकाका तातडीनं माझ्याबरोबर आले आणि परिचितांकडून सहा जाहिराती मला मिळवून दिल्या. याच बँकेच्या एका विषयासंदर्भात सहकारमंत्र्यांना भेटणे गरजेचं होतं. सोनवणे सहकारमंत्री होते. दत्तूकाकांनी त्यांच्याकडून भेटीची वेळ घेऊन मला कळवलं. त्याप्रमाणं मी मुंबईला जाऊन थेट मंत्र्याना भेटू शकलो.

मी आजरा सोडायचं ठरवलं. रत्नाप्पा कुंभार यांच्या पंचगंगा सहकारी बँकेत मी अर्ज केला. दत्तूकाकांना तसं कळवलं. पण माझी गरज आजऱ्याच्याच बँकेला असल्याचं रत्नाप्पाण्णांनी इकडे दत्तूकाकांना पटवून दिलं आणि मलाही माझा विचार बदलायला लावला. मी आजरा बँकेच्या व्यापात होतो आणि त्याचबरोबर विविध संस्थांत माझा सहभाग असल्यानं दत्तूकाका-विनूकाकांच्या सहवासात राहायचा योग कमी आला. दुर्दैवानं दोघांच्याही निधनसमयी मला हजर राहता आलं नाही याची बोचणी तर कायम मनात आहे.

*(लेखक : विनायकरावांचे, व त्यामुळे दत्तूकाकांचेही जावई, आजरा अर्बन बँकेचे माजी मुख्याधिकारी)*

●●●

## विद्यार्थ्यांचे ऐकून घेणारे सर

-मीना गो.कोल्हटकर

मी आरवाडे हायस्कूलमध्ये अकरावी(मॅट्रिक) झाल्यावर याच संस्थेच्या प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम केले. दत्तूकाकांचे अनेक पैलू आम्ही पाहिले.

मी वर्गात एक हुशार विद्यार्थिनी म्हणून वरच्या क्रमांकात असे. मला नेहमी दुसरा क्रमांक मिळत असे. खरे तर क्रीडाविषय सोडता माझे गुण पहिल्या क्रमांकाचे असत. त्यावेळी मुलींची खेळाची परीक्षा न घेता सर्वजणींना पासापुरते मार्क दिले जात. त्यामुळे इतर विषयांत चांगले मार्क असूनही मला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागे. एक दिवस ही तक्रार मी डी.एन.सरां(दत्तूकाका)कडे केली. ''मीने, तुझे म्हणणे बरोबर आहे, मात्र या घटकेला मी तुझी पी.ई.ची परीक्षा घेतली आणि गुण दिले तर, तू माझी नात आहेस म्हणून सरांनी असे केले -असा प्रचार होईल.'' मलाही ते पटले. पुढील वर्षापासून मात्र मुलींची पी.ई.ची परीक्षा सुरू झाली.

आमच्या शाळेत स्नेहसंमेलन दणक्यात असे. स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे मात्र नेहमी मंत्री, पुढारी असत. एकदा मी दत्तूकाकाना विचारले, ''असे का? आपल्या शाळेत साहित्यिक, कलाकार पाहुणे म्हणून का आणत नाही?'' त्यांचे उत्तर अगदी मार्मिक होते. ''शाळा चालवायची म्हणजे पदोपदी सरकार-दरबारी जावे लागते. अशा वेळी साहित्यिकापेक्षा मंत्रीच कामाचे असतात.''

*(लेखक : दत्तोपंतांचे बंधू हरी नारायण यांच्या मुलीची मुलगी, माहेरची मीना पटवर्धन)*

●●●

## आधारवड दत्तूकाका

-रघुनाथ पटवर्धन

वास्तविक दत्तूकाका हे माझे चुलत आजोबा. सख्खे आजोबा, म्हणजे माझ्या आईचे वडील अकाली निधन पावले. तेव्हा त्यांच्या तीन मुलांना दत्तूकाका हे एकमेव आधार म्हणून उभे राहिले. हेच प्रेम आणि आधार पुढील पिढीमध्ये पाहायला मिळाला.

माझे वडील नारायण पटवर्धन -त्यांना आम्ही दादा म्हणून असू; आणि दत्तूकाका त्यांना 'सरकार' म्हणत. माझे वडील सरकारी नोकरीत मामलेदार होते. त्यांच्या नोकरीच्या कारकिर्दीतच त्यांच्या मेंदूवर मुंबईत शस्त्रक्रिया केली. आणि ही शस्त्रक्रिया नुसतीच अयशस्वी ठरली नाही, तर दादा त्यात पूर्णपणे अपंग झाले. चालणे, बोलणे सर्व गेले. आम्ही शिकणारी सात मुले, आणि कर्ता माणूस अंथरुणावर, असा गंभीर प्रसंग. या काळात एक व्यक्ती सतत आमच्या पाठीशी होती, ती म्हणजे दत्तूकाका! अगदी वर्षभराचा दाणागोटासुद्धा ते त्यांच्या बाजारहाटाबरोबरीने करीत. आमची आई म्हणायची, ''आत्ता पैसे नाहीत.'' दत्तूकाकांचे ठरलेले उत्तर, ''तुला कोणी मागितले आहेत?''

आमच्या दादांची पेन्शन मंजूर करताना संबंधित अधिकाऱ्यांनी द्वेषापोटी चुकीची माहिती दिली. त्यामुळे दादांना न्याय्य पेन्शन मिळत नव्हती. दत्तूकाकांनी त्यांचे एक मित्र श्री.चिन्मुळगुंद (माजी जिल्हाधिकारी, सांगली) यांच्यामार्फत दादांची पेन्शनची केस पुन्हा मांडून त्यांना न्याय्य पेन्शन मिळवून देण्याचे आमच्या कुटुंबासाठी फार मोठे काम केले.

दत्तूकाका हे आमच्या समस्त कुटुंबाचे आधार होते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला त्यांनी मदत केल्याचे आता लक्षात येते.

*(लेखक : दत्तोपंतांचे बंधू हरी नारायण यांच्या मुलीचा(पिलूताईचा) मुलगा,)*

●●●

## आमचा आधार

-किशोर पटवर्धन

सांगली जिल्हा उद्योग केंद्रातील केंद्रप्रमुखाच्या केबीनमधील हा प्रसंग आहे. काही क्षणांपूर्वी अरेरावीची भाषा बोलणारा शासकीय केंद्रप्रमुख अक्षरश: तूतपूप करीत होता. दत्तूकाका त्या अधिकाऱ्याला जाब विचारीत होते. ''आमच्या देशातील हे तरुण इंजिनीयर काही करू पाहात आहेत. त्यांना प्रोत्साहन द्यायचे सोडून त्यांची अडवणूक कसली करता आहात! यांना कबूल केलेला प्लॉट ताबडतोब त्यांच्या हवाली करा; नाहीतर तुमच्याबद्दल मला तक्रार करावी लागेल.'' त्या साहेबांनी थोडी सारवासारव करायचा प्रयत्न केला. तेव्हा दत्तूकाकानी त्याच्या टेबलावरचा फोन उचलला आणि ''आत्ताच्या आत्ता दादांना (मा.वसंतदादा पाटील, तत्कालीन मुख्यमंत्री) तुम्हीच फोन लावा म्हणजे मी बोलतो.'' असा दम भरला. इतके झाल्यावर मात्र साहेब पार नरमले आणि आमचे काम झाले.

आम्ही काही इंजिनीयर मिळून स्वत:चा उद्योग चालू करू इच्छित होतो. त्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या मिरज औद्योगिक वसाहतीत आम्ही कारखान्याच्या शेडसाठी प्लॉटची रीतसर मागणी केली होती, प्लॉट मंजूरही झाला होता. ताबा घ्यायला आम्ही गेलो तेव्हा, आम्हाला डावलून आमचा प्लॉट अन्य कोणाला तरी देण्यात आल्याचे सांगितले. म्हणून आम्हाला दत्तूकाकांची मदत घ्यावी लागली. तो प्लॉट आम्हाला मिळाला नसता तर काय? -तसे आम्ही उच्चशिक्षित होतो. पुण्या-मुंबईत एखाद्या बड्या कंपनीत सहज नोकरीला लागू शकलो असतो. प्राध्यापक, सरकारी नोकरी, कार्पोरेट नोकरी करून आम्ही मस्त पेन्शन घेत बसलो असतो. पण काहीतरी वेगळे करून दाखविण्याची खुमखुमी शमवता आली नसती. आज या प्लॉटमुळे आमच्या बरोबरीने शे-दीडशे संसार चालतात, ते घडले नसते. या घटनेला पस्तीसएक वर्षे सहज झाली. स्वत:चा उद्योग उभारण्याची मजा काही औरच असते. म्हणजे पहा; व्हीआयपी रांगेतून दहा मिनिटात पांडुरंगाचे दर्शन घेणे, आणि दिंड्यापताका नाचवत, टाळ-मृदंगाच्या तालावर उन्हापावसाची तमा न बाळगता शेदोनशे मैल चालून नंतर झालेले दर्शन; दोन्हीही दर्शनेच आहेत; पण मिळणाऱ्या आनंदात जमीन-अस्मानाचा फरक आहे!!

अस्खलित इंग्रजी येणे ही काळाची गरज आहे हे मान्य. 'म्हणून मुलांनी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकले पाहिजे'- असाही एक गैरसमज आहे. मी बी.ई.च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा दिली होती. मला 'डिझाईन' हा विषय शिकविणारे प्राध्यापक माझ्या शेजारीच राहात आणि आमचे येणे-जाणेही होते. एक दिवस त्यांनी मला बोलावले. कारण डिझाईन या विषयाच्या पेपरात एका विद्यार्थ्याने उत्तम इंग्रजीचा वापर केला होता; त्याबद्दल त्यांना माझ्याशी बोलायचे होते. खरे तर इंजिनियरिंगच्या कोणत्याही विषयात उत्तम इंग्रजीचा वापर केला पाहिजे असे अपेक्षित नाही. तरीही त्या विद्यार्थ्याने उत्तम इंग्रजीचा वापर केला, म्हणजे हा विद्यार्थी निश्चितच इंग्रजी माध्यमातून शिकलेला असावा असे या सरांचे मत होते. प्रत्यक्षात तो विद्यार्थी मीच होतो!!

माझे सर्व शिक्षण मराठी माध्यमातून झाले. आठवी ते अकरावी मी सांगलीच्या गणपतराव आरवाडे हायस्कूलमध्ये होतो. ही शाळा अकरावीच्या गुणवत्ता यादीत झळकणाऱ्या विद्यार्थ्यांची नव्हती. मात्र शिक्षक कोणत्याच बाबतीत कमी नव्हते. अकरावी म्हणजे मॅट्रिकला इंग्रजी विषयासाठी 'रॅपीड रीडर' म्हणून आम्हाला महात्मा गांधी यांचे चरित्र होते. हे पुस्तक दत्तूकाका शिकवीत. त्यासाठी ते सकाळी जादा तास घेत. त्यांनी संपूर्ण वर्षात ते पुस्तक समोर ठेवून कधीच शिकविले नाही. ते आमच्याशी इंग्रजीमधून बोलत. ते आम्हाला समजण्यासारखे साधे सोपे असे. त्यामुळे इंग्रजीची भीती हळूहळू नाहीशी झाली. गांधी शिकविता शिकविता ते तत्कालीन ऐतिहासिक घडामोडींची चर्चा करीत. कळत नकळत माझे इंग्रजी सुधारत गेले; तेच माझ्या त्या बी.ई.च्या उत्तरपत्रिकेत प्रकट झाले होते! आज मी खात्रीने सांगतो की, हे केवळ दत्तूकाकांच्या त्या जादा तासामुळे घडले.

मला आजही 'त्या' प्रसंगाचा अभिमान वाटतो. शाळेच्या स्नेहसंमेलनास मोरारजीभाई देसाई प्रमुख पाहुणे होते. पाहुण्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यासाठी होणाऱ्या मार्चपास्टला माझी निवड झाली होती. मी आणि जोडीला एक विद्यार्थी एन.सी.सी.च्या गणवेषात, मोरारजीभाई देसाई यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देत होतो. बँडच्या संथ लयीत आमची पावले पडत होती. मागे मोरारजीभाई चालत होते. मार्चपास्ट संपला. बँडचा ठेका बदलला. मोरारजीभाई तडक स्टेजकडे रवाना झाले, आणि आम्ही दोघे थाड थाड बूट वाजवत आमच्या गटात सामील झालो. त्या काळी सांगलीच्या दोनच शाळांत एन.सी.सी.होती. सैनिकी शिक्षणाची गरज आमच्या शाळेने ओळखली होती. आमच्या शाळेचे आणखी एक वेगळेपण म्हणजे 'रायफल क्लब'. असा क्लब आमच्या शाळेखेरीज अन्य शाळेत असल्याचे माहीत नाही. विद्यार्थीदशेत बंदूक चालविण्याचे प्रशिक्षण व्यक्तिमत्त्वात निश्चितच भर टाकते.

मी शाळेत होतो तेव्हा माझी शाळा आर्थिक संकटातून जात होती, आणि आमचे कुटुंबही! मला स्कॉलरशिप होती, पण ती वेळेवर मिळत नसे. आमची फी भरण्याची परिस्थितीच नव्हती. दत्तूकाकानी यावर उपाय काढला, तो एका अटीवर. 'मी किशोरचा पालक म्हणून फी माफ करतो, मात्र त्याची स्कॉलरशिप मिळताच ती तुम्ही शाळेस देणगी द्यायची' सरळ साधा आजच्या भाषेत 'वीन वीन' उपाय. 'काहीतरी मिळवण्यासाठी काहीतरी त्यागले पाहिजे, कशाची तरी किंमत मोजायला हवी!'

दत्तूकाका म्हणजे माझ्या आईचे काका. चार भाऊ आणि तीन बहिणी असे आमचे नऊजणांचे कुटुंब. माझे वडील नारायणराव उर्फ दादा हे आधी सरकारी नोकरीत मामलेदार होते. साहजिकच आमचे घर चांगले खातेपिते होते. सांगली गावभागात मोठा वाडा होता. एका मोठ्या आजारपणामुळे आमच्या दादाना अर्धांगासारखा आजार झाला. ते पूर्ण परावलंबी झाले. त्यातच त्यांची नोकरी गेली. या कठीण प्रसंगी माझी आई उभी राहिली. अनेक कामे, उद्योग करून तिने संसाराचा सगळा भार उचलला. या काळात आईला नैतिक आणि मानसिक बळ कोणी दिले असेल तर, ते दत्तूकाकानी! दत्तूकाका साधारण एक दिवसाआड आमच्या घरी येऊन चौकशी करीत, धीर देत, सल्ला देत, आम्हाला परिस्थितीची कल्पना देत.

याच काळात माझ्या सख्ख्या काकांनी वाड्याची वाटणी व्हावी अशी मागणी चालू केली. त्यांना जास्त वाटा मिळायला हवा असा दबाव आणला. त्यांचे म्हणणे असे, 'मला एकच मुलगा आणि नारायणला चार मुले आहेत. तेव्हा त्याला म्हातारपणी पाहायला चार मुले आहेत पण मला मात्र एकच. म्हणून मला जास्त वाटणी हवी.' असे काहीतरी 'इमोशनल ब्लॅकमेलींग' चालू केले. आमच्या बाजूने माझी आईच उभी. इथे दत्तूकाका आमच्या मदतीला पुढे आले. काकांचा मुद्दा त्यांनी त्यांच्यावरच उलटविला. ''हरी,(काकांचे नाव) तुला लेका एकच मुलगा. तुझ्यामागं सर्व त्यालाच मिळणार. सरकारला(माझ्या वडिलांचे टोपणनाव) चार मुलं आहेत. त्यांना प्रत्येकाला चार तुकडे होऊन मिळणार. तेव्हा मोठा हिस्सा नारायणला मिळायला हवा.'' यापुढे त्यानी व्यायामशाळेच्या भाषेत 'दम देऊन'- रास्त वाटणी करून दिली.

खरे तर दत्तूकाका माझे चुलत आजोबा. आजच्या भाषेत तसे खूप लांबचे नाते. आज कुटुंबे लहान होत आहेत. एकमेकाच्या अडचणी शेअर करणे कमीपणाचे वाटते. एकमेकाला मदत करतानाही मोकळेपणा राहिलेला नाही. पुढच्या पिढीत 'आम्ही दोघं आणि आमचं एक!' अशा कुटुंब व्यवस्थेत या समस्या आणखीन भेडसावतील अशी भीती वाटते. एकत्र कुटुंब व्यवस्था जाऊन आत्मकेंद्री कुटुंबव्यवस्था आली आहे. अद्यापि सामाजिक व्यवस्था असे प्रश्न सोडविण्यास सक्षम नाही. अशा विचित्र परिस्थितीत दत्तूकाकांची आठवण आणि महत्त्व मला प्रकर्षाने जाणवते.

*(लेखक : सांगलीतील उद्योजक, दत्तूकाकांची पुतणी कमला पटवर्धन(पिलूआक्का) हिचा मुलगा)*

●●●

## राम लक्ष्मणाची जोडी

-शंकरराव सटाले

१९४८ला गांधींचा खून झाला आणि तो खुनी ब्राह्मण असल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरली. स्वत:ला 'गांधीवादी' म्हणवणाऱ्या काँग्रेस पक्षातील गुंड प्रवृत्तीचे दंगलखोर सर्व तयारीनिशी गावभागात घुसले. त्यांचे लक्ष्य सिटी हायस्कूलच्या पिछाडीस असलेला बापटवाडा होते. दत्तूकाका त्या गुंडगिरीला आडवे पडले नसते तर गावभागातील बरीच घरे खाक झाली असती. आज वयाची ९६ वर्षे मी पार केली. जन्मापासून मी दत्तोपंतांच्या गल्लीशी स्वत:च्या घरात वास्तव्य करून आहे. तो प्रसंग जसाच्या तसा माझ्या डोळ्यासमोर आहे. गांधीवादी काँग्रेसवाले म्हणवणारे गुंड जाळपोळ करीत सुटले. ब्राह्मणांची -त्यातही रा.स्व.संघाशी संबंधित घरे हे लक्ष्य होते. जमाव प्रथम विष्णू घाटावरील ब्राह्मण मुलांच्या अनाथाश्रमावर चाल करून गेला. आचार्यांनी सर्व मुले घेऊन मळीतील पिकांचा लपण्यासाठी आश्रय घेतला. ही बातमी दत्तूकाकाना कळाली. दत्तूकाका निर्भीड पैलवानगडी, -ते जमावासमोर आडवे आले. जमावाने काठ्या, गजानी त्यांच्यावर वार केले. डोके फुटून दत्तूकाका रक्तबंबाळ झाले. तोवर त्यांचे थोरले बंधू विनूकाका त्यांच्या मदतीला धावून आले. दोघांनी जमाव अडवला. आश्रमाचा नाद सोडून जमाव गावभागात घुसला. आता लक्ष्य होते बापटवाडा. त्या वाड्यात एक दत्तमंदिर आहे. तिथे पुन्हा या दोघा बंधूंनी जमाव अडविला. दत्तोपंताना मारहाण झाल्याचे नंतर वसंतदादाना कळाले. मग मात्र जमावाला परत फिरण्याचे आदेश आले, जमाव पांगला.

हा प्रसंग मी माझ्या डोळ्यांनी पाहिला आहे. मी त्यावेळी चांगला करता सवरता होतो. मला निश्चित आठवते. या दोघांखेरीज अन्य कोणी जमावाला विरोध करायला धजावले नव्हते. त्या दिवशी या दोघांनी जमाव अडवला नसता तर, सगळी गल्ली जळून खाक झाली असती. हे सांगताना आजही मला गहिवरून येते. दत्ताचे देऊळ दत्तूकाकामुळेच वाचले, म्हणून मी दत्त आपटेला हात जोडतो.

दत्तूकाका आणि विनूकाका जणू राम-लक्ष्मणाची जोडी. मी या दोघांना किमान पन्नास-पंचावन्न वर्षे तरी पाहात होतो. बलभीम व्यायामशाळेत दोघेही असत. रास्ते मास्तरांचे दोघे विद्यार्थी. दोघेही उत्तम व्यायामपटू होते. रोज संध्याकाळी दोघे तपोवनातील मारुतीला जात. उतार वयातही त्यांची चाल दमदार होती. ते रस्त्याने चालत जातानाचे दृश्य आजही माझ्या डोळ्यासमोर आहे. मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम केला आहे. त्यामुळेच वयाच्या ९६व्या वर्षी मी हिंडू फिरू शकतो आहे.

मी एक शेतकरी, एका तळावर २८ एकर जमीन होती. नागरी जमीन धारणा कायद्या(अर्बन सिलींग)मुळे जमीन गेली. त्या काळात सांगलीतील थोर म्हणवणाऱ्या नेत्यांचे खरे रूप आम्हाला पाहायला मिळाले. खूप क्लेश झाला. पण दत्तोपंताची बाब न्यारी. ते मनातून-व्यवहारांतून निर्मळ वागत.

*(लेखक : दत्तोपंतांचे गल्लीस्नेही, प्रयत्नवादी शेतकरी)*

●●●

# मिठाईच्या घरात पु.ल.

-श्रीनिवास शिंदगी

मॅट्रिक झाल्यावर पुढे शिक्षण घेणे परवडण्यासारखे नव्हते; म्हणून नुकत्याच चालू झालेल्या 'गणपतराव आरवाडे हायस्कूल'च्या प्राथमिक शाखेत मी शिक्षक म्हणून रुजू झालो. या शाळेचे अध्वर्यु बी.जी.नाईक आणि डी.एन.आपटे यांचा परिचय झाला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव -कळत न कळत माझ्यावर पडला. या शाळेत मी अल्पकाळ काम केले. त्या शाळेत अभ्यासापेक्षा कलागुणांना जास्त महत्त्व असे. माझ्या लिखाणाला इथे संधी आणि प्रोत्साहन मिळाले.

१९६९ साल असावे. त्या सालचा 'विष्णुदास भावे स्मृती पुरस्कार' पु.ल.देशपांडे यांना जाहीर झाला होता. भावे नाट्यमंदिरचे दत्तोपंत कार्यवाह असावेत; त्यांनी एक दिवस मला शाळेत बोलावून घेतले. त्यावेळी मी सांगली शिक्षण संस्थेच्या विटा येथील शाळेत होतो. ''हे बघ, पुरस्कार वितरण समारंभाच्या प्रसंगी तुझं बालनाट्य झालं पाहिजे. काहीही कर, पण प्रयोग सादर कर. तू उत्तम लिहितोस मला माहीत आहे.'' असा आदेशच दिला. ''अहो पण, मोठ्या लेखकाचे एखादे प्रसिद्ध नाटक सादर करण्याची परंपरा आहे.'' ''ते काहीही असूदे, यावेळी तुझं बालनाट्य झालं पाहिजे.'' दत्तोपंतानी बजावलं.

मी आरवाडे हायस्कूलमधील नोकरी सोडून आता बरीच वर्षे झाली होती. त्यांच्या शाळेतही उत्तम लेखक, नट, दिग्दर्शक असताना त्यानी मला का बोलाविले, हे त्या वेळी मला समजण्यापलीकडचे होते. हा प्रयोग यशस्वी करण्याचा आम्ही सर्वांनीच चंग बांधला आणि कामाला लागलो. दत्तोपंताचे आमच्यावर बारीक लक्ष असे. ते आम्हाला काही कमी पडू देत नसत. मध्येच एक दिवस दत्तोपंतांचे पुन्हा बोलावणे आले. ''हे बघ उद्या सकाळी शाळेत ये, आपल्याला पु.लं.ना बोलावणं करायला जायचं आहे. तू पु.लं.ना नाटकाच्या प्रयोगाला येण्याचं निमंत्रण द्यायचं.'' माझे तत् पप् होऊ लागले. कुठे इतका मोठा लेखक आणि कुठे मी! ''नाटक रंगमंचावर होईल, त्याचा लेखक सगळ्यांसमोर आला पाहिजे. खरे तर हा तुझाच मान मी तुला देत आहे.'' कला आणि कलाकाराबाबतची दत्तोपंताची आस्था विस्मयकारक होती.

पुलंशी त्यानी माझी ओळख, एक बालनाट्य लेखक अशीच करून दिली. पु.ल.म्हणाले, ''बालनाट्य करायचं मात्र माझ्याकडून राहून गेलं.'' आमची ही भेट तब्बल तासभर चालली. दत्तोपंत त्यांच्याशी सर्व विषयांवर स्वैर बोलत होते. मी प्रयोगाला येण्याचे पु.लं.ना निमंत्रण दिले. इथे पुन्हा एक समस्या आली. पु.लं.ना पूर्वनियोजित कार्यक्रमास कोल्हापूरला जायचे होते. पण दत्तोपंतानी ठरविले तर ते होणारच! ''हे बघा, तुमच्याकडून बालनाट्य करायचं राहून गेलं ना? तेव्हा या प्रयोगाला हजर राहून थोडीफार उणीव भरून काढता येईल!'' कोल्हापूरला फोन करून पु.लं.नी चक्क त्यांचा पूर्वनियोजित कार्यक्रम रहित केला. पु.लं.चे वाक्य अजूनही मला आठवते, ''तुमची मात्रा लागू पडली. दत्तोपंत, तुम्ही जिंकलात.'' पु.ल.'मिठाईच्या घरी' येऊन गेले. बालनाट्य झालेच, तेही तिकीट लावून झाले... टाळ्यांच्या कडकडाटात रंगमंचाचा तो लाल भव्य पडदा पडतो ना पडतो तोच, पु.ल.देशपांडे रंगमंचावर अवतरले. 'काय घडले, हे कसे घडले' म्हणेपर्यंत पु.ल.नी मला गाठले आणि नाट्यप्रयोगाबद्दल अभिनंदन केले. आपल्या खास शैलीत म्हणाले, ''ही मिठाई फक्त सांगलीकरांनाच खाऊ घालू नका. साऱ्या महाराष्ट्राला खाऊ घाला. आणि हे पहा, या नाटकातील हे शिरीष-पुष्प मला द्या.'' आमच्या नाटकातील एक बालकलाकार शिरीष उकिडवे याने पु.लं.ना मोहित केले होते. माझ्या आयुष्यातील हा परमोच्च क्षण होता. मराठी साहित्यातील एका महान लेखकाकडून माझे असे कौतुक व्हावे, याचे मला आजही आश्चर्य वाटत आहे.

भावे नाट्यमंदिर संस्थेचे दत्तोपंत संचालक होते. त्यांच्या काळात भावे नाट्यमंदिर या संस्थेने अनेक उपक्रम घेतले. 'अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समिती सांगली' यांच्या वतीने नाट्याचार्य खाडिलकर जन्मशताब्दी महोत्सव, राम गणेश गडकरी नाट्यमहोत्सव असे काही

उपक्रम आठवतात. सांगलीच्या नाट्यक्षेत्रात त्यानी नवचैतन्य निर्माण केले. माझ्यासारख्या कलाकाराला 'भावे नाट्य' म्हणजे जिवंत व्यासपीठ होते. पुढे काही घटना घडल्या आणि दत्तोपंताना भावे नाट्यमंदिरच्या व्यवस्थापनातून बाहेर पडावे लागले. संस्था आपल्याच ताब्यात ठेवण्याचे राजकारण दत्तोपंताना कधी जमले नाही.

भारत स्वतंत्र झाला, तो देशाचे दोन तुकडे होऊन! माझ्यासारख्या संवेदनशील व्यक्तींना ते खूप उद्विग्न करणारे ठरले. याच उद्विग्न मन:स्थितीत मला 'भारतमातेचे शोकगीत' हे काव्य स्फुरले. मी, बाळ कारंजकर आणि सहकाऱ्यांनी मिळून एक संगीतिका तयार केली. गांधी हत्या आणि जाळपोळीचे सावट शहरात होते. त्यात असले काहीतरी सादर करून नवीन संकट ओढवून घेण्याचे धाडस आमच्यात नव्हते. दत्तोपंताना आमचे विचार पटले होते. हे लोकांसमोर आलेच पाहिजे असा ठाम निर्णय त्यांनी घेतला. लोकांत कुजबूज चालू झाली. कटआऊट आणि अन्य साधने अशी व्यवस्था सरांनी आम्हाला लगेचच करून दिली. ही संगीतिका नुसतीच यशस्वी झाली नाही तर, ती पुढे गोवा मुक्तीसाठी निधी उभा करू शकली. दत्तोपंत काँग्रेसचे, पण तरीही आमच्या संगीतिकेचा कार्यक्रम सांगली अर्बन बँकेच्या हॉलमध्ये झाला. ती बँक संघविचाराच्या लोकांची होती.

भारत स्वतंत्र झाला तरी आमचा गोवा पारतंत्र्यात होता. 'केसरी'मधून एक कविता प्रसिद्ध झाली, 'नगर नगर की डगरसे निकल पडी है टोलीयाँ' बाळ कारंजकर यानी त्या गीताला चाल लावली. एक प्रेरणादायी गीत बसले. आम्ही आठदहा जण रात्री बाहेर पडत असू. रामभाऊ चिपळूणकर तबला जोरात वाजवीत, तसे लोक बाहेर येत. मग आमचे गीत सादर होई. या टोळीत सावईकर, भाऊ गद्रे असे सहकारी असत. दत्तोपंत आमच्यासोबत असत. असल्या उपद्व्यापातून आम्ही चांगला निधी जमविला आणि दत्तोपंतांच्या हस्ते गोवा स्वातंत्र्यनिधीसाठी अर्पण केला.

धर्म, जात असल्या गोष्टी दत्तोपंतांच्या लेखी अजिबात नसत. समाजातील सर्वांना ते बरोबर घेऊन जात. तो काळ ब्राह्मण समाजास अतिशय कठीण होता. ब्राह्मणांचे समाजातील स्थान डळमळीत होते, आपल्या बुद्धीच्या बळावरच पुढे जाणे त्याना भाग होते. दत्तोपंत या काळात रास्त गोष्टींसाठी या समाजाच्या पाठीशी होते. एक प्रसंग मला आठवतो. मी त्यावेळी प्रताप मॉडेल हायस्कूलमध्ये नोकरीत होतो. शिंदे नावाचे एक शिक्षक होते. ते 'सत्यशोधक समाजा'चे कार्यकर्ते होते. सतत काही ना काही कारण करून ते ब्राह्मणांवर टीका करीत. हा त्यांचा उद्योग विद्यार्थ्यांसमोरही चाले. शाळेत बहुसंख्य विद्यार्थी ब्राह्मणेतर असत. या त्यांच्या वाकुडपणाचा खूप वाईट परिणाम शाळेतील वातावरणावर होत असे. असा वाद एकदा चालू असतानाच दत्तोपंत तिथे आले. शिंदे सरांचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला. इतकेच नव्हे तर वादविवादाचे आव्हान दिले. ''मी एक ब्राह्मण आहे; तरीही तुम्हाला नेमून घेतले. तुम्हाला नेमताना तुमचे ज्ञान विचारात घेतले, जात नव्हे!'' असे त्यास सुनावले.

गांधीहत्येनंतर जळीतग्रस्तांच्या पाठीशी दत्तोपंत ठाम उभे होते, असे आम्ही पाहिले आहे. त्या संदर्भात मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्या दोन सभा दत्तोपंतांच्या पुढाकाराने सांगलीत झाल्या. त्या सभेत मोरारजी देसाई यांनी त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची असल्या कृत्याबद्दल हजेरी घेतली. 'जाळपोळ करणाऱ्यांची चूक माफ करावी आणि त्यांना मुक्त करावे' अशी त्यांच्याकडे मागणी केली गेली. ''मी इथे काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी म्हणून आलेलो नाही; मी इथे प्रशासक - जनतेचा सेवक म्हणून आलो आहे. जर तुम्हाला माफ केले तर उद्या मला साऱ्या जनतेला जाब द्यायचा आहे'' असे व्यासपीठावरील नेत्यांना आणि समोरील श्रोत्यांना मोरारजींनी सुनावले. याउलट आज आपण काय पाहतो? कोणीही उठतो, सार्वजनिक मालमत्तेची होळी करतो, आणि नंतर माफी मिळवून पुढारी बनतो.

दत्तोपंतांचे शैक्षणिक क्षेत्रातील काम गणपतराव आरवाडे हायस्कूलच्या रूपाने सर्वांसमोर आहेच. त्यांच्या शाळेत एस.टी.सी.कोर्स सुरू होता. हा कोर्स मॅट्रिकनंतर शिक्षक होण्यासाठी आवश्यक होता. मला ठरवूनच शिक्षक व्हायचे होते, म्हणून मी तो कोर्स केला. एकदा मी पाठ घेत असताना दत्तोपंत बाहेर उभे राहून माझा पाठ ऐकत होते. इतिहास विषयाचा पाठ, आणि धडा होता 'सम्राट अशोक'. मी पाठ्यपुस्तकाबाहेरील माहिती मुलांना देत होतो. ती मी इतर काही पुस्तके वाचून मिळविली होती. 'सम्राट अशोक हा क्रूर आणि कुरूप होता'

अशी ती माहिती होती. पाठ संपताच सरांनी माझे कौतुक केले आणि 'असेच काम करीत रहा' असा सल्ला दिला. एरवी इतरत्र असली खरी माहिती मुलांना दिल्याबद्दल माझी कानउघाडणी झाली असती. प्रताप मॉडेल आणि नंतर आरवाडे हायस्कूलमधील वातावरण अत्यंत मोकळे आणि खेळीमेळीचे असे. आम्ही सर्व एका कुटुंबाचे सदस्य आहोत असे वाटे. दत्तोपंत स्वत:च उत्साहाचा झरा होते. ते वातावरण भारून टाकीत. शाळेत शिक्षक पारखून घेतले जात, पण त्याची जात, पदवी यांपेक्षा त्याची शिकविण्याची पद्धत, हातोटी, विचाराची बैठक याला महत्त्व असे.

दत्तोपंत नेहमी जैन बोर्डींगमध्ये येत, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत. आम्ही त्यांचे व्याख्यान ऐकायला आवर्जून जात असू. त्यांच्या भाषणाने भारून जात असू. त्यांच्याकडे तत्त्व होते, वक्तृत्व होते, संघटन-कौशल्य होते, अनुभव होता. मला तेव्हाही वाटत असे आणि आजही वाटते, दत्तोपंत मतलबी राजकारणी असते तर कोठच्या कोठे पोचले असते!

*(लेखक : बालनाट्य संस्थेचे संस्थापक-संचालक, निवृत्त शिक्षक, व्यासंगी अभ्यासक)*

●●●

## दत्तूकाकांशी संवाद

-डॉ.पी.जी.आपटे

ना मी त्यांचा विद्यार्थी, ना त्यांच्या अनेक उपक्रमांतील कार्यकर्ता! माझा आणि दत्तूकाकांचा पहिला संबंध आला, तो माझ्या लहानपणी; माझे थोरले बंधू शंभूराव उर्फ दादा यांच्यामुळे आला. दादा बलभीम व्यायामशाळेत जात. मीही त्यांच्यासोबत जात असे. तिथे व्यायाम, कसरती, मल्लखांब असे खेळ चालत. दत्तूकाकांच्या हातावर दादांनी(शंभूराव) बॅलन्स केल्याचे मला आठवते.

१९६२ साली मी माझे हॉस्पीटल मारुती रोडवरील आमच्या वाड्यात चालू केले. दत्तूकाकांचा तोच शाळेस येण्याजाण्याचा मार्ग. या काळात साधारण एक दिवसाआड आमची भेट होत असे. मी हॉस्पिटलच्या दारात आणि दत्तूकाका रस्त्यावर, असे आमचे संभाषण चाले. १९६३ साली मी शाळेचा कौन्सिलर झालो, तेही दत्तूकाकांच्या आग्रहाखातर. एकतर मी अशा कामात रस घेणारा नव्हतो, आणि दुसरे म्हणजे या शाळेशी माझा कोणताही संबंध नव्हता. मी दत्तूकाकांना म्हणालोही की, ''मला शिक्षणक्षेत्रातील काही कळत नाही, आणि मी या शाळेचा विद्यार्थीपण नाही.'' तेव्हा दत्तूकाका म्हणाले ते आठवते, ''म्हणूनच तुमच्यासारखे कौन्सिलर हवे आहेत.'' त्या काळात शाळेत काहीतरी बिनसले होते, असे त्यांच्या बोलण्यावरून मला वाटे.

दत्तूकाकांची अनेक क्षेत्रांतील कामे मी पाहिलेली आहेत, आणि त्यावर आमच्या चर्चाही झाल्या आहेत. वयाने आणि अनुभवाने मी त्यांच्यापेक्षा खूपच लहान असलो तरी, ते काम करीत असलेल्या अनेक क्षेत्रांतील घडामोडी ते मला सांगत. आम्ही त्या विषयांवर बोलतही असू. मनातील विचार कोठेतरी मोकळे करावेत असे त्यांना कदाचित वाटत असावे; तसेच त्यासाठी मी योग्य व्यक्ती आहे असेही वाटत असावे! माझे हे भाग्य, असे मी समजतो.

डॉ.धनपाल आरवाडे यांचा फोन आला आणि मी हातातील काम टाकून, त्यांचा दवाखाना गाठला. दत्तूकाकाना मॅसीव्ह हार्टॲटॅक आलेला होता. मी तिथे जाताच शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांना हार्टमसाज केला. आश्चर्य म्हणजे दत्तूकाका पुन्हा काही क्षण शुद्धीवर आले, माझ्याशी बोलले. काय बोलले ते दुर्दैवाने आठवत नाही; पुढच्या क्षणी त्यांची प्राणज्योत मालवली. दत्तूकाकांवर मी डॉक्टर म्हणून केलेला तो पहिला आणि शेवटचा उपचार! दत्तूकाका अखेरच्या क्षणी कोणाशी बोलले असतील, तर ते माझ्याशी! काही विशेषसे कारण नसताना सुरू झालेला हा संवाद दिनांक १ फेब्रुवारी १९८२च्या संध्याकाळी संपला.

*(लेखक : सांगलीतील पहिले एफआरसीएस, प्रखर बुद्धिवादी शल्यविशारद)*

●●●

## केंद्रीय मंत्र्याकडे शिफारस

-माधव खाडिलकर

दत्त आपटे एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होतं. रस्त्याच्या एका बाजूनं तालबद्ध पावलं टाकत एकाकीपणे चालणारे आपटे सर सांगलीच्या नजरेत पक्के विसावले आहेत. असं उंचपुरं व्यक्तिमत्त्व पाहिलं की एक गंभीर आणि काहीसं गूढ वातावरण मनात भरून राहायचं.

भावे नाट्यमंदिरात नाट्यविषयक चळवळीत असलेले डॉ.मधू आपटे याना मी मनोमन गुरुस्थानी मानत असे. अण्णासाहेब कराळे यानी भावे नाट्यमंदिराचा ताबा घेण्याआधी प्रायोगिक वा हौशी नाट्यप्रयोग करण्यासाठी आम्हाला आपटेसर आणि शाहीर निकम यांचाच आशीर्वाद लाभत असे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय नाट्य विद्यालयातून (नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा) नाटकाचं शास्त्रोक्त शिक्षण घ्यावं असा विचार झाला. मी त्यावेळी नुकतीच पंचविशी ओलांडली होती. मुलाखतीसाठी दिल्लीला जायचं, तर किमान हजार रुपयांची आवश्यकता होती. मी दत्त आपटे सरांना भेटलो आणि काय आश्चर्य! सांगलीतील एक तरुण मुलगा, इब्राहीम अल्काजींकडे नाट्यकला शिकण्यासाठी दिल्लीला जातो आहे हे समजताच आपटे सरांनी मला शंभर रुपये अर्थसाहाय्य केलं. कित्येक मित्रांनी सहकार्य दिलं. मी मुलाखतीत उत्तीर्ण होऊन राष्ट्रीय शिष्यवृत्तीचा मानकरी झाल्याचं कळताच सराना खूप आनंद झाला. सुटीत सांगलीला आल्यानंतर मी सराना नमस्कार करायला जात असे.

१९७०मध्ये राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या नाटकांचा कलकत्ता, मद्रास, बेंगलोर, पुणे, मुंबई असा भारतव्यापी दौरा होता. त्या दौऱ्यात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जर्मन नाट्य दिग्दर्शक फ्रिट्ज बेनेविट्झ् हे देखील होते. पाश्चात्य नाटकांचा अनुभव माझ्यासारख्या तरुणांना लाभावा ह्या विचारानं फ्रिट्ज यानी मला दरमहा १००० जर्मन मार्क्सची शिष्यवृत्ती आणि प्रवासखर्चाबरोबरच तेथील दीड वर्षाच्या निवास भोजनाची व्यवस्था तर स्वखर्चातून केली होती. बेंगलोरहून पुण्याला येताना फ्रिट्ज बेनेविट्झ् यांना विष्णूदास भावे नाट्यमंदिर पाहावेसे वाटले. दत्त आपटे सरांना पूर्वकल्पना दिली होती. सांगलीतील हितचिंतक रंगकर्मींनी दत्त आपटेंच्या अध्यक्षतेखाली फ्रिट्ज यांचा जाहीर सत्कार करून त्याना विष्णूदासांचे छायाचित्र प्रदान करण्याचे ठरविले होते. ही खरोखरच ऐतिहासिक महत्त्वाची घटना म्हटली पाहिजे. सांगलीतील भावे नाट्यमंदिरात जर्मन नाट्यदिग्दर्शकाचा सन्मान. दत्त आपटे सरांचं इंग्रजीमधील नितांत सुंदर भाषण! वा! न भूतो... असाच हा प्रसंग!

विष्णूदास भावेंचे आणि कृ.प्र.खाडिलकरांचे अशी दोन्ही छायाचित्रे फ्रिट्ज बेनेविट्झ् यानी वायमार येथील जर्मन नॅशनल थिएटरमध्ये अभिमानाने प्रदर्शनीय लावलेली होती.

१९६८मध्ये दिल्लीला शिक्षणासाठी एक गरीब परिस्थितीतील होतकरू मुलगा जातो आहे हे ऐकताच त्यांनी मला बोलावून घेतले आणि माझ्या हातात दोन शिफारसपत्रे ठेवली. एक पत्र होते केंद्रीय मंत्री श्री.मोरारजी देसाई याना, आणि दुसरे होते यशवंतरावजी चव्हाण साहेबांना! सारांश असा होता, ''तो सुसंस्कारित घरातील असला तरी आर्थिक दुर्बळ आहे. त्याला मोठ्या शहरी वातावरणाचा अनुभव नाही. काही अडचण आल्यास त्याला सुहृदयतेने सहकार्य करावे ही विनंती.'' त्या पत्रांचा मला उपयोग करण्याची पाळी आली नसली तरी दिल्लीच्या वास्तव्यात ती पत्रे लाख मोलाच्या चिलखतासारखी वाटत होती.

सांगलीतील एक मध्यमवर्गीय मुख्याध्यापक केंद्रीय मंत्र्यांना पत्रे लिहून माझी काळजी करतो ही कल्पना कोणाही सांगलीकराला गोड, सुखद धक्का देणारी आहे. त्या ऋणाचा मला अभिमान आहे.

*(लेखक : मराठी रंगभूमीचे अभ्यासक कलाकार)*

●●●

## नाट्यअभ्यासक दत्तोपंत

-मधु आपटे

मी तसा सांगलीजवळच्या डिग्रज गावचा. पुणे-मुंबई करीत डॉक्टर झालो. सांगलीतच प्रॅक्टीस करायची या इराद्याने सांगलीत दाखल झालो. ते साल १९६३-६४. त्यापूर्वी मी पुण्यात अनेक नाटकांतून काम करीत होतो. पुण्यातील नाट्य-चळवळ जवळून पाहात होतो. डॉ.श्रीराम लागू, विजया मेहता, जब्बार पटेल यांचा प्रभाव आम्हा तरुणांवर होता. मी सांगलीत नवीन आलो होतो. पुण्यात एकदा माझ्या परिचिताने मला 'दादा काय म्हणतात' असे विचारले, तेव्हा मी त्यांना प्रतिप्रश्न केला, 'कोण दादा?' -इतका मी सांगलीत नवीन होतो. सांगलीत डायमंड बुक स्टॉलचे माधव गाडगीळ, अप्पा पोंक्षे, शाम लिमये हे स्नेही नाटकांत काम करणारे नव्हते, पण इतर कामांत ते मला खूप मदत करीत. नाट्य पंढरीच्या परंपरेला धरून त्या काळात पारंपरिक नाटके होत होती, आणि ती आम्ही करीतही होतो. अजून या पंढरीला पुण्या-मुंबईत सुरू झालेली प्रायोगिक नाटकाची ओळख झाली नव्हती.

दत्त आपटे त्यावेळी 'भावे नाट्यमंदिर' या संस्थेचे कार्यवाह होते. त्यांचे नाट्य क्षेत्रात येणेही तसेच नाट्यमय होते. 'भावे'मधील संचालक मंडळातील वाद विकोपास गेलेले होते. एकमेकांवर दावे लावण्यातून नाट्यगृहाला एका गटाने कुलूप ठोकण्यापर्यंत प्रकरण गेले होते. नाट्य-पंढरीतील विठोबाचे देऊळ बडव्यांच्या वादात भक्तांना बंद झाले होते. कोर्टाने कुलूप काढण्याचे आदेश दिले खरे, पण वाद चालूच होते आणि कोणी कोणास जुमानत नव्हते. याच काळात सांगलीचे प्रख्यात उद्योजक आणि व्यापारी मा.गणपतराव आरवाडे यांनी दत्त आपटे यांना नाट्यमंदिराचे कार्यवाह म्हणून पाचारण केले. सांगलीच्या सार्वजनिक तसेच राजकीय क्षेत्रांत वजन असलेला खंबीर प्रशासक संस्थेला हवा होता. गणपतरावाना 'यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष' या नात्याने त्यांच्या कामाचा वकूब माहीत होता. दत्तोपंतांच्या येण्याने एक झाले, ते म्हणजे रंगमंच नांदू लागला. ते कार्यवाह असताना नाट्याचार्य खाडिलकरांची जन्मशताब्दी मोठ्या दिमाखात साजरी झाली. त्या निमित्ताने महाराष्ट्रातील थोर नाटककारांनी सांगलीस भेटी दिल्या. त्यांच्याच काळात पु.ल.देशपांडे यांना 'भावे गौरव पुरस्कार' देण्यात आला. त्यात माझ्यासारख्या हौशी कलाकाराला रंगमंच मिळाला हे सर्वांत महत्त्वाचे वाटते.

'खून पाहावा करून' हे सरिता पत्कीलिखित नाटक बसवावे असा आम्ही घाट घातला खरा, मात्र त्यावेळचे अध्यक्ष विनायकराव उर्फ आबा पाटणकर यांच्यापासून आमच्या या प्रस्तावाला कचऱ्याची टोपली, सर्वच संचालकांनी दाखविली. इतकेच नव्हे तर 'मराठीत इतकी चांगली नाटके असताना असली फालतू नाटके आमच्या इथे अजिबात चालणार नाहीत' असा सज्जड दम दिला. यांतून दत्तोपंत आपटे हेच मार्ग काढतील, असा सल्ला कोणीतरी दिला म्हणून आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो. मी आणि माझे नाटकवाले सहकारी, गणपतराव आरवाडे हायस्कूलमधील दत्त आपटे यांच्या कार्यालयात त्यांना भेटायला म्हणून पहिल्यांदा पोचलो. विषय होता भावे नाट्यमंदिरच्या वतीने नाटक बसवायला परवानगी मिळावी. प्रथमदर्शनी त्यांचा उग्र चेहरा पाहून आपले काम काही होणार नाही असे मनातल्या मनात समजूनच आम्ही त्यांच्या खोलीत शिरलो. आम्ही काय बोलतो आहोत याचा विचार न करता त्यांनी आमच्यावर हल्लाच चढवला. ''शिक्षण, अभ्यास, कामधंदा सोडून हे नसते उद्योग तुम्हाला कोणी सांगितले?'' खरेतर मी स्वत: डॉक्टर होतो, आणि माझे क्लिनिकसुद्धा व्यवस्थित चालू होते. माझा आणखी एक सहकारी मुकुंद फडणीस तोही डॉक्टर आणि सरकारी नोकरीत. असे असताना त्यानी आमचा असा पाणउतारा करणे हे चीड आणणारेच होते. त्याचे खरे कारण नंतर समजले. त्यांचा एक लाडका विद्यार्थी आणि मित्राचा मुलगा शाळा सोडून नाटकांत कामे करीत होता; तो राग त्यांनी आमच्यावर काढला असावा. त्या घटनेपासून 'दत्त आपटे हे सांगलीच्या सामाजिक क्षेत्रात कितीही मोठे असले तरी, त्यांना नाटक या कलेविषयी काही माहिती तर नाहीच आणि आदरसुद्धा नाही' अशी माझी ठाम समजूत झाली होती. जरी माझ्या या समजुतीला छेद देणारे अनेक प्रसंग मी त्यानंतर

अनुभवले, तरीसुद्धा 'फर्स्ट इम्प्रेशन इज लास्ट इम्प्रेशन' म्हणतात तसेच काहीसे झाले. त्यांचा तो पहिला हल्ला आम्ही चिकाटीने झेलला, आणि मग संवाद सुरू झाला. आमची कल्पना दत्तोपंतानी उचलून धरली आणि 'लागा तयारीला' असा आदेश दिला. अजून आमच्या मनात भीती होतीच की, बाकीचे संचालक काय म्हणतील! 'त्याची तुम्ही काळजी करू नका; ते मी पाहतो!' म्हणून आमची शंका दत्तोपंतानी क्षणात दूर केली. आम्ही कामाला लागलो, तरी खर्चाचा प्रश्न सुटलेला नव्हता. दत्तोपंतानी तीही अडचण थोडीफार दूर केली, खर्चासाठी दोनशे रुपयेही मंजूर केले.

सांगलीत त्यावेळी स्त्री भूमिका करणारे कलाकार नव्हते, ते आम्हास कोल्हापुरातून आणावे लागत, आणि त्यांना मानधनही द्यावे लागे. याचा विचार करता ती रक्कम त्यांच्या मानधनालासुद्धा पुरणार नव्हती. काही वर्षांपूर्वी आम्ही 'राजसंन्यास' हे राम गणेश गडकरी यांचे ऐतिहासिक नाटक बसविले होते. आमचे नशीब; - कला, जात, धर्म आणि राजकारण असली खिचडी करणारी मंडळी त्यावेळी नव्हती! आणि तसे झालेच असते तर ते खपवून घेणारे सरकारही त्यावेळी नव्हते!! दत्तोपंतांच्याही स्वभावाला ते न पटणारे होते; आणि अशा विरोधाला त्यांनी भीकही घातली नसती! -तर त्या नाटकाकरिता काही स्त्री पार्टी आम्ही कोल्हापुरातून मानधन देऊन बोलाविल्या होत्या आणि त्यामुळे आमचे बजेट साफ कोलमडले होते. 'खून पहावा करून'च्या निमित्ताने आता पुन्हा एकदा हेच प्रश्न उभे ठाकले. त्यावेळी दत्तोपंतांनी दिलेला सल्ला म्हणजे, 'तुम्ही या भूमिकांसाठी सांगलीतील कलाकारांना तयार करा, म्हणजे प्रश्न कायमचा सुटेल.' मी पुढाकार घेऊन कु.नलिनी आठवलेला त्याकरिता तयार केले, आणि आमचा तो प्रश्न सुटला. तरीही दोनशे रुपयात नाटक शक्य नव्हते. आम्ही पदरमोड करून तालमी चालू ठेवल्या होत्या. अखेर पुन्हा दत्तोपंत मदतीस आले. त्यांनी त्यांच्या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने तिकीटविक्री करून हा प्रयोग हाऊसफुल्ल केला. नाटकाचा सर्व खर्च वजा जाता आम्ही संस्थेस काही रक्कम देऊ शकलो होतो. या यशस्वी प्रयोगाची चर्चा आणि कौतुक सर्व वृत्तपत्रांत झाले. आमच्यापैकीच एकाने 'वाचकांच्या पत्रा'त याचे सर्व श्रेय दत्त आपटे यांना दिले; पण हे मात्र दत्तोपंताना रुचले नव्हते; त्यांनी तसे एकदा बोलून दाखविले.

या प्रयोगानंतर मीही उत्साहाने कामाला लागलो. 'प्यादी झाली फर्जंद' हे नारायणराव पेशवे यांच्या खुनावर आधारित नाटक मी लिहिले आणि सादरही केले. याच सुमारास अरुण नाईक आणि त्याचे काही सहकारी आम्हास येऊन मिळाले. आमचे हे नवनवीन प्रयोग जुन्या मंडळींना डाचत असत. ते काही ना काही शंका काढत. मात्र दत्तोपंत आमच्या पाठीशी ठाम होते. 'राजसंन्यास'साठी आम्ही रंगराव भोसले या नव्याने आमच्यात सामील झालेल्या नटास निवडले. पुन्हा याला विरोध चालू झाला. 'इतकी महत्त्वाची भूमिका या नव्याने आलेल्याला कशाला देता? -आणि तो पुन्हा अ-ब्राह्मण.' इथेही दत्तोपंत आमच्या मदतीला आले. ''नट जर पात्र असेल तर तो नवोदित का अनुभवी, तसेच तो कोणत्या जातीचा अगर धर्माचा हा प्रश्न येतोच कुठे?'' असा पवित्रा सरानी घेऊन आमचा मार्ग प्रशस्त केला. या सुमारास आम्ही तरुणांनी जवळ जवळ ३०-३५ नाटके सादर केली. एका अर्थाने 'भावे नाट्य'चा तो सुवर्णकाळच म्हणावा लागेल.

माझ्या मनातील अशा दत्तोपंताना नाटक या विषयातील किती कळते, याबाबत मात्र शंका होतीच. त्याचेही निरसन एका प्रसंगाने झाले. आमचा एक सहकारी माधव खाडिलकर याची 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'साठी निवड झाली. यशवंत केळकर यांच्यानंतर वरती चढत गेलेला हा दुसरा नट! पुढे जर्मन नाट्यक्षेत्रातील एक नामवंत नाट्यकर्मी फ्रिट्ज बेनेव्हिड्झ यांनी माधव खाडिलकरची जर्मन शिष्यवृत्तीसाठी निवड केली. त्यांना मराठी नाटकाचे जनक विष्णुदास भावे यांच्याबद्दल खूप आदर होता. माधव त्यांना सांगलीत घेऊन आला, आता एक समारंभ करणे प्राप्त होते. जर्मन नाटककार, -म्हणजे 'नाटक' या विषयावर इंग्रजीत बोलणारे कोणीतरी हवे. आम्ही जरी शिकलेलो असलो, आणि नाटकांत काम करीत असलो तरी, इंग्रजीत या विषयावर बोलणे म्हणजे आमच्या पोटात गोळाच आला! पुन्हा आम्ही दत्तोपंताकडे गेलो. त्यांनी ''आपण त्याचा सत्कार करायचा, तुम्ही तयारीला लागा, मी पाहतो बाकीचे'' अशा एका वाक्यात आमच्या मनातील भीती दूर केली.

कार्यक्रमाचा दिवस उजाडला. 'भावे'मध्येच कार्यक्रम होता. भावे यांच्या प्रतिमेस हार घालून सुरुवात झाली. माधवने पाहुण्यांची ओळख करून दिली, मी प्रास्ताविक केले. हे सर्व मराठीत चालू होते; त्यांतील पाहुण्यांना काही कळणे शक्यच

नव्हते. मग फ्रिट्ज बोलायला उभे राहिले. त्यांनी मोडक्या तोडक्या इंग्रजीत भाषण केले. आता उत्तरादाखल दत्तोपंत उभे राहिले. 'जगाचा नाट्यकर्ता शेक्सपिअर आणि मराठी रंगभूमी' या विषयावर सुमारे अर्धा तास त्यांनी अस्खलित इंग्रजीत भाषण केले. त्यांचे भाषण संपताच खुद्द फ्रिट्ज उभे राहिले आणि ''नाटकाची इतकी जाण असणारा मनुष्य तुमच्यात आहे हे तुमचे भाग्य आहे'' असे उद्‌गार त्यांनी काढले.

य.दि.फडके हे महाराष्ट्रातील एक समाजवादी वैचारिक नेतृत्व, ते सांगलीस आले होते आणि ते मजकडे उतरले होते. त्यांना दत्तोपंतांना भेटायचे होते. मी त्यांना घेऊन शाळेत गेलो होतो, ते दोघे सुमारे तास दीड तास चर्चा करीत बसले होते. ही गोष्ट माझ्या मनावर दत्तोपंतांचे मोठेपण ठसविण्यास पुरेशी वाटली. दत्तोपंतानी नाट्यक्षेत्रात केलेले काम सांगलीतही कितीजणांस ठाऊक आहे याची शंकाच; मला ते सांगता आले यात मला आनंद आहे.

*(लेखक : वैद्यक व्यवसायी, हौशी नाट्यकर्मी आणि नाट्यचळवळीतील निष्ठावंत स्वयंसेवक)*

●●●

## विचारवंत पैलवान शिक्षक

-चारुदत्त भागवत

एखाद्या अविवाहित तरुणाला अविवाहित तरुण मैत्रिण असणे, त्यांचे एकमेकाकडे जाणे येणे आजच्या काळात मोठे आश्चर्य नाही. मात्र १९४०-४२च्या काळात माझ्या आईची आणि दत्तूकाकांची अशी मैत्री होती, यावर कदाचित विश्वास बसणार नाही. कारण स्त्रीने परपुरुषाशी नुसते बोलणे हेही त्या काळच्या समाजाला मान्य नव्हते, तेव्हा मैत्री आणि एकमेकाच्या घरी येणेजाणे अशक्यच! आम्ही दत्तूकाकाना 'काका' म्हणू लागलो, आणि दत्तूकाकांची मुले माझ्या आईला 'मीराआत्या' म्हणू लागली. दत्तूकाकांची थोरली मुलगी पुष्पा मॅट्रिकला असताना आमच्याकडे अभ्यासासाठी राहिली होती. ही मैत्री पुढच्या पिढीतही टिकून आहे. त्यांची मीराआत्या बऱ्याचदा सांगलीला आपटे घरी जात असे. काळ्या सावळ्या, गोल साडी नेसणाऱ्या आधुनिक पेहरावातील या आत्याबाई सांगलीच्या मंडळींत वेगळ्या उठून दिसत. शरद सांगतो की, ''त्यांचा आवाज नाजूक आणि मधुर होता. त्यांना ओरोगामी कला अवगत होती. त्या कागदाच्या वस्तू छान बनवीत. त्या आल्या म्हणजे आम्ही मुले कागद आणि कात्री घेऊन त्यांच्याकडून नक्षी कातरून घेत असू आणि घरात जागोजागी लावीत असू.''

माझे बाबा भास्कर रा. भागवत. त्यांचा विवाह आंतरधर्मीय होता. अशा विवाहाला सामाजिक मान्यता मिळणे फार महत्त्वाचे असते. त्यात मुलीच्या बाजूने ठाम भूमिका घेणारी व्यक्ती, म्हणून दत्तूकाकांनी पुढाकार घेऊन सर्व कार्य यथासांग पार पाडले. माझी आई मीरा भा. भागवत ही पूर्वाश्रमीची मीरा टिळक; रेव्हरंड टिळकांची नात -म्हणजे देवदत्त टिळकांची मुलगी. साहजिकच जन्माने ख्रिश्चन. टिळक कुटुंब हे सुधारणावादी विचारांचे, त्यांच्या मुलींनी शिकणे, नोकरी करणे यात काही विशेष नव्हते.

मी दत्तूकाकाना १९५५-५६च्या सुमारास पहिल्यांदा पाहिल्याचे आठवते. त्यावेळी आम्ही सांगलीजवळ बुधगावला राहात होतो. मी पहिली किंवा दुसरीत असेन. तेथील शाळेत माझी आई शिक्षक होती. गोरेपान, बलदंड असे दत्तूकाका हेही शिक्षक असले तरी थाट पैलवानी होता. दत्तूकाका कुस्त्यांच्या मैदानात 'पंच' म्हणून काम पाहात, असे आठवते. त्यांच्याकडे बंदुका होत्या. तलवारीसुद्धा होत्या. ''काय रे तलवार हवी का?'' असे म्हणून त्यांनी मला एक तलवार दिली होती. आमच्या किंवा शेजारी कोणाच्यातरी घरी एकदा चोरी झाली होती. ही बातमी दत्तूकाकांच्या कानावर गेली. दत्तूकाकानी शाळेतील शिपाई कांबळे याना पाठवून, एका इसमाला बोलावून घेतले. दुसऱ्या दिवशी सगळा मुद्देमाल घरपोच झाला. त्यांचे लिखाण, वाचन, विचार वाचले-पाहिले तर पैलवानी थाटामागे लपलेला कृतिशील विचारवंत दिसे.

*(लेखक : दत्त आपटे यांच्या मानसबहिणीचा मुलगा, रेव्ह टिळकांचा पणतू)*

●●●

## दडपे पोहे

-सुलोचना बिंदुमाधव कुलकर्णी

माझे पती बिंदुमाधव कुलकर्णी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. आणीबाणीच्या काळात माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी विरोधी लोकांना हुकुमशाही मार्गांनी नेस्तनाबूत करण्याचा चंग बांधला होता. त्यांना विरोध करणाऱ्यांना 'मिसा' या विशेष कायद्याअंतर्गत तुरुंगात डांबले होते, त्यात संघाचे अनेक कार्यकर्ते होते. माझे पती आरवाडे हायस्कूलमध्ये शिक्षक होते, त्यांना येरवडा तुरुंगात डांबले होते. 'संघाशी संबंध असणाऱ्या शिक्षकांना शाळेने नोकरीवरून काढून टाकावे' असा दबाव संस्थाचालकांवर येत होता. त्या अनुरोधाने संस्थेच्या वार्षिक सभेत एका सभासदाने 'शाळेने सरकारचा रोष पत्करू नये, आणि सरकारच्या आदेशाप्रमाणे त्या शिक्षकांना काढून टाकावे' असा प्रस्ताव आणला. आणीबाणीचे वातावरण आणि सरकारचे धोरण पाहता, बरेच सभासद ठरावाच्या बाजूने होते. मात्र दोन सभासद -दत्तोपंत आपटे आणि विनायकराव आपटे यांच्या विरोधामुळे हा ठराव बारगळला. नाहीतर माझ्या यजमानांची नोकरी जाऊन बेकारीची कुऱ्हाड कोसळली असती. सरकारचा रोष पत्करूनही असे धाडस दाखविणाऱ्या ठोसपणाचे नाव म्हणजे आपटे बंधू!

त्याच काळात दत्तोपंत एक दिवस आमच्या घरी आले. सहसा सर आमच्या घरी येत नसत. बिंदुमाधव तर येरवड्यात स्थानबद्ध होते. सरांनी एक पत्र माझ्या हातात दिले, अगदी गुप्त असे ते पत्र होते. त्यातील मजकूर असा, 'मी यापुढे संघाशी कोणताही संबंध ठेवणार नाही, त्यांच्या कार्यात सहभागी होणार नाही' असे बिंदुमाधवनी सरकारला लिहून द्यावे, या शर्तीवर त्यांची तुरुंगातून मुक्तता होईल. सरांनी विनंती केली, ''आपण हे पत्र कोणा विश्वासू माणसाहस्ते बिंदुमाधवाकडे पाठवा.'' मीच आपटे सरांना सांगितले, ''संघाशी संबंध म्हणजे आम्ही चोरी केली नाही, का दरोडा घातला नाही! बिंदुमाधव यावर सही करणार नाहीत आणि आम्हीही त्याना सही करा म्हणणार नाही.'' तरीही सरांनी त्यांच्याकडून विनंती केली, म्हणून मी ते पत्र घेतले व पुढे पाठविले. कुलकर्णी सरांनी अर्थातच सही केली नाही. मला एक आश्चर्य वाटते, कुलकर्णी सरांना काढून टाकण्याच्या ठरावाला कडाडून विरोध करणाऱ्या आपटे सरांनी हे पत्र द्यायचे का ठरविले असेल? संस्थाचालकांवर तितका दबाव शासनाकडून आला असावा. स्वत: आपटेसरांवर अशी वेळ आली असती तर त्यांनी आमच्यासारखाच निर्णय घेतला असता. सर पत्र देऊन गेले, ते स्वत: मात्र मला नाराज वाटले.

शाळा आणि तिथला स्टाफ म्हणजे एक कुटुंब होते. शाळेत सतत कोणते ना कोणते उपक्रम चालत. प्रत्येक कार्यक्रमाचे संयोजन एखाद्या शिक्षकावर सोपविले जात असे. अशाच एका कार्यक्रमाचे नियोजन बिंदुमाधव यांच्याकडे होते. पाहुण्यांना अल्पोपहार काय द्यावा? मी सर्वांसाठी दडपे पोहे करावेत असे ठरविले. सुमारे चाळीस लोकांसाठी हा पदार्थ करायचा होता. विकत काही आणण्यापेक्षा पदार्थ घरातून करून आणला तर तो उत्तम, स्वस्त होतोच आणि उपक्रमात घरच्यांचाही सहभाग राहात असे. कोणावर आर्थिक ताण पडू नये याची काळजी दत्तोपंत अशा वेळी घेत असत. उत्तम पोहे, त्यात भरपूर ओले खोबरे, नारळाचे पाणी, आले-कोथिंबीर-पादेलोण, हिरवी मिरची आणि हलकी फोडणी घालून पोहे चांगले दडपून ठेवायचे; अशी त्याची कृती. दडप्या पोह्याचा बेत इतका उत्तम झाला की दत्तोपंतांनी बिंदुमाधवना बोलावून 'पोहे कोठून आणले' विचारले. पोहे घरी केल्याचे कळल्यावर दत्तोपंतांनी खास दाद दिली; आणि पुढे प्रत्येक कार्यक्रमाचा मेनू 'दडपे पोहे' हाच ठरून गेला.

दत्तोपंत शेवटच्या दुखण्यात होते. दुपारी बिंदुमाधव हे आपटे सराना भेटायला दवाखान्यात गेले. दत्तोपंतांनी शहाळ्याचे पाणी पिण्याची इच्छा व्यक्त केली. बिंदुमाधव ताबडतोब घरी आले. आमच्याच आवारातील उत्तम शहाळी माळ्याकडून उतरवून घेतली. एका पोत्यात भरून

ते पुन्हा दवाखान्यात गेले; पण थोड्याच वेळात शहाळी घेऊन तसेच घरी आले आणि हमसून हमसून रडू लागले. असे दु:ख करताना मी यांना कधीच पाहिले नव्हते. ते शहाळी घेऊन दवाखान्यात पोचेपर्यंत दत्तोपंत स्वर्गवासी झाले होते. आपण त्यांची शेवटची इच्छा पूर्ण करू शकलो नाही याची त्यांना खंत वाटून राहिली.

बिंदूमाधव हे संघाचे कार्यकर्ते आणि दत्तोपंत कट्टर काँग्रेसचे. असे असले तरी शाळेच्या कामात सर्वजण एकदिलाने काम करीत असत. दत्तोपंतांचा सरांवर विशेष विश्वास होता, हे मलाही जाणवत असे.

*(लेखक : शाळेतील माजी शिक्षकाच्या पत्नी)*

●●●

## वडिलांचे बंधुतुल्य मित्र

-मोहन भिलवडीकर

सायकलची घंटा वाजवीत मुलांना आरोळी ठोकून हाक मारत, उत्साहाचे वातावरण निर्माण करणारे दत्तूकाका आजही मला तसेच आठवतात. पहाटे आम्हाला उठविणारे, स्वत:बरोबर आमचा व्यायाम घेणारे, सायकल शिकविणारे, नदीवर पोहायला नेणारे आणि आम्हा मुलांच्यासोबत भाकरी-चटणी न्याहरी झोडणारे! मी दत्तूकाकांकडे सुट्टीत येत असे, त्या दहा पंधरा दिवसांत त्यांचा सहवास मला लाभत असे. मी दत्तूकाकांचा नात्याने कोण होतो? कोणीही नव्हतो! पण त्यापलीकडचे माझे नाते होते. त्यांच्या आकस्मिक वारलेल्या मित्राचा मी मुलगा होतो. मला माझे वडील आठवणेही शक्य नव्हते, कारण ते गेले तेव्हा मी होतो फक्त तीन महिन्यांचा!

माझे वडील श्रीकृष्ण (बंडोपंत) प्रभाकर भिलवडीकर हे मालवणमध्ये शिक्षक होते. साल असावे१९३७-३८. समाजवादी विचारसरणीचे, काही ध्येयवाद घेऊन शिक्षण क्षेत्रात उतरलेले. इकडे सांगलीत दत्तूकाकांनीही त्याच भावनेने शाळा सुरू केली होती. माझे बाबा एक दिवस सांगलीत यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत शिक्षक म्हणून दाखल झाले. मालवण सोडून एकदम सांगलीत येण्याचे काय प्रयोजन होते, ते कळायला मार्ग नाही; पण आमचे आणि दत्तूकाकांचे ऋणानुबंध जुळायचे होते, इतकेच आज म्हणता येईल! माझे वडील दत्तूकाकांच्या मित्रमंडळीत केव्हाच मिसळून गेले. इकडे माझी आई, त्यांच्या पत्नी उषामामींची पट्ट मैत्रीण बनून गेली. माझा जन्म झालेला नव्हता.

माझ्या आजोबांना मात्र त्यांचे सांगलीत राहणे मान्य नव्हते. त्यांचा एकच आग्रह होता, मुलांनी माझ्या म्हातारपणी माझ्याजवळ असावे. अखेर आम्ही सांगली सोडून पुन्हा कोल्हापुरात स्थायिक झालो. माझा जन्म झाला. १९४२ साल उजाडले ते संकट घेऊन. टाईफॉइडच्या आजारात माझ्या वडिलांचे दु:खद निधन झाले. या धक्क्याने आजोबापण वारले. संसाराचा गाडा आईने मोठ्या धीराने ओढला. मला आठवते तसे, एक कुटुंब सतत आमच्या पाठीशी होते; ते म्हणजे दत्त आपटे आणि उषामामी! दत्तूकाका जेव्हा जेव्हा कोल्हापुरास येत, तेव्हा तेव्हा आम्हाला भेटून विचारपूस करीत. त्यांच्या घरात कोणताही कार्यक्रम असो आम्हाला निमंत्रण असे आणि आम्ही आनंदाने जात असू. दहा पंधरा दिवस मुक्काम असे. त्या निमित्ताने मला दत्तूकाकांचा आणि उषामामींचा सहवास लाभला. दत्तूकाका मला 'मोहनराव' किंवा 'ज्युनिअर बंडोपंत' म्हणत. दत्तूकाकांची मुले मला 'मोहनदादा' म्हणू लागली. आजही माझा या कुटुंबाशी संबंध आहे.

माझे वडील १९४२ साली वारले, मात्र ते वेगळ्या तऱ्हेने १०१ वर्षे जगले असे म्हणता येईल. मला ही गोष्ट शरदकडून आज कळाली. माझे वडील श्रीकृष्ण भिलवडीकर हे दत्त आपटे यांच्या मित्र परिवारात सर्वांना माहीत होते. १९४२ साली दत्त आपटे यांच्या घरावर पोलीसांचा छापा

पडला. तेव्हा दत्त आपटे यांचे एक क्रांतिकारक मित्र अनंत हरी क्षीरसागर हेही पोलिसांना हवे होते. त्यांच्यावर १३,०००/-चे इनाम सरकारने लावले होते. हे अनंत क्षीरसागर नेमके कोण, ते दिसतात कसे, याचा पोलिसांना पत्ता नव्हता. त्याच वेळी अनंत हरी क्षीरसागर हे 'श्रीकृष्ण भिलवडीकर' म्हणून राजरोसपणे वावरत होते. प्रत्यक्षात श्रीकृष्ण भिलवडीकर हयातही नव्हते. इतकेच नव्हे तर त्यांनी त्या नावाने जामीन राहून काहींना तुरुंगातून सोडवून आणले. अनंत हरी क्षीरसागर हे १०१ वर्षे जगले. त्यांनीही आपल्या आठवणीत हे लिहून ठेवले आहे! अशी ही परस्पर जिवाभावाची माणसे!!

*(लेखक : दत्त आपटे यांच्या शाळेत अल्पकाळ काम केलेले, परंतु दीर्घकाळचा स्नेह लाभलेले श्रीकृष्ण भिलवडीकर यांचा मुलगा, दत्तोपंतांचा मानसपुत्र)*

●●●

## शीर्षक सुचत नाहीये!

-सतीश थत्ते

ना.पं.थत्ते माझे आजोबा, व्यवसायानिमित्त काही वर्षे ते सांगलीत वास्तव्यास होते. त्या काळी सांगलीच्या साहित्य आणि शैक्षणिक क्षेत्रात धडाडीने काम करणाऱ्या दत्त आपटे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. दत्त आपटे यांच्याच पुढाकाराने स्थापन झालेल्या यंग मेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून माझ्या आजोबांनी काही काळ काम पाहिले. सार्वजनिक कामांतून झालेला हा परिचय पुढे कौटुंबिक जिव्हाळ्यात रूपांतरित झाला आणि दत्त आपटे हे आमच्या अख्ख्या कुटुंबाचे दत्तूकाका झाले. या जिव्हाळ्याचा परिचय मला म्हणजे तिसऱ्या पिढीला कालपरवापर्यंत अनुभवायला मिळाला.

माझे वडील मधुकर थत्ते -दत्तूकाकांच्या भाषेत 'मध्या' -हे नोकरीनिमित्त डोंबिवलीमध्ये राहात. मुंबईत दत्तूकाकांचे वरचेवर येणे होत असे. दोनतीन वर्षांनी ते आपल्या मित्राच्या मुलाला, -म्हणजे मध्याला भेटायला आवर्जून आमच्या घरी डोंबिवलीत येत असत. दत्तूकाका असेच एकदा आले असताना, आमच्या घराच्या परिसरात काहीतरी गैरबांधकाम होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आल्याआल्या त्यानी त्याबद्दल विचारणा केलीच. आमच्या घरमालकिणीने चालवलेले हे बेकायदेशीर बांधकाम आम्हालाही मान्य नव्हते; पण आवाज कोण आणि कोणासमोर उठवणार? दत्तूकाकानी माझ्या आईला दुसऱ्या दिवशी सचिवालयात येण्यास सांगितले. मीही आईबरोबर गेलो होतो. सचिवालयात मुख्यमंत्री वसंतदादांच्या केबिनमध्ये दत्तूकाका येऊन थांबलेले होतेच. आम्ही तेथे पोचलो. आईने सर्व प्रकार कथन केला. मा.दादांच्या पी.ए.नी एकदोन फोन केले आणि आम्हाला 'तुमचे काम होईल, तुम्ही घरी जायला हरकत नाही' असे सांगितले. आम्ही परतलो. बस, लोकल असा प्रवास करत आम्ही संध्याकाळी घरी पोचलो, आणि पाहतो तो काय? सर्व अनधिकृत बांधकाम पाडून परिसर साफसूफ करून लोक गेलेही होते.

असे काम करणारी दत्तूकाका आणि मा.वसंतदादांसारखी माणसे होती आणि अशी कामेही होत होती, हे आज सांगूनही पटणार नाही! धडधडीत होणारी अतिक्रमणे आज आपण रोज पाहतो. त्यांच्याविरुद्ध आवाज उठवण्याचे धाडस आज सर्वसामान्य नागरिक हरवून बसला आहे..... आणि कुणी प्रयत्न केलाच तर? त्याची खैर नाही! अशा वेळी दत्तूकाकांची आठवण प्रकर्षाने होते.

*(लेखक : संस्थेचे प्रथम आश्रयदाते आणि दत्तूकाकांच्या घरोब्याचे व्यासंगी मित्र ना.प.थत्ते यांचा नातू)*

●●●

## नव्यानेच उलगडलेले दत्तोपंत

-य.शं.(बाबूराव) गाडगीळ

सुमारे ६० वर्षांपूर्वी दत्तोपंत आणि विनायकराव आपटे या व्यक्ती माहीत नाहीत असा कोणी सांगलीकर नव्हताच. त्यांचे शाळेसंबंधीचे कार्य तितकेसे सर्वांना माहीत असेल असे नाही -फार तर त्यांचे विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य संबंधितांना ते ठाऊक असेल. वास्तविक त्यांच्या कोणत्याच कार्याबद्दल माझ्यासारख्या व्यवसायिकाला आणि संघ स्वयंसेवकाला तपशीलाने माहिती नव्हतीच; तरीही या दोन्ही व्यक्ती सार्वजनिक जीवनात कर्तबगार म्हणून सर्वांना परिचित होत्या. दत्तोपंतांचा संचार तर सांगलीतील सगळ्या क्षेत्रांत होता, आणि त्यांचा एक दबदबा सांगलीच्या जीवनावर होता हे आम्हाला जाणवत असे. त्यांचे प्रताप मॉडेल हायस्कूल हे आमच्या विद्यार्थीदशेत चर्चेचा विषय होता. दत्त आपटे हे लेखक आहेत हेही ऐकून होतो. पण तशा साहित्यिक वर्तुळापासून ते काहीसे दूरच असावेत. त्या काळातील व्यायाम क्षेत्रात त्यांचे नाव गाजत असे हे मात्र मला चांगले आठवते.

एक-दीड वर्षांपूर्वी समग्र दत्त आपटे ग्रंथ प्रकल्पासाठी समिती गठित झाली. वसंत आपटे माझ्याकडे त्यासाठी आले आणि समितीचे सदस्य होण्याचा प्रस्ताव माझ्यापुढे ठेवला, अर्थातच मी आनंदाने होकार दिला. आमच्या समितीच्या बैठका होऊ लागल्या; मी बहुतांशी बैठकांस हजर राहिलो. त्यांतील चर्चेतून मला हळूहळू दत्त आपटे ही व्यक्ती, त्यांचे कार्य आणि वाङ्मय यांची माहिती आणि महती कळू लागली. त्यांचे धाडसी उपक्रम, समाजिक कळवळ्यातून केलेले काम, आणि त्यांचे साहित्य हे सारे लक्षात आल्यावर मीसुद्धा अचंबित झालो. त्यांचे एक पुस्तक ब्रिटीश सरकारने जप्त केले होते ही माहिती सर्वांनाच नवीन होती.

थोडक्यात म्हणजे या प्रकल्पाच्या निमित्ताने मला या ज्येष्ठ कर्तबगार सांगलीकराबद्दल नवी आणि अभिमानास्पद माहिती मिळाली; ती या प्रकल्पाच्या माध्यमातून वाचकांच्या हाती देता येत आहे. प्रकल्प समितीचा सदस्य म्हणून, हे महत्वाचे काम फार समाधान देणारे आहे.

●●●

## धर्मादाय मुंज

-अरुण दांडेकर

आमचे कुटुंब मूळचे बिळाशी (ता.शिराळा) येथील. माझे वडील रंगनाथ दांडेकर हे स्वातंत्र्यलढ्यात होते. १९४८च्या जळीतात आमचे बिळाशीचे ब्राह्मणाचे घर वाचले, कारण माझे वडील स्वातंत्र्य चळवळीत होते. १९६०साली आम्ही भविष्याचा विचार करून बिळाशी सोडले, आणि काही दिवस औदुंबरला राहून १९६० साली सांगलीत आलो. गावभागात किराणा मालाचे दुकान चालू केले. आम्ही मराठी शाळा नं.२ मागे केळकर वाड्यात राहात होतो. शेजारी असल्याने दत्तूकाकाना रोजच पाहात होतो. सांगलीतील एक मोठी व्यक्ती म्हणून आम्ही त्यांना ओळखत होतो. दत्तूकाकांची आम्हाला आदरयुक्त भीती वाटे.

दत्तूकाकांचा थोरला मुलगा हर्षवर्धन याची मुंज करायचे ठरले होते. माझा धाकटा भाऊ श्री हा हर्षवर्धनच्याच वयाचा. त्याचीही मुंज करायची होती, पण आमचे दुकान बंद पडल्यासारखेच होते. त्यामुळे श्री ची मुंज करूच शकत नव्हतो. हर्षाच्या आई सौ.उषामामीनी आमच्या श्री ची मुंज 'धर्मादाय' म्हणून करायचे ठरविले, तसे माझ्या आईला विचारले. आमची मान्यता होतीच. ब्राह्मण मुलाची योग्य वयात मुंज केली नाही तर त्या काळात मोठे पातक समजले जाई. अशा वेळी आपटे कुटुंबाने श्रीच्या मुंजीची जबाबदारी उचलून आम्हाला शब्दश: धर्मसंकटातून वाचवले. आजच्या काळात त्याचे महत्त्व कदाचित वाटणार नाही, मात्र

दत्तूकाकांच्या या मदतीचे आम्हाला आजही स्मरण आहे.

पुढे १९६४ साली दत्तूकाकांचा दुसरा मुलगा शरद याची मुंज झाली तेव्हाही बाळू परांजपे या त्याच्या मित्राची 'धर्म मुंज' त्याच्याबरोबरच केल्याचे मला आठवते.

दत्तूकाकांचा कोणत्या ना कोणत्या प्रकारे सर्वांना मदत करण्याचा स्वभाव होता. आज माझी परिस्थिती बदलली. त्यामुळे अशा हतबल स्थितीत अडकलेल्या होतकरू मुलांना मदत करण्यास माझे प्राधान्य असते. आधीच्या कृतिशील पिढीचा तो संस्कार आहे.

*(लेखक : सांगलीतील प्रसिद्ध व्यापारी, विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक, संघटनांचे पदाधिकारी)*

●●●

## दत्तूकाकांची सावली -

-प्रमोद राजदीप

आपली सावली आपल्याला कधी सोडत नाही, तसेच मारुती कांबळे दत्तूकाकांच्या सोबत सावलीसारखे असत. प्रकाश असेल तरच सावली पडते; मात्र ही सावली अंधारातसुद्धा दत्तूकाकांच्या सोबत असे.

मारुती कांबळे माझे वडील, आम्ही त्यांना दादा म्हणतो. १९४२ साली वसंतदादा पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगलीचा तुरुंग फोडला आणि पोलिसांच्या बंदुका हिसकावून घेऊन पलायन केले; ही कथा सांगलीकरांना नवीन नाही. आमचे दादा त्यावेळी चौकीवर पहाऱ्यास होते. या कैद्यांना पळून जाण्यास मदत केली, म्हणून त्यांना कामावरून कमी करण्यात आले. वसंतदादा सुटून आल्यावर त्यांनी मारुती कांबळे यांची शिफारस दत्तूकाकांनी केली, आणि आमचे दादा प्रताप मॉडेल हायस्कूलमध्ये शिपाई म्हणून हजर झाले. त्यांचे दत्तूकाकांशी नाते दत्तूकाकांच्या निधनापर्यंत अतीशय निकट राहिले.

आमच्या दादांनी दत्तूकाकांचा दृढ विश्वास संपादन केला. दत्तूकाकांच्या हरएक कामात ते मदतनीस असत. दत्तूकाका जातील तिथे आमचे दादा सोबत असत. लोक त्यांना गमतीने दत्त आपटे यांचे ए.डी.सी.(एड-डी-कँप) म्हणत.

१९६२-६३ च्या सुमारास दत्तूकाकांना सौम्य अर्धांगाचा विकार झाला. त्यावेळी आमच्या दादांनी दत्तूकाकांची खूप सेवा केली. त्यांना मसाज करणे, हातापायांची हालचाल करण्यास मदत करणे, चालताना आधार देणे.... थोडक्यात आजच्या भाषेत ते दत्तूकाकांचे फिजिओथेरपीस्ट झाले होते. तेथून पुढे ते दत्तूकाकांच्या सोबत फिरायला जात असत. हा नेम शेवटपर्यंत टिकला. पहाटे चार वाजता ते दत्तूकाकांच्याकडे जात. त्यांचा चहा, नाष्टा दत्तूकाकांच्या सोबत होत असे. तेथूनच ते शाळेच्या कामासाठी परस्पर जात.

आमच्या दादांना सायकल आणि पोहणे हे दोन क्रीडा प्रकार फार प्रिय होते. ते पट्टीचे पोहणारे होते. त्यांनी अनेकांना पोहायला शिकविले. एक उत्तम जलतरणपटू(स्विमर) म्हणून त्यांचे देशभर नाव झाले, त्यास दत्तूकाकांचे प्रोत्साहन कारणीभूत होते. वेगवेगळ्या स्पर्धांत दादा भाग घेत, त्यांना दत्तूकाका रजा आणि इतर सगळे सहकार्य देत. ज्येष्ठांच्या सायकल आणि पोहण्याच्या स्पर्धांतही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दादांनी अनेक बक्षिसे मिळवली. दादांनी रायगड जिल्ह्यातले धरमतर ते मुंबईतले गेटवे ऑफ इंडिया हे सागरी २० मैल अंतर पोहण्याच्या शर्यतीत भाग घेतला. नदीत सराव, पण आयुष्यात कधी समुद्र न पाहिलेले एकमेव स्पर्धक म्हणजे आमचे दादा!! त्यांना त्या स्पर्धेत नंबर मिळवता आला नाही, मात्र ते अंतर त्यांनी पूर्ण केले; हे केवळ दत्तूकाकांवरील विश्वासामुळे, असे दादा सांगत.

१९७५च्या सुमारास दादांनी संपूर्ण भारत सायकलने पादाक्रांत करण्याचे ठरविले. हा विचार त्यांनी दत्तूकाकांना

बोलून दाखविला. सहा महिने, आणि सुमारे वीस हजार किलोमीटर इतका प्रवास दादांनी केला. या उपक्रमास सायकलीपासून ते पगारी रजेपर्यंत सर्व मदत दत्तूकाकांनी केली. दादा जेव्हा प्रवास पूर्ण करीत सांगलीत आले, तेव्हा त्यांचे भव्य स्वागत केले. सांगलीचे तत्कालीन नगराध्यक्ष डॉ.देवीकुमार देसाई हे उपस्थित होते, त्यांच्या हस्ते दत्तूकाकांनी दादांचा सत्कार घडवून आणला. या प्रसंगी दत्तूकाकांना आनंदाश्रू आवरणे कठीण झाले.

प्रत्येक व्यक्तीस आपले स्वत:चे घर असावे असे वाटत असते. साठच्या दशकात शाळेतील एका शिपायाने हे स्वप्न पाहणे म्हणजे अशक्य गोष्ट होती. मात्र ते दत्तूकाकांच्यामुळे शक्य झाले. दत्तूकाकांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वत:च्या मालकीची जागा अत्यल्प किंमतीत शिक्षकांसाठी सहकारी हौसिंग सोसायटीस दिली. त्यातील एक प्लॉट आमच्या दादांना मोफत दिला. दत्तूकाकांनी दादांना रु.२५००/- स्वत:च दिले, आणि प्लॉटसाठी सोसायटीत भरायला सांगितले. इतकेच नव्हे तर छोटे झोपडे बांधण्यासाठी आणखी एक हजार रुपये वरती दिले. आज आमचे ९७ वर्षांचे दादा आणि माझे भाऊ तिथे सुखासमाधानाने राहात आहेत.

दत्तूकाकांच्या शाळेत आणि घरी जातपात, वर्ण आणि धर्म असे भेद कधीच नसत. शिपाई आणि शिक्षक असा भेदही होत नसे. आमचे दादा दत्तूकाकांच्या घरी स्वत:च्या हाताने चहा बनवीत; न्याहरी ते दत्तूकाकांच्या सोबत घेत असत. सण आणि घरगुती समारंभानिमित्त दादांना हमखास निमंत्रण असे. थोडक्यात, आमचे दादा हे दत्तूकाकांच्या कुटुंबाचे सदस्य म्हणून गणले जात असत. ज्यांनी अनेकांची जीवने उजळली, अशा माझ्या त्या शिक्षकाचे चरित्र सर्वांनाच प्रेरणा देणारे ठरेल.

*(लेखक : स्टेट बँकेतून निवृत्त कर्मचारी)*

●●●

## एका फोनवर काम

-विनायक गजानन तथा मंगल पाठक

मी मूळचा इचलकरंजीचा, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मिठबाव या गावात शिक्षक म्हणून काम केले. तिथेच ज्युनिअर कॉलेजमध्ये अध्यापक, २००१ ला निवृत्त झालो. ब्राह्मण नाट्यमंडळ, मोफत क्लासेस, क्रीडामंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, कोकण शक्ती या मासिकाचा सल्लागार संपादक अशा विविध संस्थांची स्थापना वगैरे काम घडले. पण मुळात मी शिक्षक व्हायला डी.एन.आपटे कारण झाले.

१९६९ मे मधील दिवस. मी व माझा मित्र दत्ता खारगे असे सांगलीला बी.एड.कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून गेलो होतो. मी अर्थशास्त्राचा बी.ए., तर खारगे राज्यशास्त्राचे बी.ए. त्यावेळी माध्यमिक स्तरावर हे दोन्ही विषय शिकविले जात नव्हते. त्यामुळे प्राचार्यांनी आम्हाला प्रवेश द्यायला नकार दिला.

परिस्थिती मोठी अवघड होती. आम्ही दोघेही विवाहित होतो, व प्रपंचाची जबाबदारी होती. एका स्नेही शिक्षकाने मार्ग सांगितला. आम्ही त्याच दिवशी आरवाडे हायस्कूलमध्ये दत्त आपटे सरांना भेटायला गेलो. त्यांच्या कार्यालयात जाताच खारगे यांनी त्यांना कडक मिलिटरी सॅल्यूट ठोकला; कारण खारगे दहा वर्षे मिलिटरीत सेवा करून निवृत्त झाले होते. देशाच्या जवानांचा आपटे अत्यंत आदर करीत असत. त्यांना थोडक्यात आमची परिस्थिती सांगितली. सरांनी लगेच बी.एड.कॉलेजमध्ये फोन लावला. आम्हाला सांगितले ''तुमचे काम झाले आहे. जाऊन प्रवेश घ्या.'' आम्हाला प्रवेश मिळाला. ही त्यांचीच कृपा.

सारे आयुष्य शिक्षकी पेशात प्रामाणिकपणे घालवून मी सेवानिवृत्त शिक्षक म्हणून आनंदात आहे. परंतु मी शिक्षक होण्यासाठी दत्त आपटे हेच मदतीला आहे. मी आपटे सरांचा सदैव ऋणी आहे.

*(लेखक : निवृत्त शिक्षक, काही सामाजिक संस्थांत स्वयंसेवक)*

●●●




# प्रकल्प साकारताना

मी या प्रकल्पाचे काम हाती घेतले आणि या कामाने अक्षरश: झपाटून गेलो. तसे कधीतरी झपाटून जाण्याची मला सवय आहे; आणि त्यातून काही चांगली कामेही झाली आहेत. कदाचित ही उपजत देणगी दत्तूकाकांचीच असावी. या प्रकल्पाच्या संदर्भात मला त्यांच्या एका विद्यार्थ्याने विचारले, ''का हो, तुम्ही हे काम पितृप्रेमापोटी करता आहात; की एक ऐतिहासिक ठेवा म्हणून करता आहात?'' माझे काम पितृप्रेमापोटी सुरू झाले हे अगदी खरे, मात्र मी जसजसा या कामाच्या अंतरंगात शिरलो तेव्हा लक्षात आले की, दत्त आपटे केवळ माझे वडील नसून एक वेगळे महनीय व्यक्तिमत्व होते. ज्यांनी आपल्या क्षेत्रात आणि आपल्या काळात देश आणि समाज घडविण्याचे काम केले, असे ते एक थोर पुरुष होऊन गेले. याहीपुढे जाऊन मला असे वाटते की, देश आणि समाज घडविणारी अशी अनेक त्यागी माणसे गावोगावी होऊन गेली; त्यांनी आपले काम गवगवा न करता केले आणि मागे संस्काराची शिदोरी ठेवून ही माणसे काळाच्या पडद्यामागे निघून गेली. दत्त आपटे हा ग्रंथ त्या सर्वांचे प्रतिनिधीत्व करतो. वेळ पैसा यांच्या सबबी पुढे करून सामाजिक कामांतून माघार घेणाऱ्या पिढीला हे चरित्र एक वस्तुपाठ आहे. समाजात चांगुलपणाही पदोपदी दिसतो त्याचे संस्कार अशा अदृश्य हातांचे आहेत, असा माझा ठाम विश्वास आहे. ही परंपरा आजही सुरू आहे, फक्त कधीतरी वाटते की संस्कार करणारे तसे हात कमी पडत असावेत.

१९८२ च्या फेब्रुवारी महिन्यात दत्त आपटे यांचे निधन झाले. असंख्य लोकांनी समक्ष भेटून, पत्राद्वारे आमचे सांत्वन करू पाहिले. अनेक संघटना आणि संस्थांनी दुखवट्याचे ठराव केले, वर्तमानपत्रांनी आदरांजलीपर लेख लिहिले. दत्त आपटे किती मोठे होते ते आम्हाला समजण्याइतके हे सर्व पुरेसे होते. मात्र आम्ही सर्व भावंडे इतके गांगरून गेलो होतो की, त्याचे महत्व तेव्हा समजू शकलो नाही. त्यावेळी त्यांचे चरित्र वगैरे व्हावे असे वाटलेही नाही. २००१ साली आम्ही त्यांच्या २१व्या पुण्यतिथीनिमित्त एक कार्यक्रम केला. त्या कार्यक्रमाला दत्त आपटे यांचे अनेक विद्यार्थी आणि सहकारी मोठ्या संख्येने हजर होते, त्यांनी

आपल्या आठवणी व अनुभव सांगितले. त्या सर्व कार्यक्रमाचे ध्वनिमुद्रण मी केले, पण हा फार महत्वाचा ठेवा माझ्या हातून गहाळ झाला. नोकरी व्यवसाय करीत आम्ही सगळे निवृत्तीकडे झुकलो तेव्हा हा विषय पुन्हा चर्चेत येऊ लागला.

माझ्या काकांच्या म्हणजे किर्लोस्करवाडीचे गोपाळ नारायण आपटे यांच्या वास्तव्यस्थानातील आठवणी उजळणारे एक हृद्य संमेलन त्यांच्या डझनभर नातवांनी घडवून आणले, त्यावेळी गोपाळकाकांच्याही आठवणी बहरून आल्या. त्या पाहिल्यावर दत्तूकाका आणि विनूकाकांच्या आठवणी आपण प्रकाशित कराव्यात असा विचार माझा चुलतभाऊ अरविंद आपटे यांनी व्यक्त केला; पण हा विचार मूळ धरण्यापूर्वीच त्याचे आकस्मिक निधन झाले. माझ्या बहिणीने - रोहिणीने हा विषय पुन्हा कधीतरी उचलून धरला आणि तिला आठवेल तसे लिखाण सुरू केले. ते वाचून मलाही स्फुरण चढले आणि मीच हे काम अंगावर घेतले. एक दोन आठवड्यांत मी खरोखरीच या कामात पूर्णपणे शिरलो. तथापि अजून मला योग्य दिशा मिळाली नव्हती. नुसतेच एक पाचपन्नास पानी बाड तयार करून आपल्यापुरत्या पन्नासभर प्रती कराव्यात, की एक आकर्षक स्मरणिका करावी; यातच आम्ही घुटमळत होतो.

नातेवाईक, विद्यार्थी, त्यांच्यासोबत काम केलेले शिक्षक, यांना भेटून आठवणी लिहून घ्याव्यात असे सुरुवातीला ठरवून काम चालू केले. पण लेख लिहून मिळणे कठीण दिसू लागले. सर्वच मंडळी ऐंशी ओलांडलेली, लिहिण्याची सवय तुटलेली; मग अशा लोकांना समक्ष भेटून त्यांच्याशी गप्पा करीत आठवणी वेचाव्या लागल्या.

विलिंग्डन महाविद्यालयाचे निवृत्त ग्रंथपाल यशवंत रास्ते हे माझ्या वडिलांचे विद्यार्थी. मी त्यांचे घर गाठले. आम्ही दत्त आपटे यांचे चरित्र - स्मरणे लिहीत आहोत हे कळल्यावर त्यांना झालेला आनंद मी त्यांच्या डोळ्यांत पाहात होतो. त्यांनी आठवणी तर दिल्याच, शिवाय हजार रुपयांच्या नोटा बळेबळे माझ्या खिशात कोंबल्या आणि म्हणाले, ''अशा कामांना पैसे लागतात, हे ठेवा'' तोपर्यंत मी त्या गोष्टीचा विचारही केलेला नव्हता! म्हणजे माझे नियोजनच किती ढिसाळ आहे हे लक्षात आले. त्या दिवशी यशवंत रास्ते यांनी मला बळेच त्यांच्या घरी जेवायलाही घातले. मी त्यांचा आग्रह मोडू शकलो नाही. जेवण झाल्यावर रास्तेसर म्हणाले, 'मला माझ्या गुरूंना -डी.एन.सरांना घरी जेवायला बोलवायचे होते, पण राहून गेले. आज तुम्ही जेवलात, माझी इच्छा पूर्ण झाल्यासारखेच वाटते.'' मी तो जिना साश्रू नयनांनी उतरलो, आणि तिथेच समजून चुकलो की जे काम हाती घेतले आहे, ते ऐतिहासिक आहे! ते पूर्ण होणारच!!

एप्रिल २०१५ ला मी या कामाची माझ्या मतीप्रमाणे सुरुवात केली होती.

जसजशी माहिती हाती येऊ लागली, तसतशी उत्सुकता वाढत गेली. भेटणारा प्रत्येक विद्यार्थी, सहकारी, नातेवाईक भरभरून गहिवरून बोलू लागला. आठवणी जमू लागल्या. आता मात्र कामाला योग्य दिशा हवी होती. तितका अनुभवी आणि कामाचा हातखंडा असणारा माणूस नशिबाने आमच्या घरातच होता; तो माझा चुलत भाऊ वसंत आपटे. मी जमलेले साहित्य घेऊन त्याला गाठले, विषय मांडला. दोन-तीन दिवस असेल गेले, मी थोडा चिंतातुर झालो. पण नंदूचा (वसंत आपटे) निरोप आला. त्याने मांडले की, 'आपण एक खणखणित चरित्रग्रंथ करू. ही आपली जबाबदारी आहे, आणि आपल्याला एक संधी आहे. ते झाले तर आत्ताच! तेही आजच्या पिढीसाठी नव्हे; याचे महत्व अजून दीड-दोनशे वर्षांनी आहे.' आपोआपच ग्रंथाची सूत्रे वसंत आपटे याच्याकडे सोपवली गेली, त्यानेही ती आनंदाने स्वीकारली.

आमचा आतेभाऊ आणि साऱ्या गोतावळ्यात ज्येष्ठ असणारा विठ्ठल जोगळेकर यांच्या घरी तासगाव येथे २२ नोव्हेंबर २०१६ रोजी मुहूर्ताची पहिली बैठक झाली. त्यात प्रकल्पाचे नाव 'दत्त आपटे : व्यक्ति-कार्य-वाङ्मय' असे निश्चित करण्यात आले; आणि ग्रंथ प्रकल्प समितीची स्थापना करण्याचे ठरले. संभाव्य अकरा सभासदांची संमती घेण्यात आली. पुढील काम प्रकाशन समितीच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. प्रकाशनपूर्व वर्षभरात या समितीच्या १२ बैठका झाल्या, सर्व सभासदांनी अत्यंत जिव्हाळ्याने वेळोवेळी मार्गदर्शन केले. दिनांक १ फेब्रुवारी २०१७ रोजी या ग्रंथ प्रकल्पाच्या कामास शुभारंभ, दत्त आपटे यांचे एक सहकारी बी.व्ही.कुलकर्णी(पट्टणकुडीकर)यांच्या हस्ते गणपतराव आरवाडे हायस्कूलच्या कै.दत्त आपटे संस्कार मंदिरात झाला. या समारंभास मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद अचंबित करणारा आणि या प्रकल्पाबाबत विश्वास निर्माण करणारा होता.

दरम्यानच्या काळात मी भेटीगाठींचा सपाटा सुरू ठेवला होता. वसंत कुंभोजकर-औरंगाबाद, विनायक आणि मोहन क्षीरसागर-अकोला, साताऱ्याचे नरहर किरकिरे.... इत्यादींशी गप्पा माराव्यात, त्यांना हळूच त्या काळात न्यावे आणि बोलते करावे; असे तंत्र मी सुरू ठेवले होते. साउंड रेकॉर्डर मी अतिशय परिणामकारक वापरला. हे रेकॉर्डिंग मी ऐकून, महत्वाचे मुद्दे काढून, त्यांचे लेख त्यांच्या वतीने लिहिले. लेख अशा पद्धतीने लिहीत असे की, तो एकसुरी न होता ती एक कथा व्हावी. हे लिखाण त्यांना दाखवून घेत असे. हे लिखाण टायपिंग करण्यासाठी 'गुगल टूल' मदतीस आले. माझी पत्नी सौ.वर्षा आणि वहिनी सुमिता या शुद्ध लेखनातील दुरुस्त्या करीत असत. मसुदा यशवंत रास्ते यांच्याकडे जात असे, ते त्यावरून हात फिरवीत. त्यात सुचवलेल्या दुरुस्त्या करून मग लेख वसंत आपटे यांच्याकडे संपादनासाठी पाठविला जाई. त्यापुढची

सारी कामे त्याने करून घेतली.

या प्रकल्पाला निधीची गरज होतीच. हा निधी मी आणि आम्ही कुटुंबीय उभा करणे कठीण होते. 'आपण समाज उपयोगी काम प्रामाणिकपणे हाती घेऊन पुढे आलो, तर समाज हमखास पाठीशी उभा राहातो' असे दत्त आपटे यांनीच एके ठिकाणी नमूद केले आहे. तोच मार्ग आम्ही अनुसरला. आमचे पहिले अंदाजपत्रक पाच-सात लाख होते. आठवणींचे लेख आणि महत्वाचे लिखाण हाती मिळत गेले. त्यांचे क्रांतीकार्यातील सहकारी अनंत हरी क्षीरसागर यांचे आठवणींचे हस्तलिखित मिळाले, आणि ते ग्रंथात सामील करणे कर्तव्य बनले, इतके ते महत्वाचे आणि प्रेरणादायी आहे. नवीन अंदाज सुमारे नऊशे पाने आणि खर्च नऊ लाख असा जाऊन भिडला. तरी हे उद्दिष्ट आम्ही एका वर्षात गाठले. काही वेळा कामाची गती मंदावली तर माझी धास्ती वाढे, तेव्हा समितीच्या सर्व सभासदांनी धीर दिला. समितीचे एक सदस्य बळवंत वाळवेकर सर हे दत्त आपटे यांचे विद्यार्थी, आणि सहकारी. त्यांनी निधी संकलनात मोठे योगदान दिले. त्यांचे वय पाहाता, हा उत्साह प्रेरक ठरला. निधी संकलनात गजानन शिंदे यांची त्यांना मदत झाली.

दत्त आपटे यांनी लिहिलेली प्रत्येक ओळ आम्ही या ग्रंथात समाविष्ट करण्याचे ठरविले, तेव्हा त्यांच्या पुस्तकांचा शोध हे एक आव्हान बनले. आमच्या संग्रहात केवळ ३-४ पुस्तके होती. काही ऐकून माहीत होती. प्रकाशकाशी झालेला पत्र-व्यवहार, अनेकांच्या आठवणी आणि दत्तूकाकांच्या दैनंदिनीतून त्यांनी २०-२५ पुस्तके लिहिल्याचे समोर आले. पैकी १८ प्रकाशित झाली असल्याचे पुरावेही मिळाले. या अठरापैकी १७ पुस्तके आम्ही मिळवू शकलो. ब्रिटीश सरकारने जप्त केलेले डॅनब्रीन यांचे आत्मवृत्त महत्प्रयासानी मिळाले. ब्रिटीश कौन्सीलपर्यंत त्यासाठी पाठपुरावा केला; पुस्तक मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई इथे मिळाले. 'ग्रामोद्धाराचे तत्वज्ञान' मात्र मिळू शकले नाही याची रुखरुख आहे.

या ग्रंथ प्रकल्पाचे काम केवळ वर्ष-दोन वर्षे करताना, इतिहास संशोधकांस किती कष्ट पडत असतील याची झलक अनुभवायला मिळाली. इतिहास लिहिणाऱ्याने निपक्षपाती राहाणे आवश्यक असते; तरीही त्याचे थोडेतरी झुकते माप राहात असावे असे मला वाटत राहिले. कोणीसे म्हटले आहे ''आपण असे काम करावे, जे पुढील पिढीला मार्गदर्शक ठरेल, किंवा तसे काम जर काळाच्या आड गेले असेल तर ते आपण समाजापुढे आणावे.'' या उक्तीचा उत्तरार्ध आमच्या या कामास लागू पडला तरी यशस्वी ठरलो म्हणेन.

-शरद आपटे

# टीपा व नोंदी

# टीपा व नोंदी